


# मागे वळून बघताना...

श्रीमती मालती मधुसूदन गोडबोले

'मागे वळून पहाताना' या मालती गोडबोले यांच्या आत्मकथेचे पुस्तक त्यांच्या कन्यांनी प्रसिद्ध केले आहे. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार त्यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक विनामूल्य वितरित करण्याची कायदेशीर परवानगी दिली आहे. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

Dr. Rohini Godbole :-9980045804

Mrs. Vibhawari Thakar :- 9881077280

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com

www.esahity.in

# मागे वळून बघताना...

श्रीमती मालती मधुसूदन गोडबोले

◆ **प्रकाशक :**
सौ. सुनिता कार्लेकर
डॉ. रोहिणी गोडबोले
डॉ. सौ. कल्पना गोडबोले
सौ. विभावरी ठकार

◆ **प्रकाशन दिनांक** :
६ मे २०१७

◆ **मुखपृष्ठ** :
अनुजा ठकार

◆ **अक्षरजुळणी व मुद्रक**
प्रतिमा ऑफसेट
१ बी, देवगिरी इस्टेट, सर्व्हे नं. १७/१ बी,
प्लॉट नं.१४, कोथरूड इंडस्ट्रियल एरिया,
कोथरूड, पुणे – ४११०३८.

◆ मूल्य : रु. १५०/–

माझ्या उतावळ्या स्वभावाला शिस्तीचा बांध घालून
माझ्या आयुष्याच्या प्रवाहाला योग्य वळण देणारे
माझे मातापिता व माझे पती यांच्या
स्मृतीस समर्पण...

**श्रीमती मालती गोडबोले**

***



माझे कुटुंब, १९७४



माझे कुटुंब, १९९४

# प्रस्तावना

एखाद्या चित्रपटाची किंवा नाटकाची कथा उत्कंठावर्धक होण्यासाठी त्यात अनेक नाट्यमय घटनांची मांडणी केलेली असते. परंतु सामान्य माणसाचे जीवनही काही कमी उत्कंठावर्धक नसते. प्रत्येक आयुष्याची स्वतःची एक गोष्ट असते. आयुष्यात समोर येणाऱ्या अडचणींना प्रत्येकजण स्वतंत्रपणे सामोरा जात असतो. त्यातूनच तयार होते ही आयुष्याची कहाणी!

अशीच ही आमच्या आईच्या नव्हे आमच्या आईदादांच्या आयुष्याची कथा. आमच्या आईने आयुष्यातील आठवे तपही अर्ध्याहून जास्त ओलांडले आहे. एवढ्या मोठ्या कालखंडात तिने भारतातील राजकीय, सामाजिक वातावरणात अनेक स्थित्यंतरे पाहिली त्याचे बरे वाईट परिणामही भोगले. आजच्या पिढीला साठ सत्तर वर्षांपुर्वी लोकांपुढे काय आव्हाने होती ह्याची एक झलक ह्या पुस्तकात बघायला मिळेल.

प्राथमिक शाळेतून माध्यमिक शाळेत ज्या सहजतेने प्रवेश घेतला जातो तितक्याच सहजतेने शालांत परीक्षेनंतर महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या आमच्यासारख्या भाग्यवान पुण्याच्या मुलींना आमच्या आईच्या शैक्षणिक वाटचालीतल्या अडचणी एक वेगळाच धडा शिकवून जातील हे नक्की.

वरवर अत्यंत परंपरावादी असणारे आमचे दादा! परंतु त्या परंपरावादाच्या आवरणाला अतयंत उदार मानवतावादी अस्तर होते. त्या मानवतावादातून येणारे पुरोगामित्व त्यांच्याकडे होते. त्याच पुरोगामी विचारसरणीचे प्रतिबिंब इथे आपल्याला दिसेल.

अडचणी सर्वांच्याच आयुष्यात येतात. आमच्या आईदादांच्या संसारात सुद्धा आल्या. त्यांनी एकमेकांच्या साथ देत एकविचारांनी त्या अडचणींवर मात केली. अत्यंत प्रामाणिकपणे आयुष्याची वाटचाल करताना त्यांनी

जीवनाकडून काही अवास्तव अपेक्षा नाही ठेवल्या. छोटीछोटी उद्दिष्टे ठरवून ती साध्य करण्यासाठी प्रयत्न केले आणि हळूहळू एक एक पायरी चढत एक समृद्ध संसार निर्माण केला. ही समृद्धी नुसती आर्थिक नाही तर वैचारिक सुध्दा आहे.  त्यांच्या आयुष्याला सत्याचे आणि संस्कारांचे सुरेख अधिष्ठान आहे. आमच्या आयुष्यातील अडथळे पार करण्यासाठी आम्हाला नेहमीच त्यांच्या शिकवणीतून आणि अनुभवांमधून बळ मिळत आले आहे. हेच बळ प्रत्येक वाचकास मिळो हीच अपेक्षा.

**– सौ. विभावरी ठकार**

❍ ❍ ❍

# ऋणनिर्देश

हे पुस्तक प्रकाशित होण्यामध्ये अनेकांचा हातभार लागला आहे. इथे त्यांचा उल्लेख करणे अनिवार्य आहे.

माझा नातजावई प्रशांत साठे ज्याने सर्वप्रथम मला मी माझ्या आठवणी लिहून काढाव्यात हे सुचवले.

माझ्या बंगलोर वास्तव्यामध्ये मी लिहिलेल्या मजकुरावर चर्चा करुन मला सतत प्रोत्साहन देण्याचे कार्य डॉ. निरंजन जोशी यांनी केले.

माझे लिखाण रटाळ न होता रंजक कसे होईल याचे मार्गदर्शन मला लेखिका सौ. अपर्णा भावे यांनी केले.

पुस्तकाच्या संपादनाची जबाबदारी माझी नात पूजा ठकार हिने उचलली तर भाषाशुद्धतेकडे श्रीमती अंजली खानीवाले यांनी लक्ष पुरवले.

पुस्तकाचा सजावटीचा भार माझी धाकटी नात अनुजा ठकार हिने उचलला.

या सर्व प्रक्रियांमध्ये माझ्या मुलींचा सक्रीय सहभाग होता.

पुस्तकाचे सुबक मुद्रण प्रतिमा ऑफसेटचे अजित ठोंबरे व त्यांचे सहकारी यांच्यामुळे शक्य झाले.

अशा अनेक हातांनी हा जगन्नाथाचा रथ ओढून इथपर्यंत आणला आहे.

या सर्व आप्तेष्टांचे आभार मानून मला त्यांच्या सहाय्याचे मोल कमी करायचे नाही. त्यामुळे मला त्यांच्या ऋणात रहाणे आवडेल.

धन्यवाद!

**श्रीमती मालती गोडबोले**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | मनोगत | ९ |
| २. | माझी शैक्षणिक वाटचाल | २० |
| ३. | माझी अभ्यासेत्तर वाटचाल | ५२ |
| ४. | माझे आजोळ | ६१ |
| ५. | माझी आई | ६९ |
| ६. | वाटचाल विवाहाच्या दिशेने | ७७ |
| ७. | अरे संसार संसार, माझे सासर | ९० |
| ८. | आम्ही पुणेकर झालो | ११२ |
| ९. | रोहिणी व कल्पनाचा जन्म | १२० |
| १०. | देवळाली – एक अनुभव | १३१ |
| ११. | ३९, बुधवार पेठेतील दीर्घ कालखंड | १४७ |
| १२. | माझे आजोळ सासर | १५४ |
| १३. | कमलाकरचे लग्न व इतर बरेच काही | १६३ |
| १४. | पानशेतचा पूर | १६६ |
| १५. | एक सीमोलंघनः वाटचाल प्रगतीच्या दिशेने | १७२ |
| १६. | अविश्वसनीय तरीही खरे असे काही तरी | १८३ |
| १७. | हुजूरपागा मुली आणि मी | १८८ |
| १८. | वेध निवृत्तीचे | १९५ |
| १९. | निवृत्तीनंतर | २०५ |
| २०. | पती निधनाचे दुःख | २१२ |
| २१. | माझा वानप्रस्थाश्रम | २१६ |
| २२. | लेखिकेच्या काही कविता | २२० |


❍ ❍ ❍

# मनोगत

**।। श्री ।।**

*जीवन मृत्यूच्या सीमारेषेवर,*
*नांगर टाकून उभी आहे,*
*माझ्या जीवनाची नौका ।*
*समोर पसरलेला,*
*अनंताचा असीम अथांग महासागर,*
*खुणावतो आहे मला ।*
*मीही उत्सुक त्याच्या कवेत शिरायला ।।*

*पाठीमागे पुळणीवर पसरलंय,*
*भरतीच्या लाटांनी विणलेले,*
*असंख्य नागमोडी रेषांचे जाळे ।*
*त्यातून डोकावताहेत लहान मोठे शंख शिंपले,*
*काही उघडे काही मिटलेले ।*
*काहींच्या व्याकूळ नजरा,*
*विचारताहेत मला,*
*का गं निघालीस इतक्यात ?*
*कंटाळलीस आम्हाला ।।*

*विचारते आहे मी माझेच मला ।*
*खरंच का निर्णयाचे स्वातंत्र्य आहे मला?*
*का! मी पण वाट पाहते आहे,*
*नांगर उचलण्याचा इशारा देणाऱ्या भोंग्याची ।*
*एका अदृश्य अनाम शक्तीच्या निर्णयाची ।।*

हे नागमोडी रेषांचे जाळे म्हणजे माझ्या अदष्टाचा आलेख वाटतो आहे मला. या शंख शिंपल्यांमध्ये तर दडल्या आहेत अनेक आठवणी. काहीत टपोरे गोळीबंद मोती आहेत तर काही नुसतेच रिकामे, काही दुःखाची धग देणारे, काही सुखाची झालर विणणारे. पूर्वसंचिताचे गाठोडे बरोबर घेऊन आजवर जीवन जगले मी. मिटलेल्या शिंपल्यांमधे सामावलीय पुढच्या प्रवासाची तयारी. आयुष्याच्या संध्याकाळी मागे वळून बघताना स्वतःच्या आयुष्याचे मूल्यमापन करण्याचा ध्यास घेतला आहे मनाने. वाटले, विचारांच्या आवर्तात नुसतेच गिरक्या घेत बसण्याऐवजी हे विचार शब्दबद्ध करावेत.

माझे पूर्वसंचित बहुधा चांगले असावे म्हणून अत्यंत सात्विक व चारित्र्यसंपन्न आई–वडिलांच्या पोटी माझा जन्म झाला.

माझे वडील धोंडो गोविंद दांडेकर. पूर्वीच्या B.B.C.I. व आताच्या Western Railway च्या District Traffic Superintendent ऑफिसमधील एक सामान्य कारकून. माझी आई इंदूरच्या गोळ्यांची. हुकूमचंद मिलच्या रंगखात्यात नोकरी करणाऱ्या सामान्य गृहस्थांची मुलगी. पण या परिस्थितीशरण सामान्यांमध्ये लपले होते एक असामान्यत्व! ज्याच्यामुळे घडले माझे व्यक्तिमत्त्व! समाजाचा कणा समजल्या जाणाऱ्या मध्यमवर्गीय संस्कारी पांढरपेशांचे प्रतिनिधित्व करणारे माझे साधेसुधे माहेर. त्याचेच चित्र उभे करण्याचा हा एक प्रयास. अनेक आठवणींनी मनात फेर धरला. आठवणींचा पदर धरून मागे मागे भूतकाळात शिरताना मागोवा एका बिंदूपाशी स्थिरावला. ती माझ्या आयुष्यातली पहिली वहिली आठवण.

''चल बाई जिजी निघते आता, पाच वाजायला आले. वेळ कसा गेला कळलंच नाही.'' असे म्हणत म्हणतच कमलाबाई उठल्या व त्यांनी लेकीला हाक मारली. अंगणात मावसभावंडांबरोबर खेळण्यात दंग झालेली चिमुरडी धावतच आत आली व आईचे बोट धरून बाहेर पडली.

मार्च–एप्रिल महिन्यामधील राजस्थानातली एक संध्याकाळ. उन्हे कलली होती. कोटा शहर चंबळ नदीच्या काठावर वसलेले. त्यामुळे दुपारी रखरखणारे ऊन असले तरी संध्याकाळी सुखद गारवा, त्यातच रेल्वे कॉलनीतले मोकळे वातावरण. मायलेकी रस्त्यावर आल्या. चिमुरडीचे लक्ष डोक्यावरच्या विजेच्या तारांकडे गेले. एक कावळा तारेला उलटा लटकलेला पाहून ती आईला म्हणाली, ''आई तो बघ कावळा कसा झोका खेळतोय.'' आई वर पाहून म्हणाली, ''अगंबाई विजेचा धक्का बसून मेलेला दिसतोय.'' चिमुरडीला काय वाटले कुणास ठाऊक. तिने आईला विचारले, ''आई, आपली सुमन पण या कावळ्यासारखीच मेली का गं?''

मृत्यू म्हणजे काय हे कळण्याचे तिचे वय नव्हते, पण आपल्या नुकत्याच निवर्तलेल्या पाठच्या बहिणीसंदर्भात ऐकलेले शब्द तिला आठवले असावेत. आईच्या उत्तरासाठी न थांबता ती धावतच पुढे गेली. ऑफिसमधून घरी परत येणारे वडील समोर दिसले होते. त्यांचे बोट धरून घरात शिरता शिरता वडिलांनी विचारले, ''काय आज किती गोवऱ्या थापल्या शेणथापे बाईंनी?'' ''शेणथापे बाई आज मावशीकडे गेल्या होत्या त्यामुळे गोवऱ्यांना सुट्टी,'' आई उत्तरली.

रस्त्यावरील जाणाऱ्या येणाऱ्या गाई–म्हशींचे शेण गोळा करून आजूबाजूच्या बायका गोवऱ्या थापत असत. त्यांचे बघून चिमुरडी पण शेण गोळा करून आणी व गोवऱ्या थापत असे. त्यावरून वडील व काका तिला मालतीबाई शेणथापे म्हणून चिडवीत असत.

एकदा तिचे काका गंमतीने म्हणाले, ''दत्तुकाका, बाबुकाका विचार करिती की मालूताईचे करू लग्न.'' त्यावर वडील म्हणाले होते, ''छे छे! इतक्यात नाही करायचे आपल्या मालूताईचे लग्न. आपण मालूताईला आधी एम. डी. करू, मग तिचे लग्न करू, म्हणजे आपली मालूताई एम.डी. दांडेकर, एम.डी. असे लिहील.'' आपले शिकण्याचे अर्धवट राहिलेले स्वप्न मुलीकडून पूर्ण करून घेण्याची इच्छा बाळगणारे वडील म्हणाले.

चहा घेता घेता बाबुराव बायकोला म्हणाले, ''येत्या रविवारी आपल्याला बडोद्याला जायचे आहे. दादाच्या गोदीचे लग्न ठरले आहे. सोमवारी लग्न आहे. मी दोन दिवसांची रजा टाकतो. रविवारी सकाळी निघू. काय?''.

''बरं झालं बाई तिचं लग्न ठरलं ते. कुठे पसंतच पडत नव्हती बिचारी,'' कमलाबाई म्हणाल्या. थोड्या वेळाने बाहेर येऊन कमलाबाई म्हणाल्या, ''ऐकलं का, गेले वर्षभर घरी भांडी घासून व पाणी भरून मी काही रक्कम जमा केली आहे. त्यातून सोने खरेदी करून मालूला बिल्वर करू या का? अनायासे जातोच आहोत बडोद्याला म्हणून म्हणते.''

बायकोचा काटकसरी स्वभाव बघून बाबूराव मनोमन सुखावले. म्हणाले, ''आज माझ्याकडे पण एक आनंदाची बातमी आहे. मला प्रमोशन मिळते आहे! आता माझा पगार एकशेवीसपर्यंत वाढेल. थोडे थोडे करून मी पण तीनशे रुपये साठवले आहेत. मालूला बिल्वर आणि तुला पाटल्या करून टाकू आपण.'' कमलाबाई समाधानाने हसल्या.

ठरल्याप्रमाणे मंडळी सीमांतपूजनाच्या वेळी पोहोचली. पण पाहातात तो काय! लग्नाच्या मांडवाला रणांगणाचे रूप आलेले. वरपिता तणतणत म्हणत

होता,''आधी हुंड्याची रक्कम मोजा, त्याशिवाय जागचा हलणार नाही मुलगा. मागाहून देतो वगैरे काही चालणार नाही. जमणार नव्हते तर ठरवते वेळी कुठे गेली होती अक्कल?'' वगैरे वगैरे...

बाबुरावांना क्षणात परिस्थितीची जाणीव झाली. बायकोला बाजूला घेऊन म्हणाले, ''दादाचा स्वभाव तुला माहीतच आहे. काय करतो पगाराचे कुणास ठाऊक? आता जर वरात परत गेली तर केवढी नाचक्की! किती छी थू होईल दांडेकरांची बडोद्यात? आणि त्या मुलीचे काय? मी तुझ्या पाटल्यांसाठी आणलेले पैसे पुढे करू का? तुझा हिरमोड होईल हे कळतंय मला. पण एक वेल मांडवावर चढवल्याचे पुण्य लागेल आपल्याला. पुन्हा पैसे गोळा होईतोपर्यंत वाट पाहायला तयार असलीस तर देऊन टाकतो. मला तरी आत्ता हेच आपले कर्तव्य आहे असे वाटते.'' कमलाबाईंनी खट्टू मनाने होकार दिला व प्रसंग निभावला. हे पैसे बाबुरावांना तब्बल पंधरा वर्षांनंतर, म्हणजे वडील भावाच्या रिटायरमेंटनंतर मिळालेल्या फंडाच्या रकमेतून परत मिळाले.

वाघेर लोकांनी केलेल्या बंडाचा बीमोड करण्यासाठी जी काही मंडळी गायकवाडांबरोबर गुजरातेत गेली होती त्यातील एक कुटुंब. आम्ही दांडेकर मूळचे नेरळजवळील उद्धररामेश्वरचे. माझे आजोबा कोर्टात नाझर होते. एक चुलत आजोबा जुनागड स्टेटचे दिवाण, तर दुसरे मद्रासच्या कॉमर्स कॉलेजचे मुख्याध्यापक होते.

माझ्या थोरल्या चुलत्यांमध्ये व वडिलांमध्ये जवळजवळ पंधरा वर्षांचे अंतर होते. आजीची मुले जगत नसत म्हणून वडिलांचे नाव धोंडू ठेवले होते. वडील दहा वर्षांचे असतानाच आजोबा निवर्तले. लहान भाऊ आठ वर्षांचा होता. तोपर्यंत आजोबांच्या भावंडांची शिक्षणे, स्वतःच्या दोन मुलींची लग्ने व मोठ्या मुलाचे लग्न झालेले होते. बडोद्याला कप्तानच्या खाच्यात स्वतःचे लहानसे घर होते.

मोठ्या मुलाचे जरी लग्न झालेले असले तरी आजीला या मोठ्या मुलाचा म्हणावा तसा काहीच आधार नव्हता. उलट, हे गृहस्थ स्वतःची बायको-मुले बडोद्याला पाठवून देत व पैसे पाठवीत नसत. दरवेळी पत्र येई, 'पगार मास्तर रजेवर गेला आहे. तो येताच पैसे पाठवतो.' रजेवर गेलेला पगार मास्तर व पैसे कधीच आले नाहीत. आजी वडिलांना म्हणे, ''अरे बाबू, जरा जाऊन बघून तरी ये रे. पगार मास्तर जर असा महिनोनमहिने रजेवर जात असेल तर लोकांची घरे कशी चालत असतील रे?''

आजी स्वतःचे किडूक-मिडूक विकून एखादा भाडेकरू ठेवून कसे बसे घर

चालवी. एका स्नेह्याच्या ओळखीने वडिलांना बडोद्याच्या कमेटी बागेत तासभर झाडांना पाणी देण्याचे काम मिळाले होते त्याचे रोज चार आणे मिळत.

अशा परिस्थितीत एक दिवस असा उजाडला की आजीने मुलांना चणे कुरमुरे खायला घालून झोपवले व सूरसागरावर राहाणाऱ्या आपल्या सावत्र मामेसासऱ्यांकडे गेली.

***

''या मामा, आज सकाळी सकाळीच इकडे कुणीकडे?'' उजाडताच मामांना आलेले बघून जयरामपंतांनी विचारले. ''अरे, तू आणि महादेव बडोद्यात आलाय हे कळले, म्हटलं भेटून यावे भाच्यांना,'' मामा उद्‌गारले.

''असे काय म्हणता मामा. बडोद्यात आल्यावर आम्ही कधीतरी तुम्हाला भेटल्याशिवाय परत जातो का? येणारच होतो आज संध्याकाळी आम्ही तुमच्याकडे,'' महादेव बाहेर येत म्हणाला.

''तसे नाही रे बाबांनों, थोडे निवांतपणे तुमच्याशी बोलावे म्हणून आलो आहे,'' मामा बैठकीवर बसता बसता म्हणाले. ''अरे, काल दुर्गी माझ्याकडे आली होती. बाळा, तिला अजिबात विचारीत नाही. तिचे सर्व मार्ग बंद झाले आहेत. बाबूला कमेटी बागेत माळ्याचे काम लावून दिले होते, पण ब्राह्मणाचा मुलगा. माळ्याचे काम करतो अशी कोणीतरी चुगली केली आणि तेही काम बंद झाले. आता मुलांना अन्नछत्रात पाठवून ती कुठेतरी स्वयंपाकाचे काम बघण्याच्या विचारात आहे. खरं तर तिचा बाबू हुशार आहे. मी त्याच्याकडून संस्कृत करून घेतो आहे, बहुधा जगन्नाथ शंकरशेट मिळवील. पण तोपर्यंत तरी तग धरून राहायला हवे का नको? सावत्र झाला तरी गोविंदा भाऊच होता ना तुमचा? काशीनाथपंत गेल्यावर त्याने मदतीचा हात पुढे केला नसता तर दिसले असते का हे दिवस? दांडेकरांची मुले अन्नछत्रात जेवतात हे तुम्हाला लांच्छनास्पद आहे असे वाटते म्हणून आलो आहे. नाहीतर मागाहून म्हणाल, आम्ही इथे नसतो, मामांनी आम्हाला काहीच कसे सांगितले नाही? बोला काय विचार आहे तुमचा?''

हे मामेसासरे म्हणजे सूरसागरावरील बाबजी सदनामध्ये राहणारे संस्कृततज्ज्ञ देवधर.

महादेव व जयराम यांनी एकमेकांशी विचारविनिमय करून असे ठरविले की ते दोघे मिळून या कुटुंबाला माझे वडील मॅट्रिक होईपर्यंत दरमहा पंधरा रुपये पोचते करतील.

बाबू यथावकाश मॅट्रिक झाला. पण जगन्नाथ शंकरशेट एका मार्काने हुकली.

महादेवकाकांनी त्याला शिक्षणासाठी मद्रासला नेण्याची तयारी दर्शवली. कॉलेजमध्येसुद्धा Freeship मिळत होती, पण आई व भाऊ यांना आपला मोठा भाऊ सांभाळील याची खात्री वाटत नसल्याने त्यांने पुढे शिकण्याचा विचार मनावेगळा केला.

त्याकाळी, प्राथमिक शिक्षकाला दरमहा १५ रुपये पगार मिळे. ''त्याऐवजी तू माझ्याबरोबर गंगापूरला चल, मी तुला एक दरमहा २५ ची नोकरी देतो,'' असे एक गृहस्थ म्हणाले. सदर गृहस्थ गंगापूरला B.B.C.I. रेल्वेत स्टेशनमास्तर होते. कोटा ते दिल्ली या मार्गावरून रुळ टाकण्याचे काम सुरू होते. तेथे District Trafffic नुकताच Supritendent इंग्लंडहून आलेला होता आणि सदर गृहस्थांना त्याच्याशी संवाद साधणे अवघड जात होते. त्याकाळी, इंग्रजी दोन–तीन इयत्ता झालेल्यांना पण नोकरी मिळत असे. वडिलांचे नाव Unskilled Labour मध्ये दाखवून हे गृहस्थ त्यांच्याकडून स्वतःची कामे करून घेत असत. वडिलांना याची काहीच कल्पना नव्हती.

एकदा असे झाले की तो Supritendent साहेब तपासणीसाठी आलेला असताना काही स्पष्टीकरण देण्यासाठी स्टेशनमास्तरने वडिलांना बोलावून घेतले. बोलून झाल्यावर साहेब वडिलांना म्हणाले, "You seem to be quite intelligent. Why are you rotting here as unskilled labour? Come with me. I will appoint you as a senior clerk in my office." अशा रीतीने, निव्वळ नशिबानेच वडिलांची त्या वेठबिगारीतून सुटका झाली व ते B.B.C.I. Railway त कारकून म्हणून कोट्याला रुजू झाले. पगार दरमहा रु. पस्तीस.

वडिलांना चांगली नोकरी मिळाल्याच्या आनंदात आजीने आवराआवरीला सुरूवात केली. स्वतःची बडोद्यातील सर्व देणी भागवण्यासाठी तिने गोळे वकिलांकडे घराला भाडे नाही व पैशाला व्याज नाही या करारावर दहा वर्षांसाठी घर गहाण ठेवले, व ती मुलांबरोबर कोट्याला राहावयास आली. पुढील दोन वर्षांत वडिलांनी माझ्या धाकट्या काकांना पण D.T.S. ऑफिसमध्ये ज्युनिअर क्लार्क म्हणून चिकटवून टाकले. दिवस सुखाचे आले असे वाटत असतानाच मारुतराव वकिलाकडून ताबडतोब व्याजासह पैसे भरा नाही तर गहाण डुल करतो अशी नोटीस आली.

आजीला काहीच कळेना. घर गोळे वकिलांकडे गहाण असताना मारुतराव नोटीस कशी पाठवतो? चौकशीअंती समजले की निव्वळ तीनशे रुपये जास्त घेऊन माझ्या थोरल्या चुलत्यांनी घर गोळे वकिलांकडून काढून घेऊन तीन वर्षांच्या

कराराने मारुतरावांकडे तबदील केले होते, व त्यानुसार ही नोटीस आली होती.

हा घाव आजीच्या वर्मी लागला. ती रात्रंदिवस रडून काढू लागली. त्यातून ती बाहेर पडावी म्हणून वडिलांनी तिला त्यांचे शेजारी वृंदावन मथुरेच्या यात्रेला निघाले तेव्हा त्यांच्याबरोबर पाठवायचे ठरवले. पण मनाच्या अशा विमनस्क अवस्थेत, रात्री धर्मशाळेचा जिना उतरून खाली येत असताना पाय घसरून पडल्याचे निमित्त झाले व त्यातच तिची प्राणज्योत मालवली.

ही सर्व हकीगत मी मॅट्रिक झाले त्यावर्षी माझ्या वडिलांकडून ऐकायला मिळाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर वाढती महागाई व वाढता संसार याने माझे वडील थोडे मेटाकुटीला आले होते. याच सुमाराला, माझ्या दुसऱ्या चुलत बहिणीचे यजमान हृदयविकाराने दगावले. तिला तिच्या तीन मुलांसकट आमच्याकडे पोहोचवून माझे थोरले चुलते जे मुंबईला निघून गेले, त्यांनी नंतर साध्या पत्रानेसुद्धा तिची विचारपूस केली नाही.

या संदर्भात वडिलांना एकदा आईशी बोलताना मी ऐकले होते. ''तुला असे वाटत असेल की, या महागाईत मी मैनीचे व तिच्या तीन मुलांचे लोढणे कशाला गळ्यात घेतले. पण तुला खरं सांगू का, तिचा फंड मिळून तो नीट गुंतवून तिचे लागी लागेपर्यंत तरी तिला आपण सांभाळले पाहिजे. ती व तिचा फंड दादाच्या हातात सुरक्षित राहतील याची मला खात्री वाटत नाही. आपल्याला त्रास होतो हे मला कळत का नाही? पण तिच्या हिताच्या दृष्टीने आपण थोडी कळ काढायलाच हवी.'' पुढे तिला शिवणाचा कोर्स करायला लावले व बडोद्याच्या राणी चिमणाबाई हायस्कूलमधे ती शिवण शिक्षिका म्हणून नोकरी करू लागली.

परीक्षा पास झाल्यावर वडील मला म्हणाले होते, ''नशीबवान आहात. मुलगी मॅट्रिक झाली म्हणून बाप पेढे वाटतो आहे.'' त्यांना एकूणच शिक्षणाविषयी फार आस्था वाटत असे. माझ्या एका आतेभावाला तो B.A. होईपर्यंत दरमहा पाच रुपये पाठवीत असत.

आमच्या घरी केसरी व विविधवृत्त, स्त्री, किर्लोस्कर व मनोहर ही मासिके येत असत. तसेच चार आणे माला, धनंजय छोटूच्या रहस्यकथा, सुरस ग्रंथमालेची अनेक प्रकाशने, हरि नारायण आपट्यांच्या कादंबऱ्या व अनेक नाटकांची पुस्तके होती. मराठी रंगभूमीचा तो सुवर्णकाळ होता. वडील पास काढून शनिवार–रविवार मुंबईला जाऊन नाटके पाहात. जवळ जवळ सत्तर ते ऐंशी नाटकांची पुस्तके आमच्या घरी होती. पाहिलेल्या प्रत्येक नाटकाचे पुस्तक ते विकत घेत.

वडिलांची वृत्ती प्रयोगशील होती. ठकूबाई, कंदिल, हंडीचा दिवा इत्यादी

विविधे दिवे किती रॉकेल घातले असता किती तास प्रकाश देतात याचा सप्रयोग तपशील त्यांच्याकडे होता. त्याप्रमाणे देवघरात ठकूबाई, स्वयंपाकघरात कंदिल व बैठकीच्या खोलीत हंडी दिवा अशी उजेडाची व्यवस्था असे. पत्र्याच्या डब्यांना रंग लावून त्यावर आतल्या वस्तूंची नावे खडूने लिहीत. कधी कधी आई पहिले नाव पुसून दुसरे लिहावयास विसरे त्यामुळे विनोद निर्माण होई. त्यावरून ते तिला चिडवीत असत. ते इतके व्यवस्थित होते की अंधारातसुद्धा त्यांच्या टेबलावरील रबर किंवा पेन्सिल मिळायला अडचण येत नसे. आईला ते पसारा परायण म्हणत. तांबूस गौरवर्ण, टपोरे तपकिरी मोठे डोळे, व्यायामाने कमावलेले पिळदार शरीर असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. अठरा अध्याय गीता त्यांना तोंडपाठ होती. याशिवाय गंगाष्टक, यमुनाष्टक, नर्मदाष्टक, चर्पटपंजरिका, शिवमहिम्न व जगन्नाथ पंडितांची गंगालहरी ते रोज म्हणत. रोज एकशे आठ सूर्यनमस्कार घालीत. आळस कसा तो त्यांना ठाऊक नव्हता. पहाटे चार वाजता उठून सर्व आन्हिके उरकत असत. त्यांना कविता करण्याचा पण नाद होता. त्यांनी केलेल्या काही कविता मी पाहिल्या होत्या. त्यातली त्यांच्या स्वतःच्या लग्नाची काव्यमय आमंत्रणपत्रिका मला एकदा जुन्या कागदात सापडली. त्यातल्या दोन–तीन ओळीच आज आठवतात.

‘इंदूरस्थ गृहस्थ सज्ञन अती गोळे उपाख्या जया। व नामे जी कमला फुलास सरला शोभा आणि ही अशी!’ यावरून थोडी कल्पना यावी. मला त्यांनी परशुरामपंत तात्या गोडबोले यांच्या वृत्तदर्पण या पुस्तकाच्या साहाय्याने मात्रावृत्ते व गणवृत्ते शिकवली होती.

कटाक्षाने प्रत्येक गोष्ट नियोजनपूर्वक करण्याकडे त्यांचा कल असे. सूत्रमय पद्धतीने व्यवहारातील कितीतरी गोष्टी ते आम्हाला समजावून सांगत असत. ते म्हणत बँकेत पैसे ठेवून उपाशी राहू नये व कर्ज काढून खाऊ नये. मुलीचे लग्न, मुलाचे शिक्षण व आजारपण यासाठीच फक्त जरूर पडल्यास कर्ज काढावे. वाणी, दूधवाला, घरभाडे यांची कधीही उधारी ठेवू नये. या गोष्टी दुसऱ्या महिन्यात दुप्पट होतात. डॉक्टर व कापडवाला यांना दरमहा थोडे थोडे पैसे देऊन भागवावे. सत्कर्माचे महत्त्व पटवण्यासाठी ते आम्हाला सांगत, ‘‘अगं, माणसाने नेहमी चांगले वागत असावे. सत्कर्म पेरीत असावे. ते कुठे तरी उगवतेच उगवते. देवाची शेती आपल्या शेतीपेक्षा खूप निराळी असते. आपण जिथे पेरतो तिथेच उगवते. पण देवाच्या शेतीत आपण पेरतो एका ठिकाणी पण उगवते मात्र दुसरीकडे. पण उगवते हे नक्की.’’ कर्मकांडावर त्यांचा फारसा विश्वास नव्हता पण प्राणायाम व

ध्यानधारणा करीत.

माझी आई व त्यांच्यात कधी मतभेद होत नसत असे नाही. पण भांडणे झालेली मी कधीच पाहिली नाहीत. आई सहसा त्यांच्या सांगण्याबाहेर नसे. परंतु कधी जर त्यांचे निर्णय चुकीचे वाटले तर ती आपले म्हणणे मागे घेत नसे व त्या वेळी तेही तिचे म्हणणे ऐकत असत.

रेशनिंगच्या काळात एकदा मला म्हणाले, ''मालू, यावेळी माझ्यासाठी पण रेशनिंगची धोतरे आण. तुम्ही रेशनिंगच्या साड्या नेसता, आई हुकूमचंद मिलची जाडीभरडी वायल नेसते, मग मीच कोण टिकोजी लागून गेलो कॉलिको व फिनलेची धोतरे नेसायला?'' असे जरी असले, तरी आमचे दूध, खाणेपिणे व औषधोपचार यात कधी काटकसर नसे.

त्यांच्या या नियोजनाला पहिला हादरा बसला १९४० साली. त्या वेळी आम्ही रतलामला होतो. त्यांचा वरिष्ठ सनतकुमार पैसेखाऊ व हाताखालचा मगनलाल कामचुकार. यामुळे त्यांची कोंडी होत असे. स्वतः अत्यंत निस्पृह असल्याकारणाने अनेक वेळा अडकित्त्यात सुपारी अशी अवस्था होई. या ताण तणावांचा प्रकृतीवर परिणाम न झाला तरच नवल. अशा अवस्थेत एक दिवस ते राजीनामा देऊन घरी आले. काय करावे सुचेना. शेवटी मी व आई रेल्वेचे डॉ. वकील यांचेकडे गेलो व सर्व परिस्थिती निवेदन केली. त्यांनी Sick Certificate देऊन Change of Climate चा सल्ला दिला. सनतकुमारकडे जाऊन दादा–बाबा करून राजीनामा परत आणला. त्यासाठी आम्ही कोट्याला माझ्या धाकट्या चुलत्यांकडे जायचे ठरवले. घरी जाताना रस्त्यात आई मला म्हणाली, ''आपण दर वेळी कोट्याला जातो त्यापेक्षा आजची परिस्थिती निराळी आहे. आज आपण आश्रितांसारखे जातो आहोत असे मला वाटते आहे. प्रभी लहान आहे, तिला कळत नाही. पण तू मोठी आहेस, मला खाली पाहावे लागेल असे काही वागू नकोस.'' लख्खकन वीज चमकून जावी असे झाले. क्षणात मी मोठी झाले. त्यावेळी माझ्या स्वभावातला पोरकटपणा व हूडपणा एकदम कमी झाला. त्या क्षणापासून, मी व माझी आई जणू जिवाभावाच्या मैत्रिणी झालो. तिच्या माझ्यात अशी कोणतीही गोष्ट नव्हती जी एकमेकींना माहीत नव्हती. नंतर मला व माझ्या धाकट्या बहिणीला एका स्नेह्यांकडे ठेवून ते धाकट्या भावासकट मुंबईला गेले. तिथे वैद्य अप्पाशास्त्री साठे यांच्या औषधोपचाराने वडिलांची प्रकृती सुधारू लागली व १९४१ च्या मे महिन्यात त्यांची प्रमोशनवर कोट्याला बदली झाली. या काळात, मी माझ्या डोळ्यांनी त्यांची पासबुकातली शिल्लक शून्यावर गेलेली

पाहिली. त्यांना बडोद्याला स्वतःची वास्तू खरेदी करावयाची होती. परंतु दैवमन्यत्र चिन्तयेत् हेच खरे.

रिटायरमेंटनंतर चार शिकणारी मुले घेऊन ते बडोद्याला गेले. त्या वेळी ते आईला घरकामात मदत करीत. भांडी लावणे, केर काढणे, धुणे वाळत घालणे, पाणी भरणे इत्यादी कामे स्वतःकडे घेतली. म्हणत, ''मला निवृत्ती आहे, तिला कुठली आलीय निवृत्ती? जन्मभर तिने घर व बाहेरील व्यवहार सांभाळले. आता मी नाही तर कोण तिला मदत करणार?''

निवृत्तीनंतर काही दिवस Re-employment घेऊन ते दोहदला नोकरी करीत होते. त्या वेळी एका जुन्या वॅगनमध्ये राहात व स्वतः स्वयंपाक करून जेवत. मी त्यांना ''या वयात ही दगदग कशाला करता'' असे विचारल्यावर म्हणाले, ''अगं, आता मी असलो काय आणि नसलो काय, काय फरक पडणार आहे? दिवसेंदिवस महागाई वाढते आहे. माझी बायका-मुले तेवढीच चार दिवस जास्त जेवतील.'' मनात आले, कर्मयोग याहून काही वेगळा असतो का?

पूर्वायुष्यात घेतलेल्या काही चुकीच्या निर्णयांची कबुली उत्तरायुष्यात देण्याचा प्रांजळपणा पण त्यांच्या ठिकाणी होता. म्हणत असत, ''मी आयुष्यात तीन चुका केल्या. मालूला पुढे शिकू दिले नाही, वसंताला रेल्वेत शिक्षण सोडून apprenticeship घ्यायला लावली व सुमन्ताला गणित सोडून Economics घेऊन पुन्हा परीक्षेला बसायची संधी दिली नाही.'' याची खंत त्यांना शेवटपर्यंत वाटत राहिली. पण आम्ही तिघांनीही चिकाटीने आपापली आयुष्ये यशस्वी केली, याचेही त्यांना कौतुक वाटे. लग्नानंतर जवळ जवळ अकरा वर्षांनी मी बहिःस्थ विद्यार्थिनी म्हणून B.A.ची परीक्षा दिली तेव्हा त्यांनी मला gown घालून डिग्रीचा फोटो काढून घ्यायला लावला व तो बैठकीच्या खोलीत लावला. त्या वेळी त्यांनी एक-दोन ओळींचे काव्यपण करून पाठवले होते.

*नयन झाकिले सुंदर चष्मे, फ्रेम लाविली वरि सोन्याची*
*रिस्टवॉच मनगटा लाविले, पास परीक्षा युनिव्हर्सिटीची.*

वसंताने apprenticeship संपवून A.P.W.I म्हणून रेल्वेत नोकरीला लागल्यावर A.M.I.E.च्या परीक्षा देऊन तो रेल्वेत Assistant Executive Engineer झाला, व सुमन्ताने सयाजी हॉस्पिटलमध्ये Lab Assistant चे काम करून Shorthandचा कोर्स पूर्ण केला व I.P.C.L. मधे चांगल्या पगारावर Shorthand Typist म्हणून लागला. नोकरीला लागल्यावर वसंता पाठवत असलेल्या पैशांमधून ते ठराविक रक्कम नियमितपणे त्याच्या लग्नाची तरतूद म्हणून शिल्लक टाकीत.

याच सुमारास आणखी एका संकटाने त्यांना ग्रासले. आईला क्षयाचा संसर्ग होऊन ती आजारी पडली. उतारवयातल्या या संकटाला ते खंबीरपणे सामोरे गेले. तिच्या औषधपाण्यात यत्किंचितही हयगय केली नाही. स्वयंपाकाला बाई ठेवून इतर सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्या. आई वारंवार त्यांना खर्चाबद्दल विचारी, पण त्यांनी तिच्या औषधपाण्यासाठी होणाऱ्या खर्चाची कधीच वाच्यता केली नाही. एक गोळ्यांची बाटली उघडल्यावर ती संपण्याआधीच दुसरी बाटली आणलेली असे. आईला बरे वाटल्यावर डॉ. कीर्तन्यांनी आईला सांगितले, ''माझ्या औषधाइतकेच नव्हे तर त्याहूनही जास्त श्रेय तुमच्या यजमानांनी जी तुमची काळजी घेतली त्याला द्यायला हवे.''

शेवटची दीड–दोन वर्षे ते अंथरुणावर होते. खूप हाल झाले त्यांचे. सुमन्ता व आई त्यांची निरलसपणे सेवा करीत. परंतु शारीरिक व्याधी ज्याच्या त्यालाच सोसाव्या लागतात. Bedsoras झाले होते. मृत्यूपूर्वी आपल्या सर्व मुलांना प्रगतिपथावर वाटचाल करताना त्यांनी ऐकले. त्यांना भेटायला गेले असता मी विचारले, ''बाबुकाका, का देव तुमची या हालातून सुटका करीत नाही? कुठे जीव अडकलाय तुमचा?'' तर ते म्हणाले, ''खरं सांगू का तुला ! माझा जीव तुझ्या आईत अडकला आहे. माझे असे फक्त पाच हजार रुपये मी तिच्यासाठी ठेवले आहेत. मुलांनी तिला नीट बघितले नाही तर काय, याची काळजी वाटते मला.'' मी त्यांना सांगितले, ''तुमचे संस्कार इतके कुचकामी आहेत असे वाटते का तुम्हाला? आपली मुले चांगली आहेत. ती असे काहीही करणार नाहीत.'' त्यावर ते म्हणाले, ''ते खरं ग! पण त्यांच्या बायका? जगाचे पाहिले की काळजी वाटते. वसंताची बायको चांगली आहे, पण दुसऱ्या दोघी कशा असतील हे काय सांगावे?'' त्यावर मी त्यांना सांगितले, ''तुमचा जावई कसा आहे हे तुम्हाला माहीत आहेच. मलाही आता नोकरी लागली आहे. माझ्या सासरच्या सर्व जबाबदाऱ्या मी पार पाडल्या आहेत. मी फार श्रीमंत नाही, पण भावांनी आईला नीट बघितले नाही तर मी त्यांना फाडून खाईन. आणि अतःपर वेळ आलीच, तर माझ्या भाकरीतली अर्धी भाकरी मी तिला नक्की खाऊ घालीन. तुम्ही निश्चिंत मनाने जा.'' यानंतर दोनच दिवसांनी ते गेले.

सुमंताने आईची उत्तम प्रकारे काळजी घेतली. आईला म्हातारपणी त्याने कुठल्याही गोष्टीची उणीव भासू दिली नाही. तिचे म्हातारपण सुखासमाधानात गेले.

❍ ❍ ❍

# माझी शैक्षणिक वाटचाल

आज हुजूरपागेत माजी विद्यार्थिनी व माजी शिक्षक संघाचा मेळावा जमला होता. कितीतरी माजी विद्यार्थिनी काठी टेकत टेकत आल्या होत्या. एकमेकींना भेटून आपल्या शालेय जीवनाबद्दल भरभरून बोलताना पाहून मला क्षणभर त्यांचा हेवा वाटला. माझं बरचसं शालेय आयुष्य उत्तर भारतात गेलं. लग्नानंतर मी महाराष्ट्रात आले; वडीलपण निवृत्तीनंतर बडोद्यात स्थायिक झाले त्यामुळे मला माझ्या शालेय व महाविद्यालयीन जीवनात परत कधीच डोकावता आले नाही. ते रुसवे, फुगवे, ती स्पर्धा, मैत्रीचे हळवे व कोवळे अंकुर कधीच उमलले नाहीत. एक प्रकारचे अनुभवांचे रितेपण कुरवाळीत त्रयस्थपणे समोरचा मनोरंजनाचा कार्यक्रम पाहाता पाहाता माझे मन पाखरासारखे केव्हा भूतकाळात शिरून या फांदीवरून त्या फांदीवर बागडू लागले ते माझे मलाच कळले नाही, खरे तर माझी शालेय जीवनाची बांधिलकी कुठल्या एक विशिष्ट शाळेशी जोडलेली नाही. निरनिराळ्या ठिकाणी वेगवेगळ्या माध्यमांतून माझ्या शालेय जीवनाचा प्रवास झालेला. पण या अनेकरंगी स्रोतातून झिरपणारे माझे बालपण मला खुणावत होते. साद घालीत होते.

अगदी सुरूवातीला आठवली ती दादरच्या लेडी जमशेटजी रोडवरील मराठी शाळा. या शाळेत मी दोन वर्षे होते. फार काही आठवत नाही, पण मला त्या शाळेत बक्षीस म्हणून मिळालेली पुस्तके लक्षात आहेत. श्रीकृष्ण चरित्र व इसापनीतीतल्या गोष्टींचे पुस्तक, दुसरीत गोपीनाथ तळवळकरांचे 'साराच चमत्कार' नावाचे मंगळावरील स्वारीचे पुस्तक. त्या शाळेतली भाटवडेकर नावाची मैत्रीण, तिच्या वाडीतल्या उंच झाडावरील गाभुळलेली कमरके. या फळांचा मी पुढील आयुष्यात शोध घ्यायचा पुष्कळ प्रयत्न केला पण काही कळले नाही. हे चौधारी हिरवट, पिवळसर, आंबटगोड फळ, मला कधीच परत दिसले नाही. त्या वेळी मी माझ्या थोरल्या चुलत्यांकडे राहात होते. माझ्या एक विधवा काकू व काका पोपटलालच्या चाळीत राहात असत. काकूंचा एक मुलगा व काकांची मुलगी असे

चौघेजण घरात होते. ही काकू माझ्या चुलत बहिणीला फार खाष्टपणे वागवी. एकदा तिच्या तथाकथित चुकीबद्दल तिला आंगठे धरून ओणवे उभे करून तिच्या पाठीवर पाटा ठेवला होता. त्याच वेळी माझ्या हातून माझ्या छत्रीचा दांडा तुटला होता. आपल्याला पण या चुकीबद्दल अशीच शिक्षा होईल या भीतीने मला इतके ग्रासले होते, की सुट्टीनंतर परत मुंबईला जायच्या कल्पनेने मला सडकून ताप भरला. नंतर काय घडले माहीत नाही पण मी मुंबईहून रतलामला आई–वडिलांकडे परत आले. मधल्या काळात वडिलांची कोट्याहून रतलामला बदली झाली होती व तिथे रेल्वेची मराठी चौथीपर्यंतची एकशिक्षकी शाळा होती. मुंबईच्या वास्तव्यात माझ्या बालमनाला शाळेत जाताना रस्त्यावर विकल्या जाणाऱ्या चिक्कीचा भयंकर मोह पडे, पण घरातील वातावरण हे असे. मी आई–वडिलांकडे लाडाकोडात वाढलेली. एक दिवस हा मोह अनावर झाला व होळीच्या राखेतून हातात आलेला एक पैसा घेऊन मी चिक्की खाल्ली होती. ही आयुष्यातली पहिली व शेवटची चोरी.

रतलामची आमची एकशिक्षकी मराठी शाळा. मोजून पंचवीस ते तीस विद्यार्थी. आम्हाला तिसरीत इंग्रजी सुरू होई. इंग्रजीच्या तासाला हिंदी माध्यमाच्या शाळेत जात असू. एकाच आवारात हिंदी, मराठी व गुजराथीचे पहिली ते चौथीचे वर्ग होते. रतलामला आल्यावर शाळेतील व घरातील वातावरणांची अदलाबदल झालेली. मराठी शाळेच्या धर्माधिकारी मास्तरांची पु.लं.च्या दामले मास्तरांशी नाळ जोडलेली. त्यांनी पिरगळलेला दिवाकर कावरेचा कान, त्यातून ठिबकणारे रक्त अजूनही विसरू म्हटले तरी विसरता येत नाही. आम्हा मुलांमध्ये त्या वेळी अशा काही कल्पना होत्या की मास्तरांची बायको त्यांना घरात आंगठे धरून उभे करते व त्याचा राग ते आम्हां मुलांवर काढतात. मला त्यांची भयंकर भीती वाटत असे. इतकी, की करंगळी दाखवून बाहेर जाण्यापूर्वी कितीतरी वेळ मनाची तयारी करण्यात खर्च होई. यातूनच कधी कधी अनवस्था प्रसंग ओढवे. असे दोन–तीन वेळा झाल्यावर वडील त्यांना येऊन भेटून गेल्यावर परिस्थिती सुधारली. पण ते लवकरच निवृत्त झाले. त्यांच्या जागी पुण्याहून आलेले एक जोशी नावाचे नवीन मास्तर. ते मात्र खूपच छान होते व मुख्य म्हणजे ते व काही टेलिफोन एक्सचेंजमध्ये काम करणारी दोन–तीन अविवाहित मंडळी आमच्याच शेजारी राहात असत. जोशी मास्तरांनी आम्हाला अवांतर वाचनाची सवय लावली. शाळेच्या लायब्ररीतून वेगवेगळी पुस्तके वाचायला मिळाली. कोरलईचा किल्लेदार, वीरधवल, गड आला पण सिंह गेला, हरि आणि त्रिंबक, चंद्रगुप्त इत्यादी पुस्तके आजही आठवतात.

गळके नळ, फुटके हौद, सरपटणाऱ्या पाली, विरुद्ध दिशांनी धावणाऱ्या आगगाड्या यांची गणिते सोडवताना खूप मजा वाटायची. माझे गणित चांगले होते. आडवे, उभे, उलटे सर्व प्रकारचे पाढे यात माझा हातखंडा. मला औटकीपर्यंतचे सर्व पाढे पाठ होते. सुट्टीच्या दिवशी मास्तरांच्या जवळ बसून मी गोखल्यांच्या अंकगणिताची पुस्तके सोडवली. तिथली एक विशेष आठवण म्हणजे आम्हाला एका स्पर्धेसाठी त्रिकोन, चौकोन, गोल वापरून एक ड्रॉईंग काढायला आले. मी गोल जांभळी द्राक्षे व त्रिकोनी पाने काढून साडीची किनार रेखाटली. त्या चित्राला तीन्ही शाळांच्या विद्यार्थ्यांमध्ये पहिले बक्षीस मिळाले. वडिलांनी माझ्याकडून गीतेचा बारावा व पंधरावा अध्याय पाठ करून घेतला होता. त्या पाठांतर स्पर्धेतपण महाराष्ट्र मंडळाच्या गणेश उत्सवात बक्षीस मिळविल्याचे आठवते. मी, माझी धाकटी बहीण, मावशीची दोन मुले व त्यांची मित्रमंडळी मिळून गुलामलकडी (सूरपारंब्या), लगोऱ्या, विट्टीदांडू इत्यादी खेळ खेळत असू. मला लहानपणापासून खोटेपणा आवडत नसे. खेळात कोणी लबाडी केली की माझी भांडणे होत. मी इतकी बावळट की पत्ते खेळताना कुणाचे पत्ते दिसले तर तसे मी त्याला सांगे. यावरून माझी भावंडे माझी टिंगल करीत असत.

अशाप्रकारे इयत्ता चौथी पर्यंत शिकले. पुन्हा प्रश्नचिन्ह. गावात मुलींची शाळा नव्हतीच. मुलांच्या शाळेत मुली जात नसत व माध्यम हिंदी. विचारांती मला हिंगण्याला वसतिगृहात ठेवण्याचे ठरले व आमची स्वारी १९३७च्या जूनमध्ये हिंगण्याला इ. पाचवीत दाखल झाली.

हिंगण्याला मी उणीपुरी दोन वर्षेच होते, कारण १९३९ च्या जानेवारी महिन्यात क्रॉनिक मलेरियामुळे मी परत रतलामला आले. हिंगण्याच्या वास्तव्याचा माझ्या आयुष्यावर दूरगामी परिणाम झाला असे म्हटले तर वावगे होणार नाही. अनुभवाच्या कक्षा रुंदावल्या, ज्ञानाची क्षितिजे विस्तारली, विचारांना दिशा मिळाली. भास्करराव व कावेरीताई कर्वे, येसूताई बर्वे यांसारख्या मंडळींचा सहवास लाभला, वाचनाची गोडी लागली. काळे पाणी, सत्तावनचे स्वातंत्र्यसमर, दोन ध्रुव, क्रौंचवध, मुक्तात्मा, मी, पण लक्षात कोण घेतो, चंद्रगुप्त, गणपतराव, आणखी गणपतराव, इंदू काळे, सरला भोळे वगैरे पुस्तके वाचनात आली. त्या अल्लड वयात काही गोष्टी जरी डोक्यावरून गेल्या असल्या तरी कुठेतरी काहीतरी जागे होत होते हे निश्चित. आम्हाला दोन दोनच्या रांगा करून 'कुंकू' सिनेमा बघायला नेले होते. त्यानंतर त्यावर झालेला परिसंवाद, वाचलेले शारदा नाटक... गडकऱ्यांची सिंधू कुठेतरी मनात भिडत होती. त्या वेळी मी म्हणाल्याचे मला आठवते, ''वेडीच होती ती

सिंधू, मी दारुच्या नशेत असलेल्या नवऱ्याला 'वित्त परार्जित मानी विषसम' असे वचन कधीच दिले नसते. उलट आई-वडील व भावाच्या मदतीने नवऱ्याचे व्यसन सोडवायचा प्रयत्न केला असता.' अन्यायाचा प्रतिकार करण्याची जाण आली होती. चिलया बाळाची गोष्ट कविता रुपात शिकल्यावर बाईंनी वर्गात त्यावर उलट-सुलट घेतलेल्या चर्चेत मी बाईंना म्हणाले, 'अतिथी धर्माचे पालन करण्यासाठी मी त्या गोसावड्याची अशी अवास्तव व अवाजवी इच्छा पुरवण्याऐवजी त्याचेच डोके उखळात घालून कांडले असते.'' त्या वेळी अण्णा कर्वे यांचा ८०वा वाढदिवस साजरा झाला. त्यासाठी आम्ही काढलेल्या हस्तलिखित मासिकात एक कविता पण लिहिली होती. त्यातल्या दोन ओळीच फक्त आज आठवतात.

*भारतभूच्या उदरी आली कितितरी रत्ने जन्माला ।*
*स्त्रीवर्गाला उद्धरणारा अण्णा कर्वे हा झाला ।।*

आमच्याबरोबर वर्गात काही परित्यक्ता व विधवा पण असत. या वेळापर्यंत विधवांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी समाजाची मनोभूमिका तयार होत होती. आमच्या वर्गातल्या कमलाबाई नावाच्या एक बाई माझ्याबरोबर अभ्यास करीत असत. त्या काळात झालेल्या अनेक कार्यक्रमांमधून अण्णांच्या कार्याची थोरवी व महती कळली व प्रत्यक्ष बघायला व अनुभवायला मिळाली. त्या वेळी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे व्याख्यान ऐकावयास मिळाले. त्यांच्या इतिहासप्रसिद्ध समुद्र उडीचे वर्णन व तुरुंगातील हालांचे वर्णन प्रत्यक्ष त्यांच्या तोंडून ऐकताना अनुभवलेला विस्मयकारक व भयचकित थरार अविस्मरणीय असाच होता. सामाजिक जाण जागी होण्याच्या प्रक्रियेत हिंगण्याचे वास्तव्य निश्चितच परिणामकारक म्हणावे लागेल. त्याच काळात श्रमदानाची संकल्पना पण रुजली. आम्ही श्रमदानाने तयार केलेल्या रस्त्याची पण पुसट आठवण आहे. साहित्य, नाट्य, वक्तृत्व, अभिनय, काव्य इत्यादी गोष्टींची प्राथमिक ओळख या काळातच झाली. क्रीडांगणावर मला लंगडी, पळणे व खो-खो आवडत, हुतुतूची फार भीती वाटे. अभ्यास विषयात गणित व इंग्रजी आवडत असत. इतिहास व भूगोल यथातथाच आवडत. सायन्समध्ये प्रयोग करायला आवडे. चुनखडी, मोरचुद, गारगोटी वगैरे वेगवेगळे दगड गोळा केलेले आठवतात. एक पान साधे, एकाला पुढच्या बाजून व्हॅसलीन, दुसऱ्याला मागच्या बाजूने व्हॅसलीन व तिसऱ्याला दोन्ही बाजूंनी व्हॅसलीन लावून त्यांच्या वाळण्याच्या प्रक्रियेतील फरक नोंदवलेला आठवतो. हळदीच्या पाण्यात भिजवून लाल होणारा खडू, निळा व पिवळा रंग एकत्र केल्यावर होणारा हिरवा, निळा व लाल रंग मिळून होणारा जांभळा रंग

तयार झाला की मोठी गंमत वाटे. गाणे व ड्रॉईंगबद्दल फारसे आठवत नाही, पण शिवण मात्र अफलातून. वर्षाच्या शेवटी, विणायला घेतलेले क्रोशाचे लोकरी झबले मूळ रंग ओळखू न येण्याइतके काळे मिचकूट झालेले असे. पुढील आयुष्यात मी शिवणकाम, विणकाम इत्यादींमधे बऱ्यापैकी प्राविण्य मिळवीन असे भाकित करायला त्या वेळी कुणीच धजावले नसते.

मी येसूताई बर्व्यांची लाडकी होते. कधी कधी त्यांचे बंधू स. गो. बर्वे यांच्या गाडीतून पुण्याला माझ्या स्थानिक पालक श्री. सौ. इंदूमती सहस्त्रबुद्धे यांच्याकडे मी येत असे. एरवी आम्ही मुली दोन-दोनच्या रांगा करून चालत आपापल्या स्थानिक पालकांकडे येत असू.

येसूताईंनी एकदा आम्हाला रँग्लर परांजपे यांची गोष्ट सांगितली होती. त्यांनी म्हणे गणिताच्या पेपरात कोणतीही पाच उदाहरणे तपासावी असे लिहिले होते. माझे गणित चांगले होते. सहामाही परीक्षेत मी पण तसे लिहिले. परिणामी ५० पैकी ४८ मिळाले. बाई म्हणाल्या, ''तुला काय आपणही रँग्लर आहोत असे वाटते का? पुन्हा असे लिहू नकोस.'' पण वार्षिक परीक्षेत मात्र वर्षाची प्रगती पाहून सूचना देऊन वर घातल्याचा शिक्का प्रगतिपुस्तकावर बसला. कारण गणिताच्या पेपरच्या आदल्या दिवशी वडील गेल्याचे स्वप्न पडल्याने मन अस्वस्थ होते. पस्तीस मार्कांचा पेपर सोडवून तेवढेच मार्क मिळतील या खात्रीने पेपर देऊन टाकला, व ३४ मिळाले. तेव्हा पण बाई म्हणाल्या, ''तुला मी आधी सांगितले होते की असा फाजील आत्मविश्वास बरा नाही. पण पालथ्या घड्यावर पाणी. बसला न प्रमोटेडचा शिक्का!''

पाचवीत आल्यावर आम्हाला पहिला निबंध लिहायला 'मी उन्हाळ्याची सुट्टी कशी घालवली' हा विषय दिला होता. मी सकाळी उठल्यापासून अहवाल लेखनाप्रमाणे दिनचर्या लिहिली. बाईंनी वाचनालयातून काही पुस्तके वाचावयास सांगितली. त्यातून निबंध लेखनाचे मर्म समजले व दुसरा विषय मिळाला 'माझी संध्याकाळची सहल'. तेव्हा मात्र रंगीबेरंगी फुलपाखरे उडताना दिसली, सृष्टिदेवीने लाल-निळ्या बुट्ट्यांचा शेला पांघरला. पक्षांनी मधुर कूजन केले, संध्यादेवीने लाल, पिवळ्या, सोनेरी रंगांची रांगोळी रेखाटली व मंदमंद वाहणाऱ्या वाऱ्याने वातावरण सुगंधित केले.

आमच्या त्या वेळच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकात 'हेही गेले व तेही गेले' या नावाच्या धड्याचे आम्हाला संवादरूपांतर करायला सांगितले होते. माझे संवादरूपांतर चांगले झाले असावे, कारण बाईंनी गॅदरिंगच्या वेळी तेच रूपांतर आमच्या वर्गाचा कार्यक्रम म्हणून बसवले होते. तसेच, आयत्या वेळेच्या भाषणात

‘चित्रकला श्रेष्ठ की संगीत’ यातही पहिला क्रमांक मिळाला होता.

सामुदायिक भोंडला, श्रावणी सोमवारी महादेवाच्या देवळात, पटवर्धन बागेत खाण्यासाठी जाणे या गोष्टी अजूनही आठवतात. आम्ही बकुळीची फुले, प्राजक्ताची फुले वेचीत असू. इचलकरंजी हॉलच्या बाहेर सिल्व्हर ओकचे फुटाणीचे तुरे, बुचाच्या फुलांच्या माळा गुंफीत असू. गुलबक्षीच्या रंगीबेरंगी फुलांच्या पण माळा गुंफीत असू.

याच दिवसात स्वयंशिस्तीची, स्वावलंबनाचीपण सवय झाली. आपण आपली कपबशी विसळणे, ताटवाटी घासणे, परकर–पोलके धुणे वगैरे सवयी लागल्या, फरसावर उशीरा गेल्यावर गरम पाणी मिळत नसे, त्यामुळे लवकर वेळेत गोष्टी उरकण्याची सवय लागली. दिवाळीच्या सुट्यांमध्ये भाऊबीज फंड गोळा केला. त्या वेळचा एक गमतीदार किस्सा आठवतो. आमच्या मावशीच्या शेजारी एक रतनसी पी. चौहान नावाचे गोंदियाचे विडी व्यापारी काही दिवस उपचारासाठी येऊन राहिले होते. त्यांच्याकडे पावती पुस्तक नेल्यावर ते म्हणाले, ‘‘तू सांगशील ती रक्कम टाकतो. किती टाकू सांग.’’ मी माझ्याकडून खूप मोठी रक्कम म्हणून पंचवीस रुपये मागितले. हे गृहस्थ विनापत्य असून खूप श्रीमंत होते. त्यांनी हसून एकशेपंचवीस रुपये दिले. ते आम्हाला बोलावून रोज केशरयुक्त दूध प्यायला देत असत. त्यांची बायको आठ आण्याइतके मोठे कुंकू लावीत असे. तिला आम्ही जाबाई म्हणत असू. त्यांचा व आमचा पुढे कित्येक वर्षे पत्रव्यवहार होता. जाबाईला चाळिशीला एक मुलगा झाला. त्याला मी लग्न होईतोपर्यंत राखी पाठवीत असे.

हिंगणे येथे दोन वसतिगृहे होती. एक विद्यालय व दुसरे आश्रम. विद्यालयात एक वेळ पोळी व एक वेळ भाकरी असे. दुपारी पण एखादा वेगळा पदार्थ करीत असत. त्यासाठी वेगळे पैसे असत. इतरांना त्या वेळी पोळी खाता येई. आश्रमात दोन्ही वेळा भाकरी असे. आश्रमात दार, नादार व अर्धनादार विद्यार्थिनी असत. विद्यालयात पण काही नादार असत. त्या Earn and Learn या तत्त्वावर राहात. आमच्या सारख्या लहान मुलींची वेणीफणी, त्यांना न्हायला घालणे, केर काढणे इत्यादी कामे त्या करीत असत. मी वर उल्लेख केलेल्या कमलाबाई त्यांपैकी एक होत्या.

त्या वेळेची एक मजेशीर आठवण म्हणजे, एक दिवस मी व माझी मैत्रीण प्रभा आठवले, कावेरीताईंची भाची, अभ्यास करीत होतो. काका (भास्करराव) व कावेरीताई शेजारीच गप्पा मारीत होते. मुलींच्या पेपरातील गमती जमती एकमेकांना सांगताना एका विद्यार्थिनीने ‘माझा अभ्यास बुडणार नाही’ या वाक्याचे भाषांतर 'My studies will not' बुडणार’ असे केल्याचे सांगितले. आम्हालाही

आपली अक्कल पाजळण्याची खुमखुमी आली. मी म्हणाले ''काहीतरीच काय. 'My studies will not sink' असे नको का म्हणायला?'' यावर ते दोघेही खोखो हसले. का हसले ते त्या वेळी कळलेच नाही.

मी स्वभावाने जात्या सैरट असल्याने हिंगण्याच्या वातावरणात बऱ्यापैकी रमले होते. आमच्या मेट्रन म्हणजे गो. मा. चिपळूणकरांच्या पत्नी. त्यांना आम्ही अक्का म्हणत असू. त्या शिस्तीला कडक, पण एरवी स्वभावाने प्रेमळ होत्या. त्यांची मुलगी सुमन आपल्या नीला नावाच्या मुलीसह त्यांच्याजवळ राहात असे. तिच्याशी खेळण्यात पण वेळ चांगला जात असे. त्या लहान मुलीने एकदा चुकून खाऊची गोळी समजून डांबराची गोळी गिळली, त्या वेळी उडालेला सर्वांचा घबराट व गोंधळ चांगलाच लक्षात आहे.

माझ्याबरोबर विद्यालयात राहाणाऱ्या बऱ्याच मुलींची नावे आजही आठवतात. शांता, सीता व तापी बाळ बहिणी, बॅडमिंटनपटू जबा किर्लोस्कर, प्रभा पाध्ये, गंगू कोकणे, उषा आठवले, विजया भुस्कुटे, कुसुम रिसबूड, कादंबरी लेखिका वत्सला बहुतुले, प्रमिला खैर, गायत्री शर्मा, प्रमिला गेज्ञी इत्यादी. तेव्हा मनू गाडगीळ, बाळी आगरकर, विमल पेंडसे याही मुली आठवतात. त्या वेळी मालती किर्लोस्कर तावातावाने कोकणस्थांना शिव्या घाली. त्याचे कारण मला बऱ्याच उशीरा कळले. समाजात त्या वेळी 'यशवंती विवाहा'ची जी साथ आली होती. त्याचा किशोरवयात तिला बसलेल्या धक्क्याचा तो परिपाक होता. राजकवी यशवंत पेंढारकर, ना. सी. फडके. शं. वा. किर्लोस्कर इत्यादी अनेक मान्यवरांनी केलेली बौद्धिक लग्ने बरीच गाजली होती.

स्वयंपाकघरात मथुराबाई, बहिणाबाई सर्वच मुलींशी प्रेमाने वागत, आम्हाला आठवड्यातून एक दिवस वाढण्याची पाळी असे. रविवारी थोडे तांदूळ निवडावे लागत. मुलींना पोहावयास व सायकल चालवायला पण शिकवीत. एकूण सर्व वातावरण घरगुती व प्रेमळ असे.

आमच्या शिक्षकांपैकी गणिताचे जोशी सर, टिळकबाई, पालकर मास्तर, नाना पटवर्धन, शारीरिक शिक्षणाच्या अनुसूया पाटील इत्यादी शिक्षक मंडळी आठवतात. कुमुद आठवले व पालकर मास्तरांचे लग्न हा एक कुतुहूलमिश्रित चर्चेचा विषय. कारण त्यांनी पळून जाऊन लग्न केल्याचे अंधुक स्मरण आहे.

अशी सर्व घडी बसत असतानाच मला मलेरियाने गाठले. दर आठपंधरा दिवसांनी ताप येई. त्या वेळी मात्र घरची आठवण येई. असुरक्षिततेची व पोरकेपणाची जाणीव प्रकर्षाने होई. अशातच वडिलांनी मला परत घरी नेण्याचा निर्णय घेतला.

एक प्रकारे ही माझ्या प्रगतीला पडलेली खीळच होती. शिक्षणाचे विशाल दालन समोर असताना पाठ फिरवून मी परत जात होते. या वसतिगृहाच्या आयुष्यात बरंच काही शिकावयास मिळाले असले तरी प्रत्येक गोष्टीला एक दुसरीही बाजू असते. डोक्यात सतत उवा होत. सुट्टीत आई डोके स्वच्छ करून पाठवी, पण पुन्हा पहिले पाढे पंचावन्न असा प्रकार असे. माझ्या पुढील आयुष्यात मला एकाच गोष्टीसाठी परमेश्वराचे आभार मानावेसे वाटतात आणि ते म्हणजे मध्यवर्ती सरकारच्या नोकरीत असूनही आम्हाला मुलींना वसतिगृहात ठेवायची वेळ आली नाही.

पुढील आयुष्यात मला गंगू कोकणे, मनू गाडगीळ, विमल पेंडसे व उषा आठवले बऱ्याच कालावधीनंतर कुठेतरी भेटल्या. आठवणींची उजाळणी झाली पुढे माझ्या मामेनणंदेची जाऊ म्हणजेच कुंदा कर्वे त्यामुळे पुन्हा कावेरीताई व काकांचीपण भेट झाली व त्याच वेळी माझी मैत्रीण प्रभा आठवले टायफॉईडने लहानपणीच देवाघरी गेल्याचे कळले. मलेरियाच्या विळख्यातून बाहेर पडायला जवळजवळ आठ ते दहा महिने लागले.

त्यामुळे हिंगण्याहून रतलामला परत आल्यावर जवळ जवळ वर्षभर मी घरीच होते. डॉक्टरांची ट्रीटमेंट सुरू होती. प्रकृती हळूहळू सुधारत होती. सुरूवातीचे काही दिवस सोडले, तर मला रिकामा वेळ खायला उठे.

मी झपाटल्याप्रमाणे घरातील नाटकांची व इतर पुस्तके वाचून काढली. त्यातील एक पुस्तक आज प्रामुख्याने आठवते : ‘ढोंगी गुरुच्या सैतानी लीला’. यामुळे बुवाबाजीबद्दल जागरूक दृष्टिकोन निर्माण झाला. याच सुमारास किर्लोस्कर मासिकातून येणाऱ्या अनेक बुवांबद्दलच्या माहितीचा पण मनावर परिणाम होत होता. साकोरीचे उपासनी बाबा, केडगावचे नारायणमहाराज आदि बऱ्याच तथाकथित महाराजांची माहिती त्या वेळी वाचनात आली व बुद्धिनिष्ठ दृष्टिकोन वाढीला लागला. या मासिकांमधून बऱ्याच विचारप्रवर्तक प्रश्नांचा मागोवा घेतला. जाई, बदसूर जोडपी, सकच्छ की विकच्छ, सहवासोत्तर विवाह की विवाहोत्तर प्रेम, जरठ कुमारी विवाह, बलात्कारित अभयाला गर्भपाताचे स्वातंत्र्य का नसावे? आदि अनेक प्रश्नांवर चर्चा असे. मी जवळ जवळ सत्तर ते ऐंशी नाटके वाचली. त्या सगळ्यांचा उपयोग मी १९५८ साली जेव्हा बहिस्थ विद्यार्थिनी म्हणून B.A. ला बसले तेव्हा झाला. मी ऑनर्ससाठी नाटक हा वाङ्मय प्रकार निवडला होता.

या संगीत नाटकांबद्दलचा माझा महत्त्वाचा आक्षेप असा होता की, त्यातल्या गाण्यांमुळे कथानकाचा खोळंबा होतो व कथेचा प्रवाह खंडित होतो. असे मी बोलून दाखवल्यावर वडिलांनी संगीत नाटकांची संकल्पना स्पष्ट करून सांगितली.

लोकरंजनातून समाज जागृतीचे महत्त्व समजावून सांगितले. ‘मानापमान’ मधून कर्तृत्वाचे महत्त्व कसे स्पष्ट होते ते सांगितले. अनेक उदाहरणांमधून ब्रिटिश राजवटीला ईश्वरी वरदान मानणाऱ्या समाजात हळूहळू स्वातंत्र्याची भावना कशी वाढीला लागली हे विशद करून सांगितले.

मी बरी झाल्यावर १९४० च्या जानेवारीस वडिलांनी मला रेल्वेच्या European School मध्ये दाखल केले. या शाळेत ब्रिटिश व अँग्लोइंडियन अधिकाऱ्यांची मुले व काही उच्चपदस्थ भारतीय अधिकाऱ्यांची मुले जात असत. सुरूवातीला या शाळेत जम बसणे फार अवघड गेले, कारण मला इंग्रजी बोलण्याचा सराव नव्हता. माझ्या वर्गातील मुलांना फार नवल वाटे. ते म्हणत, "Man, she can read she can write, she stands first but she cannnot speak, It's a wonder." सहा महिन्यात ही अडचण दूर झाली. या शाळेत पण मी आमच्या वर्गशिक्षिका मिसेस वॉर्डची लाडकी विद्यार्थिनी होते. इथे ज्यू व ख्रिश्चन मुलींशी मैत्री झाली. Silvia, Higgs, Daisy Aptikar, Ratnoo Meerchandani इत्यादी मुलींच्या घरी मी जात असे. Daisy ची आई माझ्यासाठी दुधातला शिरा करी. ती कोकणातली असल्याने आपल्याकडील चालीरीती तिला थोड्याफार माहीत होत्या. मला म्हणे, ‘‘पोरी, तुझा धर्म मी बिघडवणार नाही. हा शिरा दुधातला आहे. खा.’’ इतर ठिकाणी मी बिस्किटांशिवाय काही खात नसे.

मी माझ्या अनेक ठिकाणच्या शाळा बदलण्यामुळे व त्या वेळी इतकी जागरूकता नसल्यामुळे असेल कदाचित, पण माझ्या वर्गातल्या इतर मुलांच्या मानाने एक दोन वर्षांनी मोठी होते. शाळेला युनिफॉर्म होता पांढरा Sports blouse व निळा Pinafore. पण माझ्या आईच्या मते मी परकर पोलके किंवा या युनिफॉर्मसाठी मोठी झाले होते. वडिलांनी वरिष्ठांना भेटून माझ्यासाठी साडीची परवानगी काढली होती. पांढरे ब्लाऊज व निळी साडी नेसून मी शाळेत जाई. फक्त स्पोर्टसच्या वेळी मिसेस वॉर्ड त्यांच्या मुलीचा युनिफॉर्म मला घालायला सांगत. आमच्या मुख्याध्यापिका मिसेस चेंबर्स होत्या.

आम्हाला American war of Independence व Indian Mutiny असे दोन्ही धडे पाठोपाठ शिकवले. त्या वेळी मी वर्गात उठून उभी राहिले व म्हणाले, "Why do you call this a mutiny and that war of Independence. This was also an attempt for Independence?"

शेळ्यांच्या कळपातून वाघ बाहेर पडल्यावर जसे वाटते तशा नजरेने माझ्याकडे पाहात मिसेस वॉर्ड म्हणाल्या, "Child, where do you come from?" मला लगोलग

मुख्याध्यापिकांकडे नेण्यात आले. माझे स्कूल लीव्हिंग सर्टिफिकेट मागवले गेले व ते पुण्याचे आहे पाहाताच मिसेस चेंबर्स म्हणाल्या, "Yes, only a puneite can dare say this." मग माझ्या पाठीवर हात ठेवून म्हणाल्या "Child, I myself also am an Indian. I share your feelings. But don't say this again in school." तरीपण रीतीप्रमाणे माझ्या वडिलांकडे पत्र गेले. वडिलांचे ऑफिस जवळच होते. ते मिसेस चेंबर्सला भेटूनच घरी आले. म्हणाले, ''बाईसाहेब, आज काय पराक्रम गाजवून आलात?'' तो काळ दुसऱ्या महायुद्धाचा होता. एकीकडे असे बोलले तरी दुसरीकडे सैनिकांसाठी जवळ जवळ १० ते १२ लोकरीचे मोजे जोड विणून दिले होते.

एप्रिल १९४१ला वडिलांची प्रमोशनवर परत कोट्याला बदली झाली. तिथे गावात मुलींची शाळा होती. त्या शाळेत मुलींना पाचवी पर्यंतच गणित विषय होता. त्यामुळे गणित सोडूनच शिकावे लागणार होते. पण दुसरा पर्यायच नव्हता. एवढे खरे की, सातवी ते दहावी व पुढे कॉलेजची दोन वर्षे अशी सलग सहा वर्षे एका ठिकाणी शिक्षण मिळाले. एकीकडे दुसऱ्या महायुद्धाचे वातावरण तापत होते. आम्ही स्टेटमधे राहात असल्याने महागाईची फारशी झळ आम्हाला पोचत नसली तरी पुणे-मुंबईच्या बातम्या व वर्तमानपत्रे यामुळे एकूण परिस्थितीचा थोडाफार अंदाज येत होता. कोट्याला आम्ही आमच्या मावशीच्या दिरांच्या घरात बिऱ्हाड केले.

आता परत नवी विटी, नवे राज्य : हिंदी माध्यम. तशी हिंदीशी अजिबात ओळख नव्हती असे नाही, पण माध्यम म्हणून स्वीकारणे जरा अवघड होते. पण जमून गेले. आमची परीक्षा घेऊन मगच आम्हाला प्रवेश मिळाला. ''लडकी की इंग्लिश क्या बढ़िया है लिख दो Fit for Seventh,'' या उद्गारांसकट सातवीत प्रवेश मिळाला.

इयत्ता सातवीत आम्हाला इंग्लिश, हिंदी, इतिहास, भूगोल, आरोग्यशास्त्र, संस्कृत, शिवण व संगीत असे विषय होते. सायन्स, गणित, शारीरिक शिक्षण यांना पूर्णपणे फाटा. स्टेशनवरून आम्ही फक्त पाच मुली येत असू. जायला-यायला असलेल्या टांग्यावर व शाळेच्या दारावर भला मोठा पडदा. शाळेच्या भोवती दीड पुरुष उंचीचा कोट. शाळा दोन मजली, चार बाजूला बुरुज. पैकी दोन बुरुजातून वर जायला जिने. लाल दगडाची कोरीव काम केलेली इमारत. शाळेचे नाव होते 'महारानीजी जाडेचीजी गर्लस् हायस्कूल'. पहिली ते दहावीचे वर्ग, एक शिवण वर्ग, एक गायन कक्ष, वाचनालय, मुख्याध्यापिकांची खोली व शिक्षकांची खोली, अशा बारा-पंधरा खोल्या होत्या. कडेला रस्त्याच्या पलीकडे

गृहजीवन शास्त्राची चार खोल्यांची इमारत होती. तिथे आम्ही प्रात्यक्षिकांच्या वेळी जात असू. आमच्या मुख्याध्यापिका मिस शास्त्री होत्या. शास्त्री हे त्यांचे आडनाव नसून पदवी होती.

नव्या शाळेत नव्या मैत्रिणी, नवे रुसवे, फुगवे व नवे हेवेदावे. नवीन आलेली मुलगी आतापर्यंत हुशार गणल्या गेलेल्या आपल्या मैत्रिणीला प्रतिस्पर्धी आहे हे कळताच काही जणी बिथरल्या होत्या. त्यातच माझे डाव्या खांद्यावरून पदर घेणे त्यांना आवडत नव्हते. सीधा पल्ला व उलटा पल्ला असा वाद सुरू झाला. उत्तरेमध्ये डाव्या खांद्यावरून घेतलेला पदर, डोक्यात माळलेली फुले छछोरपणात मोडत असे. आतापर्यंत शाळेत ज्या दोघी–तिघी महाराष्ट्रीय मुली आल्या त्या पिढ्यान्‌पिढ्या राजस्थानात राहात असल्याने त्यांची आई, आजी जरी घरात नऊवारी नेसत असल्या तरी मुली इकडच्या पद्धतीने पाचवारी साडीचा पदर घेत होत्या. मी तसे करण्याचे नाकारले.

माझ्या डोक्यावरून पदर न घेण्याला पण विरोध होता. पेशव्यांमुळे जी थोडीफार मंडळी उत्तरेत स्थायिक झाली होती त्यात इंदूर व बडोदा व काही अंशी ग्वाल्हेर संस्थानातील मराठी मंडळींनी आपले मराठीपण व मराठी भाषा जतन केली होती. या संस्थानांमध्ये बऱ्याच संख्येने महाराष्ट्रीय मंडळी राहात असत. बुंदेलखंड, जयपूर, उदेपूर, रतलाम व कोटा या संस्थानांमध्ये हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी महाराष्ट्रीय मंडळी होती व तिथले राज्यकर्ते मराठी नव्हते, त्यामुळे इथली महाराष्ट्रीय मंडळी इथल्या समाज जीवनात व चालीरीतींमध्ये बऱ्यापैकी मिसळून गेली होती. शेवटी प्रकरण मुख्याध्यापिकांपर्यंत गेले. त्यांनी मला माझे म्हणणे ऐकून घेण्यासाठी बोलावून घेतले. मी बाईंना म्हणाले, ‘‘अम्तुल रशीदा चुडिदार कमीज, शमीम आरा गरारा कमीज व पद्मा कपूर सलवार कमीज असे पोशाख घालतात मग माझ्याच डाव्या खांद्यावरुन पदर घेण्याला तुमचा विरोध का असावा? सर्वच महाराष्ट्रीय स्त्रिया डाव्या खांद्यावरून पदर घेतात म्हणून त्या शालीन नसतात असे म्हणता येईल का? मी उद्यापासून नऊवारी साडी नेसून शाळेत येत जाईन, मग तर झाले. आणि डोक्यावर पदर घेण्याबद्दल म्हणाल तर आमच्याकडील मध्यमवर्गीय ब्राह्मण स्त्रिया डोक्यावरून पदर घेत नाहीत. आमच्याकडे सर्वसामान्य मध्यम वर्ग डोळ्यात काजळ, नाकात चमकी, मेंदी व पायात साखळ्या इत्यादी गोष्टी छछोर समजतो आणि त्या गोष्टी इकडे सर्रास शिष्टसम्मत समजल्या जातात यावर तुमचे काय म्हणणे आहे? माझ्या मते हे प्रांताप्रातांमधल्या विभिन्न प्रथांवर शालीन, अशालीन असे शिक्के मारणे अयोग्य

आहे आणि केवळ याच कारणासाठी मी डोक्यावरून पदर घेणार नाही आणि डोक्यात फुले पण घालणार आहे.'' त्यांना बहुधा माझे म्हणणे पटले असावे. त्यांनी मुलींना सांगितले, ''वह शिवाजी के देश की लडकी है, वह तुम्हारा कहना नही मानेगी.'' प्रकरण इथेच संपले. त्यानंतर मी बरेच दिवस नऊवारी साडी नेसून आमच्या मालकांच्या बागेतील कुंदाच्या फुलांचा गजरा न चुकता घालून शाळेत जात असे. हळूहळू माझे व त्यांचे कंगोरे घासले गेले. आम्ही एकमेकींमध्ये मिसळून गेलो. या सर्वांचा परिणाम म्हणून माझ्यानंतर शाळेत येणाऱ्या महाराष्ट्रीय मुलींचा मार्ग सुकर झाला. तरीही अधून मधून खटके उडतच असत.

या शाळेत मी व शकुन्तला माथुर नावाच्या मुलीमध्ये चुरस असे. आत्तापर्यंत या भावनेचा संसर्ग मला झाला नव्हता. एखादे आव्हान स्वीकारून ते यशस्वी करून दाखवणे, नवीन काहीतरी शिकणे व शिकल्यावर त्याचा आनंद उपभोगणे एवढ्यावरच गोष्टी मर्यादित होत्या. पण एकदा आमच्या वर्गातली सुशीला भूलियान नावाची मुलगी मला म्हणाली, '' मालती कुछ भी करो, तुम कभी भी शकुन्तला के आगे नही जा सकती।'' मलाही राग आला व मी म्हणाले, ''एक बार गाना छूट जाने दो फिर देखना।'' सातवी आठवीत मला दुसऱ्या नंबरावर समाधान मानावे लागले होते. कारण संगीतात माझ्या व तिच्या मार्कांमध्ये १२ ते १५ मार्कांचा फरक पडत असे.

मला लेखी पेपरात २० पैकी २० मिळत, पण मौखिक परीक्षेत जेमतेम ३० पैकी १० ते १२ मिळत. ती माथुर कायस्थ असल्याने लहानपणापासून गाणे शिकवायला मास्तर येत असत व आवाजही चांगला होता तरीही ती माझ्यापेक्षा २ ते ४ मार्कांनीच पुढे असे. ज्यात माझा हातखंडा, ते गणित नव्हतेच. आम्ही ९वीत गेल्यावर संगीत सुटणार होते. ही सुशीला माझ्यावर खार खाऊन होती. कारण आम्हाला २५ मार्कांचा आरोग्यशास्त्राचा पेपर असे. पेपर संपल्यावर तिने मला विचारले, ''मालती, तुमने कितने पेजेस लिखे हैं, मैंने सोला लिखे हैं।'' मी म्हणाले, ''मैने साढेतीन फुलस्केप लिखे है।'' मला कळेनाच, जेमतेम ५०–७५ पानांचे पुस्तक, त्यावर २५ मार्कांचा पेपर, हिने १६ फुलस्केपमध्ये काय लिहिले असणार? पेपर वाटल्यावर मला २०, व तिला १० मार्क मिळाल्याचे पाहून ती बाईंकडे तक्रार घेऊन गेली. त्यावर बाई म्हणाल्या, ''सुशीला, मालतीने बोरेभर भूसेमेंसे फटक फटक कर कटोरीभर चाँवल निकाल कर मेरे सामने रखे हैं और तुमने कटोरीभर चाँवल बोरेभर भूसे में मिलाकर मेरे सामने रखे हैं। यही तुममें और मालती में फर्क है।'' एकदा मला म्हणाली, ''मालती, तुम्हारे कान छोटे है,

छोटे कानवाले लोग बुद्धू हुआ करते है।'' यावर माझी दुसरी मैत्रीण तिला म्हणाली, ''लेकिन तुम्हारी और मालती की तरफ देखकर तो ये बिल्कुल उलटा ही लगता है, क्योंकि तुम्हारे कान बड़े है और अगर इसी उपमा को आगे बढ़ाया जाय तो लंबकर्ण याने गधा दुनिया का सबसे होशियार जानवर समझा जाता।''

शकुन्तलाची धाकटी बहीण मनोरमा व आमच्या मालकांची नात लीलावती एका वर्गात होत्या. एक दिवस शकुन्तलाच्या घरी दोघी खेळत असताना मनोरमा लीलावतीला म्हणाली, ''अरे शोर मत मचाओ, हमारी शकुनजीजी पढाई कर रही हैं । उन्हें डिस्टर्ब मत करना।'' लीलावती म्हणाली, ''बडी आई तुम्हारी शकुनजीजी पढाई करनेवाली। हमारी मालती को देखो, सारा वक्त घरमें काम करती रहती है, उसे पढाई करने के लिये बहुत कम समय मिलता है, फिर भी तुम्हारी शकुनजीजी उससे घबराती है।'' आम्हाला खरोखरीच अभ्यासाला फार कमी वेळ मिळे. सकाळी सातच्या आधी व रात्री नऊनंतरच आम्ही अभ्यास करीत असू. आमच्या घरी फक्त भांडी घासायला मोलकरीण होती. बाकी केरवारे, धुणे–पाणी, उष्टीखरकटी, गाद्या काढणे, घालणे इत्यादी सर्व कामे मी व माझी बहीण मिळून करीत असू. इयत्ता ८ वीत असताना भूगोलाच्या पेपरच्या आदल्या दिवशी आपल्याला काही येत नाही असे वाटून मला खूप रडू येत होते. आमच्या मालकांचा मोठा मुलगा– त्याला आम्ही रणछोडभाऊ म्हणत असू– नुकताच रंगूनमधून निर्वासित म्हणून भारतात परतला होता. तो रंगून युनिव्हर्सिटीत प्रोफेसर होता. मला रडताना बघून म्हणाला, '' बघू बरं तुला काय काय येत नाही ते.'' असे म्हणून त्याने माझे पुस्तक हातात घेऊन धावती उजळणी घेतल्यासारखे केले. माझा आत्मविश्वास परत आला व परीक्षेत त्या वर्षी माझा भूगोलात पण पहिला नंबर आला. पुढील आयुष्यात माझ्या मुलींना भेटल्यावर म्हणाला, ''तुम्हाला माहीत नसेल तर सांगतो, परीक्षेच्या आदल्या दिवशी खूप रडावे म्हणजे दुसऱ्या दिवशीच्या पेपरात पहिला नंबर येतो.''

१९४२चा सुमार Quit India व महायुद्ध जोर धरीत होते. हळूहळू रेशनिंग, महागाई आपले हातपाय पसरीत होते. आमच्या मिस शास्त्री व माझ्या एका चंद्रकला नावाच्या मैत्रिणीचे वडील गांधीवादी होते. आम्ही दोघींनी मिळून विद्यार्थ्यांचा मोर्चा काढायचा विचार केला. आमच्या मुख्याध्यापिकांचा आम्हाला छुपा पाठिंबा होता. तसं पाहिलं तर हे सगळं जरा धाडसाचं होतं. शाळेत येताना आमच्या टांग्याला टपापासून पायथ्यापर्यंत एक चादर बांधलेली असे. अशा आम्ही शाळेत येत असू. मुलींनी एकट्यांनी रस्त्यावर येणे म्हणजे जरा अवघडच होते. पण

आम्ही निर्धार केला व ७ वी ते १०वीतल्या १०–२० मुली आमच्याबरोबर यायला तयार झाल्या. आमच्या शाळेच्या शेजारी कर्जन वायली मेमोरियल हायस्कूल नावाची मुलांची शाळा होती. आम्ही मधल्या सुट्टीत बाहेर पडलो व मुलांच्या शाळेसमोर जाऊन कर्जन वायली बॉईज शेम शेम अशा घोषणा देऊ लागलो. थोड्याच वेळात बरीच मुले मोर्चात सामील झाली. मग आम्ही भीम कॅडेट कोअरच्या प्रवेशद्वाराजवळ जाऊन बी.सी.सी. बॉईज शेम शेमच्या घोषणा द्यायला सुरूवात केली. तीपण मुले बाहेर पडली व आम्ही सर्व मिळून राजवाड्यासमोर जाऊन घोषणा द्यायला सुरूवात केली. पोलीस आले, लाठीमार झाला पण आम्हा मुलींना पकडून प्रत्येकीला तिच्या घरी पोचते करण्यात आले. स्टेट असल्याने कोणावरच खटले वगैरे भरण्यात आले नाहीत. त्या वेळी स्टेशनवर व गावात हा एक मोठाच चर्चेचा विषय झाला.

१९४३च्या जूनमध्ये मी ९वीत गेले. आम्हाला ९वी व १०वीच्या अभ्यासक्रमावर १०वीची परीक्षा द्यावी लागत असे. हळूहळू बोर्डाच्या परीक्षेचे वेध लागले. मी पूर्ण तयारीनिशी यंदा काही झाले तरी शकुन्तलेला मागे टाकून पहिले येण्याचा निर्धार मनाशी केला व प्रथमपासूनच पद्धतशीर अभ्यासाला सुरूवात केली.

आम्हाला दहावीला ५० मार्कांचे तीन इंग्लिशचे पेपर, ५० मार्कांचे संस्कृत व हिंदीचे प्रत्येकी दोन पेपर, इंग्लिश, इतिहास व इंडियन हिस्टरी असे ५० मार्कांचे दोन पेपर व गृहजीवनशास्त्र ५० चे दोन पेपर होते. ह्या व्यतिरिक्त २५ मार्कांचे वर्षभराचे शिवणकाम व २५चे प्रात्यक्षिक, प्रत्येकी २५ मार्कांची दोन स्वयंपाक व होम नर्सिंगशी संबंधित प्रात्यक्षिके होती. आमचा गृहजीवनशास्त्राचा अभ्यासक्रम खरोखरच खूप उपयुक्त असा होता. होम नर्सिंग, फर्स्टएड, मदर क्राफ्ट अशी पुस्तके आठवतात. याशिवाय, एक Anatomy, Physiology व Hygiene चा Optional Paper पण होता. शालेय पातळीवर जरी असले, तरी या अभ्यासक्रमाची मला पुढील आयुष्यात अपत्यसंगोपनात व मुलींना बालवयात होणाऱ्या अनेक दुखण्यांचे निदान करण्यात म्हणा किंवा वेळीच पूर्वसूचना मिळण्यात फार मदत झाली. माझ्या लहान भावाचे green fracture, दुसऱ्या भावाचा Typhoid व माझ्या मोठ्या मुलीला झालेली कावीळ मला वेळीच ओळखता आली. आजाऱ्याचा आहार, शुश्रुषा, पथ्यपाणी, अनेक आजारांची लक्षणे व प्राथमिक उपाय माहिती झाले. संस्कृतसाठी मला बाबूराम सक्सेना लिखित एक अत्यंत उत्तम व्याकरणाचे पुस्तक मिळाले होते. या पुस्तकाची संक्षिप्त आवृत्ती आम्हाला prescribe केली होती व मोठी आवृत्ती out of print होती. हे पुस्तक इतके छान होते की संस्कृत

व्याकरणातली प्रत्येक शंका निवारण करण्यासाठी आयुष्यभर मला त्याचा उपयोग झाला.

आमच्या संस्कृत व इंग्लिश विषयाच्या स्तराबद्दल पण बरंच काही सांगावेसे वाटते. आमच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमात A.G. Gardener, Shakespeare, Goldsmith, Charles Dickens इत्यादिकांच्या साहित्यातले उतारे होते. संस्कृतसाठी काही प्रश्नांची उत्तरे व कवितांचा संस्कृतमधे अन्वय लिहावा लागे. यामुळे संस्कृतमध्ये वाक्यरचना करून एखाद्या विषयाची प्रस्तावना किंवा संक्षिप्त परिचय देण्यासाठी पुढच्या आयुष्यात फार सोईचे झाले. आमच्या संस्कृतचा पाया इतका पक्का घातला गेला होता की लग्नानंतर जवळ जवळ २२ वर्षांनी बी.एड.ला प्रवेश घेतल्यावर संस्कृतच्या परीक्षेमध्ये मला ४० पैकी ३८ मार्क मिळाले.

मिस शास्त्री आम्हाला इतिहास व संस्कृत हे दोन विषय शिकवीत असत. इतिहासाचा मला फार कंटाळा येई. इंग्लिश, इतिहास त्यामानाने सोपी वाटे. ट्यूडर घराणे, स्टुअर्ट घराणे पुढे क्रॉमवेल असे एका ओळीत. पण इंडियन इतिहासात एका वेळी अनेक ठिकाणच्या घडामोडी लक्षात ठेवाव्या लागत. एकीकडे बंगाल दुसरीकडे कर्नाटक, तिसरीकडे महाराष्ट्र यांची एकत्र सांगड घालताना त्रेधातिरपीट उडत असे. सनावळ्या लक्षात ठेवताना जड जाई. मिस शास्त्री इतक्या विस्ताराने शिकवीत की नोटस् घेताना बोटे दुखू लागत. कधी कधी इतका त्रास व्हायचा की मी नुसत्याच नागमोडी रेषा रेखाटत असे. इतिहासाच्या तासाला मागच्या बाकावर जाऊन बसत असे. इतिहास व संस्कृतचा तास पाठोपाठ असे, अशा वेळी त्या म्हणत, ''बेहेनजी आगे आईये अब मैं संस्कृत पढ़ानेवाली हूँ ।'' माझ्या स्पष्ट व खणखणीत शब्दोच्चारांवर व स्वराघातांवर त्या बेहद्द खुश होत्या. म्हणत, ''सच्चे बामन की लडकी है । क्या बढ़िया श्लोक बोलती है ।'' त्यांनी कधी प्यावयास पाणी मागितल्यावर मी आणून दिलेले पाणी पीत नसत त्या म्हणत, ''लडकी तुम बामण हो, तुमसे सेवा कराकर मैं कहाँ नरक में जाऊँ ।'' त्यांचे माझ्यावर फार प्रेम होते. झाले असे, की त्या वर्षीच्या नोव्हेंबरमध्ये आम्हाला एक भाऊ झाला. माझी मावशी बाळंतपणासाठी आली होती. परंतु तिच्या सासरी काही अडचण आल्यामुळे तिला ८–१० दिवसात परत जावे लागले. सर्व घराची जबाबदारी मी व माझ्या लहान बहिणीवर पडली. सकाळी चार वाजता उठून स्वयंपाक, केरवारे, धुणेपाणी करून जाताना तारांबळ उडे. घरात आई, वडील, आजोबा, काका व वय वर्षे ५ व वर्षे १।। असे दोन लहान भाऊ. अभ्यासाला अजिबात वेळ मिळत नसे. वर्गात कोणालाही न आलेल्या

प्रश्नांचे मी हमखास उत्तर देत असे. एक दिवस मिस शास्त्रींनी प्रश्न विचारल्यावर उत्तर न देता आल्यामुळे मला रडू फुटले. ऑफिसात बोलावून रडण्याचे कारण विचारले तेव्हा म्हणाल्या, ''आता तू मला परत येऊन सांगेपर्यंत मी तुला प्रश्न विचारणार नाही.'' त्या वेळी कधी कधी वाढून घेतलेले ताट सरकवून बसचा हॉर्न वाजल्यावर शाळेत पळावे लागे. आत्तापर्यंत स्टेशनवरुन गावातल्या शाळेत जाणाऱ्या मुलींची संख्या बरीच वाढल्याने बससेवा उपलब्ध झाली होती. त्या वेळी कळत नव्हते पण आता विचार येतो की १५–२० दिवसांची बाळंतीण, दोन मुले व बाळ कसे केले असेल माझ्या आईने? त्यातच आम्ही ज्या दिवशी उपाशी जात असू तेव्हा ती आम्ही परत यायच्या वेळी पोहे, सांजा करून आमची वाट पाहात असे. खरंच एक आईच हे सर्व करू जाणे. असे जरी होते तरी त्या वर्षी परमेश्वर कृपेने माझा पहिला नंबर आला. आपण घेतलेले पहिल्या नंबरचे आव्हान गाठता येणार नाही अशी रास्त भीती वाटत होती. शेवटच्या दिवशी इंग्रजीचा पेपर मिळाला व शकुन्तलाला १५० पैकी ११२ व मला ११३ मिळाले व एका मार्काने मी पहिली आले व पैज जिंकली. अतिशय आनंदात ही बातमी आईला सांगितली. यावेळेपर्यंत माझी मावशी परत आली होती. म्हणाली, ''बर झालं बाई पास झालीस ते, नाही तर माझ्या डोक्यावर खापर फुटले असते. बाकी पहिला नंबर आला काय आणि प्रमोट झाली काय, वरच्या वर्गात गेलीस हे महत्त्वाचे.'' असा राग आला मला, मी आईला विचारले, ''आई इतक्या अडचणीतून मला पहिला नंबर मिळाला याचे काहीच का कौतुक वाटले नाही तिला?'' आई म्हणाली, ''जाऊ दे गं, असतो एकेकाचा स्वभाव! तिची मुले हुशार नाहीत ना म्हणून म्हणाली असेल ती असे.''

एकूण पाहाता मुलींच्या शिक्षणाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन असाच अनुदारपणाचा होता. शिकणारी, शाळेत जाणारी मुलगी म्हणजे उठवळ कामचुकार अशीच असणार असा सर्वसाधारण अभिप्राय असे. या सगळ्याचा एक फायदा असा झाला, की मी शिकलेली आहे म्हणून मला अमुक गृहकृत्ये येत नाहीत असे कोणी म्हणता कामा नये असे मला वाटे. यामुळे अक्षरशः पुरणावरणाच्या स्वयंपाकापासून लाडू, चिरोट्यांपर्यंत सर्व गोष्टी स्वतःच्या जबाबदारीवर करून पाहावयास शिकले. लोणची, पापड, कुरडया सर्व गोष्टी मला येत होत्या.

यथावकाश इयत्ता १०वीचे वर्ग सुरू झाले. महागाई दिवसेंदिवस वाढत होती. हळूहळू स्टेटमध्येसुद्धा युद्धाची झळ जाणवू लागली होती. रॉकेलचा तुटवडा भासू लागला होता. वडिलांना ऑफिसातून विशेष परवाना मिळाल्याने रॉकेल मिळत

असे. ते कामासाठी लवकर उठत व मोठा दिवा लावीत. त्यांच्याबरोबर लवकर उठून त्या दिव्यात आम्ही अभ्यास करीत असू. तसेसुद्धा सकाळी ७ नंतर व रात्री ९ च्या आधी कधीच अभ्यास करायला वेळ मिळत नसे.

या काळातली एक विशेष आठवण म्हणजे आम्हाला गृहशास्त्र या विषयात शिवणाच्या प्रात्यक्षिकांची एक वही करावी लागे. त्यात वेगवेगळ्या टाक्यांचे नमुने करून चिकटवावयाचे असत. त्यासाठी लागणारे रंगीत रेशीम व कापड याचा खर्च वाचवण्यासाठी आम्ही वडिलांच्या फाटलेल्या धोतरांमधून धड भाग काढून त्याला साबूदाणा किंवा भाताची खळ तयार करून कांजी केली व त्या कापडाला तांब्यात निखारे टाकून इस्त्री करून आवश्यक नमुने तयार केले. साड्यांचे काठ फाडून त्यातील रंगीत धाग्यांच्या साह्याने भरतकामाचे नमुने तयार केले. स्वतःचा वापरता स्वेटर उसवून त्या लोकरीतून बेबी सूट विणला, अशा अनेक करामती आम्ही पैसे वाचवण्यासाठी केल्या. वाढती महागाई व वाढता संसार याचा मेळ घालताना उडणारी आई–वडिलांची तारांबळ याची आम्हाला जाणीव होती व त्यात आपण कशाप्रकारे मदत करू शकतो एवढाच विचार या गोष्टी करताना आमच्या मनात येई. आमची आई स्थूल असल्याने तिची पातळे मांड्यांवर फाटत. आम्ही साडीच्या मधला भाग पाचवारी करून घरात नेसत असू. तरीपण आमचे सकाळचे दूध व आमचे शिक्षण यात आमच्या आई–वडिलांनी खंड पडू दिला नाही.

मी आणि परीक्षा यांची बहुधा एकनाड असावी, कारण माझ्या प्रत्येक महत्त्वाच्या परीक्षेच्या वेळी काही ना काही अडचण हमखास आलेली आहे. माझी मॅट्रिकची सबंध परीक्षा मी जवळ जवळ १ ते १।। ताप असताना दिली. ताप उतरण्याची गोळी घेऊनच पेपर लिहिले. त्यामुळे अपेक्षित यश जरी मिळाले नाही तरी शाळेत तिसरा व Anotomy Physiology व Hygine या विषयात बोर्डात पाचवी आले. बोर्डातील या विषयातील पहिल्या पाच क्रमांकांना Lady Motibai Medical School मध्ये Scholarship मिळत असे. पण आता विरोध घरातच होता. वडील पुढे शिकवायला तयार नव्हते. इंदूरला पाठवायला तर ते आजिबात तयार नव्हते. कारण त्याच सुमारास इंदूरच्या कोण्या एका डॉ. नामजोशींची मुलगी त्यांच्या ड्रायव्हरसह पळून गेल्याने ते बिथरले होते. मी १९ वर्षांची झाले होते. या वयाला माझी रोहिणी बी.एससी. आमच्या शिक्षणाच्या गाडीने इथवर मजल मारली हेच फार मोठे होते. त्या काळात १५ ते १७ या वयातल्या मुलींची सर्रास लग्ने होत होती. माझ्या वडिलांनी मी मॅट्रिक झाल्याशिवाय माझे लग्न करावयाचे नाही असे ठरवल्यामुळेच मी मॅट्रिक होऊ शकले. माझ्या दोन मावस बहिणींची लग्ने माझ्या

अगोदर झाली होती. आम्हाला मामा नसल्याने आमचे आजोबा आमच्याकडे असत. त्यांच्यात व माझ्या आईत नेहमी संवाद ऐकायला मिळे. ते म्हणत, ''कमळे, अगं सोनीच्या दोन्ही मुलींची लग्ने झाली. त्या दोघी मालूपेक्षा लहान आहेत. तुम्ही मालूचे लग्न कधी करणार?'' यावर आई म्हणत असे, ''दादा तिच्या वडिलांनी ती मॅट्रिक झाल्याशिवाय तिचे लग्न करावयाचे नाही असे ठरवले आहे. तुम्ही पुन्हा मला हा प्रश्न विचारू नका.'' असे करता करता अॅडमिशनची शेवटची तारीख जवळ आली व मला असाहाय्यतेने रडू फुटले. मी दिवसभर रडत होते. संध्याकाळी आई वडिलांना म्हणाली, ''तुम्ही काय करावयाचे ठरवले आहे? आज ती दिवसभर रडते आहे. तिला रणछोडचे पत्र आले आहे आणि त्यात तिला स्कॉलरशिप मिळाल्याचे त्याने कळवले आहे. काय करावे, पाठवावे का तिला इंदूरला? रणछोड तिला आपल्याकडे ठेवून घ्यायला तयार आहे.'' यावर पुढे त्यांचे आपसात काय ठरले ते मला कळले नाही, पण दुसऱ्या दिवशी ऑफिसला जाण्याअगोदर मला म्हणाले, ''तुला मी इंदूरला काही पाठवायला तयार नाही, पण उद्या इथल्या कॉलेजमध्ये नाव घालून ये. पण लग्न ठरेल त्या दिवशी कॉलेज सोडावे लागेल व कॉलेजात जाते म्हणून घरातली कामे अडून राहता कामा नयेत.'' मी वडिलांना म्हणाले, ''आम्ही घरात काम करत नाही असे आईने म्हणावे.'' आई असे म्हणणे शक्य नव्हते, कारण आम्ही दोघी बहिणी केरवारे, उष्टी खरकाटी, सडासारवण, गाद्या घालणे, काढणे इत्यादी कामे करत असू. मेडीकलचा प्रवेश नाकारला आणि 'एम.डी. दांडेकर, एम.डी.' हे स्वप्न इथेच भंगले.

मी व माझा मावसभाऊ आमच्या शाळेत School Leaving आणण्यासाठी ५ मैल चालत गेलो. कॉलेजमध्ये नाव घालण्यासाठी ११ रु. लागणार होते. मुलींना शिक्षण फुकट होते, पण हे पैसे भरावे लागणार होते. सर्व आवश्यक त्या गोष्टी पूर्ण करून आम्ही घरी आलो व भानू सायकलवर जाऊन फी भरून येणार होता. आईकडे पैसे मागितल्यावर ती म्हणाली, ''कपाटाच्या किल्ल्या हे बरोबर ऑफिसात नेतात त्या घेऊन ये मग पैसे देते.'' मी ऑफिसात जाऊन किल्ल्या आणल्या व प्रवेश घेतला. पण ही गोष्ट मनाला खटकल्याशिवाय राहिली नाही. संध्याकाळी वडील घरी आल्यावर मी त्यांना विचारले, ''तुम्ही इतकी वर्षे आई बरोबर संसार करता आहात, अजून आमची आई कशी आहे हे तुम्हाला कळले नाही का? हा आमच्या आईचा अपमान आहे.'' तेव्हापासून कपाटाच्या किल्ल्या घरी राहू लागल्या. आई म्हणाली, ''बरं गं बाई तू बोललीस, मला काही असे म्हणायचे धाडस झाले नसते.''

कॉलेज सुरू झाले. आमचे कॉलेज म्हणजे एक गंमतच होती. पहिल्या प्रथम आम्ही F.Y. ला सहाजणी होतो. या अगोदर एखाद दुसरी मुलगी कॉलेजात जात असे. प्रोफेसर वर्गात गेल्यावर आम्ही वर्गात जात असू व तास संपल्यावर आम्ही बाहेर पडल्याशिवाय प्रोफेसर बाहेर पडत नसत. Ladies Room च्या बाहेर पडणे तर शक्यच नव्हते. वर्गात आम्हाला कोणी प्रश्न विचारीत नसत. Toilet ला तिघीजणी जात असू. एक आत व दोघी बाहेर. कधी कधी फार चिडचिड होत असे. कॉलेजातली टवाळ मुले मला घाबरून असत. कारण कोट्याला वडिलांच्या ऑफिसात खांडेकर नावाचे एक गृहस्थ होते. मन्नू नावाचा त्यांचा मुलगा वेडसर होता. एकदा रणछोडभाऊ मला चिडविण्यासाठी म्हणाला, ''आपण मालूचे मन्नूशी लग्न करू''. मी चिडले, पण सगळेजण खूप हसले. पण हे प्रकरण इथेच संपले नाही. ही गोष्ट मन्नूपर्यंत कशी पोचली ते कळले नाही. एकदा मी बाजारात गेल्यावर त्याने माझी खोडी काढण्याचा प्रयत्न केला. मी मन्नूला म्हणाले, ''मन्नू गप्प बस नाही तर मार खाशील.'' वेडाच तो, म्हणाला, ''अरे तुम्हारी मार तो हमारे लिये फुलोंका हार होगी.'' माझा तोल सुटला व त्याला मी अक्षरशः चपलेने बडवून काढले. आजूबाजूचे लोक मध्ये पडले व त्याला बाजूला केला. मी रागाने फणफणतच घरी आले व रणछोडभाऊवर खूप तोंडसुख घेतले. भाऊ म्हणाला, '' महामाये, अग चंडिके काय झाले ते सांगशील की नुसतीच बडबड करशील.'' मी म्हणाले, ''हे तुझेच प्रताप भोवताहेत मला.'' शांत झाल्यावर मी भाऊला विचारले, ''वेडा म्हणावा तर या गोष्टी कशा कळतात याला?'' भाऊ म्हणाला, "These are natural instincts," व त्याने झाल्या प्रकाराबद्दल सपशेल क्षमा मागितली. यामुळे कॉलेजमध्ये मुले मला 'झाँसी की रानी' म्हणत असत.

या काळातली आणखी एक गम्मत म्हणजे मी व माझा मावसभाऊ एकाच वर्गात होतो. तो सायन्सला व मी आर्टस्‌ला. तो सायकलवर कॉलेजात येई. कधी कधी बसच्या वेळेपर्यंत आईचा स्वयंपाक होत नसे व त्याच्याबरोबर ती डबा पाठवत असे. मुली मला त्यावरून चिडवीत असत. तो माझा मावसभाऊ लागतो यावर त्यांचा विश्वास बसत नसे. त्या म्हणत, ''तुम दांडेकर वह गोगटे फिर तुम कैसे भाईबहन हो सकते हो?'' मग मी त्यांचे बौद्धिक घेऊन आपल्या कडील आडनावे, गोत्रे, जाती व्यवस्था इत्यादींची सविस्तर माहिती दिली. त्यांच्याकडे माथुर, भटनागर, सक्सेना, कुलश्रेष्ठ, श्रीवास्तव इत्यादींची कायस्थांमधील उपजाती असतात तशाच उपजाती आमच्याकडेपण आहेत पण आम्ही त्यांचा वापर आडनावासारखा करीत नाही. असे जर आडनाव वापरायचे ठरले तर आमचे

दोघांचे आडनाव ब्राह्मण, कोकणस्थ असे असेल. तसेच आम्ही गोत्रांचा वापर पण आडनावासारखा करीत नाही हेही सांगितले.

एकदा आमच्या बसमधे एका मुलाने सिगारेटचे जळते थोटूक फेकले. आम्ही ड्रायव्हरला गाडी थांबवायला सांगून त्याच्याविरुद्ध पोलिसात तक्रार केली व त्याला पोलिसांच्या हवाली केले. त्या वेळी या गोष्टीचा पण बराच गाजावाजा झाला. दुसऱ्या दिवशी त्या मुलाचे वडील वकील घेऊन कॉलेजात आले. पोलिस पण त्या मुलाला घेऊन हजर झाले. सवाल जबाब झाले व शेवटी त्या मुलाने व त्याच्या वडिलांनी आमची लेखी माफी मागितली. या सगळ्यांचा परिणाम म्हणून असेल कदाचित पण शिकणाऱ्या मुलींची वाटचाल त्यानंतर काही प्रमाणात सुकर झाली असेच म्हणावे लागेल.

आम्ही F.Y.ला गेलो त्याच वर्षी जयपूर विद्यापीठाची स्थापना झाली व आमचे कॉलेज डिग्री कॉलेज झाले. त्यामुळे आमच्या कॉलेजात Highly Qualified शिक्षकांच्या नेमणुका झाल्या. सुरूवातीला आम्हाला एक शास्त्री संस्कृत शिकवीत असत. ते हिंदीतून शिकवीत व आम्हाला उत्तरे इंग्लिशमधून लिहावी लागत. लवकरच एक डॉ. फत्तेहसिंग म्हणून नवीन संस्कृतचे प्रोफेसर आले. Economics ला प्रो. वैद्यनाथन म्हणून एक दाक्षिणात्य आले. हे नुकतेच M.A. झालेले २२–२४ वर्षांचे होते. हसमुख, स्मार्ट व एकदम टिपटॉप वर्गात येत. त्यांना आम्ही मिस्टर मणी म्हणत असू, कारण ते Money ला मणी म्हणत. विद्यार्थीप्रिय प्रोफेसर होते. कधी कधी कानाच्या पाळीवरील पावडर पुसावयाची राहून जाई व आम्ही आपापसात म्हणत असू ''आटे के बोरे में से चुहिया निकल आई है।'' ते लहान असल्याने आम्हाला आपल्यातीलच एक वाटत. आमच्या कॉलेजमध्ये अशी प्रथा होती की गैरहजर राहिल्यास प्रत्येक विषयशिक्षकाला Leave Note द्यावी लागे. एकदा मिस्टर मणी म्हणाले, "It is no use being absent and asking for leave the next day". मुद्दा बरोबर होता पण एकदा असे झाले की, अचानक खूप मोठा पाऊस आल्याने आम्ही भिजलो व सर्वांनाच अर्ध्या रस्त्यातून परतावे लागले. आम्हाला प्रोफेसरसाहेबांची फिरकी घेण्याची संधी मिळाली. आम्ही Leave Note मध्ये लिहिले की, Sir, had we known that it would rain yesterday we would have given this note a day earlier. Please excuse us for giving this note today. त्यांनी खिलाडूपणे दाद दिली म्हणाले, "I admire your inteligence. Don't do it again."

या महाशयांना पेन्सिलने नोट घेतलेल्या चालत नसत व पेन घेणे मला शक्य

नसल्याने मी टाक दौत घेऊन वर्गात जात असे. पण सहामाही परीक्षेला मी इकॉनॉमिक्समध्ये दुसरी आले व मला पेन्सिलने नोट घेण्याची परवानगी मिळाली. कारण मी पुस्तकात नसलेला पण वर्गात शिकवलेला संदर्भ उत्तरात वापरला होता. तो संदर्भ Malthusian law of population बद्दल होता हे आजही चांगले आठवते. English Literature आम्हाला डॉ. दास शिकवत. हे गृहस्थ वयस्कर असले तरी आम्हाला फार आवडत असत. छान शिकवत असत. ते व्हाईस प्रिन्सिपलपण होते. आझाद हिंद सेनेचा जोर असणारे दिवस होते ते. वर्गात हजेरी सुरू झाली की मुले 'येस सर' ऐवजी 'जय हिंद' म्हणू लागली. काही प्रोफेसर रागारागाने वर्ग सोडून निघून गेले, पण डॉ. दास पहिल्या मुलाने 'जय हिंद' म्हणताच उठून उभे राहिले. सॅल्यूट करून म्हणाले, "I have honoured your word, now answer the roll call." मुलांची बोलती एकदम बंद. आमचे हिंदीचे प्रोफेसर तिवारी म्हणत, ''एक महाराष्ट्र की लडकी आकर तुम्हारे उपर नंबर पाती है तुम लोगोंको शरम नहीं आती?'' असे होता होता पहिले वर्ष संपले. मी वार्षिक परीक्षेत संस्कृत व हिंदी विषयात पहिली व English Literature व Economics ला दुसरी आले.

दुसऱ्या वर्षाच्या सुरूवातीला जुलै–ऑगस्टमध्ये आमच्या कॉलेजात आंतर महाविद्यालयीन वक्तृत्त्व स्पर्धा होती. या स्पर्धेसाठी इंदूर, ग्वाल्हेर, गुणा व अजमेरहून मुले आली होती. आमच्या कॉलेजतर्फे नारायणदास भार्गव व सुशीलकुमार त्यागी या दोन विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. पण आमच्या कॉलेजचा performance अगदीच सुमार झाला. विषय होता 'Money is the root cause of all evils'. आमच्या मुलांना प्रतिपक्षाचे मुद्देसुद्धा खोडून काढता येईनात. आम्ही मुली डॉ. दास यांच्या समोरच बसलो होतो. मला राहवेना, मी एका रफ पेपरवर काही मुद्दे मांडले व डॉ. दासांच्या हातात दिले. त्यांनी ते चिटोरे प्रो. वैद्यनाथन यांना दाखवले व त्यांची अनुमती घेऊन मला आपल्या केबिनमध्ये बोलावून विचारले, ''तू घाबरणार नाहीस ना! मुले तुझी खिल्ली उडवायचा प्रयत्न करतील.'' मी नाही म्हणाले. नंतर ते मध्यन्तरात परीक्षकांना जाऊन भेटले व मला बोलायची परवानगी देण्याबद्दल विचारले. परीक्षकांनी परवानगी देण्याचे कबूल केले. परंतु माझे भाषण चांगले झाल्यास ते ट्रॉफीसाठी ग्राह्य धरता येणार नाही हेही स्पष्ट केले. मी प्लॅटफॉर्मवर उभी राहताच मुलांनी गडबड करायला सुरूवात केली, पण मी न घाबरता सुरूवात करताच क्षणार्धात हॉलमध्ये शांतता पसरली. भाषण बहुधा चांगले झाले असावे, कारण आम्हाला जरी ट्रॉफी मिळाली नाही तरी परीक्षक मंडळींनी मला स्पेशल प्राईज

जाहीर केले. कदाचित गावंढ्या गावात गाढवी सवाशीण असाही प्रकार असेल पण तो कप मी पुष्कळ दिवस जपून ठेवला होता. माझा मावसभाऊ सायकलवर घरी येत असे. घरी येऊन आईला म्हणाला, ''कमलामावशी आरतीचे तबक तयार कर ओवाळायला, तुझी मुलगी कॉलेज जिंकून घरी येते आहे.'' दुसऱ्या दिवशी पेपरला नाव आले. त्या वर्षीच्या बक्षीस समारंभात मी कोटा स्टेटच्या राजाकडून पाच बक्षिसे घेतली. मी डायसवरुन खाली उतरताच उपस्थितांमध्ये बसलेल्या आमच्या शाळेच्या मुख्याध्यापिका उठून पुढे आल्या व मला मिठी मारून माझे कपाळाचे चुंबन घेऊन म्हणाल्या, ''मेरे स्कूल के माथेपर आज तूने तिलक लगा दिया लडकी!''. कॉलेजमध्ये बक्षीस मिळवणारी मी पहिलीच विद्यार्थिनी होते. बक्षिस समारंभाला कर्नल पृथ्वीसिंग हजर होते. त्यांचा मुलगा जयवंतासिंग, वडिलांचा D.T.S. होता. त्याने दुसऱ्या दिवशी वडिलांना विचारले, ''काल एका दांडेकर नावाच्या मुलीला बक्षिसे मिळाली ती तुझी कोण?''

एवढे जरी झाले तरी मी मात्र रडत रडतच घरी आले कारण मी बक्षीस घ्यायला गेल्यावर कोणीतरी खुर्चीवरची माझी शाल चोरली होती. शाल हरवल्याबद्दल माझी आई मला रागवू लागली तेव्हा माझे आजोबा आईला म्हणाले, ''अग कमळे, तीन रुपयांची शाल हरवली म्हणून किती बोलशील तिला. ती कमरेपासून हनुवटीपर्यंत किती बक्षिसे घेऊन आली आहे ते तरी बघशील की नाही.''

या सर्व गोष्टींमुळे आमच्या प्रो. फतेहसिंगांनी बनारस हिंदू विद्यापीठाच्या एका शिष्यवृत्तीसाठी माझी शिफारस केली व माझ्याकडून एक फॉर्म भरून घेतला. या शिष्यवृत्तीसाठी सहा वर्षांचा बॉण्ड देणे आवश्यक होते. चार वर्षे एम.ए. पर्यंत व पुढे दोन वर्षे नोकरी असे त्या बाँडचे स्वरूप होते. घरी ही गोष्ट सांगितल्यावर वडील अर्थातच नाही म्हणाले. ते म्हणाले, ''बाँड संपेतोपर्यंत तू २७ वर्षांची होशील, इतके दिवस मी तुझ्या लग्नासाठी थांबू शकत नाही. तुझ्या पाठोपाठ प्रभी आहे.'' मी त्यांना सांगितले, ''तुम्ही प्रभीचे लग्न करून टाका.'' त्यावर ते म्हणाले, ''लोक मोठी मुलगी लग्नाची का राहिली असे विचारतील व ही गोष्ट तिचेही लग्न ठरण्याच्या आड येईल.'' आई म्हणाली, ''आमचे मुलगे लहान आहेत. आपले पोट जाळायला आई–वडिलांनी मुलगी लग्नाची ठेवली असा ठपका आम्हाला नको आहे. आम्ही आता होईल तितक्या लवकर आमच्या ऐपतीप्रमाणे स्थळ पाहून तुझे लग्न करणार आहोत.'' अशा रीतीने इंटरनंतर माझ्या शिक्षणाला एक भला मोठा पूर्णविराम मिळाला. या पूर्णविरामातून माझ्या शिक्षणाची गाडी पुढे सरकायला मला तब्बल ११ वर्षे वाट पाहावी लागली.

२८ जून, १९४७, या दिवशी माझे लग्न झाले. लग्नानंतर बहिस्थ विद्यार्थिनी म्हणून बी.ए. करण्याचा माझा मानस होता. परंतु लग्नानंतर मला समजले की माझ्या सासरी 'बडे घर पोकळ वासा' असा प्रकार होता. आमच्यावर जवळ जवळ सात माणसांची जबाबदारी होती. वय अडीच ते एकोणीस या वयोगटातील पाच भावंडे व आई–वडील. एका बहिणीचे वर्षापूर्वीच लग्न झाले होते. त्या वेळी जवळ जवळ अर्धा पगार घरी पाठवत होतो. त्यातच माझ्या नणंदेने बहिस्थ विद्यार्थिनी म्हणून इंटरला बसण्यासाठी पैशांची मागणी केली. एका भावाने बी.एड.ला जाण्यासाठी पैशांची मागणी केली. मीही माझा मानस बोलून दाखवला. त्या वेळी ते म्हणाले, ''हे बघ, मी तुला नाही म्हणतो म्हणून माझ्यावर रागावू नकोस. पण तुझ्या आयुष्याला एक ओळ लागली आहे. त्या दोघांच्या आयुष्याला ओळ लागायची आहे. म्हणून मी त्यांना पैसे पाठवणार आहे. हा भाऊ आमच्या चुलत सासऱ्यांकडे दत्तक गेलेला होता. एकादशीच्या घरी महाशिवरात्र असाच एकूण प्रकार होता. त्या वेळी मी म्हणाले होते, ''तुमचे म्हणणे मला पटते आहे, पण एक गोष्ट लक्षात ठेवा. उद्या माझ्या मुलांना पैशाअभावी मी त्यांना शिकवत नाही असे म्हणणार असाल तर ते मला आवडणार नाही.'' यानंतर या ना त्या कारणाने ही गोष्ट मागेच पडत गेली. सुदैवाने, यांची नोकरी चांगली होती. जवळ जवळ २५० रुपये पगार होता.

१९५५ च्या नोव्हेंबरमध्ये आमची देवळालीला बदली झाली. त्या वेळी माझ्या हातात एक शंभरची नोट देऊन ते म्हणाले, ''तुला बी.ए.ला बसायचे असेल तर बस.'' मध्यंतरीच्या काळात एका शिवणक्लासला जाऊन मी शर्ट बुशकोटपर्यंत कपडे शिवायला शिकले. आतापर्यंत मी तीन मुलींची आई झाले होते. मी हिंदी ऑनर्स घेऊन फॉर्म भरला. पण चौकशीअंती असे कळले की लायब्ररीची काहीच सोय देवळाली येथे नव्हती व नाशकातसुद्धा एच.पी.टी. कॉलेज सोडून कुठेच हिंदी लायब्ररी नव्हती. त्यामुळे ते वर्ष तसेच वाया गेले. दुसऱ्या वर्षी मराठी ऑनर्स घेऊन फॉर्म भरला व काही पुस्तकेही खरेदी केली. इथेसुद्धा नाशकात रविवार कारंज्याजवळच्या लायब्ररीतून पुस्तके आणावी लागणार होती. मुलींना घरी ठेवून लायब्ररीत जाणे अशक्य, कारण एक तीन वर्षांची व दुसरी सव्वाचार वर्षांची. पण याबाबतीत देवळालीच्या पोस्टमास्तर कुलकर्णींच्या पत्नी माझ्या मदतीला आल्या. मी महिन्यातून चार पुस्तके नेण्याची परवानगी काढली. महिन्यातून एक दिवस कुलकर्णी बाईंकडे मुलींना ठेवून मी नाशकात जाऊन येत असे. अभ्यास सुरू होता. मी ऑप्शनल फॉर्म नाटक घेतले होते. पूर्वी वाचलेल्या नाटकांची यावेळी खूप मदत झाली. पुणे विद्यापीठाशी सर्व व्यवहार पोस्टाने

व्यवस्थित चालले होते. देवळालीच्या काही मंडळींना माझी ही धडपड हास्यास्पद वाटत होती. तिथे एक गोविलकर मास्तर होते. त्यांनी बहिस्थ विद्यार्थी म्हणून नोकरी करून बी.ए.ची परीक्षा दिली होती. त्यांच्याकडे मी कधीकधी सल्ला घेण्यासाठी जात असे. तसेच कवी योगेश्वर अभ्यंकर पण बहिस्थ विद्यार्थी म्हणून बी.ए.ला बसत होते. परंतु त्यांना वाटे, मी मला न पेलणारा, न पचणारा घास घेण्याचा प्रयत्न करीत होते. ते म्हणत, ''वेडी का आहे ही बाई. अहो बी.ए.ची परीक्षा म्हणजे खाऊ वाटतो का हिला?'' तिथल्या काही बायका हिंदीच्या परीक्षांना बसत असत त्याचे इतके स्तोम माजवीत की विचारायला नको. अडचणी येतच होत्या. जमेल तशा त्या बाजूला सारण्यात यश पण येत होते. पहिली अडचण आली ती Migration Certificate ची कुठे अर्ज करायचा, कोणाला विचारायचे काहीच कळत नव्हते. कारण या वेळेपर्यंत कोट्याशी पार संबंध तुटला होता. शेवटी इंदोरला रणछोडभाऊला पत्र लिहिले व माझा इंटरचा रोल नं., कॉलेज सेंटर व वर्ष कळवले. त्याने योग्य ती चौकशी करून कुठे पत्रव्यवहार कारायचा ते कळवले व अडचण दूर झाली. जानेवारीत परीक्षेसाठी सेंटर कोणते निवडावे हे कळत नव्हते. नाशिक सेंटर निवडले तर एच.पी.टी. कॉलेजला जाण्यायेण्यातच दमछाक झाली असती व आम्हा लोकांच्या डोक्यावर तर सततच बदलीची तलवार टांगलेली असते. यावेळी यांच्या ऑफिसातील श्री. उपाध्ये दंपतीने मी पुणे सेंटर निवडले तर आमच्या घरी येऊन राहण्याची तयारी दर्शवली. सदर गृहस्थ देवळालीला बदली झाल्यावर दोन तीन महिने आमच्याकडे राहात होते व जागा मिळाल्यावर पत्नी व मुलीला आणले होते. हाही प्रश्न सुटला.

कधी नव्हे ती मी माझी पत्रिका वडिलांकडून मागवून घेतली व आमच्या ओळखीचे एक शुक्ल म्हणून होते त्यांना दाखवली. त्यांनी भविष्य वर्तवले की परीक्षेला बसलात तर तुम्ही पास व्हाल, पण अडचणी इतक्या येतील की तुम्ही परीक्षेला बसणारच नाही. मी म्हणाले, ''असे जर असेल तर मी नापास होण्याचा धोका पत्करीन पण परीक्षेला बसेन.''

बोलाफुलाला गाठ पडावी तसेच झाले. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात आमची पुण्याला बदली झाली. १६ फेब्रुवारीला जॉईन व्हायचे होते. ऐन परीक्षेच्या तोंडी जवळ जवळ पंधरा दिवस सामानाची आवरा आवर व बांधाबांध करण्यात वाया जाणार होते पण इलाज नव्हता. समाधानाची एकच गोष्ट होती की, पुण्याला जागेची शोधाशोध करण्यात वेळ घालवावा लागणार नव्हता. ह्यांच्या मामांना पत्र लिहून तात्पुरती तीन महिन्यांपुरती जागा मिळणार होती.

जवळ जवळ परीक्षेची सर्व तयारी होत आलेली होती. संस्कृतच्या पन्नास मार्कांचा अभ्यास शेवटच्या महिन्यात करावयाचे ठरवले होते. मभ्भटाच्या काव्य प्रकाशाचा दहावा उल्लास बराचसा पाठांतरावर आधारित असल्याने तो मी शेवटच्या महिन्यात करणार होते व पुण्याला आपण तो लायब्ररीतून मिळवायचा प्रयत्न करू असे हे म्हणाले, कारण त्याची किंमत बरीच होती.

सोळा फेब्रुवारीला आम्ही पुण्याला आलो. आल्यावर परत घराची मांडामांड, मुलींचे शाळा प्रवेश यात संबंध फेब्रुवारी संपला. यांना डिफेन्सशी संबंधित काही विशिष्ट कामगिरीसाठी पुण्यात आणले असल्याने यांचा उपयोग शून्य. रोज घरी यायला रात्रीचे आठ वाजत आणि यातच भरीला भर म्हणून रोहिणीला टायफॉईड झाला. परीक्षा पाच एप्रिलला सुरू होणार होती. काव्यप्रकाशाचा दहावा उल्लास मिळवायला व मिळाला तर उघडून पाहायला सुद्धा फुरसद नव्हती. खरोखरच परीक्षेला बसावे की बसू नये असा संभ्रम पडला. एकच गोष्ट चांगली होती ती म्हणजे माझ्या मामेनणंदेच्या मदतीने मुलींना हुजूरपागेत प्रवेश मिळाला व फर्ग्युसन कॉलेजमध्ये जाऊन सीट नं., बिल्डिंग नं. वगैरे गोष्टी बघून येणे सुकरतेने पार पडल्या. ती फर्ग्युसनचीच विद्यार्थिनी होती. शेवटच्या दिवसापर्यंत निर्णय होत नव्हता. कारण रोहिणीची काळजी सलग तीन चार तास कोण घेणार? बडोद्याहून बहिणीचे पत्र आले, ''काहीच जमले नाही तर तार कर, मी येईन.'' त्या वेळी फोन फारसे कुणाकडे नसत. तरी पण पन्नास मार्कांच्या सेक्शनची तलवार डोक्यावर टांगलेली होती. हे म्हणाले, ''तुझे संस्कृत चांगले आहे. इंटरला तू पहिली आलेली आहेस. तुला दीडशे पैकी सत्तर मिळूनही जातील. प्रयत्न करायला काय हरकत आहे? फार फार तर तुला संस्कृतला रिपीट येईल. याहून जास्त काय होईल? या सर्व अडचणींमधून नापास झाली, तर तुला कोणी नावे ठेवणार नाही. पास झालीस तर कौतुकच होईल.'' शेवटी मन तयार करून परीक्षेला बसावयाचा निश्चय केला. याच वेळी बहिणीच्या यजमानांना एस.एस.सी.ची Moderatorship मिळून ते पुण्यात आले व रोहिणीच्या देखरेखीचा पण प्रश्न सुटला. कधी नव्हे तो बादशाही बोर्डिंगचा डबा लावला व परीक्षा सुरू झाली. पण अडचणी इथेच संपायच्या नव्हत्या. दोन पेपर शिल्लक असतानाच मला तापाने गाठले. १०२ पर्यंत ताप होता. पुढचा पेपर दोन दिवसांनी होता. तोपर्यंत ताप उतरला, पण शारीरिक व मानसिक अशक्तपणा जाणवत होता. कसेबसे दोन्ही पेपर पार पाडले व हायसे वाटले.

जसजसा रिझल्टचा दिवस जवळ येत होता तसतशी मनाची तगमग वाढत

होती. आशा–निराशेच्या हिंदोळ्यावर मन हेलकावे खात होते. माझ्या रिझल्टच्या दिवशीच माझ्या मावसजावेचे व मावसनणंदेचे डोहाळेजेवण माझ्या मावस सासूबाईंनी ठरवले होते व मला मदतीसाठी येशील का म्हणून विचारले. मी म्हणाले, ''पास झाले तर येईन, नाही तर नाही.'' माझे मावस सासरे, श्री. आपटे, फर्ग्युसनचे उपप्राचार्य होते. त्यांनी सकाळीच विद्यापीठातून निकाल काढून आणला व मी पास झाल्याचे शिपाई घरी पाठवून कळवले. त्या वेळी आमचे देवळालीचे स्नेही श्री. गाडगीळ यांनीपण त्यांच्या बहिणीबरोबर माझाही रिझल्ट काढून आणला होता. मलाही अर्थातच आनंद झाला. पण मनात एकच धास्ती होती की अगदीच पंचेचाळीस टक्क्यांच्या काठावरचा सेंकड क्लास तर नसेल? ही शंका बोलून दाखवल्यावर मावससासरे म्हणाले, ''किती हावरट आहेस गं तू? मिळालाय न सेंकड क्लास आता. तरी पण त्यांनी फोन करून चौकशी केली. मला एकावन्न टक्केपर्यंत मार्क मिळाले होते. पन्नास मार्कांचा सेक्शन कोरा टाकून मिळालेले मार्क खरंच चांगले वाटले. माझ्या वडिलांच्या विनंतीनुसार मी पोस्टाने डिग्री न मागवता स्वतः उपस्थित राहून डिग्री घेतली व गाऊन घालून डिग्री घेतानाचा फोटो काढून त्यांना पाठवला. यांनी पण मला रिस्टवॉच घेऊन पदवीचा आनंद साजरा केला. एवढेच नव्हे तर देवळालीचे गोविलकर आमच्या घरी आले असताना त्यांना म्हणाले, ''अहो गोविलकर, एक तर पुणे विद्यापीठाचा दर्जा तरी कमी असला पाहिजे, किंवा आमची बायको तरी हुशार असली पाहिजे. असे पन्नास मार्कांचा सेक्शन कोरा देऊन सुद्धा तिला ५०% मार्क मिळाले आहेत.'' योगेश्वर अभ्यंकर तर वेडावूनच गेला. माझी मैत्रीण, श्रीमती गाडगीळांना, म्हणाला, ''अहो मीराबाई, एक तर माझे डोके तरी पुण्याला घेऊन जा किंवा त्यांचे पाय तरी इथे घेऊन या. ना क्लास ना कसले मार्गदर्शन, हिंदी माध्यमात शिकलेली ही बाई मराठी ऑनर्स घेऊन परीक्षा देते काय आणि सेकंड क्लास मिळवते काय.''

माझ्या दृष्टीने मला यात काहीच अवघड वाटले नव्हते. कारण मी मराठी सहावीपर्यंत मराठी माध्यमात शिकले होते. महाराष्ट्रात राहात होते व मराठी वाचनाची आवड पण जोपासत होते. यानंतर माझ्या मनात बी.एड. करण्याचा विचार होता. मी एस.एन.डी.टी. विद्यापीठात चौकशी केली होती. त्यांची वेळ ११ ते ५ असल्याने कल्पना पाच वर्षांची होऊन पहिलीत गेल्यावर जमणार होते. यंदा ती चारच वर्षांची होती व तिची शिशुशाळा ८ ते ११ होती. पण माझ्या शिक्षणाच्या विचारात अडचणी न आल्या तर नवलच. १९५९च्या जूनमधे माझ्या मावस–बहिणीच्या यजमानांचा धनुवार्ताच्या इंजेक्शनची रिॲक्शन येऊन मृत्यू झाला व

तिच्याकडे शिकावयास असलेल्या दुसऱ्या मावसबहिणीची मुलगी माझ्याकडे ठेवून तिचे आई–वडील नोकरीच्या गावी गेले. मी जर बी.एड. ला गेले तर ह्या मुलीला कामाला लावून हिने बी.एड. केले असा ठपका यायला नको म्हणून मी तो विचार बाजूला केला.

याच सुमारास मध्यवर्ती सरकारने निवृत्तीचे वय पंचावन्न वरून अठ्ठावन्नवर नेल्याची घोषणा केली. कल्पना सहा वर्षांची झाली होती. यांचे वय चाळीस व मी चौतीस वर्षांची झाले होते. आणखी एक अपत्याची जबाबदारी आपल्याला सहज पेलता येईल असे वाटू लागले. ऑफिसरकीचे प्रमोशन पण एक दोन वर्षात मिळणार होते. तिघी मुली बहुगुणी, बहुआयामी व हुशार होत्या. मुलासाठी एक चान्स घ्यावा असे वाटले व २२ नोव्हेंबर, १९६०, रोजी चि. विभावरीने आमच्या कुटुंबात पदार्पण केले. थोडे खट्टू झालो, पण ओझे वाटले नाही. बी.एड. पूर्णपणे मागे पडले.

विभावरी शिशुशाळेत जाऊ लागली. माझी पण शाळेत हुशार मुलींची आई म्हणून ओळख वाढायला लागली. त्याच सुमारास पालक–शिक्षक संघाच्या कल्पना जोर धरू लागल्या. हुजूरपागेत पण पालक–शिक्षक संघाची स्थापना झाली व मी संघाची सेक्रेटरी म्हणून काम बघू लागले. वक्तृत्त्व, कविता, उतारा, पाठांतर, नाट्यवाचन स्पर्धा यात मुलींसाठी भाषणे लिहिणे, त्यांच्या तालमी घेण्यात संबंधित शिक्षकांना मदत करणे, इंग्रजी कच्चे असणाऱ्या मुलींसाठी सराव वर्ग घेणे अशा अनेक उपक्रमांत मी सहभागी होत असे.

या सर्व वातावरणाचा परिणाम म्हणून माझी शैक्षणिक भूक जागी होऊन परत चाळवली व मी १९६८, १९६९ या दोन वर्षात हिंदी घेऊन एम. ए. भाग एक व एम. ए. भाग दोन या परीक्षा दिल्या व ५६ टक्के मार्क मिळवून एम. ए. झाले. मला Poetics व Literary Criticism मध्ये ५९ मार्क मिळाले. इथे सुद्धा दैवाने आपला प्रभाव दाखवला. एम.ए. भाग एकच्या पहिल्या पेपरला सकाळी डोके इतके दुखत होते की विचारता सोय नाही. गोळी घेऊनच परीक्षा दिली. भाग दोनच्या पहिल्या पेपरला मोलकरणीची दांडी. भांडी घासून, धुणे धुवून पेपरला गेले. पण मागच्यापेक्षा खूप बरे. हे स्वतः मला स्कूटरवर पेपरला पोचवायला, न्यायला येत होते. राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या ग्रंथालयात रोज सायंकाळी चार ते सात बसून अभ्यास करीत असे. दादांची ऑफिसातून आल्यानंतरच्या चहापाण्याची जबाबदारी मुली सांभाळीत असत. आमचा एक पेपर हैद्राबादला तपासायला गेलेला असताना जळितात नष्ट झाला व त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना त्या पेपरात पासापुरते ४० गुण देण्याचा विद्यापीठाने निर्णय घेतला. त्यामुळे टक्केवारी कमी झाली नाहीतर जास्त

टक्के मिळाले असते. रिझल्ट आल्यावर विद्यापीठातील हिंदीच्या विभाग प्रमुखांनी मला बोलावून घेऊन माझ्यापुढे एक प्रस्ताव ठेवला. मला मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत व गुजराती अशा पाच भाषा येत असल्याने वेगवेगळ्या कालखंडातील त्या त्या भाषांमधील साहित्याचे अध्ययन करून त्यातील कल्पनांच्या साम्यस्थळांचा मागोवा घेणे असे काहीसे या प्रकल्पाचे स्वरूप होते. त्यासाठी ते मला दरमहा १५० रुपये अभ्यासवृत्ती द्यायला तयार होते. यांच्या मते मी हा प्रस्ताव स्वीकारावा असे होते. पण? हा पण सुरूवातीपासूनच माझा पाठपुरावा करीत आला होता आणि यावेळीदेखील हा पणच आडवा आला.

या पणचे स्पष्टीकरण देण्यासाठी मला बरेच मागे जावे लागणार आहे. आठवणी लिहीत असताना कधी ना कधी या सर्व घडामोडींचा उहापोह मला करावा लागणार आहेच मग तो आत्ताच केला तर अस्थानी होणार नाही असे वाटल्यानेच पुढील हकीगत लिहिणार आहे.

२० ऑक्टोबर, १९१९, साली ह्यांचा Born with a silver spoon in mouth अशाच शब्दात वर्णन करता येईल अशा परिस्थितीत जन्म झालेला असताना पुढील पंधरा–सोळा वर्षांच्या काळात नियतीची चक्रे अशी काही फिरली की वयाच्या सोळाव्या वर्षी मॅट्रिक झाल्यावर पुढील शिक्षणाची काहीच सोय झाली नाही. एक वर्ष घरी काढल्यावर नंतरच्या वर्षी याच्या– त्याच्याकडे राहून, कधी एकाकडे राहून दुसऱ्याकडे जेवून, मित्रांच्या पुस्तकांवर अभ्यास करून, सायन्सचा खर्चिक अभ्यासक्रम न निवडता कलाशाखेची निवड करून, १९४१ साली फ्रीशिपवर स.प. महाविद्यालयात सर्वप्रथम आलेला हा विद्यार्थी. परिस्थितीच्या रेट्यामुळे १९४२ च्या जानेवारीत नोकरीला लागला. वडिलांनी ''माझा हा संसार तू कडेला लाव, माझे जे काय आहे ते मी शेवटी तुला देऊन जाईन'' अशी गळ घातल्याने १९४२ ते १९६२ अशा प्रदीर्घ कालखंडात स्वतःची व पर्यायाने आपल्या बायको मुलांची हौसमौज बाजूला ठेवून कुटुंबासाठी केलेली पदरमोड. तरीही, जाताना स्वतःचा शब्द न पाळता आपले जे काही होते ते बायकोच्या नावाने करून जाणारे वडील. लग्न झाल्यावर स्वतःच्या बायकोला बी.ए. होण्यासाठी नकार देऊन बी.एड. होण्यासाठी भावाला व इंटर होण्यासाठी बहिणीला मदत केली. वडील गेल्यानंतर, घर आईच्या नावावर केलेलं असूनसुद्धा बहिणीच्या लग्नाला केलेली मदत व ''आता मी तुला दरमहा पैसे पाठवणार नाही. तू माझ्याबरोबर पुण्याला चल,'' असे सांगितल्यावर आमच्याकडे पुण्याला येण्याचा प्रस्ताव मान्य न करता ''वडील गेल्यावर मधूने पैसे पाठवणे बंद केले. मधू फिरला,'' अशी

केलेली हाकाटी. १९६७ साली इंटर सायन्स झाल्यावर मीनाच्या आवडीप्रमाणे तिला जे.जे. स्कूल ऑफ आर्टस्ला किंवा मायक्रोबायोलॉजी घेऊन बी.एससी. करण्यासाठी मुंबईला ठेवून शिकवणे, न जमल्याची सांपत्तिक असहाय्यता या सगळ्याचा ताण सहन न झाल्याने व आपण आपल्या बायकामुलांवर अन्याय केला अशी समजूत त्यांच्या संवेदनाक्षम मनाने करून घेतली व ते आजारी पडले. त्यांचे अन्न तुटले. दर दोन दिवसांनी मला विचारू लागले, ''माझे काही झाले तर तू काय करशील? माझा पंधरा हजारांचा विमा आहे पण यावर मी दहा हजार कर्ज घेतले आहे. चार मुली पदरात घेऊन तू कुठे जाशील? माझे फॅमिली पेन्शन इतके कमी मिळेल की त्यात तुम्ही एकवेळ चहा फक्त पिऊ शकाल.'' आम्ही नाना तऱ्हेने त्यांना उभारी देण्याचा प्रयत्न करीत होतो, पण यश येत नव्हते. असे म्हणतात की 'सत्य संकल्पाचा दाता नारायण' तसेच काहीसे या बाबतीत झाले. एक दिवस मी इंग्रजी कच्चे असणाऱ्या मुलींना शिकवत असताना मुख्याध्यापिका साठेबाई वर्गावर आल्या. वर्ग संपल्यावर मला म्हणाल्या, ''गोडबोले बाई, तुम्ही बी.एड. होऊन आमच्या शाळेत का येत नाही?'' मी आश्चर्यचकित झाले. माझ्यासमोर जणू अलीबाबाची गुहाच उघडली. मी बाईंना विचारले, ''बाई, मी बी.एड. झाले तर खरंच तुम्ही मला घेणार आहात का?'' बाई म्हणाल्या, ''तुम्ही इंग्लिश घेऊन बी.एड. व्हा मी तुम्हाला घेते. मला जुन्या इंग्लिशमधली माणसे हवी आहेत.'' माझा निर्णय झाला. पी.एच.डी.साठी आलेला प्रस्ताव नाकारून मी बी.एड.ला जाण्याचा पर्याय निवडला. याची दोन कारणे. आता मी ४४ वर्षांची होते. हिंदीत पी.एच.डी. करून मी काय साध्य करणार होते? ही डिग्री मिळेतोपर्यंत चार-पाच वर्षे निघून जाणार होती व हिंदीला स्कोप तरी कितीसा असणार? त्या दिवशी संध्याकाळी आमची जणू कौटुंबिक सभाच भरली. एका बाजूला मी व मुली व दुसऱ्या बाजूने त्यांचे वडील, आम्ही एकमेकांना आपापली बाजू समजावून सांगू लागलो. हे म्हणाले, ''मी आत्तापर्यंत तुमच्या आईच्या प्रगतीत अनेक अडथळे निर्माण केले आहेत. आता तिच्या प्रगतीच्या आड येणारा दगड बनायची माझी इच्छा नाही.'' मी म्हणाले, ''स्वतःच्या डोक्यावर डिग्रींचा भार वाढवण्याऐवजी तुमच्या डोक्यावरच्या कर्जाचा भार कमी झाला तर मला जास्त आनंद होईल. मी पी.एच.डी. होण्याऐवजी माझ्या मुलींनी पी.एच.डी. झालेले बघणे जास्त श्रेयस्कर नाही का? तेवढी कुवत आपल्या मुलींमध्ये नक्कीच आहे.'' मला काळजी फक्त एकाच गोष्टीची वाटत होती. यंदा कल्पना ११वीला व रोहिणी F.Y. Scienceला. दोघींची महत्त्वाची वर्षे होती. मीना नुकतीच बी.एससी. झाली होती. अशावेळी

आपण या वेळखाऊ अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा का, असा संभ्रम उत्पन्न झाला. मीना दादांना म्हणाली, ''दादा तुम्ही रोज आईला नको ते प्रश्न विचारता व स्वतःपण दुःखी होता. मी बी.एससी झाले आहे. मी नोकरी करून थोडीफार मदत करू शकेन, नाही असे नाही. पण मी तुम्हाला किती दिवस पुरणार? एक दोन वर्षात तुम्ही माझे लग्न कराल. त्याऐवजी मी घर पाहीन, आईला बी.एड. करू दे. तिला नोकरीचे आश्वासन आहे. तिने नोकरी केली तर ती तुम्हाला जन्मभर पुरेल.'' कल्पना, रोहिणीनी मला खात्री दिली की माझ्या बी.एड.ला जाण्याचा त्यांच्या अभ्यासावर काहीही परिणाम त्या होऊ देणार नाहीत. इतकेच नाहीतर विभावरीच्या अभ्यासाकडे पण त्या लक्ष पुरवतील. विभावरी तेव्हा पाचवीत होती. तीपण हुशार होती, पण या मुलींइतकी Sincere नव्हती म्हणून मला तिची काळजी वाटे. सरतेशेवटी रोहिणी म्हणाली, ''दादा, तुम्हाला आमची व आईची सारखी काळजी वाटते व तुम्ही अजूनच नर्व्हस होता. मीनाताई बी.एससी. झाली आहे. मला सायन्स टॅलेण्ट मिळाली आहे, कल्पनापण आपले शिक्षण स्कॉलर्शिप मिळवून पूर्ण करू शकेल. अशा परिस्थितीत जर आईला नोकरी मिळाली तर तुम्हाला गरज पडली तर प्रकृती स्वास्थ्यासाठी नोकरी सोडून ऐच्छिक निवृत्ती घेता येईल. आम्हाला तुम्ही मिळवलेल्या पैशांपेक्षासुद्धा जास्त तुम्ही हवे आहात. आता तुम्ही नाही म्हणू नका.'' या सर्व युक्तिवादानंतर यांनी हार पत्करली, व मी बी.एड.ला ॲडमिशन घेतली.

मी कॉलेज लाईफची ही सेकंड इनिंग भरभरून जगले. मी डिबेट सेक्रेटरी म्हणून निवडून आले. मी चारही भाषांची मॅटर टेस्ट दिली. मला इंग्रजीत २२, मराठीत २४, हिंदीत ३० व संस्कृतमध्ये ४० पैकी ३८ मिळाले. मी हिंदी व इंग्लिशसाठी अर्ज दिला होता. बी.एड. कॉलेजचे एक वैशिष्ट्य म्हणजे तिथे प्रत्येकाकडे वैयक्तिक पातळीवर लक्ष दिले जाते. प्रिन्सिपॉलसाहेबांना मी संस्कृत घ्यावे असे वाटत होते कारण त्यात मी सर्वप्रथम होते. शेवटी मला त्यांनी साठेबाईंनी घातलेली अट सांगावी लागली, कारण त्यांनी १२ मार्क मिळालेल्यांना सुद्धा इंग्लिश दिले होते. मग ते हिंदी सोडण्याचा आग्रह करू लागले. तेव्हा तो मास्टर डिग्रीचा विषय असल्याने मी नकार दिला. शेवटी मला हिंदी व इंग्लिश मिळाले कारण मी इंग्लिश मिडिअम निवडले होते. पहिल्या युनिट टेस्टला मी गणितात चक्क नापास झाले. मला Mean, Median व Mode काहीच आले नाही. दशांश, अपूर्णांकापलीकडे माझी गणिताची मजल गेलीच नाही. पुन्हा प्रिन्सिपॉलना भेटणे आले. मी त्यांना माझी अडचण सांगितली व सहामाहीपर्यंत सुधारणा

करण्याचे आश्वासन दिले. रोज घरी गणिताची शिकवणी सुरू झाली. हे व मुली मला शिकवीत. सहामाही परीक्षेत २५ पैकी २५ मिळवून सरांची शाबासकी मिळवली. otis test नुसार माझा I.Q. १३९ निघाला. पुन्हा प्रिन्सिपॉलनी बोलावून विचारणा केली की कॉलेजमध्ये I.Q. सगळ्यात जास्त आहे मग रिझल्ट तसे दाखवीत नाही असे का? मी सरांना म्हणाले, "Sir, This is my last priority. माझी एक मुलगी इंटरला, एक एस.एस.सी.ला आहे. दोघी नंबरात येणाऱ्या आहेत. मोठ्या मुलीसाठी मी स्थळे बघते आहे. या सर्व जबाबदाऱ्या सांभाळून वेळ मिळाला तर मी अभ्यास करते. माझ्याकडून तुम्ही फार अपेक्षा ठेवू नये हे बरे.'' आमचे टी.एन. लिमये सर मला म्हणत ''अहो गोडबोले बाई तुम्ही फ्रेश स्टुडंट म्हणून हौशीने ६०० रु. भरुन सक्तमजुरीची शिक्षा कशासाठी भोगत आहात?'' फ्रेशर म्हणून मला पन्नास लेसन्स घ्यावे लागणार होते. असे जरी होते तरी गृहिणी या अनुभवाचा फायदा करून इतर विद्यार्थिनींशी संपर्क साधून रेशनकार्डावरील त्यांना नको असलेली साखर, तांदूळ, रवा, मैदा, वनस्पती तूप इत्यादी वस्तू गोळा करून प्रिन्सिपल साहेबांकडून बंद झालेल्या बी.एड. हॉस्टेलच्या गॅसवरच्या शेगड्या वापरण्याची परवानगी काढली. एल.डी. भाव्यांना भेटून फक्त खर्च झालेल्या गॅसचे पैसे देण्याची परवानगी मागून सिलेंडर मिळवला व अल्पोपहारासाठी मंजूर झालेल्या रकमेतून गॅदरिंगच्या वेळी जिलबीचे जेवण बनवून दाखवले. कॉलेजच्या नियतकालिकात एक कविता व छोट्यांसाठी लिहिलेले नाट्कले छापून आले.

यावेळीपण माझ्या परीक्षेला बसण्यात एक अडथळा आलाच. वडिलांची प्रकृती पाहण्यासाठी मी डिसेंबरच्या सुट्टीत बडोद्याला गेले होते. परत येताना माझी गाडी लेट झाली. आम्हाला एक प्रोजेक्ट करावयाचा होता. मी पाळीव जनावरांच्या सवयी, त्यांचे खाणे व आवाज यावर बडबडगीते तयार केली होती व हा प्रोजेक्ट बाईंडिंगला टाकून बडोद्याला गेले होते. गाडी लेट झाल्याने मी बारा वाजण्याच्या आत प्रोजेक्ट सादर करू शकले नाही, कारण दुकानदार घरी गेला होता. दुपारी चार वाजता हिंदीच्या हेड ऑफ डिपार्टमेंटने, मी अडचण सांगूनसुद्धा प्रोजेक्ट घेण्याचे नाकारले. ही गोष्ट माझ्या अधिकारातली नाही असेही म्हणाले. शेवटी मी प्रिन्सिपॉलची भेट घेण्याचे ठरवले. कारण मी मजा करायला गेले नव्हते. मृत्युशय्येवरील वडिलांना पाहायला गेले होते व गाडी लेट झाली हा माझा अपराध नव्हता. ही हकीगत गद्रे बाईंना कळली. त्या इंग्लिशच्या हेड ऑफ दी डिपार्टमेंट होत्या. त्यांनी मला प्रिन्सिपॉलकडे जाण्यापासून परावृत्त केले व म्हणाल्या,

''फुकटचे वैर पत्करू नका. तुम्ही तुमचा प्रोजेक्ट इंग्लिशमध्ये सादर करा. मी तुम्हाला मुदत देते.'' हे कळल्यावर सरांनी मुकाटपणे प्रोजेक्ट स्वीकारला. ते असे का वागले हे मला कधीच कळले नाही. कारण हा प्रोजेक्ट जर स्वीकारला गेला नसता तर मला नियमाप्रमाणे परीक्षा देता येणार नव्हती. खरे तर ही गोष्ट एकूणच बी.एड. कॉलेजामधल्या वातावरणाशी विसंगत होती. परीक्षा पार पडली. ध्यानी मनी नसताना मला बेस्ट स्टुडंटसाठी ठेवलेले पाकणीकर बक्षीस मिळाले. बक्षीस समारंभाला सेंट अर्नेलाजचे श्री. नित्सुरे उपस्थित होते. त्यांना त्या वर्षी ७वी पासून मराठी माध्यमाचा एक वर्ग सुरू करावयाचा होता. मी चारही भाषा शिकवू शकणार असल्याने त्यांनी मला मराठीची सुपरवायझर म्हणून येण्याची विनंती केली. पण त्यांची वेळ सकाळी नऊ ते दुपारी तीन अशी असल्याने मला गैरसोयीची होती. त्याच वेळी मला खडकवासल्याच्या सेंट्रल स्कूलमध्येपण पोस्ट ग्रॅज्युएट टीचर म्हणून नोकरी मिळू शकत होती. मी साठेबाईंना जाऊन भेटले, कारण शाळेकडून काहीच कळले नव्हते. बाईंनी दोन दिवस थांबायला सांगितले व दोन दिवसांनी मला नेमणूक झाल्याचे पत्र मिळाले. मुलाखत झालेली होतीच. या दोन्ही नोकऱ्या जास्त मानाच्या होत्या हे जरी खरे असले तरी गैरसोयीच्या होत्या. सेंट्रल स्कूलमध्ये स्केल जास्त होते, पण बदलीची तलवार. दोघेही दोन ठिकाणी बदलून गेलो तर? म्हणून पूर्ण विचारांती हुजूरपागेत रुजू झाले. १९७३च्या जूनमध्ये प्रोबेशन पिरीयड संपला व कायम झाले. पुढे Higher secondary चे वारे वाहू लागले. बऱ्याच शिक्षिका एम.ए. करू लागल्या. कुणी मराठी घेऊन तर कुणी समाजशास्त्र घेऊन. मी हिंदीची एम.ए. होते. सेकंड क्लास ही होता पण मला संधी मिळणार नव्हती. कारण श्रीमती निर्मला देव मला सीनिअर होत्या. मी इंग्लिश घेऊन एम.ए. करण्याचा विचार करू लागले. मला शनिवारी शेवटचा तास फ्री असे. बाईंची परवानगी घेऊन मी थोडी लवकर शाळेतून बाहेर पडून ११.२०च्या बसने युनिव्हर्सिटीच्या लायब्ररीत जाऊ लागले. रोहिणीचे कार्ड वापरुन ब्रिटिश कौंन्सिल मधून पुस्तके आणू लागले. भाषाशास्त्र व Shakespearean theater चा अभ्यास व शेक्सपियर व मोर्ले यांचा तौलनिक अभ्यास सुरू केला, पण याच सुमारास मला इस्चिमिक हार्टचा त्रास सुरू झाल्याने मुली व यांनी Veto वापरला. नोकरीसुद्धा चालू ठेवायची की नाही हे डॉक्टरी सल्ल्याने ठरणार होते. शेवटी 'सर्व नाशे समुत्पन्ने अर्धंत्यजति पंडितः' या न्यायाने मी माझा हट्ट मागे घेतला व शैक्षणिक वाटचालीला कायमचा पूर्णविराम मिळाला.

❍ ❍ ❍

# ३. माझी अभ्यासेतर वाटचाल

मानवी जीवनाचे वर्णन करताना अनेकांनी जीवनाला निरनिराळ्या उपमा दिल्या आहेत. कोणाच्या मते जीवन ही एक रंगभूमी आहे तर कोणी त्याला सुखदु:खाच्या धाग्यांनी विणलेल्या जरतारी वस्त्राची उपमा देतो. कोणाला जीवन एक संग्राम आहे असे वाटते तर कुणी सुखदु:खे समे कृत्वा लाभालाभो जयाजयौ असा संदेश देत जीवनाच्या खेळातील हारजीत खिलाडू वृत्तीने स्वीकारायला सांगून त्याला खेळ म्हणतो. या सगळ्याचा विचार केल्यावर असे लक्षात येते की जीवनाचे हे वर्णन सात आंधळ्यांनी केलेल्या हत्तीच्या वर्णनाशी मिळते जुळते आहे. यातील प्रत्येकाने जीवनाच्या एकेका अंगाचा विचार केला आहे.

माझ्या मते मानवी जीवन हे अनेक रंगीबेरंगी धाग्यांनी विणलेल्या गोफासारखे आहे किंवा एखाद्या कॅलिडोस्कोपसारखे आहे. आपल्या आयुष्याला शैक्षणिक, वैचारिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक, भावनिक, धार्मिक असे कितीतरी संदर्भ चिकटलेले असतात. यांपैकी प्रत्येक संदर्भ आपल्या आयुष्यावर आपापला ठसा उमटवीत असतो. बंगालची दुर्गापूजा, उत्तरेतील रामलीला, मथुरा–वृंदावनची कृष्णाष्टमी, गुजरातचा दांडिया तसा महाराष्ट्राचा सार्वजनिक गणेशोत्सव; मराठी माणूस जिथे जिथे गेला तिथे तिथे आपल्या बरोबर घेऊन गेला. रतलाम व कोट्याला पण सार्वजनिक गणेशोत्सव साजरा होत असे. या दोन्ही ठिकाणी रेल्वे स्टेशननजीक जी वस्ती होती त्यात नोकरी निमित्त बरीचशी महाराष्ट्रीय मंडळी इंदूर, ग्वाल्हेर, उज्जैन, बडोदा, भोपाळ, सागर येथून आलेली होती. त्यातली बहुतांश रेल्वेत, काही पोस्टात–टेलिफोनमध्ये नोकरी करणारी असत. एखाद् दुसरा बँकेत वगैरे मुंबईकर किंवा पुणेकर असे. रेल्वेत नोकरी करणाऱ्यांनी रेल्वेकडून गणेशोत्सवातील कार्यक्रमांसाठी येणाऱ्या कलाकारांसाठी व त्यांच्या साथीदारांसाठी फ्री पासेस उपलब्ध करून घेतले होते. यामुळे पुण्या–मुंबईहून नारायणराव व्यास, शाहीर खाडिलकर, उमाबाई सहस्त्रबुद्धे यांचे कीर्तन असे कार्यक्रम ठरवता येत असत. कोट्याला गणपतीची स्थापना एखाद्या अधिकाऱ्याच्या बंगल्यात अथवा रेल्वे इन्स्टिट्यूटमध्ये होई. अनंत चतुर्दशीच्या

दिवशी झांज ताशांच्या गजरात बैलगाडीतून गणपतीबाप्पांना विसर्जनासाठी चंबळेवर नेण्यात येत असे. चंबळेच्या काठावर पेशव्यांनी बांधलेल्या एकखांबी गणपतीच्या देवळात उत्तर पूजा करून चंबळेत विसर्जन होत असे. याबद्दल विशेष नमूद करण्यासारखी एक गोष्ट अशी की एकदा मुनीरखान नावाच्या एका मुस्लिम अधिकाऱ्याच्या बंगल्यात गणपती बाप्पा विराजमान झाले होते. या गणेशोत्सवात मी व वडिलांचे हेडक्लार्क श्री. पिटकर यांच्या बाई व भानू या दोन मुली मिळून एखादा मनोरंजनाचा कार्यक्रम बसवीत असू. बालगोपालांचे छोटेसे नाटुकले, एखाद्या नाटकातील प्रवेश, एखादे नृत्य असे या कार्यक्रमाचे स्वरूप असे. या कार्यक्रमासाठी लागणारी ड्रेपरी भाग घेणाऱ्या मुलांच्या पालकांकडून मिळणाऱ्या थोड्याफार पैशांच्या मदतीने आम्हीच तयार करीत असू. पुठ्ठयाला सोनेरी कागद चिकटवून मुकुट, चंदेरी कागद चिकटवून तलवारी, धनुष्यबाण, जुन्या फाटक्या धोतरांच्या धड भागांना रंगवून कांजी करून टिकल्या लावून अंगरखे, शेला व पागोटे तयार होई. रविवारच्या बाजारात मिळणाऱ्या काचेच्या मण्यांचे दागिने तयार होत. तीन जुनी धोतरे रंगवून गोफ विणण्यासाठी सहा पदर बनत. चादरींचे पडदे असा सगळा थाट असे. त्या वेळी कोट्याला गार्लिक कंपनीतर्फे एक भली मोठी पाण्याची टाकी बांधली जात होती. या कामावर देखरेख करण्यासाठी श्री. बापट नावाचे गृहस्थ आलेले होते. ते कोकणातील असल्याने त्यांना गणपती उत्सवाचे विशेष अप्रूप असे. हे त्यांच्या घरच्या गणपतीसमोर आमचा कार्यक्रम ठरवीत व सर्व कलाकारांना भेट वस्तू देत.

मी, बाई व भानूने मिळून गावात नवीन लग्न होऊन आलेल्या मुलींसाठी एक भगिनीमंडळ सुद्धा सुरू केले होते. श्री. बापट यांनी त्यांच्याकडे असलेली एक खोली आम्हाला वापरायला दिली होती. या मुलींना आम्ही आम्हाला येत असलेले थोडेफार विणकाम, शिवणकाम, इंग्रजी, फर्स्ट एड व होम नर्सिंगची माहिती करून देत असू. या सर्व मुली सातवी आठवीत शाळा सोडलेल्या असत. या भगिनी मंडळात माझे मैना मराठे नावाच्या मुलीशी विशेष मेतकूट होते. मराठी तिसरीपर्यंतच शिकलेली ही मुलगी छान कविता करी. तिची शब्द संपत्ती समृद्ध होती. मलाही कविता करण्याचा नाद होता. या भगिनी मंडळात आम्ही स्त्री, किर्लोस्कर व मनोहर मासिकांमधील विचारप्रवर्तक लेख वाचून त्यावर चर्चा घडवून आणीत असू. त्या वेळी पिरोज आनंदकर, कमला बंबेवाले, आनंदी विजापुरे, आनंदी वैद्य, मृणालिनी देसाई, शामला वनारसे इत्यादी लेखिकांचे लेख असत. एकदा स्त्रीविषयक कायदे समजावून सांगताना कायदा स्पष्ट करते वेळी मी म्हणाले, ''उद्या मी एकवीस वर्षांची झाल्यावर माझे आई–वडील जर मला पसंत नसलेल्या मुलाशी माझे लग्न

ठरवीत असतील तर मला कायद्याने त्यांच्या विरुद्ध कोर्टात जाता येईल.'' ही गोष्ट कोणी तरी आईला येऊन सांगितल्यावर आई घाबरली व वडिलांना म्हणू लागली, ''ही कारटी एकवीस वर्षांची होण्याअगोदर हिचे लग्न उरकून टाका, नाहीतर ही डोईजड होईल.'' वडिलांचा माझ्यावर पूर्ण विश्वास होता. ते तिला म्हणाले, ''अग मुद्दा स्पष्ट करण्यासाठी ती असे म्हणाली म्हणजे ती असे काहीतरी करेलच असे का समजतेस तू? तुला कोणी तरी काहीतरी येऊन सांगत आणि तू उगीचच घाबरतेस. आपली मुलगी इतर मुलींपेक्षा थोडी निराळी आहे हे जरी खरे असले तरी ती विचारी आहे. तिला बऱ्या-वाईटाची जाण आहे. नीती-अनीतीची चाड आहे. शिक्षणासाठी पडतील ते कष्ट करण्याची तयारी आहे. ती कोणतेही गैर कृत्य करणार नाही अशी मला पूर्ण खात्री आहे.'' माझे हे असे त्या काळी चाकोरीबाहेर समजले जाणारे वागणे बघून अनेकांनी अशी भाकिते वर्तवली होती की ''ही मुलगी एखाद् दिवशी कोणाचा तरी हात धरून पळून जाईल. बाबूरावांनी तिला सैल सोडले आहे. त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागतील.'' माझे वडील म्हणत, मालू म्हणजे पटकोडगे आहे. कुठेही कशीही फेका ती उठून सरळ उभी राहील. त्यांची ही उपमा मला आवडत नसे. कारण पटकोडगे या शब्दाला थोडासा निलाजरेपणाचा वास आहे असे मला वाटे. माझी व माझ्या आईची बऱ्याच वेळा लहान लहान गोष्टींवरुन वादावादी होई. हरताळकेचा उपवास आला की मी तिला विचारी, ''कशाला घालतेस हा उपवास मला तू? मी जर उद्या एखाद्या मुलाशी लग्न ठरवले तर करू देणार आहेस का?'' मी असे विचारले की तिला वाटे माझे काहीतरी affair आहे व ती अस्वस्थ होई. वटसावित्रीला ती पूजेला निघाली की मी म्हणे, ''अग नवरा आजारी पडला तर त्याला औषधोपचार सोडून वडाला सूत गुंडाळीत बसणे कितपत योग्य आहे? तू खरी वटसावित्रीची पूजा केव्हाच केली आहेस. मुंबईला जाऊन अप्पा शास्त्रींच्या औषधाने बाबूकाकांना बरे नाही का केलेस तू? हीच खरी वटसावित्रीची पूजा आहे.'' असे म्हटले की ती हमखास रागवे व वडील माझी बाजू घेत. लोकांचा माझ्यावर आणखी काही गोष्टींमुळे पण राग होता. मी व पिटकरांच्या मुली मिळून भगिनी समाजातर्फे चैत्रगौर व संक्रांतीचे सार्वजनिक हळदीकुंकू करीत असू. त्या वेळी आगाशे नावाच्या गृहस्थांनी प्रथम पत्नी गेल्यावर एका रजपूत स्त्रीशी विवाह केला होता व नेवासकर नावाच्या गृहस्थांनी पुनर्विवाह केला होता. त्यांना पण आम्ही हळदी कुंकवाचे आमंत्रण देत असू. इतर बायका त्यांना हळदी कुंकवाला बोलवीत नसत.

पति-पत्नी किंवा स्त्री-पुरुष संबंधाबाबत आम्ही किती अनभिज्ञ होतो याची

आठवण झाली की आजही हसू येते. तसा विचार केला तर कथा कादंबऱ्यांमधून प्रियकर प्रेयसी याबद्दल जरी वाचले असले तरी आपल्या पतीसाठी किंवा प्रियकरासाठी पराकोटीच्या त्यागाला तयार असणे', त्याच्या कल्याणासाठी कितीही दु:ख सोसण्याची तयारी ठेवणे एवढेच कळे. पैशाला महत्त्व न देता गुणी व्यक्तीची पती म्हणून निवड करणे अशी धारणा होती. आलिंगन, चुंबन या पलीकडे आणखीही काही असते याची कल्पनाच नव्हती. आताच्या मुलांना सिनेमा, सीरियल्स यामुळे नको त्या वयात नको तितक्या गोष्टी माहीत असतात. इयत्ता नववीत Anatomy, Physiology, Hygiene शिकल्यावर हा भ्रम दूर झाला. त्याच वेळी ''विवाहाच्या निमंत्रण पत्रिकेतील शरीर संबंध म्हणजे काय?'' या प्रश्नाचे उत्तर कुणीच कधीच न देता मार का मिळत होता हेही कळले. एकदा तर कहरच झाला. आमच्या पाठीमागे हरमन गार्ड यांचा बंगला होता. त्यांच्या घरी पोलिस आले होते व त्यांच्या मुलीला पकडून नेले. चौकशी केल्यावर कळले की तिला बाळ झाले होते व ते तिने कचऱ्याच्या पेटीत टाकले होते. मागे एकदा रतलामला सौ. नागराज नावाच्या बाईंना वर्षाच्या अंतराने दोन मुले झाली तेव्हा आई म्हणाली होती, ''देव तरी एखाद्याच्या पाठीमागे कसा लागतो. बिचारी, वर्षाच्या आत दोन बाळंतपणे झाली. किती हाल होत असतील तिचे?'' मी आईला म्हणाले, ''आई तू बाईंना वर्षाच्या आत देवाने दोन मुले दिली म्हणून त्यांची कीव केलीस. मग आता हरमन गार्डाच्या मुलीला देवाने बाळ दिले म्हणून का नावे ठेवतेस? हाँ, आता तिने ते बाळ कचऱ्याच्या पेटीत टाकले हे चूकच आहे.'' मी या वक्तव्याबद्दल त्या वेळी यथेच्छ मार खाल्ला होता.

लहान गावात अशा गोष्टी कर्णोपकर्णी पसरायला वेळ लागत नाही. त्यामुळे काही मंडळींच्या मते मी वाया गेलेली किंवा पुढे मागे नक्की वाया जाणार असलेली मुलगी होते. असे जरी असले तरी अशीही काही माणसे होती ज्यांना मी आवडत असे. अशा मंडळींपैकी आमच्या मालकांचे ओकसाहेब नावाचे वयोवृद्ध मित्र, मालकांचे मोठे भाऊ रामभाऊ गोगटे व आमचा रणछोड भाऊ हे होते. हे ओकसाहेब विद्वान व व्युत्पन्न असून प्राथमिक शिक्षक होते. त्यांनी आपली हयात पैसे जोडण्याऐवजी माणसे जोडण्यात व गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यात खर्च केली. त्यामुळे निवृत्तीनंतर मिळणाऱ्या तुटपुंज्या निवृत्ती वेतनाला हातभार लावण्यासाठी म्हणून ज्या मुलांचे पालक दूरवर राहात व काहींकडे पैसा आहे पण पालक नाही अशा दोघा तिघांना जवळ ठेवून त्यांचे पालन पोषण करीत. ते स्वत: विनापत्य असले तरी या मुलांचे संगोपन उत्तम वळण लावून करीत. त्यात

व्यवहार कमी व सौहार्द जास्त असे. त्यांनी मोठा केलेल्या एका रानडे नावाच्या मुलाशी माझ्या मैत्रिणीचे लग्न झाले होते. तिच्याकडून मला ही सर्व हकीगत कळली होती. हे ओकसाहेब एकदा रणछोडभाऊला म्हणाले, ''अरे रणछोड, ही मुलगी यंदा मॅट्रिकला आहे ना? तिला पास व्हायचे आहे की नाही. अरे, ती कधीच अभ्यास करताना दिसत नाही ते.'' भाऊ म्हणाला, ''अहो, नुसते पासच काय फर्स्ट क्लास करियरची मुलगी आहे ती.'' खात्री करून घेण्यासाठी एक दिवस त्यांनी मला बोलवून काही प्रश्न विचारायला सुरूवात केली. आम्हाला बाणभट्टाच्या कादंबरीमधील काही भाग होता. बाणभट्ट म्हणजे लांबच लांब वाक्ये लिहिण्यात पटाईत. चार चार ओळींचे एकेक वाक्य, त्याचा विग्रह म्हणजे तारेवरची कसरत. मी एक दोन वाक्यांचा विग्रह केल्यावर त्यांनी पुरे म्हणून सोडून दिले. ते भाऊला म्हणाले, ''रणछोड, खरंच हुशार आहे रे पोरगी. तिच्या वडिलांना म्हणावे हिचे शिक्षण थांबवू नका.''

मालकांचे रामभाऊ नावाचे भाऊ महात्मा गांधींचे अनुयायी होते. हे गृहस्थ मॅट्रिकला फर्स्ट क्लास फर्स्ट आलेले असून त्यांनी स्वत:ला देश कार्याला वाहून घेतले होते. कमतपूरला कोणा चाफेकरांची शेती होती. बन्याबापू मराठे नावाचे गृहस्थ ती शेती बघत असत. तिथे राहून रामभाऊ खादी ग्रामोद्योगाचे काम करीत व शेतीविषयक सुधारणा घडवून आणण्याचे मार्गदर्शन करीत. इंदूरला भाई कोतवाल नावाच्या कार्यकर्त्याशी त्यांचे घनिष्ट संबंध होते. जन्मभर स्वत: काढलेल्या सुतापासून विणलेले कपडे ते वापरीत. चरख्यावर सूत काढताना त्या सफाईदार सुताकडे बघत राहावेसे वाटे. आम्हाला पण त्यांनी कापसाचे पेळू बनवून टकळीवर सूत काढायला, धनुकलीने कापूस पिंजायला शिकवले होते. आम्ही काढलेले सूत फक्त समईच्या तेलवातीलाच उपयोगी पडेल असे निघे ही गोष्ट निराळी. ते वडिलांना म्हणत, ''बाबूराव, मुलीला शिकवा. अण्णा काळ्यांकडे बघा. त्यांनी मुलीला M.A.L.T. केले आहे.'' हे अण्णा काळेसुद्धा गांधीवादी होते व त्यांची मुलगी अजमेरच्या सावित्री गर्ल्स हायस्कूलची मुख्याध्यापिका होती. आमचे घरमालक म्हणजे आमच्या मोठ्या मावशीचे दीरच होते. बयान्याहून स्टेशन मास्तर म्हणून निवृत्त झाल्यावर त्यांनी कोट्याला घर बांधले होते. आत्तार्यंत तीन चार निवृत्तांनी इथे घरे बांधली होती. खांडेकर, कुलकर्णी, तारे इत्यादी लोकांची घरे बजरिया नावाची स्टेशनलगत जी नवी वसाहत निर्माण होत होती तिथे होती. आमच्या मालकांचा मोठा मुलगा म्हणजेच रणछोड भाऊ तो रंगूनला प्रोफेसर होता. ४२साली तो निर्वासित म्हणून भारतात परतला होता. युद्धाचे पडघम वाजू लागल्यावर त्याने स्वतःच्या बँक अकाऊंटसह

बायका–मुलांना भारतात पाठवून दिले होते. त्याला स्वतःला येता आले नाही, कारण तो रंगूनच्या Air Raid Precaution चा In-charge होता. रंगून पडल्यावर जी मंडळी ब्रह्मदेशातून खुश्कीच्या मार्गाने परतली, त्यांपैकी हा एक. बोटातली अंगठी, घड्याळ, अंगावरचे कपडे देऊन टाकून कसे तरी निभावून नेत ही मंडळी कलकत्त्याला पोहोचली. त्यावेळच्या सरकारने त्यांना जन्मगावी जाण्यासाठी फ्री पासेस दिले होते. एक गंजीफ्रॉक व कमरेला गुंडाळलेली लुंगी असा तो कोटा स्टेशनवर गाडीतून उतरला. पुढे त्याने काही दिवस पुण्याला फर्ग्युसन कॉलेजमध्ये अध्यापन केले व शेवटी इंदोरला होळकर कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाला. तो स्थिरस्थावर होईतो त्याची पत्नी आपल्या दोन मुलांसह कोट्याला होती. अशा वेळी कुटुंबसंस्थेचे महत्त्व पटते. या सर्व मंडळींनी खंबीरपणे व एकजुटीने या संकटाला तोंड दिले. मोठे काका म्हणत, ''अरे रणछोड, 'शिर सलामत तो पगडी पचास.' तुम्ही सगळे सुखरूप आहात हेच महत्त्वाचे.''

आम्हाला वडिलांकडून फारसे नातेवाईक नव्हते. माझ्या दोन्ही आत्या व आजी आजोबा वडिलांच्या लग्नाअगोदरच गेलेले होते व थोरल्या चुलत्यांबद्दल मागे लिहिले आहेच. धाकटे चुलते कोट्यातच होते. माझ्या आईची आई मी सात आठ वर्षांची असतानाच गेलेली असल्याने आजोळची रेशीम माया आम्हाला कधी मिळालीच नाही. पण आमच्या मालकांनी ती उणीव भरून काढली. त्यांना आम्ही मोठे काका म्हणत असू. उमदे, हौशी व खेळकर असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या घरात आमचा मुक्त संचार असे. घराशेजारच्या बागेत त्यांच्याबरोबर बागकाम करीत असू. त्यांचा B.Sc. च्या वर्गात शिकणारा अतिशय देखणा असा मुरलीधर नावाचा मुलगा क्षयाचा संसर्ग होऊन वारला होता. सर्वांत धाकटा विनायक D.T.S. ऑफिसमध्ये असताना रतलामला आठ दहा महिने आमच्याकडे राहात होता. यांची दोन्ही तिन्ही मुले इंदूरला माझ्या आजोबांकडे शिकायला होती. गोगटे व गोळे दोघेही इंदूरचे असल्याने आमचे नाते कमी पण घरोबा जास्त होता. मोठे काका घरातला कर्ता पुरुष असल्याने त्यांच्याकडे कुळधर्म, कुळाचार यथासांग साजरे होत असत. गौरी गणपती, नवरात्र, देव दिवाळी, वार्षिक बोडण इ. नवरात्र बसवायला उज्जैनहून ब्राह्मण बोलवीत. सप्तशतीचा पाठ, अखंड नंदादीप, धान्याची उगवण, नऊ दिवस सवाष्ण–ब्राह्मण हे सगळे संस्कार त्यांच्यामुळे झाले. कोट्याला एक कथेकरी बुवा उज्जैनहून कीर्तन करण्यासाठी येत असत व नऊ दिवस कीर्तन करीत. रोज नवे आख्यान लावीत. सुरूवातीला एक श्लोक व त्याचे निरुपण आणि शेवटी ज्या श्लोकाने कथानकाची सुरवात करत त्याच

श्लोकाने कथानकाची समाप्ती करत याची मोठी गंमत वाटे व हरदासाची कथा मूळ पदावर असे का म्हणतात हे कळले. अनेक पौराणिक कथांची ज्ञानात भर पडली. त्यांनी एकदा सत्यवान–सावित्रीच्या आख्यानात मोरोपंतांची आर्या वापरली होती. सावित्रीला शेवटचा वर देताना यमधर्माचे वर्णन करताना,

*'भुलला धर्म द्युतिला धृतिला मतिला तिच्या तथास्तुतिला ।*
*काही न विचार करिता संतोषे तो वदे तथास्तु तिला।।'*

यातल्या यमकाची मला इतकी भुरळ पडली की मी मोरोपंतांचे आर्या रामायण, संशय रत्नमाला व केकावली मिळवून वाचली. त्या वेळी मी त्यांच्या संशय रत्नमालेवर विडंबनात्मक अर्जदाराची संशयरत्नमाला अशी कवितासुद्धा केली.

या कालखंडात एकदा असे झाले की आमचे थोरले चुलते नवरात्रात आमच्याकडे राहावयास आले. त्यामुळे आमच्याकडे त्यांचे व आजोबांचे अशी दोन नवरात्रे होती. फार काही अवडंबर नव्हते. फक्त नंदादीप व माळ एवढेच होते. आईला दोन अडीचपर्यंत ताप येत होता. त्या वेळी आम्ही तीन दिवस पाळीत असू. धाकटी बहीण बाजूला होती आणि माझीपण पाळी सुरू झाली. काय करावे कळेना. घरात वडील, काका, आजोबा, तीन लहान भाऊ, बाजूला बसलेली बहीण व आजारी आई. मनाची घालमेल होत होती. मी कितीही बुद्धिनिष्ठ असले तरी माझ्यासाठी एक प्रकारे ही कसोटीची वेळ होती. पाप–पुण्याच्या कल्पनांचा मनावर जबरदस्त पगडा होता. तसे आम्ही टांग्यातून शाळेत जात येत असतांना महिन्यातून जवळ जवळ पंधरा दिवस शाळेतून परत आल्यावर शिवाशीव झाली म्हणून परत आंघोळ करीत असू. कारण आम्ही पाच जणी एकत्र जात येत असू. कधी कधी थंडीत आंघोळ केल्याचे नाटक करून हात, पाय, तोंड ओले करून बाथरुमधून बाहेर पडण्याची लबाडी करीत असलो तरी आता प्रसंग वेगळा होता. स्वैंपाक करून देवाला नैवेद्य दाखवायचा होता. दिव्याची वात सारायची होती. आपण विटाळ कालवला आणि काही अनिष्ट घडले तर? अशी भीती वाटत होती. खूप विचार केला. मागे वडिलांनी आपद्धर्म म्हणजे काय हे समजावून सांगताना विश्वामित्रांनी दुष्काळात कुत्र्याचे हाडूक चघळण्याची कथा सांगून म्हणाले होते, ''आपल्या समोरून एखादी गाय गेली व तिच्या मागून आलेल्या कसायाला मी गाय पाहिली नाही असे सांगितले तर ते पाप होत नाही, कारण त्यामुळे गायीचा जीव वाचणार असतो. कोणतेही कृत्य चूक की बरोबर हे ठरविण्यासाठी हेतु शुद्धीचा विचार करायचा असतो.'' क्षणात मनाचा कौल मिळाला. हा आपद्धर्म आहे असे मनाला पटले तरी पण मनावरचे दडपण दूर करण्यासाठी देवासमोर उभी राहून देवाला म्हणाले ''देवा, आता मी जो निर्णय घेतला आहे तो जर चूक असेल, त्यात

पाप नाही असे मला वाटत असतानाही जर त्यात पाप असेल तर या पापाची तू मला शिक्षा दे. इतर कोणालाही त्याचा त्रास होऊ देऊ नकोस कारण हा निर्णय सर्वस्वी माझा आहे. तू सर्वसाक्षी आहेस. तुला सर्व कळते. तरी मला क्षमा कर.'' पुढे आईला कसलाही संशय येऊ नये म्हणून ती बरी झाल्यावर खोटी खोटीच बाजूला बसले. नाहीतर आणखी एका गैरसमजाला निमंत्रण!

१९४३ डिसेंबरमध्ये मोठे काका निवर्तले व त्याच सुमारास माझ्या मावशीचे दुसरे दीर रिटायर होऊन त्यांच्याकडे राहावयास आले. सदर गृहस्थ जरासे बुद्धीला बेताचे पण सुस्वभावी होते. मोठ्या काकांनी त्यांना रेल्वेत चिकटवून दिले होते. आग्रा येथे रेल्वे रुळांवर खडी टाकण्यासाठी चार-पाच डब्यांची मालगाडी असे ती त्या ठराविक सेक्शनवर नेऊन ठरल्या ठिकाणी खडी टाकवून घेण्याचे काम त्यांच्याकडे असे. आम्ही गार्डाच्या डब्यात बसून त्यांच्या बरोबर जात असू. ब्रेक कसा लावायचा, वेग कसा कमी करायचा, कसा वाढवायचा हे ते आम्हाला समजावून सांगत असत. मोठी गंमत वाटे, त्यांच्या देखरेखीखाली ब्रेक व्हील हलवताना. हे जोडपे विनापत्य होते. त्यांच्या पत्नी रुपाने सुमार पण बाई बुद्धिवान होती. पण त्यांची बुद्धी जरा तिरकी चालत असे. महागाई वाढू लागली होती. आम्ही देत असलेले भाडे वाढवून घ्यावे असे त्यांनी अप्पाला म्हणजे मोठ्या काकांच्या धाकट्या मुलाला सांगितले. वडिलांनी त्या वेळी निघालेल्या नियमाप्रमाणे २५ टक्के भाडे जास्त द्यावयास सुरुवात केली, पण तेवढ्याने त्यांचे समाधान होत नव्हते. आम्ही देत असलेल्या भाड्याच्या अडीचपट भाडे त्यांना हवे होते. दांडेकर, गोगटे, गोळे यांचे पूर्वापार स्नेहसंबंध लक्षात घेता अप्पाला हे अवघड वाटून त्याने काय करावे म्हणून रणछोडभाऊला पत्र लिहून विचारले. उत्तराचे कार्ड पोस्टमनने नेमके माझ्याच हातात दिले. भाऊने लिहिले होते, ''दांडेकर जोपर्यंत इथे राहाणार आहेत तोपर्यंत भाडे वाढवू नये. कमळामावशीच्या वडिलांकडे राहून आपण सर्वजण शिकलो हे विसरून चालणार नाही. दादा गोळे व वहिनीने अत्यंत प्रेमाने आपले संगोपन केले. तसेच नोकरीला लागल्यावर तू आठ ते दहा महिने रतलामला दांडेकरांकडे राहिलास त्या वेळी आपण तुझ्या राहण्या-जेवणाचा खर्च विचारल्यावर हा गृहस्थ धर्म आहे असे सांगून त्यांनी पैसे नाकारले होते. मुरलीधर गेल्यावर तुझे नाव D.T.S. ला सांगून compassionate grounds वर त्याच्या जागी नोंदवून घेतल्यामुळेच तू seniority basis वर लवकर नोकरीला लागलास हेही लक्षात घेतले पाहिजे. कृष्णाकाकू काहीही म्हणू देत पण भाडे वाढवू नये. आज ना उद्या त्यांची बदली होईल तेव्हा काय भाडे वाढवायचे ते वाढवा. तुला दत्तूकाका व कृष्णाकाकूंचेसाठी

खर्च करावा लागतो याची मला कल्पना आहे. हवे असेल तर त्यासाठी मी दरमहा काही रक्कम पाठवीन, कारण पर्यायाने ते दोघे माझी पण जबाबदारी आहेत, परंतु दांडेकरांचे भाडे वाढवू नये,'' मी ते पत्र त्यांच्या दारातून आत सरकवून दिले.

याच कृष्णाकाकूंनी एका गणेशेत्सवात माझी फजिती करण्याचा घाट घातला होता. त्यांच्याकडे त्यांच्या चुलत दिराची सुशीला नावाची मुलगी शिकायला आली होती. ते रिटायर झाल्यावर अजमेरहून पुण्याला गेल्यामुळे व ती हिन्दी माध्यमातली असल्याने तिला कोट्याला मालकांकडे ठेवले होते. तिला गाणे चांगले म्हणता येत असे. लहानपणापासून त्यांच्याकडे गाणे शिकवायला मास्तर येत असत. ती पेटी पण वाजवीत असे. त्यामुळे माझ्या कार्यक्रमामध्ये हा भाग तिच्याकडे सोपवलेला होता.

कार्यक्रमाच्या दोन–तीन दिवस अगोदर कृष्णाकाकूंनी तिला सांगितले, ''तू ऐन वेळी पेटी वाजवायला नकार दे म्हणजे मालूची चांगली फजिती होईल.'' त्याप्रमाणे तिने मला सांगितले. काय करावे मला कळेना. पण 'देव तारी त्याला कोण मारी'. तिथे पाऊ गोखले म्हणून गाण्याबजावण्यातले एक गृहस्थ होते. ते प्रसिद्ध लेखक शामकान्त गोखले यांचे भाऊ होते हे मला बऱ्याच दिवसांनी कळले. त्यांचे गणेश मंडळातील लोकांशी भांडण होते. परंतु त्यांच्या दोन मुली माझ्या गरबा डान्समध्ये राधा व कृष्ण होत्या. त्यांच्या पत्नीला त्यांच्या मुलींचे कपडे शिवायला वेगवेगळ्या फॅशन्स करायला मी मदत करीत असे. त्यांना जेव्हा ही गोष्ट कळली तेव्हा ते स्वत:हून माझ्याकडे आले व म्हणाले, ''मालू माझा गणेश मंडळावर जरी बहिष्कार असला तरी तुझ्या कार्यक्रमाला मी गाण्याची बाजू सांभाळीन, काळजी करू नकोस.'' त्यामुळे अडचण दूर झाली. आम्ही शारदा नाटकातील हळदीकुंकवाचा प्रवेश बसवला होता. मी शारदा, माझी बहीण प्रभावती वल्लरी अशा भूमिका होत्या. त्यांनी माझ्याकडूनपण दोन गाणी बसवून घेतली होती. या कार्यक्रमासाठी बारा येथील श्री. परांजपे यांची पत्नी आपला शालू व दागिने माझ्यासाठी घेऊन आल्या होत्या.

पुढे आम्ही काढलेले हे महिला मंडळ अखिल भारतीय महिला मंडळाशी संलग्न झाल्याची माहिती मला कळली व त्यावेळी माझी आठवण काढण्यात आली असे मला कळले. वाटले, मला जर हे आधी कळते तर त्या कार्यक्रमाला मी पदरचे भाडे खर्च करून उपस्थित राहिले असते. आपण लावलेल्या रोपट्याचा विकास बघून होणाऱ्या आगळ्या वेगळ्या समाधानाचा अनुभव खूप काही देऊन गेला.

❍❍❍

# ४. माझे आजोळ

आजोळ हा शब्द ऐकताच आपल्या मनात मऊ लुसलुशीत, मखमली मुलायम, छान अशा अनेक संवेदना फेर धरून नाचू लागतात. आजोळ म्हणजे उन्हाळ्यात सुखवून जाणारी गार वाऱ्याची झुळूक, थंडीतल्या शेकोटीची आल्हाददायक ऊब, मायेचा रेशीमस्पर्श, आजी, आजोबा, मावशी, मामा यांच्या नातेसंबंधातली हळुवार कोवळीक. ज्ञानोबा, नाथांपासून ते आजतागायत सर्व साहित्यिक, लेखक व कवींनी हाताळलेला हा हृद्य विषय अजूनही तितकीच आपली अवीट गोडी सांभाळून आहे. पण मी मात्र आजोळच्या या रेशीमस्पर्शाचा अनुभव घेऊ शकलेली नाही कारण माझ्या वयाच्या सातव्या–आठव्या वर्षीच माझी आजी स्वर्गवासी झाली. त्यानंतर आजोबांनी पाच ते सहा वर्षे कशीबशी इंदूरला काढली व १९४२ च्या मे महिन्यात ते आमच्या घरी कायम वास्तव्याला आले. तसे ते कोणावर आर्थिक दृष्ट्या अवलंबून नव्हते. त्यांना दरमहा पंचवीस रुपये पेन्शन मिळत होती. ते हुकुमचंद मिलच्या रंग खात्यात नोकरी करीत होते.

माझे आजोबा विष्णू कृष्ण गोळे मूळचे सातारचे. मर्ढेकर गोळे म्हणून ओळखले जात. मढ्याला त्यांची वडिलोपार्जित काही शेती पण होती. पण मुलगा नसल्यामुळे स्वतःच्या हयातीतच ती त्यांनी आपल्या चुलतभावाला विकून टाकली होती. ही गोळे मंडळी मढ्याहून इंदूरला कशी आली याबाबत काहीच माहिती उपलब्ध नाही. पण त्यांच्या चुलत भावाचा मुलगा इंदूरच्या होळकर कॉलेजमध्ये गणिताचा प्राध्यापक होता. माझी एक चुलत मावशी सदाशिव पेठेतील सहस्रबुद्धे यांच्याकडे दिलेली होती व दुसरी साठ्यांकडे दिलेली होती. या साठ्यांचा शिवाजीनगरला पुलाखाली सहयाश्रम नावाचा भला मोठा बंगला होता. सहस्रबुद्धे यांचे दत्त मंदिर असलेला वाडा अजूनही सदाशिव पेठेत आहे. या मावशीकडे मी हिंगण्याला असताना तिकडे येत असे, कारण ती माझी स्थानिक पालक होती. तिने लग्नानंतर एस.पी. कॉलेजमध्ये इंग्रजी घेऊन एम.ए. केले होते. पुढे ही मंडळी आफ्रिकेत होती. मी लग्नानंतर पुण्यात आल्यावर तिला भेटायला गेले होते त्या वेळी तिने

माझी अत्यंत आस्थेने विचारपूस केली. ही सर्व मंडळी सधन व उच्च शिक्षित होती. त्यांचे व माझ्या आजांबांचे संबंधही सलोख्याचे होते. माझे आजोबा आपल्या आई–वडिलांचे एकुलते एक अपत्य. आमच्या आईला काका किंवा आत्या कोणीच नव्हते. एक मावशी होती, ती पण विधवा होती व तिला मूल बाळ नसल्याने आमच्या आजोबांकडेच असे. आजी गेल्यावर आजोबा इंदूरला तिच्यासह राहात होते. माझ्या मावशीची व तिच्या दिरांची मुले माझ्या आजोबांकडेच शिकायला होती. आईची मावशी गेल्यावर आजोबा आमच्याकडे राहावयास आले.

फारसे काही माहीत नाही पण बहुधा माझ्या आजोबांचे वडील त्यांच्या लहानपणीच गेले असावेत व माझ्या आजोबांना माझ्या पणजीने मोठे केले असावे. कारण आईच्या तोंडून मी तिच्या आजीबद्दल कधी कधी ऐकले होते, पण आजोबांचा उल्लेख कधीच तिच्या बोलण्यात आला नाही. माझी पणजी व आजी अत्यंत गोडी गुलाबीने मिळून मिसळून रहात असल्याचे बरेचदा आईकडून ऐकले होते. आजोबा आमच्याकडे राहावयास आल्यानंतर ''मी सातव्या वर्षी शाळेत गेलो व सतराव्या वर्षी मॅट्रिक झालो,'' असा उल्लेख मी ऐकला आहे. मला माझी ही पणजी आठवत नाही. फार काय माझी आजीसुद्धा अगदी पुसट आठवते. त्यांच्या घराला एक माळ्यावर जायला जिना होता व त्या माळ्यावर रणछोड भाऊ, मुरली अण्णा, रामकृष्ण भाऊ व विनायक अप्पा अभ्यास करीत असत, अगदी अंधुक आठवते. आणखी काही आठवत असेल तर अंडाकृती आडवट गोल कुंकू व तिच्या मैत्रिणींची फाटक्या माई, मोडक्या ताई अशी फाटक व मोडक या नावांची अपभ्रष्ट रुपे. यांची मोठी गंमत वाटे. जुन्या तोफखान्यात साळसणकर वाड्यात आजोबांचे बिऱ्हाड होते. माझे आजोबा माळकरी होते. इतरांना अडीअडचणीला आपल्या कुवतीप्रमाणे मदत करणारे असे हे कुटुंब होते. कोणाच्या तरी जागेवर भुई भाड्याच्या करारावर त्यांनी कधी तरी घर बांधल्याचे व त्या माणसाने आजोबांना फसवल्याचे आईने सांगितलेले आठवते. त्यात त्यांची सर्व पुंजी संपून गेली. पैसा जोडण्याऐवजी माणसे जोडण्याकडे त्यांचा कल जास्त होता. या सगळ्या घटनांबद्दल उत्तरायुष्यात त्यांना कधीही हळहळताना ऐकले नाही. अत्यंत अल्पसंतुष्ट व समाधानी असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. माझे वडील त्यांचे विशेष लाडके होते. ''माझा धाकटा जावई विद्वान आहे,'' असे ते आपल्या मित्रांना सांगत. त्यांचा मला जाणवलेला एक विशेष म्हणजे ते कधीच कुणाला नावे ठेवीत नसत. दुसऱ्यात काय चांगले असेल तेच शोधण्याकडे त्यांचा जास्त कल असे. आमच्या घरी आल्यावर ते आमच्यातले एक होऊन राहिले. त्यांच्या वागण्या बोलण्यात कधीच

उपरेपणा जाणवला नाही. कडीकर नावाचे त्यांचे एक मित्र होते. दोघे मिळून गीता वाचत व ती पाठ करण्याचा प्रयत्न करीत. म्हातारपणामुळे बरेचदा पुढे पाठ मागे सपाट असे होई, की मग पुन्हा पहिल्यापासून सुरुवात. पण न कंटाळता, न थकता त्यांचा हा उपक्रम चालत असे. प्रत्येक वेळी 'आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत'पर्यंत गाडी आली की मला विचारीत, ''का ग मालू? आचार्य म्हणजे द्रोणाचार्य की भीष्माचार्य?'' मग मी त्यांना म्हणे, ''आजोबा, पुढचा श्लोक वाचा म्हणजे कळेल ना.'' त्यानंतर पुढील तीन चार श्लोकांचा संदर्भ देऊन दुर्योधन हे द्रोणाचार्यांना उद्देशून म्हणतो आहे हे लक्षात आणून दिल्यावर, त्यांची गाडी पुढे सरकत असे. आमच्या विणकाम, भरतकामावर त्यांचा फार आक्षेप असे. म्हणत Waste of time, waste of money & waste of energy. नातवंडांवर फार जीव. जरा काही झाले की सत्यनारायण करीन म्हणत. यावरुन त्यांच्यात व आईत वाद होई. आई म्हणत असे, ''अहो दादा, एवढया तेवढ्यासाठी कशाला सत्यनारायणाला साकडे घालता. ब्राह्मण–सवाष्ण किती उटारेटा करावा लागतो मला.'' गंमत म्हणजे नुसती पूजा करून त्यांचे समाधान होत नसे. आमच्या काकांकडील व मालकांकडील सर्व मंडळी पण बोलवावी लागत. माझ्या धाकट्या काकांची बायको माझ्या मधल्या मावशीच्या नणंदेची मुलगी होती. हे लग्न माझ्या आजोबांनीच जुळवले होते. माझ्या काकीचे वडील मध्य प्रदेशातील सागर जवळील देवरी गावाचे मालगुजार फडणीस होते. ही माझी काकू बऱ्यापैकी उठवळ, तोंडाळ व आळशी अशी श्रीमंताची मुलगी होती. तिच्या हटवादी व खर्चिक स्वभावाचा माझ्या चुलत्यांना बराच त्रास होत असे. तिच्या आजारपणात व तीन दिवसात आम्ही तिच्याकडे स्वयंपाक करायला जात असू. ताप थांबला तरी ''आता येऊ नका'' असे ती म्हणत नसे. आम्हीच एक दोन दिवसांनी कंटाळून जाणे थांबवत असू. तिच्या अनागोंदी कारभाराची एक आठवण मी कधीच विसरू शकणार नाही. एकदा पीठ पेरून कांद्याची भाजी करतेवेळी पीठ भुरभुरल्यावर उष्णतेने इतक्या आळ्या वळवळत बाहेर आल्या व त्याची मला इतकी किळस बसली की किती तरी दिवस मी पीठ पेरून केलेली कांद्याची भाजी खात नव्हते. तिला कोरड्या बेसनाच्या लाडूशिवाय कोणतेच पक्वान्न करता येत नसे. पुरण घालायचे असले तर मला म्हणत असे, ''मालू, उद्या पुरण घालणार आहे. जरा मदतीला येशील का?'' तिच्या खर्चिकपणाला आळा घालण्यासाठी माझ्या वडिलांनी दिलेल्या सल्ल्यानुसार काकांनी पैसे ऑफिसमधील टेबलाच्या खणात कुलूप लावून ठेवायला सुरुवात केली तर ही बाई भरमसाठ वाणसामान

मागवून त्यातील काही मागील दाराने विकून पैसे मिळवू लागली. अशाच वेळी 'गृहिणी गृहमुच्यते' या वचनाची सार्थकता पटते.

वर्षातून दोन वेळा आजोबा पेन्शन आणण्यासाठी इंदूरला जात असत. माझ्या मोठ्या मावशीची दोन मुले शिक्षणासाठी इंदूरला खोली घेऊन राहात होती. ती दोघे सिनेमा पाहाण्यासाठी आजोबांकडून पैसे मागून घेत. म्हणून एकदा त्यांनी माझ्यासाठी इंदूरहून येताना संस्कृतची रु. ५/- किमतीची डिक्शनरी आणली. म्हणाले, ''दुर्गीची मुले सिनेमा पाहायला पैसे मागतात, मग हिनेच काय पाप केलंय?'' अधून मधून तोंडात टाकण्यासाठी त्यांच्याजवळ साखरफुटाणे, दाणे व फुटाणे असत. माझे धाकटे दोन भाऊ वय वर्षे पाच व साडेसहा त्यांच्या या साठ्यावर डल्ला मारीत. त्या वेळी ते आईला म्हणत, ''कमळे, अगं माझे दाणे-फुटाणे लवकर लवकर कसे संपतात काही कळत नाही.'' एकदा ही चोरी पकडली गेली व मुलांना तंबी दिली तर तेही आवडले नाही. आईला म्हणाले, ''अगं, नको रागवूस त्यांना. लहान मुले म्हणजे देवाघरची फुले. संपू देत संपले तर माझे दाणे-फुटाणे.'' सणासुदीला देवाला नैवेद्य दाखवण्याआधी मुलांना गोड पदार्थ खायला नकार दिला तर म्हणत, ''लहान मूल म्हणजे माशी असते. खाऊ दे त्यांना नैवेद्य दाखवण्याअगोदर.'' त्यांच्याकडे एक खूप छान करवतीकाठी जरीचा खणाचा काठ होता. तो मला दिसल्यावर मी म्हणाले होते, ''आजोबा अहो किती छान आहे हा जरीचा काठ! मला देता पोलक्याला लावायला?'' तर म्हणाले, ''दिला असता ग, पण तुझ्या आजीच्या चोळीचा काठ आहे हा. तिची ही एवढीच एक आठवण माझ्याजवळ आहे.'' माझ्या मोठ्या मुलीच्या वेळी बाळंतपणानंतर मी सासरी जायला निघाले तेव्हा तो काठ मला देऊ करून म्हणाले, 'तुला आवडला होता न हा काठ? घेऊन जा आणि लाव तुझ्या पोलक्याला.' मला नाही, होय काहीच म्हणता येईना. डोळे भरून आले माझे. आपली कवच कुंडले काढून इंद्राला देणाऱ्या कर्णाची आठवण झाली मला. माझी चुळबूळ लक्षात आल्यावर म्हणाले, ''अगं, घे हा काठ आणि याचा एक छोटा तुकडा तू ते पॅचवर्क का काय करतेस तसा एका रुमालावर टाचून दे मला. अग जे सिंधूत तेच बिंदूत.'' त्यांची काही काही वाक्ये अजून माझ्या स्मरणात आहेत. आपण कोणाबद्दल काही बोलू लोगलो की म्हणत, ''अग चालायचेच, कोठे काही कोठे काही, एक आहे एक नाही.'' कधी चिडचिड झाली की म्हणत, ''तुका म्हणे नाही चालत तातडी, प्राप्त काळ घडी आल्यावीण.'' एकूण ''ठेविले अनंते तैसेची रहावे चित्ती असू द्यावे समाधान,'' अशा प्रकारची त्यांची जीवनविषयक धारणा होती.

त्यांच्या वाढदिवसाला माझी आई आवर्जून जिलबीचा बेत करीत असे, कारण ते त्यांचे आवडते पक्वान्न होते. जिलबीची तोंड फाटेपर्यंत स्तुती करता करता पोट भरत आले की त्यांना जिलबीची नळी जरा बारीक पडल्याचा साक्षात्कार होत असे. त्यांनी तसे म्हणायची आम्ही वाट बघत असू व आम्हाला त्या वेळी आमचे हसू आवरणे कठीण जाई. माझे वडील निवृत्त झाल्यावर बडोद्याला दोन खोल्यांच्या जागेत राहावयास गेले व आजोबांना माझ्या मोठ्या मावशीचे जावई कोट्याला त्यांच्या घरी घेऊन गेले. काही दिवस ते मुंबईला माझ्या मावस–भावाकडे म्हणजे रामकृष्णाभाऊकडे पण होते. या देवाघरच्या माणसाचे सर्वांनी प्रेमाने संगोपन केले. वृद्धापकाळामुळे १९५६ ते १९५८ च्या दरम्यान केव्हा तरी ते देवाघरी गेले. आज नक्की आठवत नाही.

माझी आजी मोठ्या मावशीकडे असताना मरण पावली. मृत्युपूर्वी काही दिवस ती माझ्या मावशीच्या यजमानांना म्हणाली, ''दुर्गीचे सगळे झाले आहे. सोनीच्या सासरची माणसे तिचे हवे नको बघायला आहेत. मला कमळीची काळजी वाटते. तिला सासरचे कोणी नाही.'' त्या वेळी माझ्या मोठ्या मावशीच्या यजमानांनी माझ्या आजीला शब्द दिला होता, ''कमळीची काळजी तुम्ही करू नका. आम्ही दोघे तिचे आई–बाप होऊ.'' माझ्या मोठ्या मावशीने व अंतुकाकांनी माझ्या आजीला दिलेला शब्द अक्षरशः खरा करून दाखवला. माझ्या मावशीने माझ्या आईची ५–६ बाळंतपणे पार पाडली. अतिशय कामसू व कष्टाळू होती ती. या दोघी बहिणींची एकजूट वाखाणण्याजोगी होती. माझ्या आईचे लग्न माझ्या मावशीनेच जुळवले होते.

या माझ्या मावशीचे कुटुंब हेच आमचे जिव्हाळ्याचे व जवळचे नातेवाईक होते. कोट्याला बरीच वर्षे रेल्वे कॉलनीत चार घरे टाकून ती राहात होती. ही सर्व मंडळी संगीत वेडी होती. माझ्या मावशीचे यजमान अत्यंत गोड व सुरेल आवाजात भजने म्हणत. माझ्या सगळ्या मावस बहिण–भावंडांनापण संगीताची आवड व गोडी होती. सर्वांना पेटी वाजवता येई. आम्हा भावंडांपैकी माझ्या बहिणीचा गळा चांगला होता. एकूणच माझी ही बहीण कलावान होती. तिचे सर्व काम नीटनेटके, रेखीव व सुबक असे. तिने काढलेली ठिपक्यांची रांगोळी पण फूटपट्टीने आखल्यासारखी प्रमाणबद्ध असे. आम्ही जर शहराच्या ठिकाणी राहात असतो तर तिला संगीत व चित्रकला या दोन्ही कला वाढवता आल्या असत्या. शिवण शिवताना मी बेतायचे व तिने शिवायचे अशी वाटणी आम्ही करीत असू. तिने केलेल्या पोळ्यासुद्धा इतक्या, एकसारख्या होत की चळत बघत राहावी आणि पातळ तर इतक्या की चिमटीत दोन उचलल्या तरी एकच उचलली आहे असे वाटावे. आमच्या

दोघीत तुलनाच करायची झाली तर मला काठावरचा फर्स्ट क्लास व तिला डिस्टिंक्शन असे म्हणावे लागेल. माझ्या मावशीचे नानू व भानू हे दोन मुलगे व आम्ही दोघी बहिणी असा आमचा ग्रुप होता. आम्ही त्यांच्या बरोबर विटी दांडू, लगोऱ्या, गुलामलकडी (सूरपारंब्या) इत्यादी खेळ खेळत असू. सागरगोटे, झिम्मा, फुगड्या, काचापाणी इत्यादी खेळ पण ते आमच्या बरोबर खेळत. हिंगाच्या डब्यांना भोके पाडून त्याचा तराजू करीत असू. लिंबोण्या, शिसवीच्या शेंगा, टाकळ्याच्या शेंगा, रतलाम स्टेशनवरच्या बकुळीच्या झाडांवरची आंबट–गोड फळे यांनी आमच्या भाजीची दुकाने मांडली जात. चिंचोक्याचे पैसे व चिंचोका फोडून त्याचे दोन भाग केल्यावर अर्धा पैसा अशी विभागणी असे. आम्ही काढलेल्या रांगोळ्या विस्कटणे, आमच्या बाहुल्या मोडणे इत्यादी भावांचे बहिणींना त्रास देण्याचे जन्मसिद्ध अधिकार वापरण्यात आमचे हे दोघे भाऊ आघाडीवर असत. त्यांच्या बहिणी त्यांच्यापेक्षा मोठ्या व आमचे भाऊ आमच्यापेक्षा लहान असल्याने बरोबरीच्या भावंडांचे सुख, भांडणे, रुसवे फुगवे आम्ही चौघांनी भरभरून अनुभवले. दिवाळीच्या दिवसात आपले फटाके संपवून आमच्या वाटणीतून फटाके पळवणे हा तर त्यांचा आवडता उद्योग. चौघे मिळून घरापाठीमागच्या जंगलात जाऊन आंबट–गोड चणिया मणिया बोरे गोळा करणे, पिसे गोळा करणे, काजवे, लाल गोगलगायी पकडून काड्यापेटीत ठेवणे वगैरे अनेक उद्योग आम्ही एकत्रितपणे केलेले आहेत.

माझ्या या मावशीचे यजमान शीघ्रकोपी व संतापी होते. त्यासाठी त्यांना आजूबाजूचे लोक 'विश्वामित्र' म्हणत. गंमत म्हणजे एकदा त्यांना कोणीतरी चुकून 'विश्वामित्र' या संबोधनाने तार पाठवली अन कोट्याच्या टेलिग्राफ ऑफिसने न चुकता ती त्यांच्यापर्यंत पोचती केली. या त्यांच्या तापट स्वभावामुळे माझ्या मावस भावांना त्यांचा बऱ्याच वेळा मार खावा लागला आहे. पण अशा मारण्यामुळे काही मुले निगरगट्ट होतात व तसेच काहीसे माझ्या या भावांचे पण झाले होते. ती हाताबाहेर गेली नाहीत हेच त्यांचे नशीब. मुलांना मिळणारी शिक्षा त्यांच्या हातून घडणाऱ्या चुकीच्याच प्रमाणात असावी. त्या काळी मुलांना शिस्त लावणे म्हणजे त्यांना बदडून काढणे असे वाटत असावे. एकदा तर माझी मावशी व त्यांच्यात काही वादावादी झाली. त्या वेळी ''आता मुलांसमोर शोभा करून घ्यायची नसेल तर गप्प बसा'' असे म्हणायला त्यांनी कमी केले नाही. माझ्या आजोबांना पण त्यांची फार भीती वाटत असे. मी घरी आल्यावर आईला विचारले, ''आई! म्हणजे अंतुकाका मारणार होते का गं जीजीला? त्यांनी मारूनच बघायचे होते मग पाहिले असते आम्ही काय ते.'' कारण यावर आम्हा चौघांमध्ये बराच विचार

विनिमय झाला होता. आमची ही मावशी खूप प्रेमळ होती. तिला रागावता कसे ते येतच नव्हते. तिला दुसरेपणावर दिलेली असून पहिला एक मुलगा होता. तोच आमचा रामकृष्णभाऊ. तिचे व त्याचे प्रेम इतके होते की एकदा तो मावशीला म्हणाला ''जिजी, माझा एक मित्र आहे त्याची सावत्र आई त्याला फार त्रास देते तर मी त्याला मधल्या सुट्टीत खाऊ खायला आपल्या घरी आणत जाऊ का?'' अशी होती ही मावशी. थंडीत रात्री ती आमच्या पायांना झोपण्याअगोदर तेल लावून देई. आम्ही इतके नालायक की आम्ही म्हणत असू, ''जिजी, तू पांघरुणात आत हात घालून तेल लाव. पांघरूण बाजूला करू नकोस.'' संध्याकाळी गरम पाण्यात मीठ घालून त्यात पाय बुडवून ठेऊन ती आम्हाला पाय शेकायला लावीत असे.

मध्यंतरी काही वर्षे मावशी रतलामला व आम्ही कोट्याला असे राहात होतो तेव्हा मुंबईहून येताना कधी कधी नेसत्या कपड्यानिशी आम्ही रतलामला उतरुन जायचो. मग भगू शिंप्याकडे जाऊन कपडे शिवायला टाकण्यापासून तयारी. या सर्व मंडळींना वर्षातून फ्री पासेस मिळत असल्याने आमचे एकमेकांकडे बऱ्याच वेळा जाणे येणे होत असे. या मावशीच्या सासरच्या मंडळींशी पण आमचे खूप घरोब्याचे संबंध होते कारण ही मंडळी पण इंदूरचीच व सर्व रेल्वेतच असल्याने सतत जाणे येणे होई. माझे वडील बडोद्याचे असले तरी आई-वडिलांचा मधला दुवा निखळल्यामुळे साखळी तुटल्यासारखी झाली होती. आमचे चुलत घराणे खूप मोठे होते पण त्यांच्या कोणाशीच आमचा बरेच काळपर्यंत संबंधच आला नाही. त्याला कारणही तसेच झाले. माझे एक चुलत काका I.C.S. होते व ते Income Tax कमिशनर होते. त्यांचे लग्न इंदूरच्या सरदार किब्यांच्या मुलीशी झाले. त्या लग्नाला आम्ही गेलो होतो. मला अजूनही त्या लग्नात पहिल्यांदाच खाल्लेली Nice बिस्किटे आठवतात. त्या वेळी अनवधानाने असेल किंवा जाणीवपूर्वकही असेल पण मानापानाच्या यादीत माझ्या वडिलांचे व चुलत्यांची नावे दिलेली नव्हती. इतर कुठल्याही सोम्यागोम्यांची नावे दिली गेली होती. ही नावे बहुधा काकांच्या मामांनी दिली होती. ही गोष्ट वडिलांना खटकली व त्यानंतर त्यांनी दांडेकरांच्या कुठल्याही कार्याला न जाण्याचा निश्चय केला.

माझी दुसरी मावशी हरद्याला चोळकरांकडे दिलेली होती. ही मंडळी सधन, घरंदाज व सुखवस्तू होती. शेतीवाडी, स्वत:चे घर होते. मावशीचे यजमान मॅट्रिकपर्यंत शिकलेले असून 'जपान कॉटन कंपनीत' नोकरीला होते. त्यांच्याकडे आमचे फारसे येणे जाणे नव्हते; मला दोनदा त्यांच्याकडे गेल्याचे आठवते. एकदा मावस भावंडांच्या मुंजीत हरद्याला व एकदा बढवाहा येथे जीन फॅक्टरीत ते

असताना. मावशीचा चौसोपी वाडा, दूधदुभते, गायी म्हशींचा गोठा, माजघरात मुलींसाठी एका कोपऱ्यात भातुकली खेळण्यासाठी बांधलेले छोटे घरकुल, खूप गंमत वाटली या सगळ्यांची. बडवाहा येथील नोकरीच्या ठिकाणी आवारातील कापसाचे मोठमोठे ढीग, त्याच्यापासून तयार होणाऱ्या कापसाच्या गासड्या हा सगळा अनुभव खूपच वेगळा वाटला. त्या कापसाच्या ढिगात जाऊन लोळण्याचा, उड्या मारण्याचा मोह अनावर होई. काकांनी भेट म्हणून आम्हाला एक पोते भरून कापूसच दिला होता.

ही भावंडे ज्या वेळी आमच्याकडे येत तेव्हा त्यांना आगगाड्यांचे अपरुप असे. मोठ्या मावशीचे घर स्टेशनजवळ असल्याने त्यांना घेऊन आम्ही यार्डात जायचो व साइडिंगला टाकलेल्या रेल्वेच्या डब्यांमधून खूप हिंडवून आणीत असू. स्टेशन–जवळच्या केबिनमध्ये नेऊन केबिनमनला निरनिराळे खटके दाबून रुळ बदलताना, सिग्नल पाडताना बघून त्यांना खूप गंमत वाटायची. पुढे जागतिक मंदीच्या काळात ही कंपनी बंद पडली. घरची सुस्थिती व एकत्र कुटुंबपद्धती यामुळे मावशीचा संसार निभावला. मावशीचे मोठे दीर सखाराम महादेव चोळकर मोठे कुस्तीगीर होते. त्यांच्या अफाट शक्तीच्या अचाट प्रयोगांचे वर्णन आम्ही ऐकून होतो. छातीवर दगड ठेऊन फोडणे, गळ्यात दोरखंड बांधून मोठमोठी वजने ओढणे अथवा उचलणे. हे दीर टेंभुर्णीच्या इनामदारांकडे खाजगी कारभारी म्हणून काम पाहात असून त्यांना लोकमान्य टिळकांनी सखाराम मूर्ती या बिरुदाने गौरविले होते. सर्व चोळकर मंडळी बलोपासक होती. या सर्वांचा परिणाम म्हणून किंवा परिस्थिती म्हणून ही आमची मावशी कायम सासुरवाशीणच राहिली. प्रगतीची कुठलीच दालने तिच्यासाठी कधीच खुली झाली नाहीत. या काळात मला आठवत असलेली एक गोष्ट म्हणजे माझी आई व माझी मोठी मावशी आपल्या संसारातून काटकसर करून हस्ते परहस्ते एक लुगड्यांची जोडी मावशीपर्यंत पोहोचवीत असत. पुढील काळात या मावशीच्या मुलाबाळांशी फारसा संबंध आला नाही पण मोठ्या मावशीच्या मुलानातवंडांशी आजतागायत आमचे संबंध आहेत. याचे एक कारण असेही असेल की आम्ही सगळी बडोदे, पुणे, मुंबई या भागातच स्थायिक झालो आहोत. चोळकर मंडळींनी आपल्या एका मागे आलेल्या बहिणीचा संसार कडेला लावण्यासाठी पण सढळ हाताने मदत केली.

❍❍❍

# ५. माझी आई

माझी आई माझ्या आजी–आजोबांची सगळ्यात धाकटी मुलगी. मराठी तीन इयत्ता शिकलेली, काळीसावळी, चुणचुणीत, शांत व मोठ्या मोठ्या काळ्या डोळ्यांची, रुंद कपाळपट्टी असलेली, सडसडीत, उंच व शेलाट्या बांध्याची अशी होती. पुढील आयुष्यात वारंवार येणाऱ्या बाळंतपणांनी ती बरीच स्थूल झाली होती. वडिलांच्या सहवासाने म्हणा किंवा ती जात्याच बुद्धिमान होती म्हणून म्हणा ती बऱ्यापैकी बहुश्रुत व प्रगल्भ होती. त्या काळी तिच्या आजूबाजूच्या बायकांपेक्षा तिची वैचाारिक पातळी व सामाजिक जाण बऱ्यापैकी वरच्या स्तरावर होती. तिच्यामध्ये व माझ्या वडिलांमध्ये बारा वर्षांचे अंतर होते. १९२३ साली त्यांचा विवाह झाला. तिला वाचनाची व शिकण्याची आवड होती. आमच्याकडे स्त्री, किर्लोस्कर व मनोहर मासिके येत. विविधवृत्त व केसरी पण येई हे सर्व ती वाचत असे. त्याचबरोबर, वडिलांनी तिच्यासाठी क्रोशाची व लोकरीच्या विणकामाची आणलेली पुस्तके वाचून ती स्वत:ची स्वत: एक सुईचे व लोकरीचे विणकाम करू लागली. क्रोशा, शिवणकाम व लोकरीच्या विणकामाचे प्राथमिक धडे तिनेच आम्हाला दिले. वडिलांनी तिला तीस रु. किंमतीचे second-hand सिंगर मशिन घेऊन दिले होते. आजूबाजूच्या बायकांना ती त्या वेळी प्रचलित असलेल्या नऊ तुकडी चोळ्या बेतून देत असे. सर्व बेतकाम विती, अंगुळे इत्यादी प्रमाणावर होई. पुढे ती tape measure वापरू लागली. तिला थोडाफार वैद्यकीचा पण नाद होता. अप्पाशास्त्री साठे यांच्या 'घरचा वैद्य' या पुस्तकाचा तिने अभ्यास केला होता. त्यात दिलेली अनेक औषधे व चूर्णे ती स्वत: तयार करीत असे. साधा ताप सर्दी, खोकला यावर ती घरीच उपचार करी. सध्या आपण ज्याला मलेरिया या नावाने ओळखतो त्या पाळीच्या हिवतापावर ती प्राजक्ताची व कडूलिंबाची कोवळी पाने–फुले वापरून इतर काही औषधे घालून गोळ्या तयार करी. चिंच, गूळ, केशर, बिब्बा याच्याबरोबर काही औषधे घालून आवेवर इलाज करीत असे. लवंगा, काळी मिरी, केशर, वेलदोडे, मोरपिसाचे डोळे, सागरगोटे, तुळस, पुदिना,

ओवा, बडीशेप, कोरफड, अडुळसा, जिरे, धने, मोहरी, मेथ्या, कापूर, डिकेमाली, वावडिंग, तुळशीचे बी, कायफळ, मायफळ, सुंठ, सांबरशिंग, रक्तचंदन, जायफळ, महामंजिष्ठ, बेलफळ, चित्रक, जवस, डाळिंबाच्या साली, गुलकंद, मोरावळा अशा कितीतरी गोष्टींचा ती वापर करी. तिच्या उपचारातल्या दोन आठवणी म्हणजे आमच्या बजरंगी मोलकरणीच्या मुलाच्या पायाची सेप्टिक झालेली जखम तिने पांढऱ्या काथाचे वस्त्रगाळ चूर्ण, गायीच्या दुधावरच्या साईचे लोणी शंभर वेळा पाण्याने धुवून त्यात मिसळून केलेल्या मलमाने बरी केली होती. तसेच, युद्धकाळात आयात केलेल्या अमेरिकन गव्हाबरोबर आलेल्या काँग्रेस गवताची अनेकांना ॲलर्जी येऊन हातापायांना खाज सुटून पुरळ येत असे. अप्पाशास्त्री साठे यांच्या पुस्तकात वाचून तिने गंधक शुद्ध केले व ते ती रोज आम्हाला केळ्याबरोबर खाऊ घाली. त्यामुळे आमच्या घरात कुणालाच त्या खाजेचा उपद्रव झाला नाही. या उपचारांचे ती पैसे कधीच घेत नसे. ती हरहुन्नरी होती. जुन्या धोतरांच्या मच्छरदाण्या शिवी, दट्टया लावून बांबूच्या पिचकाऱ्या करी. तार वापरून छत्र्या दुरुस्त करी. वडील तिला multipurpose engineer म्हणत असत. ती जात्या शांत स्वभावाची व कनवाळू वृत्तीची होती. कधीकधी मर्यादेबाहेर जाऊन इतरांना मदत करीत असे. अशा वेळी वडील तिला तुकाराम म्हणून चिडवीत असत.

तिला मी कधीही कावलेली वा त्रासलेली बघितली नाही. तिला राग आला म्हणून आम्ही कधीही मार किंवा बोलणी खाल्लेली नाहीत. आम्हाला झालेली शिक्षा आमच्या चुकांसाठीच असे. ती अतिशय मानी होती. दुसऱ्याची वस्तू वापरलेली तिला आवडत नसे. म्हणत असे शेजारणीने सरी घातली म्हणून आपण दोरी का बांधून घ्यायची आहे? आपल्याकडे जी गोष्ट नाही तिच्याशिवायच आपण जगायला शिकले पाहिजे. ''लोकांचे लेणे लाजिरवाणे मागितले की काढून देणे मग कशाला वापरावी ती?'' इतरांनी आम्हाला रागावले की तिला वाईट वाटे. म्हणत असे, ''अगं, अशा कशा गं तुम्ही? राग कसा येत नाही तुम्हाला? का वागता अशा? चेंडू सुद्धा जमिनीवर आपटला तर उशी घेऊन उंच उडतो. लोकांनी बोल लावावा असे का वागता तुम्ही?'' वडिलांच्या निवृत्तीनंतर त्यांचे निवृत्तिवेतन रु.९९/– च्या समकक्ष असल्याचे प्रमाणपत्र दाखवून माझ्या शिकणाऱ्या भावांसाठी ज्या वेळी शैक्षणिक फी माफीचे अर्ज भरले त्या वेळी तिच्या डोळ्यात अश्रू तरळले. म्हणाली, ''आज आपण भीक मागितली.'' ती अतिशय सुग्रण होती. बुंदी पाडून किंवा जिलबीसारखी पक्वान्ने करून चाळीस–पन्नास माणसांचा स्वयंपाक ती सहज करीत असे.

तिने आम्हाला ओल्या मातीचा चौकोन करून त्यात पितळी चित्राचा ठसा उमटवून साचा तयार करून त्यात वितळवलेले मेण घालून चित्रे करायला शिकवले. काडेपेटीच्या साहाय्याने लहान लहान विटा करून घरकुल बांधायला शिकवले. दिवाळीत फुलबाज्यांच्या जळक्या तारा गोळा करून त्यापासून ती टोपली व शिंकाळी बनवीत असे. या तारांचा वापर ती मातीची चूल वा शेगड्या घालताना टणकपणा आणण्यासाठी त्यांच्यामध्ये वापरीत असे. सिमेंट–काँक्रीटचे तत्त्व कुणी न शिकवताच तिला कळले असावे असे वाटते. फुटलेल्या बांगड्या ज्योतीवर धरून काच कमळ, तोरणे करायला तिने आम्हाला शिकवले. हिरव्या काचांच्या साहाय्याने कागदावर वा पुठ्ठ्यावर चिकटवून पोपट, निळ्या काचा वापरून मोर, इतर रंगांच्या काचा वापरून काकाकुवा वगैरे आकार काढायला पण ती आम्हाला मदत करी. अष्टकोनी पेन्सिलीला टोकयंत्राने टोक करताना जे कंगोरेदार तुकडे निघत त्यांना रंगवून फुलांच्या आकारात आम्ही चिकटवीत असू. वेलदोडे सोलताना साल न मोडता एकसंध ठेवायची व दोन टरफले चिकटवून त्यांना फुलांचा आकार देऊन रंगवायला पण तिनेच आम्हाला शिकविले. आता नवीन अभ्यासक्रमात कार्यानुभव या नावाखाली मुलांना या गोष्टी शिकवल्या जातात. कडब्याची धाटी सोलून आतल्या मऊ भागांचे लहान–मोठे तुकडे करून त्याला चोया टोचून तिने आम्हाला पाळणा, झोपाळा, खुर्ची, टेबल, पलंग, झोपडी, जनावरांचे आकार इत्यादी करायला शिकवले होते. आता आपण मुलांना यासाठी वेगवेगळ्या प्रकारची प्लॅस्टिकची साधने उपलब्ध करून देत असतो.

ती अत्यंत पांढरा शुभ्र काटेदार हलवा करीत असे. हलव्याचा पाक करायला पण मी तिच्याकडूनच शिकले. या सगळ्यांचा परिणाम म्हणून आमची कल्पनाशक्ती वाढीला लागली असावी. वयाच्या साठीनंतर प्लॅस्टिक मण्यांच्या साहाय्याने तिने केलेले एक तुळशीवृंदावन पण बरेच दिवस माझ्याकडे होते.

मी व माझी धाकटी बहीण यांच्यात कामावरून नेहमी भांडणे होत. माझी बहीण माझ्यापेक्षा चार वर्षांनी लहान. ती बऱ्यापैकी लबाड होती. तिला उष्टी काढायला, चहाचा चोथा फेकायला व चूल सारवायला आवडत नसे. साहजिकच, मी मोठी, समजूतदार म्हणून ही कामे माझ्याकडे असत. आमच्या घरात फक्त भांडी घासायला मोलकरीण असे. बाकी केरवारे, गाद्या घालणे–काढणे, चूल सारवणे, कपडे धुणे, मोरी घासणे वगैरे काम आम्ही दोघी मिळून करीत असू. एकदा अशाच एका कामाच्या वाटणीचे वेळी अंगणाचा केर तिने काढावा व बंबात व पिंपात पाणी मी भरावे अशी वाटणी झाली. मी फूटपट्टीच्या सहाय्याने बंब, पीप

व नळ यांच्या पातळ्यांचा अंदाज घेतला व उदबत्तीची तीन चार पत्र्याची नळकांडी गोळा केली. जोडाच्या ठिकाणी चुलीवर धरून त्याचा झाळ काढून त्याची पन्हाळ तयार केली. एका बाजूला कापडाचा बोळा बसवून खिळ्याने दोन भोके पाडली व त्याला दोरीने बांधून नळाला अडकवले व पाणी भरणे सुरू केले. आता बहिणीला कामांची अदलाबदल हवी होती व मी त्याला तयार नव्हते. आई–वडील दोघेही यावेळी हजर होते. आई म्हणाली, ''काही कामांची अदलाबदल नको. उद्यापासून पाणी मी भरीन तुम्ही दोघी एक दिवसाआड अंगणाचा केर काढा.'' वडील हसून मला कौतुकाने जवळ घेऊन म्हणाले, "Laziness thy name is invention." पण उपयोग काय झाला? शिंक्याचे तुटले व बोक्याचे फावले. गये थे रोजे बख्शने उलटे नमाज गले पडी. ''Anyway, I am proud of you!''

मेलेला उंदीर उचलून टाकायला तिला सांगितला की मला ती सांगे, ''बाबूकाकांनी तुला तो उंदीर उचलून फेकायला सांगितले आहे.'' कालांतराने खरे काय ते कळल्यावर माझी चिडचिड होत असे व भांडणे होत. मी बऱ्यापैकी तापट, हूड व हट्टी होते. मी अशा वेळी आईला म्हणे, ''आम्ही अन्याय का सहन करावा पण?'' अशा वेळी ती म्हणे, ''नका नं सहन करू तुम्ही अन्याय! घ्या ती कोपऱ्यातली काठी आणि घाला आमच्या डोक्यात.''

आम्हाला साडी घेण्यासाठी प्रत्येकी रु. १०/– मिळत. माझी बहीण ५ रुपयांच्या दोन साड्या खरेदी करी व मी रु. पावणेतीनच्या दोन व रु. साडेचारची एक अशा तीन साड्या खरेदी करीत असे. परिणामी माझ्याकडे बऱ्यापैकी स्टॉक असे. तिची शाळा मी कॉलेजला गेल्यावर असे. माझी साडी नेसून शाळेला जाई व शाईचे डाग पाडून आणी. मग आमची भांडणे होत. आई म्हणे, ''नका गं अशा भांडू. लग्न होऊन जाल आणि वर्षावर्षात एकमेकींच्या भेटीसाठी आसुसलेल्या राहाल.''

याचा अर्थ आमचे एकमेकींवर प्रेम नव्हते असे मुळीच नाही. ती मॅट्रिकला व मी इंटरला असतानाची गोष्ट. जानेवारीत आमची प्रिलीम उरकली व दोघींनाही फॉर्म मिळाले. तिला रु. २१/– परीक्षा फी व तीन महिन्यांचे बसचे रु. १५/– भरायचे होते व मला रु. ३१/– परीक्षा फी व बसचे रु. १५/– भरावे लागणार होते.

वडील ऑफिसमधून घरी आल्यावर फॉर्म मिळाल्याच्या आनंदात आल्या आल्या आम्ही आमच्या मागण्या सादर केल्या. वडील रागावून म्हणाले, ''काही भरत नाही मी तुमच्या फिया. इतके पैसे एकदम कुठून आणू?'' त्या वेळी त्यांचा पगार होता रु. १७५/– व आम्ही मागत होतो एकूण रु. ८२/–

थोड्या वेळाने चहा वगैरे झाल्यावर मी वडिलांकडे जाऊन म्हणाले, ''बाबूकाका

असे करता का? तुम्ही फक्त प्रभीचे पैसे भरा. मी मॅट्रिक झाले आहे, तिला व्हावयाचे आहे. मी पुढच्या वर्षी परीक्षेला बसेन.''

थोड्या वेळाने माझी बहीण त्यांच्याजवळ जाऊन म्हणाली, ''बाबूकाका तुम्ही आमच्या दोघींची फक्त परीक्षेची फी भरा. आम्ही पायी पायी परीक्षेला जाऊ.'' आमची शाळा व कॉलेज घरापासून पाच मैलांवर होते.

वडील हसून म्हणाले, ''वेड्या आहात का दोघीजणी! करतो काहीतरी व्यवस्था. तुमची दोन वर्षांची मेहनत फुकट कशी घालवीन मी! तुम्हाला माणसाला ऑफिसमधून घरी आल्या आल्या त्रास देऊ नये एवढेही कसे कळत नाही?''

१९२३ ते १९४३ या वीस वर्षांच्या कालखंडात आमच्या आईची दहा बाळंतपणे झाली. पैकी आम्ही दोन बहिणी व तीन भाऊ जगलो. दोन बहिणी वर्षाच्या आतच गेल्या व एक भाऊ व बहीण हॉस्पिटलमधून घरीच आले नाहीत. एक भाऊ दीड वर्षाचा होऊन गेला. या गर्भारपण व बाळंतपणाच्या रहाटगाडग्यात तिने आपला उत्साह कसा सांभाळून ठेवला याचेच आश्चर्य वाटते.

एका गमतीशीर योगायोगाने तिची या त्रासातून सुटका झाली. एकदा केर काढतांना वाणसामानातून आलेला एक कागद माझ्या दृष्टीस पडला. तो र.धों. कर्वे यांच्या समाजस्वास्थ्य मासिकातला कागद होता. कोणताही कागद वाचल्या–शिवाय न टाकण्याची मला सवय होती. या कागदात सेफ पिरियड थियरी व चंदन तेल अथवा कडूनिंबाच्या तेलाचा कसा अपयोग करावा याची माहिती दिलेली होती. या वेळेपर्यंत स्त्री–पुरुष संबंधाबद्दलचे अज्ञान दूर झालेले असल्याने मी तो कागद आईला नेऊन दिला. त्यानंतर जवळ जवळ सात वर्षे गर्भारपण बाळंतपणा–शिवाय पार पडली. पण Menopause च्या वेळी पाळी अनियमित झाल्याने १९५० साली आणखी एक मुलगा झाला. विचार केला की वाटते या कर्वे पिता–पुत्रांनी स्त्रीचे जीवन सुखमय करण्याकरिता आपले सबंध आयुष्य वेचले.

लग्नानंतर जवळ जवळ दहा वर्षे रेल्वे कॉलनीत राहात असल्याने तिला हिन्दी व गुजराती भाषा बऱ्यापैकी अवगत होत्या. परंतु १९४८ साली बलसाडला बदली झाल्यावर वाण्याला यादी देता यावी म्हणून तिने गुजराती लिपी आत्मसात केली. आम्हा सर्व भावंडांना तिला अभ्यासासाठी कधीच बोलावे लागले नाही. आमचा अभ्यास आम्ही टंगळमंगळ न करता पूर्ण करीत असू. बऱ्यापैकी मार्क्स मिळवून पासही होत असू. नेहमीच पहिल्या पाचात असायचो. पण बलसाडला तिला एका वेगळ्याच संकटाला सामोरे जावे लागले. माझ्या भावाचा एक बलदेव नावाचा मित्र नेहमी आमच्या घरी येई. त्याची चित्रकला चांगली होती व भाऊ

इंटरमीजिएटच्या परीक्षेला बसत होता. तिथेच दोघांची ओळख वाढली. माझी वहिनी मला फार त्रास देते असे तो सांगे. आईच्या कनवाळू मनाला ते खरे वाटले व ती त्याची विशेष आस्थेने विचारपूस करू लागली. तो माझ्या भावापेक्षा बराच मोठा होता. त्या वेळी माझे वडील Chief Clerk होते व त्यांच्या सेक्शनवर, म्हणजे सूरत ते बडोदा, ही दोन्ही मुले विनामूल्य प्रवास करत. त्यांच्या नावाचा वापर करून स्टेशनवरील व्हेंडर्सकडून खाणे–पिणे उकळीत, सिनेमा थिएटरमध्ये पण त्यांचे नाव वापरून फुकट सिनेमा बघणे वगैरे गोष्टी करू लागली तोपर्यंत ठीक होते, पण उताराला लागलेला दगड गडगडतच खाली जात असतो. त्याने माझ्या भावाला बिड्या ओढायला शिकवले. पौगंडावस्थेतील वयात आपण काय करतो आहोत याचे माझ्या भावाला भान उरले नाही. दिवसेंदिवस घसरत गेला. वडिलांच्या बिडीच्या बंडलातून विड्या कमी होऊ लागल्या, आजोबांच्या जवळची चिल्लर चोरीला जाऊ लागली व एक दिवस चांदीचे उदबत्तीचे घर चोरीला गेले. अशा वेळी सहाजिकच घरातल्या नोकर माणसांवर आपला पहिला संशय असतो. आई सतर्क होऊन शोध घेण्याचा प्रयत्न करू लागली. आमच्या क्वार्टरबाहेर आमच्यासाठी एक जोड संडास होता. आई संडासात असताना तिला शेजारच्या संडासात काडी ओढल्याचा आवाज आला. ती बाहेर आल्यानंतर माझा भाऊ पण संडासातून बाहेर आला. तिने संडासात जाऊन पाहिले तर तिला काडेपेटी व अर्धवट जळालेली बिडी खालच्या लोखंडी डब्यात टाकलेली दिसली. तिने लगेच जाऊन ती वडिलांनी तिथे टाकली किंवा कसे याची शहानिशा करून घेतली व भावाला धारेवर धरले. आम्हाला घरात कधीच फारशी मारझोड ती करीत नसे. तिचे रागावणेच पुरेसे असे पण त्या दिवशी तिने भावाकडून कबुलीजबाब घेतल्यावर त्याला इतके मारले की अंगावर वळ उठले. ती त्याला म्हणाली, ''तुला वाटत असेल की नवसासायासाने झालेला व जगलेला मुलगा म्हणून मी तुझी गय करीन. पण तुझ्यासारख्या दुर्गुणी मुलाची आई म्हणून जगण्यापेक्षा मी बिनमुलाची आई म्हणून जगणे जास्त पसंत करीन.'' याचा योग्य तोच परिणाम झाला. भावाची घसरण थांबली व तो पुन्हा योग्य मार्गाला लागला. बलदेवची अर्थातच घरातून हकालपट्टी झाली. योग्य वेळी योग्य उपाययोजना झाली. विशेष म्हणजे माझा हा भाऊ पुढच्या आयुष्यात इतका प्रामाणिक व सच्छील आयुष्य जगला की त्याच्या आयुष्यात लहानपणी असे काही घडले असे सांगितले तर कोणाला खरेही वाटणार नाही.

त्याला शिक्षण अर्धवट सोडावे लागल्यावर जिद्दीने A.M.I.E. होऊन तो रेल्वेत Chief Engineer च्या पदापर्यंत चढला व सचोटीचा प्रामाणिक अधिकारी

म्हणून लौकिक मिळवला. रेल्वेत नोकरी करीत असताना घ्याव्या लागणाऱ्या मोजमापांसाठी डिझाईन तयार करून त्याने एक असे उपकरण बनवले की ज्यामुळे इतर कशाची गरज भासू नये. त्याने Track expert म्हणून इंग्लंडमधील गाड्यांचा वेग वाढविण्यासाठी सल्लागार म्हणून काम केले व आता वृद्धापकाळी निरामय सुखी जीवन व्यतीत करत आहे. या सर्वांचे श्रेय आमच्या 'वज्रादपि कठोराणि मृदुनि कुसुमादपि' आईलाच द्यावे लागेल असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये.

तिची कर्तव्याची जाण पण अतिशय प्रखर होती. माझ्या या भावाच्या लग्नात तिने स्वत:साठी काहीही खरेदी करावयाचे नाकारले. विचारल्यावर म्हणाली, ''खरे तर आम्ही त्याचे लग्न करून द्यायला हवे. त्याच्याच पैशांनी त्याचे लग्न करतो आहोत आम्ही. मला माझ्यासाठी काहीही नको.'' शेवटी मी व माझ्या बहिणीने मिळून तिला अहेरावर इंदुरी गर्भरेशमी साडी घेतली. त्या वेळी तिच्याजवळ असलेले तीन तोळ्यांचे गुजराती तोडे ती उजळून सुनेला घालणार होती. ते मात्र मी तिला घालू दिले नाही. मी तिला म्हणाले, ''हे बघ, तुझ्याजवळ आहे ते सर्व त्यांचेच आहे पण आजच तू अशी रिकामी होऊ नकोस. इथून पुढे ही मुले आपल्या बायकांना दागिने करतील. तुला कोणी करणार आहेत का?''

गोष्ट इथेच संपली नाही. दुसऱ्या भावाच्या लग्नात पण तिला आम्ही तिचे सोने देऊ दिले नाही. पण तिसऱ्या भावाच्या वेळी तिने आमचे ऐकले नाही व त्या सुनेला तिने आपला पाच तोळ्यांचा पोहेहार दिला. कारण विचारल्यावर म्हणाली, ''हे आजारी असताना सुमन्ताला बडोद्याबाहेर चांगली नोकरी मिळत असताना मी म्हणाले होते की, जयंता व वसंता दोघेही बाहेरगावी असतात. यांची सेवा शुश्रुषा करायला तू मला मदत करतोस. तू गेल्यावर मी हे सगळे कसे सांभाळू? म्हणून तो बाहेर गेला नाही. व तसेही हे दोघे चांगले पगारदार आहेत. सुमन्ताचा खिसा लहान आहे. म्हणून त्याच्या बायकोला त्याच्या त्यागाची भरपाई म्हणून मी ही फूल नाही तर फुलाची पाकळी देणार आहे.''

आमचे सर्वांत धाकटे बंधू आईचे शेंडेफळ थोडे प्रतापी निघाले. अभ्यासात विशेष प्रगती न दाखवता Pass Class B.Com झाला. त्याने मनात आणले असते तर या तीन भावांनी मिळून त्याला कितीही शिकवले असते. तरी पण वडील गेल्यावर माझ्या यजमानांनी त्याला Defence Accounts मध्ये नोकरीला लावण्यास मदत केली. मनात आणता तर व्यवस्थित वागून चार पैसे बाळगून राहाता आले असते. पण तसे होताना दिसले नाही त्यामुळे लवकरात लवकर त्याचे लग्न

करुन दिलेले बरे म्हणून आईच्या पाटल्या व दोन बांगड्यातून मंगळसूत्र व चार बांगड्यांची जुळवाजुळव केली व आम्ही पाच भावंडांनी इतर खर्चाचा भार उचलला व चिरंजीव चतुर्भुज झाले. हे सर्व विस्ताराने लिहिण्याचे कारण इतकेच की मरतेवेळी आई सुमन्ताजवळ म्हणाली की माझी एकेक बांगडी मी गेल्यावर मालू व प्रभीला द्या. त्याप्रमाणे मुलांनी जेव्हा त्या बांगड्या आम्हाला देऊ केल्या तेव्हा मला ती घेणे प्रशस्त वाटेना कारण जयंता वसंताला सोने देण्यापासून मी तिला अडवले होते व माझ्या मते उरलेल्या सोन्यावर त्या दोघांचा अधिकार असायला हवा होता. माझ्या बहिणीचे मत पण माझ्यासारखेच होते. भाऊ म्हणू लागले तुम्हाला देण्याची तिची इच्छा आम्हाला मोडायची नाही. शेवटी जयंताची बायको मधे पडून म्हणाली, ''आई सर्वांची होती. आपण त्यांची साखळी व बांगड्यांचे सहा सारखे भाग करू व आईची आठवण म्हणून जवळ ठेऊ.'' ही कल्पना सर्वमान्य झाली.

मला आनंद एकाच गोष्टीचा वाटतो की यामुळे आमच्या बहीण–भावंडांच्या स्वच्छ मनाचे दर्शन झाले व आमचे संबंध दुरावले नाहीत.

ooo

# ६. वाटचाल विवाहाच्या दिशेने

मी १९४५ च्या जूनमध्ये मॅट्रिक झाले आणि माझे सुरक्षा कवच संपुष्टात आले. कॉलेजमध्ये घालतानाच वडिलांनी स्पष्टपणे सांगितले होते की आता मी तुझ्या लग्नाचे बघणार. ज्या दिवशी लग्न ठरेल त्या दिवशी कॉलेज सोडावे लागेल. माझ्या मनावर फार मोठे दडपण आले होते. इतरांच्या बोलण्यातून मला नेहमी हे जाणवत असे की आपण मुलगी होऊन आपल्या आई–वडिलांना फार मोठ्या संकटात टाकले आहे. नाटक सिनेमांमधून मुलीच्या आई–वडिलांना झालेला त्रास, मुलींचे सासरी होणारे हाल यांनी मन झाकोळून जाई. कुठल्या तरी सिनेमात– आता नाव आठवत नाही– पण ''कन्या ही रास संकटांची । छाया की पूर्व पातकांची ।।'' या गाण्याच्या ओळी आठवत. आपण आपल्या वडिलांचा हा त्रास कसा कमी करू शकतो यावर बराच विचार करून एक दिवस मी वडिलांना म्हणाले, ''बाबूकाका, तुम्ही मला एखाद्या बिजवराला दिलीत तरी चालेल पण माझी एक अट आहे. त्याने हुंडा घेता कामा नये.'' वडील हसून म्हणाले, ''वेडी आहेस का तू? जन्म दिला आहे मी तुला तो तुला अशी तशी वैरून टाकण्यासाठी का? मी तुझ्यासाठी पालखी पदस्थाचे स्थळ पाहू शकणार नाही हे माहीत आहे मला. पण ज्या परिस्थितीत तू लहानाची मोठी झालीस त्याहून किंचित उजव्या परिस्थितीतले स्थळ तुझ्यासाठी पाहणे हे माझे कर्तव्य आहे. तू ज्या दिवशी जन्माला आलीस तेव्हापासूनच मी तुझ्या लग्नासाठी पैसे बाजूला ठेवत आलो आहे. आता महागाई वाढल्याने ते पुरणार नाहीत हे मला माहीत आहे, पण तू काळजी करू नकोस व असे काहीबाही विचार मनात आणू नकोस.''

त्यांनी माझ्यासाठी मुलगा कसा बघावा याचे काही नियम ठरवले होते. मुलगा पदवीधर असावा, त्याचा बेसिक पगार रु. शंभर असावा व वयात सहा ते आठ वर्षे इतकेच अंतर असावे. या दोन वर्षांच्या कालावधीत पाच ते सहा स्थळे पाहिली. एक–दोघांनी मला नापसंत केले व एक दोघांना मी नाही म्हणाले. मला हुशार नवरा हवा होता. वकील नको होता व शिक्षकही नको होता. वकीलाला

खोट्याचे खरे करावे लागते म्हणून नको तर शिक्षक pass क्लास असतो म्हणून नको. पगार वगैरे विचार मनातच आले नाहीत. एका मुलाला मी तो अठ्ठाविसाव्या वर्षी B.A. झाला म्हणून नकार दिला होता तर दोघे अगदीच कुरूप म्हणून नकार दिला होता. मला असे वाटे आम्हा दोघांना एकत्र पाहिल्यावर लोकांनी कोणा एकाची कीव करू नये. तरीही त्या कुरुप मुलांनी हुंडा न घेता लग्न करायची तयारी दर्शविली तर मला चालेल असे मी वडिलांना सांगितले. पण मग वडीलच पुढे गेले नाहीत. राजस्थानात असल्यामुळे दोन–चार महिन्यांनी एखादे स्थळ बघितले जाई. मेच्या सुट्टीत स्थळे पाहण्यासाठी मुंबईला मावशीकडे पाठवले असता एका घैसास नावाच्या मुलाने मला पसंत केले. मुलगा B. Tech असून मेरठला नोकरीला होता. वडील कोकणात केळशीला हेडमास्तर होते. गृहस्थाने वाचून घेतले, सुई ओवायला सांगितले व चालूनही बघितले. असा राग आला होता, पण काय करणार! हजार रु. हुंडा ठरला. डिसेंबरमध्ये लग्न करू म्हणाले. बांगडीचे माप घेतले, भिंतीजवळ उभे करून टेपने उंची मोजली. पहिल्याच ठिकाणी मुलगी पसंत पडली, B. Tech जावई मिळाला म्हणून सर्वांना आनंद झाला. पण दोन महिन्यांनी त्यांच्याकडून पत्र आले की अडीच हजार हुंडा देणारी दुसरी मुलगी आम्हाला सांगून आली आहे. तुम्ही अडीच हजार हुंडा द्यावयास तयार असलात तर हे लग्न होईल अन्यथा मोडले असे समजावे. आई रडू लागली. वडील उरलेल्या दीड हजाराची जमवाजमव कशी काय करता येईल हे बघू लागले. पण या वेळी मी ठामपणे या लग्नाला नकार दिला. ''जो माणूस आत्ताच इतका लोभीपणा दाखवतो आहे तो तुम्हाला जन्मभर पैशांसाठी त्रास देईल व मला ते आवडणार नाही,'' असे मी स्पष्टपणे सांगितले. पण लग्न मोडले तर लोक काय म्हणतील? बदनामी होईल त्याचे काय? इत्यादी प्रश्न आई वडिलांनी उपस्थित केल्यावर मी म्हणाले, ''मी हुशार आहे, नाही झाले लग्न तर B.A. होऊन नोकरी करून खाईन, पण अशा अडवणुकीला बळी पडणार नाही.'' आईला पुढे असेही सांगितले की आता मला स्थळे पाहाण्यासाठी परत मुंबईला पाठवू नकोस. कारण असे की हे स्थळ पाहाण्याअगोदर मावशीच्या यजमानांनी भाईंदरच्या कोणा गोखले नावाच्या मुलाला दाखवण्याचा कार्यक्रम ठरवला. मुलगा मॅट्रिक झालेला असून रेल्वेत नोकरीला होता. सुरुवातीलाच मी त्यांना हे स्थळ बघू नका असे सांगितले असताना त्यांनी हे ठरवल्यामुळे मी दाखवून घ्यायला नकार दिल्यावर, ''मी आता शब्द दिला आहे म्हणून तू दाखवून घे,'' म्हणाले. पण तरीही मी कबूल झाले नाही म्हणून खूप रागावले व म्हणाले, ''बापाची हजार

रुपड्यांच्यावर हुंडा द्यावयाची ऐपत नाही पण हिची मिजास पाहा.'' माझ्या वडिलांचा कोणी असा अपमान केलेला मला आवडत नाही. माझे लग्न नाही झाले तरी चालेल पण मी मॅट्रिक मुलाशी लग्न करणार नाही असे आईला सांगितले. माझ्या मावसभावाच्या बायकोने मला पत्र पाठवून सुचवले की घैसास स्थळाला नकार देण्याआधी मी माझ्या future prospectsचा विचार करायला हवा. पण मी सांगितले की आई–वडिलांना कर्जबाजारी करून आई–वडील व भावंडे यांच्या सुखात माती कालवून मिळणारा हा future prospect मला नको आहे. कदाचित मानसिक दबाव आणून जास्त हुंडा मिळवण्याचाही तो एक बनाव असेल, पण एकदाचे ते प्रकरण निकालात निघाले.

मला वीस किंवा एकविसाव्या वर्षी first attempt ला Higher Second Class मिळवलेला मुलगा हवा होता. त्या वेळी Second class सुद्धा मानाचा समजला जाई. First class हाताच्या बोटांवर मोजले जातील एवढ्या लोकांनाच मिळत असे. तिथपर्यंत आपली पोच नाही हे मला माहीत होते. हे स्थळ मावशीनेच सुचवले होते. मुलगा दिल्लीला होता. कोट्याहून दाखवणे, पाहाणे सोईचे होईल असे वाटल्यामुळे तिने ते आम्हाला कळवले होते. ती त्या वेळी माझी मावस बहीण व तिची पुतणी बाबी गोगटे यांचेसाठी स्थळे पाहात होती. वधूवर सूचक मंडळातील नोंदीनुसार मुलाला एक भाऊ व एक बहीण असून वडील वऱ्हाडात वकील होते. सासू सावत्र होती. माझी मैत्रीण मैना मराठेचे यजमान नागपूरचे असल्याने त्यांनी वऱ्हाडातील वकील गबर असतात असा निर्वाळा दिला. सावत्र सासूचा मुद्दा आईने उपस्थित केल्यावर वडील म्हणाले, ''तिला कुठे सासूजवळ राहावे लागणार आहे? तो Defence Accounts मधे आहे. ही सतत नोकरीच्या गावी असणार. फार फार तर सावत्र सासूमुळे वडिलांच्या इस्टेटीत वाटणी मिळणार नाही इतकेच. आपण कुठे इतके तालेवार लागून गेलो आहोत तर हा विचार करायचा? मुलाला आत्ता दोनशे पन्नास रु. पगार आहे. खात्याची एक परीक्षा पास झाला आहे. दुसरीची पण तयारी करतो आहे. मी सगळी चौकशी माझ्या जोशी नावाच्या मित्राकडे केली आहे. तो नक्की राजपत्रित अधिकारी होईल.'' माझे एक चुलते शहादरा सहारानपूर रेल्वेत जनरल मॅनेजर होते. यांच्या Bossची बायको काकांची टेनिस पार्टनर होती. त्यांच्यातर्फे Boss कडे चौकशी केल्यावर ते म्हणाले, "He is a smart, intelligent young boy. मला त्याच्या घरची काही माहिती नाही, पण मी त्याला सिलेक्टिवली पुण्याहून दिल्लीला आणले आहे. खणखणीत नाणे आहे. डोळे झाकून मुलगी द्या. मुलगा निर्व्यसनी व सज्जन

आहे.'' मला सिगरेट ओढणारा मुलगा नको होता. मी व वडिलांनी दोन वेळा दिल्लीला जाण्याचे ठरवले, पण तिथे दंगा उसळला होता. गोपाळ टी.टी. (Chief train ticket Examiner) वडिलांना म्हणाला, ''अरे दांडेकर जवान लडकी लेकर कहाँ दिल्ली जा रहे हो । वहाँ तो गोली चल रही है, भाडा देकर उस लडकेकोही यहाँ बुला लो । कहो तो मै अपने साथ ले आऊँ? लेकिन तुम्हे यह मंजूर नहीं होगा यह भी जानता हूँ!'' शेवटी एक जून रोजी हे मला पाहावयास आले. मी विनायक अप्पाला (मालकांचा मुलगा) ते कितव्या वर्षी B.A. झाले व क्लास कोणता मिळाला एवढेच विचारायला सांगितले. हे संपूर्ण दिवस कोट्याला शेजारी मालकांकडे होते. मावशीच्या पुतण्याने (अप्पाने) माझी बरीच भलावण केली असावी असे वाटते, कारण पाहाण्याचा कार्यक्रम पाचच मिनिटात संपला. मी अर्थातच नटण्या–मुरडण्याचे नाकारले. रेशनची स्वच्छ धुतलेली पांढरी साडी व नीटनेटकी वेणी फणी. हेतू हा की आमच्या आर्थिक स्थितीबद्दल गैरसमज निर्माण होऊ नये. संध्याकाळी आईने मलाच स्वैंपाक करायला सांगितले. रात्री निरोप देते वेळी वडिलांनी विचारले, ''मुलगी पसंत नसेल तर आत्ताच सांगून टाका कारण आम्ही चार दिवसांनी पुण्याला जाणार आहोत तेव्हा दुसरी स्थळे बघायची का नाही हे ठरवायला बरे पडेल.'' त्यावर निव्वळ, ''तसंच काही नाही, मी विचार करून कळवतो म्हणाले.'' पाच, सहा व आठ जून अशी तीन लग्ने पुण्याला होती. आम्ही तीन जूनला फ्राँटियर मेलने मुंबईला निघालो. चार जूनला आमचा रिझल्ट होता. चारला संध्याकाळच्या गाडीने पुण्याला यायला निघालो तोपर्यंत वर्तमानपत्र मुंबईला पोचले नव्हते. पुण्याला पोचल्यावर बाबी म्हणाली, ''अगं, पेपरात तुझा नंबर दिसलाच नाही.'' पण तेवढ्यातच वडिलांची तार आली व मी सुटकेचा निश्वास टाकला. मला second class with distinction in Sanskrit मिळाला होता. संस्कृतमध्ये ब्याण्णव मार्क मिळाले होते. पाच तारखेला यांचे दिल्लीहून पत्र आले व मला त्यांचे मामा व चुलत भाऊ श्री. दामोदर वामन गोडबोले यांना दाखवावे असे सुचवले. त्याप्रमाणे मामांकडे परत दाखवण्याचा कार्यक्रम झाला. मामांना मी पसंत होते, पण यांच्या चुलत भावाला मी पसंत नव्हते. मामांनी "We approve, but Damoo disapproves wire decision," अशी तार केली.

त्या तारेचे उत्तर या सद्गृहस्थाने पत्राने पाठवले व लग्न ठरवण्यासाठी वडिलांनी एलिचपूरला जावे असे कळवले. गोडबोले मंडळींना मी पसंत नव्हते कारण त्यांच्या मनात बिलिमोऱ्याच्या सरदेसाईंची मुलगी करून घ्यावी असे होते.

ती मंडळी सधन होती. मुलगी काळीसावळीच पण पैसा गोरा होता. यांना non-matric मुलगी नको असल्याने त्यांनी तिला नाकारले होते. करता करता २१ जूनला माझे वडील माझे लग्न ठरवण्यासाठी एलिचपूरला गेले. माझ्या सासऱ्यांना मुहूर्त संपत आल्याने चातुर्मासानंतर लग्न कोट्याला करावे असे वाटत होते. पण घैसासांचा अनुभव जमेला असल्याकारणाने वडिलांनी २८ जूनचा आग्रह धरला व शेवटच्या मुहूर्तावर पुण्याला नव्या विष्णूच्या देवळात आमचे लग्न झाले. लग्नाच्या आदल्या दिवशी कारण आठवत नाही पण बोरीबंदर स्टेशनवर दगडफेक व जाळपोळ झाल्याने मुंबईकर नातेवाईक व लांबून आलेले नातेवाईक स्टेशनवरच अडकून पडले. सगळी मंडळी लग्न लागून गेल्यावरच मांडवात येऊन पोहोचली. सकाळी मी, माझे आई–वडील व मावशी इतकीच माणसे मांडवात होती. आईला खूप वाईट वाटत होते. एखाद्या डागाळलेल्या मुलीचे क्षेत्राच्या ठिकाणी जाऊन लग्न लावल्यासारखे वाटते आहे असे म्हणाली. माझ्या मावस बहिणीची मुलगी म्हणाली, ''असे कसे मालू मावशीचे लग्न? कोणी तांदूळ फेकलेच नाहीत, हार घातले नाहीत आणि गाणी पण म्हटली नाहीत?'' कारण ती लग्न लागून गेल्यावर आली होती.

मी पंगतीत घास देण्या घेण्याचे नाकारले. मला तो पाचकळपणा आहे असे वाटे. ज्या मनोज्ञ अनुभूती पति–पत्नींनी एकान्तात अनुभवायच्या त्याचे असे उथळ प्रदर्शन नसावे असे वाटे. पुढील आयुष्यात हे मला त्यावरुन खूप चिडवीत असत. मुलींना सांगत ''त्याच वेळी जन्मभर आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे याची मला कल्पना आली होती.'' तीच गोष्ट नाव बदलण्याची. माझ्या नणंदेने मला विचारले, ''वहिनी, तुला कोणते नाव आवडेल पद्मजा की शैलजा?'' मी काहीही उत्तर दिले नाही. यांनी पण तोच प्रश्न विचारल्यावर मी म्हणाले, ''मला माझे नाव आवडते आणि ते तुमच्या नावाशी किती मिळते जुळते आहे? याउप्पर बदलायचेच असेल तर काहीही ठेवा. मला second choice नाही.'' शेवटी मालती हेच नाव ठेवले. नाव ऐकून सर्वजण, ''अरे, गडी फितूर झाला बरं का!'' असे म्हणाले. गोडबोल्यांकडे माहेरचे नाव न बदललेली एकटी मीच होते. मुलीचे नाव बदलणे म्हणजे तिचे स्वतंत्र अस्तित्व पुसून टाकण्याचाच एक प्रकार आहे असे मला वाटे.

रात्री सर्व मंडळी एकत्र जमली. गप्पा, गाणी, गोष्टी वगैरे कार्यक्रम सुरू होते. मलाही गाणे म्हणण्याचा आग्रह झाला, पण मी मला गाता येत नसल्याचे सांगितल्यावर ''काहीतरी म्हणाच'' असा आग्रह सुरू झाल्यावर खालील कविता

सुरावर म्हणून वेळ निभावून नेली. माणसाच्या मनाचे प्रतिबिंब त्याच्या वर्तनात दिसते असे म्हणतात कारण मला नेमकी हीच कविता कशी काय सुचावी–

*''मन गगनी उगवे तारका पुंज आशा हा ।*
*मन बागी फुले ताटवा फुलांचा आशा हा ।।*
*मन गगनी फुले तळी बागी फुले ।*
*अजि भासे जगत सुखे डुले ।। मन गगनी फुले...*

पुढची कविता आठवत नाही.

त्याअगोदर सासऱ्यांनी मला संस्कृतला काय होते, इंग्लिश कादंबरी कोणती होती वगैरे चौकशा केल्या, कारण अगोदर मला यांच्याशिवाय घरातल्या कुणीच बघितले नव्हते. त्यांनी काही प्रश्न विचारले. David Copperfield ला आत्मचरित्राचा touch आहे. कालिदासाची एखादी आवडलेली उपमा कोणती असे विचारले.

मी *''पुरस्कृता वर्त्मनि पार्थिवेण ।*
*प्रत्युद्गता पार्थिव राजपत्न्या ।।*
*तदंतरे सा विरराज धेनु ।*
*दिनक्षपा मध्य गतेव संध्या ।।*

हा श्लोक सांगितल्यावर गमतीने हसून म्हणाले, 'अरे, पेपर फुटलेला दिसतोय'. सगळे खळखळून हसले पण पुढच्याच वाक्याने मला उदासवाणे वाटले कारण ते म्हणाले, ''कारकुनाची मुलगी करून घेताना मला जरा काळजी वाटत होती, पण मुलगी हुशार दिसते आहे.'' याअगोदर पण एक ओरखडा मनावर उठलाच होता. कपडे बदलताना माझी एक नणंद म्हणाली होती, ''वहिनी, तुम्हाला घातलेले सगळे दागिने तुमचे नाहीत बरं का! फक्त चपलासाखळी आणि बांगड्याच तुमच्या आहेत. बाकीचे सगळे दागिने काकूचे (म्हणजे तिच्या आईचे) आहेत.'' वकीलाची मुलगी ती! स्त्रीधन म्हणून वहिनीने सगळ्या सोन्यावर हक्क सांगितला तर काय घ्या! अशी भीति तिला वाटली असेल. पण मी मात्र दुखावले गेले. कारण यावर आमच्या घरातसुद्धा चर्चा झालेली मी ऐकली होती. मावशी आईला म्हणाली, ''कमळे पाटल्या, बांगड्या, गोठ, तोडे सगळे घातलेत खरे, पण हे सगळे मालूचे नसावे. सासूच्या अंगावर पाहिलेस का, गळ्यात फक्त मोहनमाळच दिसते आहे.'' या दोन्ही प्रसंगी मनाला आवर घालून मी गप्प बसले कारण अजून आमची ओळख झाली नव्हती.

दुसऱ्या दिवशी काकण सोडायला जाते वेळी ह्यांनी विचारलेला पहिला प्रश्न म्हणजे ''रिझल्ट काय लागला?'' मी Second Class व संस्कृतला प्रथम क्रमांक

असे अभिमानाने सांगितले.

आमचे लग्न यांच्या मामांच्या पुढाकाराने ठरल्यामुळे माझे चुलत सासरे रागारागाने एका पुतणीला घेऊन बार्शीला दुसऱ्या पुतणीकडे निघून गेले होते. तिथे गेल्यावर निमंत्रण पत्रिका पाहिल्यावर त्यांना कळले की यांनी त्यांच्याच नावाने निमंत्रण पत्रिका छापली आहे. संध्याकाळी पुतणीला म्हणाले, ''सिंधू, चल. आपल्याला परत पुण्याला जायला हवे''. या काकांचे यांच्यावर फार प्रेम होते. यांच्या आईला त्यांनीच गोडबोल्यांच्या घरात आणले होते. ते व माझे आजे सासरे मित्र होते. युद्धकाळात यांनी युद्धावर जाण्याची गोष्ट काढली तेव्हा म्हणाले, ''तू माझ्या वहिनीची एकमेव आठवण आहेस. कुसुम लग्न होऊन गेली, विनायकला कृष्णाकडे दिले. तू युद्धावर जाऊ नकोस, पण Defence Accounts मध्ये नोकरीला लाग. तुझे तिथेच उत्कर्षाचे योग आहेत.'' त्यांना थोडीफार पत्रिका कळत असे व यांना कडक मंगळ असल्याने त्यांनी पत्रिका बघणे नाही असे वधूवर सूचक मंडळात नोंदवले होते. कारण मंगळामुळे निवडीवर नियंत्रण येते. मलाही सुदैवाने मंगळ होता पण ज्योतिषाने माझ्या मंगळामुळे नवरा मंगळाचा नसेल तर त्याच्या जिवाला अपाय होणार नाही परंतु ''तो हिच्या ताटाखालचे मांजर होऊन राहील'' असे सांगितल्याने वडिलांनी पण पत्रिकेचा आग्रह धरला नाही. माझ्या पहिल्या मुलीच्या बाळंतपणानंतर मी खूप आजारी पडले होते, त्या वेळी ते यांना म्हणाले, ''तुझ्या बायकोला नक्की मंगळ असला पाहिजे. नाहीतर आत्ता ती जगली नसती.'' हे चेष्टेने म्हणत, ''मला मंगळ असूनही काय उपयोग! ताटाखालचे मांजर आहेच न मी!'' आमची गाठ वरती परमेश्वरानेच बांधली असावी कारण मंगळाची नाही तर पत्रिका पाहावयाचे ठरवल्यावर मृत्युषडाष्टक असल्याने आमचे लग्न झाले नसते. कधी पत्रिकेवर विश्वास ठेवावा असे घडते तर कधी याउलटही घडते. आपला विश्वास अथवा अविश्वास दोन्ही डळमळीत करणाऱ्या घटना घडत असतात. शेवटी 'त्या'ची इच्छा तीच खरी असे म्हणावेसे वाटते. पूर्वी सासर–माहेर वगैरे ego problems फार असत. हल्ली सुद्धा असतात म्हणा पण प्रमाण कमी एवढेच!

मला एकूण तीन दीर व चार नणंदा होत्या. दोघींची लग्ने झालेली होती व तिसरी लग्नाची होती. एकीचे लग्न वर्षापूर्वीच झालेले होते व ती बाळंतपणासाठी आमच्याबरोबरच परतवाड्याला येणार होती. वय वर्षे एकोणीस व तेरा अशा दोघी व सोळा, बारा व दोन अशा वयाचे तीन दीर होते. यांपैकी यांना एकच सख्खी बहीण. ती यांच्यापेक्षा सात वर्षांनी मोठी होती. यांच्याहून अडीच वर्षांनी लहान

असलेला सख्खा भाऊ धाकट्या चुलत सासऱ्यांना दत्तक दिला होता. हा दीर चौदा दिवसांचा असतानाच यांची आई गेली होती व त्याच वेळी या चुलत सासूबाईंचे बाळ दगावले होते. माझ्या आजेसासूबाई धाकटया सुनेला म्हणाल्या, ''सत्ये या बाळाला तू सांभाळ.'' त्यांची मुले जगत नव्हती. सासूबाई म्हणाल्या, ''परत मागणार नसतील तरच सांभाळीन.'' सासरे म्हणाले, ''मी दिला.'' सासूबाईंनी हा मुलगा स्वत:चे दूध पाजून मोठा केला. पुढे त्यांना पण तीन मुलगे व दोन मुली झाल्या. पण हा दीर यांनी मागितला नाही व त्यांनीही दिला नाही. या दोन भावांमध्ये कमालीचे साम्य होते. भाऊजींना कोणी म्हणत, ''साहेब मी तुमच्या हाताखाली E Section ला होतो. तर यांना कोणी म्हणत सर तुम्ही आठवीत आम्हाला इंग्लिशला होता.'' इतके लोक फसत असत. हे दीर भारत हायस्कूलमध्ये शिक्षक होते.

शनिवारी आमचे लग्न झाले. रविवार व सोमवार दोन दिवस नातेवाईकांकडे जाण्यात व भेटण्यात गेले व मंगळवारी दुपारच्या गाडीने आम्ही परतवाडा एलिचपूरला जायला निघालो. गाडीला भयंकर गर्दी, IIIrd class चा प्रवास मला फार त्रासदायक झाला. माझ्या वडिलांना त्या काळच्या IInd class चे पासेस मिळत असल्याने आम्ही नेहमी चार बर्थचा कुपे रिझर्व करून प्रवास करीत असू. त्यातच माझी पाळी सुरू झाली. खरं तर त्या वेळी जरा लवकरच सुरू झाली होती. कसे बसे आम्ही परतवाड्याला येऊन पोचलो. यांना लगेच शनिवारी निघावे लागणार होते कारण लग्नाअगोदर येऊन गेल्याने जास्त रजा मिळाली नव्हती. शनिवारी सत्यनारायण करावयाचे ठरले. पुरण वरण शिजायला लावून होते नं होते तोच सासूबाईंची पण पाळी सुरू झाली. धाकटया दिराच्या जन्मानंतर त्या पहिल्यांदाच बाजूच्या झाल्या होत्या. त्यांनी आपल्या मैत्रिणीला स्वैंपाक करण्यासाठी बोलावण्याचे ठरवले. मी पुढे होऊन म्हणाले, ''मला कोणी पुरण वाटून दिले तर मी करीन स्वैंपाक. कुणाला नाही बोलावले तरी चालेल.'' सासूबाई आश्चर्याने पाहात म्हणाल्या, ''पंचवीस माणसांचा पुरणावरणाचा स्वैंपाक जमेल तुला? फजिती नाही होणार ना?'' मी होकार दिला व कामाला लागले. वन्संनी पुरण वाटून दिले. हे सारखे आत बाहेर करीत होते. पूजेला ते एकटेच बसले होते. मी फक्त आरतीच्या वेळी गेले. सगळा स्वैंपाक झाल्यावर मी पोळ्या करायला घेतल्या. मामंजी जवळच उभे होते. पहिली पोळी तव्यावर टाकताच म्हणाले, ''अगं अन्नपूर्णाबाई, ही तुझ्यासारखी कागदावर घेऊन पोळी तव्यावर टाकत नाही. लाटण्याला गुंडाळून टाकते आहे.'' पंगत व्यवस्थित पार पडली. सर्वांनी कौतुक केले. माझ्या सासऱ्यांना स्वत:च्या

पत्नीच्या सुगरणपणाचा फार अभिमान होता. मला वाटले या पोक्त्या पुखत्या बाईशी हे माझ्यासारख्या नवशिकीची कशाला तुलना करताहेत. यांचा जीव बहुधा भांड्यात पडला असावा. त्यांना वाटणारी काळजी व उलघाल त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती. आता मागे वळून बघता असे वाटते की नीट निभावले म्हणून बरे, पण मी जरा जास्तच धाडस केले होते.

मला यांच्या स्वभावाचा थांगच लागत नव्हता. आमची व्हावी तशी ओळखच झाली नव्हती. हळू हळू अंदाज घेत चाचपडत नवीन आयुष्याला सामोरी जात होते. आदल्या दिवशी बाहेर जाताना मी बाहेरून आल्यावर पाणी काढून देईन मग तुम्ही धुणे धुवा असे सांगून गेले होते. त्यांना यायला उशीर झाल्याने मी व वन्संनी धुणे धुतले. वन्संनी पाणी काढून दिले व मी धुणे धुतले. मला रहाटाने पाणी काढायला, भाकरी करायला व शेण लावायला येत नव्हते. आमच्याकडे चोवीस तास पाणी, धान्याची सुबत्ता व फरशीचे घर असल्याने या तीन्ही गोष्टी मी लग्नानंतर शिकले. आमचे धुणे संपता संपताच हे बाहेरून आले. परत आल्यावर ''मी सांगून गेलो होतो तरी तुम्ही मी येण्याअगोदर धुणे का धुतलेत,'' म्हणून खूप रागावले व रागारागाने पंधरा वीस बदल्या शेंदून ओतून दिल्या व विचारले, ''बस, की आणखी काढू?'' मी तर हा अवतार बघून घाबरुनच गेले होते. जणु निद्रिस्त ज्वालामुखी जागृत झाला होता. तरी पण धीर करून म्हणाले, ''आणखी एक बादली हवी आहे.'' ''कशाला?'' त्यांनी रागारागाने विचारले. मी म्हणाले, ''एक माणूस खूप तापले आहे त्याच्या डोक्यावर ओतायला.'' सगळे हसू लागले व वातावरण एकदम निवळले. हे दिल्लीला पोचल्यावर तीन-चार दिवसांनी पोचल्याचे पत्र व मला लिहिलेले Inland आले. पत्र सकाळच्या डाकेने व इनलँड दुपारच्या डाकेने आले. आम्हाला आधी पत्र आले व मग बायकोला आले यावर बरीच चर्चा झाली. यात चर्चा करण्यासारखे काय आहे हेच मला कळत नव्हते. त्याचे पत्र आपल्याला आधी आले या कल्पनेने त्यांचा अहंकार सुखावला इतकेच कारण दोन्ही पत्रे एकाच दिवशी लिहिलेली व पोष्टात टाकलेली होती. पोष्ट खात्याची कृपा, दुसरे काय?

मला फारसा अर्थबोध होत नसला तरी या घरात कुठेतरी सुसंवादाचा अभाव आहे असे सारखे जाणवत होते. संध्याकाळी आमच्या घरी स्वैंपाकघरात आई, मुले व राजाराम नावाचा एक माणूस यांची बैठक असे. सासरे बाहेर गेलेले असताना त्यांची प्रच्छन्न निंदा हा बैठकीतला मुख्य विषय. मला मोठे चमत्कारिक वाटे. मी आमच्या घरी माझ्या आई-वडिलांना एकमेकांबद्दल अनुदारपणे बोलताना कधीही

ऐकले नव्हते. त्यांचे जे काय मतभेद असतील त्याची चर्चा एकमेकांसमोर होत असे. आम्हा सर्वांना एकमेकांबद्दल निर्व्याज व अकृत्रिम प्रेम वाटत असे. इथे सगळाच प्रकार वेगळा होता. माझ्या सासूबाईंच्या माहेराहून आमच्या लग्नाला कोणीच आले नव्हते त्यावरून ''माझा मुलगा, तुझी मुले,'' किंवा ''तुमचा मुलगा, माझी मुले'' असेही उल्लेख ऐकायला मिळाले. मला स्त्री मासिकात वाचलेल्या बदसूर जोडपी या लेखमालेची आठवण झाली. घरात कुणाशी मनमोकळे बोलण्याइतका विश्वास निर्माण होणे अशक्यच.

या लोकांच्या बोलण्यात आम्ही कसे मोठे, कसे खनदानी, माझे माहेर जहागिरदाराचे, दादाची आई कारकुनाची मुलगी, तुमचे वडील कारकुनाचा मुलगा इत्यादी ऐकून मी चक्रावून जात असे. असे जर होते तर यांनी बिजवराला मुलगी का दिली? तीही चार मुलांवर व बावीस वर्षांचे अंतर पत्करून! त्यातच माझ्या सतरा वर्षांच्या दिराबद्दल (कमलाकरबद्दल) बोलताना सख्ख्या बहिणीने सुद्धा 'याच्याबरोबर घरात एकटे राहाण्याच्या लायकीचा नाही आहे हा' असे ऐकले. माझा गोंधळ वाढत होता.

एकदा आम्ही दुपारी ओटीवर बसलो असता हा दीर मला म्हणाला, ''वहिनी! तुम्हाला कारकुनाची मुलगी, कारकुनाची बायको वगैरेपेक्षा वकिलाची सून म्हणून घ्यायला जास्त आवडत असेल नाही?'' त्यावर मी सांगितले की जर माझा नवरा प्रामाणिकपणे माझे पोट भरीत असेल तर कारकुनाचीच काय पण हमालाची बायको म्हणून सुद्धा मला जगायला आवडेल. तसंच ''तुम्ही काय कॉलेजात जाऊन इंटर झालात. आमची नमूताई बाहेरुन परीक्षेला बसून पास झाली.'' हे मुक्ताफळ! ही सगळी काय भानगड आहे? ही अशी तुलना हे लोक का करताहेत काहीच कळत नव्हते. माझ्या कल्पनेप्रमाणे मी असा डौलही कधी मिरवीत नव्हते. एकदा दोनदा ऐकून घेतल्यावर मात्र मी तुमच्या बहिणीला कोणता क्लास मिळाला असे विचारले तर 'पास क्लास' असे उत्तर मिळाल्यावर मला Second Class असून मी बोर्डाला संस्कृतला पहिली असल्याचे सांगितले. खरं तर तोपर्यंत माझा रिझल्ट सुद्धा मी यांच्याशिवाय कुणाला सांगितला नव्हता. यावर चिरंजीव उद्गारले, ''ते काहीही असले तरी उद्या नमूताईची मुलेच तुमच्या मुलांपेक्षा जास्त हुशार निघतील कारण आम्ही वकिलाची मुले आहोत.'' माझ्या वडिलांच्या कारकुनीचा वारंवार होणार अनुदार उल्लेख ऐकून मला राग आला व मी सांगितले की माझे वडील अत्यंत बुद्धिमान असून केवळ परिस्थितीमुळे त्यांना कारकून व्हावे लागले आहे. त्यांची जगन्नाथ शंकरशेट एका मार्काने हुकली आहे. तेव्हा

कुठे त्यांची तोंडे बंद झाली. ही सगळी अक्कल या दिराचीच होती की बोलविता धनी कुणी वेगळाच होता माहीत नाही.

''आम्हाला तुझ्यापेक्षा कितीतरी चांगल्या श्रीमंतांच्या मुली सांगून आल्या होत्या. तुझ्या नवऱ्याला तू पसंतच नसली पाहिजेस नाहीतर कुठला नवरा लग्न झाल्यावर बायकोशी ओळख झालेली नसताना नोकरीच्या गावी निघून गेला असता?'' वगैरे ऐकावे लागले. खरं तर याच लोकांनी मंगळागौरीकरता मला ठेवून जाण्याचा आग्रह धरला होता.

हा माझा दीर लघळपणे वागण्याचा प्रयत्न करीत असे. मोठी वहिनी आईसारखी असते वगैरे म्हणून मांडीवर डोके ठेवून झोपायचे बघे. पण मी त्याला सांगितले, ''हे सगळे स्वतःची आई जिवंत नसेल तर! तुम्ही तुमच्या आईच्या मांडीवर डोके ठेवून झोपा.'' त्याच्या असल्या वागण्याचा कोणी निषेध करीत नव्हते की त्याला ''नीट वाग'' असे सांगतही नव्हते. मला फार अवघडल्यासारखे होई. त्यातच मी त्याची undergarments धुवायला नकार दिल्यावर तो जास्तच पिसाळल्यासारखे करू लागला. खरं तर नव्या नवरीला असले कपडे धुवायला टाकू नकोस हे आईनेच सांगायला नको का? ''तुम्ही दादाचे कपडे धुणार मग माझे धुवायला काय हरकत आहे,'' असे म्हणू लागला. मी म्हणाले, ''देवा ब्राह्मणांच्या साक्षीने तुमच्या दादाला जे मी मानले आहे ते तुम्हाला मानलेले नाही हाच तुमच्या व त्यांच्यातला फरक आहे.'' प्रकरण चिघळतच होते. मी दाद लागू देत नाही म्हटल्यावर एक दिवशी संध्याकाळी मी एकटीच स्वैंपाकघरात असताना आला व म्हणाला, ''वहिनी, दादाको तुम अच्छी न लगी तो क्या हुआ? हम तो हैं न यहाँ?'' मनातून मी खूप घाबरले होते पण उसने अवसान आणून म्हणाले, ''समजलात काय तुम्ही स्वतःला? राजस्थानातली आहे मी. एक पाऊल पुढे टाकाल तर हे जळते लाकूड डोक्यात घालीन.'' वरमून तो निघून गेला, पण मी मात्र सैरभैर झाले. काय करावे सुचेना. विचार करून करून डोक्याचा नुसता भुगा झाला. याचा भाऊ पण असाच असेल का? या विचाराने मनाचा ठाव सुटल्यासारखा झाला. रात्री झोप येईना. मध्यरात्री मनाचा निश्चय करून खाली आले. आईने एक दोन कार्डे व Inlands बरोबर दिली होती. एक कार्ड वडिलांना लिहिले की मंगळागौर झाल्यावर मला लवकरात लवकर येऊन घेऊन जा. त्या वेळी जुन्या पंचांगाचा श्रावण अधिक होता पण गोडबोले टिळक पंचांग वापरीत असल्याने जुलैच्या शेवटच्या आठवड्यात माझी मंगळागौर व नणंदेचे डोहाळजेवण पार पडणार होते. दुसरे सविस्तर पत्र मी दिल्लीला लिहिले. त्यात सर्व हकीगत सविस्तर

कळवून, ''मी खरंच जर तुम्हाला आवडत नसेन तर तसे स्पष्टपणे कळवावे. मी अजून बनारस विद्यापीठाच्या स्कॉलरशिपला नकार कळवलेला नाही. त्यांची अखेरची तारीख ३१ जुलै आहे. मी दिल्लीला न येताच परत कॉलेज जॉईन करीन. माझे वडील आयुष्यात फार मोठा जुगार खेळले असे मी समजेन. तिथे येऊन स्वत:ची नाचक्की करून घेण्याची मला अजिबात इच्छा नाही,'' असे लिहिले. सुदैवाने पोस्टाची पेटी आमच्या बाहेरच्या अंगणातल्या लिंबोणीच्या खोडालाच अडकवलेली होती. पत्रे पेटीत टाकली व परत वर येऊन झोपले. तेवढया वेळात कोणी उठले नाही म्हणून बरे, नाही तर गहजब झाला असता.

या चार–आठ दिवसात आयुष्य ढवळून निघाल्यासारखे वाटत होते. एकीकडे जो काय थोडाफार सहवास मिळाला होता त्यावरून अंतर्मन आपला नवरा चांगला असावा अशी ग्वाही देत असतानाच शंकेची पाल चुकचुकू लागे. मन बेचैन होई. माझ्यासमोर अत्र्यांची निर्मला, रांगणेकरांची भानुमती, कुंकूतली नीरा फेर धरून नाचू लागल्या व त्यामुळेच हे असे पत्र लिहिण्याचा धाडसी निर्णय मी घेतला. सासुरवासाच्या, सावत्रपणाच्या वाचलेल्या, ऐकलेल्या अनेक कथा मनापुढे तरळून गेल्या.

दोन–चार दिवस असेच अस्वस्थतेत गेले. एके दिवशी संध्याकाळी पुढच्या दारी शेण सडा घालत असताना समोरून पोस्टमन येताना दिसला. माझ्या पत्राचे उत्तर express delivery ने आले होते. अंतर्मनाची ग्वाही खरी ठरली होती. लिहिले होते, ''तुला मागे ठेवून दिल्लीला यावे लागेल असे मला वाटलेच नव्हते. पण मंगळागौरीसाठी ठेवायचा प्रस्ताव पुढे आला. नाही म्हणणे बरे दिसले नसते म्हणून होकार दिला. मी निक्षून 'नाही' सांगितले असते तर बरे झाले असते असे आता वाटते आहे. मला खूप काही सांगायचे आहे. बोलायचे व ठरवायचे आहे. तुझे पत्र वाचून मी पण गोंधळून गेलो आहे. काय करावे सुचत नाहीये. पण एकच सांगतो, उतावळेपणाने कोणताही निर्णय घेऊ नकोस. संसाराची घडी बसण्याआधीच विस्कटू नकोस. तू दिल्लीला ये. महिना दोन महिने माझ्याजवळ राहा, त्यानंतर मी सोडून देण्याच्या लायकीचा आहे असे वाटले तर खुशाल सोडून जा. नव्हे, तू तशी इच्छा व्यक्त केलीस तर मी स्वत: तुला तुझ्या वडिलांकडे पोचती करीन. गरीबाची सुस्वरूप व श्रीमंताची बेताची अशा दोन्ही प्रकारच्या मुली मी कटाक्षाने टाळल्या आहेत. नॉन–मॅट्रिक मुलीला मी बघण्याचे पण नाकारले आहे. यावरुन तुला माझ्या अपेक्षांची कल्पना यावी. तू मला न आवडण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मी एकट्यानेच पाहून तुला पसंत केले आहे. तुमच्या घरमालकांच्या मुलाने

तुझ्याबद्दल जे काही सांगितले त्यावरून तू बुद्धिमान आणि विचारी आहेस असे वाटून मी होकार दिलेला आहे. माझ्या समोर अडचणींचा डोंगर आहे तो तुझ्या साहाय्याने चढून जाता येईल असे वाटते आहे, तरी काय ते कळव. आतुरतेने वाट बघतो आहे.'' केवळ तुझाच. चालेल ना असे म्हटले तर?''

मळभ दूर झाले व वृत्ती उल्हसित झाली. मी जवळ जवळ एक महिना सासरी होते पण या चार आठवड्यात मी बरेच काही शिकले.

माझ्या ह्या पहिल्या पत्राबद्दल 'हे' मुलींना सांगत असत, ''बघा तुमच्या आईने मला पाठवलेले पहिले प्रेमपत्र कसे होते.''

❍❍❍

# ७. अरे संसार संसार, माझे सासर

माझे सासर पुण्यातील गोडबोले यांच्याकडे. नारायण पेठेत आमचे एक सात खणी वडिलोपार्जित घर होते.

ही गोडबोले मंडळी कोकणातील कासारवेलीहून पावसला, पावसहून वाईला व वाईहून पुण्याला आली. त्यानंतर माझे सासरे पुण्याहून एलिचपुरात स्थायिक झाले. आम्ही नवलाखे गोडबोले म्हणून सुद्धा ओळखले जात असू. याबद्दल दोन आख्यायिका आहेत. एक म्हणजे आमच्या पूर्वजांपैकी अमृत विसाजी गोडबोले हे पेशव्यांचे पागाधिकारी असताना हरबऱ्याच्या पोत्याऐवजी त्यांना एक होनांनी भरलेले पोते मिळाले व दुसरी म्हणजे आम्ही पेशव्यांना नऊ लाख होन कर्ज दिले होते. पेशवाईबरोबर हे कर्जही बुडाले. पावसचे स्वामी स्वरूपानंद व आमचा वंशवृक्ष एकच आहे. माझ्या एका चुलत दिराकडे मी सवाई माधवरावांच्या लग्नात निजामाने केलेल्या आहेराचे वर्णन करणारे एक पत्र स्वत: वाचले आहे. वृत्तदर्पणकार परशुराम तात्या गोडबोले, बुकसेलर नारो आप्पाजी गोडबोले आमच्याच वंशवृक्षातले आहेत. पुण्यातील विष्णु सदाशिव आणि कंपनीची जागा, विजय टॉकीजची जागा व वाईच्या द्रविड हायस्कूलची जागा गोडबोल्यांनी तुळस लावायला व शाळेला दान दिल्याचे पण ऐकिवात आहे.

माझे आजे सासरे नीलकंठ विष्णु गोडबोले हे शिक्षणखात्यात कारकून होते. माझ्या आजेसासूबाई पुण्यातील प्रसिद्ध वकील एल.आर. गोखले यांची मोठी बहीण. त्या उत्तम वैद्यकी करीत. या जोडप्याला एकूण नऊ मुले, सहा मुलगे व तीन मुली, यातील एक विश्वनाथ नीलकंठ गोडबोले व दुसरे माझे सासरे गणेश नीलकंठ गोडबोले. एक मुलगी केमिस्ट्रीचे प्रोफेसर श्री. जोशी यांना दिली होती. तिचा मुलगा I.C.S. होता.

श्री. विश्वनाथ नीलकंठ गोडबोले अभियंता होते. ते P.W.D. मध्ये नोकरी करीत. त्यांनी भाटघर, दारणा डॅम, भंडारदरा व सक्कर बराज इत्यादि धरणे बांधली. वडील गेल्यानंतर त्यांनीच एकत्र कुटुंबाची जबाबदारी पेलली. सुरवातीची

काही वर्षे माझ्या सासऱ्यांनी पण एकत्र कुटुंबाचा भार पेलण्यासाठी हातभार लावला. माझ्या आजेसासूबाईंच्या सांगण्यावरून सर्व भावंडांनी आपला घरावरचा हक्क सोडून दिला. परंतु विश्वनाथ नीलकंठांनी त्यांची सांपत्तिक स्थिती चांगली असल्याने घराची किंमत करून सर्व भावंडांना त्यांच्या हिश्श्याचे पैसे दिले. १९३५–३६ च्या सुमारास आजेसासूबाईंच्या निधनानंतर सर्व मंडळी विभक्त झाली.

माझ्या सावत्र सासूबाई सुरेख होत्या, कष्टाळू होत्या, प्रेमळ होत्या व सुस्वभावी पण होत्या. परंतु माझ्या आईच्या ठिकाणी असलेल्या प्रगल्भतेचा मागमूसही मला त्यांच्या ठिकाणी जाणवला नाही. दोघींचा जन्म एकाच साली झालेला होता. या माऊलीवर झालेला अन्याय माझ्या मनाला इतका भिडला होता की आयुष्यात कधीच मला त्यांच्यावर रागावता आले नाही. वयाच्या तेराव्या वर्षी चार मुलांचा बाप असलेल्या पस्तीस वर्षांच्या बिजवराशी लग्न! ही कल्पनाच मनाचा थरकाप उडवणारी होती. माझ्या लेखी त्यांना शंभर गुन्हे माफ होते. किंग लियरप्रमाणे She was more sinned against than sinning. माझी मोठी नणंद त्यांच्यापेक्षा फक्त दोन वर्षांनी लहान होती. त्यांच्या माहेरी श्रीमंती असावी परंतु वडील गांजेकस होते व व्यसनात सर्व इस्टेट घालवली होती. त्यांच्या मृत्यूनंतर आभाळच कोसळले. तीन मुले पदरी. मोठा मुलगा नुकताच कलेक्टर कचेरीत लागलेला. पैशाच्या लोभाने मुलगी बिजवराला दिली. यातच भर म्हणून की काय नजीकच्या आठ दहा वर्षांतच ती श्रीमंती पण नाहीशी झाली. विपन्नावस्था पदरी आली. तीस सालच्या कॉटनक्रॅश नंतर वऱ्हाडातील अनेक वकील देशोधडीला लागले. भरीत भर म्हणून सासऱ्यांचे खुपऱ्यांच्या त्रासाने डोळे गेले. वास्तविक ते अतिशय बुद्धिमान व एकपाठी होते. दादासाहेब खापर्डे यांचे ते वकील होते. घरी चालून आलेली सबजज्ञाची नोकरी नाकारली होती. वाढता संसार व उतरती मिळकत या चढत्या–उतरत्या भाजणीचा मेळ घालण्यात ते अयशस्वी ठरले होते. बायको गेल्यानंतर पुनर्विवाह करताना मोठ्या वयाच्या विधवेशी लग्न केले असते किंवा डॉ. पुतण्याच्या सल्ल्याप्रमाणे वेळीच वाढत्या संसाराला आळा घातला असता तर कदाचित ही वेळ आली नसती. न्यायमूर्ती रानड्यांसारखा सुधारकाग्रणीसुद्धा विधवाविवाह करण्याचे धाडस दाखवू शकला नाही तर त्यांच्याकडून अशी अपेक्षा करणेच चूक. वयाच्या साठीनंतर डोळे गेलेले असताना खापर्ड्यांच्या मुक्तागिरी येथील इस्टेटीच्या खटल्यात निव्वळ स्मरणशक्तीच्या जोरावर त्यांनी तो खटला जिंकला होता. त्यांनी एकशेपन्नास साक्षीदारांची उलट तपासणी घेतली होती. इंडियन पीनल कोडच्या कोणत्या पानावर काय पाहायचे हे ते कारकुनाला सांगत.

"Godbole never reads twice," असे म्हणत. माझ्या लग्नानंतरची ही गोष्ट असल्याने नागपूर टाईम्समध्ये त्यांच्यावर लिहिलेला स्तुतिपर लेख मी वाचला आहे. L.L.B. ला असताना मित्राने वाचावे व यांनी ऐकावे अशी परीक्षा दिली. मित्र नापास व हे पास झाले. वयाच्या साठाव्या वर्षानंतर त्यांनी रुद्र पाठ केला होता. पण मिठाचा एकच खडा दूध नासवायला पुरेसा असतो असे त्यांचे झाले होते. आता त्यांची परिस्थिती 'पिंजऱ्यामध्ये व्याघ्र सापडे, बायका मुले मारिती खडे' अशी झाली होती. माझ्या सगळ्यात धाकट्या दिराचा जन्म १९४५ साली ते अठ्ठावन्न वर्षांचे असताना झाला. या सगळ्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. पति–पत्नींमधला दुरावा वाढत गेला. पर्यायाने मुलांच्या वाढीवर पण याचा परिणाम झाला.

माणूस आपला पराभव अथवा अपयश झाकायला वेगवेगळ्या सबबी शोधत असतो. इथेही तेच झाले. ''मधूची आई नशीबवान होती. तिच्या नशिबाने मला पैसे मिळत होते. तुझे नशीबच फुटके म्हणून मला पैसे मिळत नाही.'' ''ज्याने त्याने आपल्या नशिबाने घ्यावे'' वगैरे. यातूनच मी जहागिरदाराची मुलगी, दादाची आई कारकुनाची मुलगी वगैरे गोष्टी निर्माण झाल्या. मुलांच्या मनावर सतत ''तुमचा बाप कसा नालायक आहे'' हे ठसवले जात होते. मी कुठेच बाहेर जात येत नसल्याने मला दोन्ही बाजू ऐकायला मिळत. बाबू सोमण नावाचा सासऱ्यांचा एक नातेवाईक व सासऱ्यांची पण खलबते चालत. राजाराम, बाबू सोमण व लक्ष्मी मोलकरीण मला कधीच आवडले नाहीत. घरातच दोन तट होते. एका बाजूला आई व मुले व दुसरीकडे सासरे. त्या वेळी जरी मला या गोष्टींचा राग येत होता तरी आता विचार करता असे वाटते की त्या वेळी आम्ही असे, आम्ही तसे, आम्ही डालडा खात नाही, जहागिरदारी, वकिली, कारकुनी वगैरे status symbols हे सगळे अहंगंडाच्या माध्यमातून होणारे न्यूनगंडाचे प्रकटीकरणच होते.

यथावकाश सासर माहेरच्या– मंगळागौरी उरकून मी सतरा–अठरा ऑगस्टच्या सुमारास दिल्लीला आले. स्वातंत्र्याचा जल्लोष, त्याला लागलेले फाळणीचे व जातीय दंगलींचे ग्रहण या पार्श्वभूमीवर नवीन आयुष्याची सुरूवात केली. आम्ही घरी येताच ''गोडबोले साहब बहू लेकर आये है,'' म्हणत बिल्डिंगमधल्या बायका मला पाहायला गोळा झाल्या, पण त्यांची निराशा झाली. मी त्यांच्याशी व्यवस्थित हिन्दीमध्ये बोलू लागल्याने त्यांचा उत्साह मावळला. पुण्याहून इथे राहायला आलेल्या बायकांची हिन्दी येत नसल्याने उडणारी त्रेधा तिरपिट त्यांच्या करमणुकीचा विषय होता. पण यामुळेच माझी त्या सर्वांशी गट्टी जुळायला वेळ लागला नाही.

दिल्लीला आम्ही करोलबागेत १६/५ वेस्टर्न एक्स्टेंशन एरियात आर्य समाज रोडवर राहात होतो. दोन खोल्या, वऱ्हांडा व स्वैंपाकघर एवढ्या जागेत आम्ही दोन कुटुंबे राहात होतो. छोटे स्वैंपाकघर व एका खोलीत कुलकर्णी पति–पत्नी आपल्या दोन मुलींसह राहात होते व एका खोलीत आम्ही दोघे राहात असू. भाडे दर महा रु. सत्तर. पैकी आम्ही रु. तीस देत असू. श्रीमती कुलकर्णींनी मला लहान बहिणीसारखे वागवले. म्हणत, ''मालूताई, संध्याकाळी फिरायला जाताना तांदूळ घालून पातेले मला देऊन जात जा. माझ्या कुकरबरोबरच मी तुमचाही भात लावत जाईन. नवीन लग्न झाल्यावर वाटते थोडेसे हिंडा फिरावेसे.'' त्यांची मोठी मुलगी पाहाता क्षणीच मला मामी म्हणून चिकटली. दोन खोल्यांच्या मधले दार लावलेले तिला अजिबात आवडत नसे.

मी घरातील सामान बघून हबकूनच गेले होते. दरमहा दोनशे पन्नास रु. मिळवणाऱ्या पगारदाराचे हे घर आहे असे वाटलेच नाही. एक फाटकी गादी, फाटके ब्लँकेट, काथ्या सैल पडलेली एक कॉट व एक जुनी सायकल, कपबशी, एक जुना स्टोव्ह व दोन तीन लहान पातेली. बास. लग्न ठरल्यापासून आठ दिवसात झाल्यामुळे वेळ मिळाला नसेल असे वाटले. पण हळूहळू चित्र स्पष्ट होत गेले.

माझे सासर म्हणजे बडा घर पोकळ वासा असा प्रकार होता. इथे आल्यावर मला कळले की वऱ्हाडातील घर आम्हीच चालवत होतो. हे दरमहा शंभर रु. घरी पाठवीत होते. आदल्याच वर्षी हजारभर रु. खर्च करून एका बहिणीचे लग्न केले होते. दुसरी बहीण लग्नाची होती. तिचे लग्न करून मगच यांच्या लग्नाचा विचार करावा असे ठरले होते. पण मधेच यांची दिल्लीला बदली झाल्याने मुलगा परप्रांतात कदाचित वाईट संगतीला लागेल या भीतीने यांच्या लग्नासाठी सासू–सासऱ्यांनी उचल खाल्ली. त्या वेळी दिल्लीला असणे आज इंग्लंड–अमेरिकेला असण्यासाखे किंबहुना त्याहून जास्तच असे होते.

आम्हाला ऑफीसमधून रेशन मिळे. यांच्या मधुसूदन या नावामुळे यांच्या रेशनकार्डावर बंगाली असा शिक्का मारला गेला. तिकडचे लोक भात कमी खात असल्याने भरपूर तुकडा बासमती मिळे. soft coal व charcoal मिळे. मी एका पत्र्याच्या डब्यात दगडी कोळशाची शेगडी घातली ती सकाळी सहा वाजता पेटवली की दुपारी एकपर्यंत पुरत असे. सरते शेवटी पाणी तापवून अंघोळ. हे गार पाण्याने अंघोळ करीत असत. माझे वडील येणाऱ्या जाणाऱ्याबरोबर त्यांना मिळणाऱ्या subsidised रेशन शॉपमधून एक चहाचा पुडा, तुरीची डाळ, साबण बार, धने, जिरे वगैरे पाठवीत. आत्तापर्यंत त्यांना पण घरची हकीगत कळली होती. त्यांनी

मला किंवा यांना कधीही घरी पैसे पाठवू नका असे सांगितले नाही. उलट ते मला म्हणत, ''तुझी वाहती गंगा आहे. तुला कधीही कमी पडणार नाही. अडचणी निघून जातील, पण वाईट नाव मागे राहील.'' दिवाळीसाठी माहेरी गेल्यावर आईने एक गादी व एक रजई करवून घेतली.

एक सप्टेंबरला पगार झाल्यावर त्यांनी मला हातखर्चाला म्हणून पाच रु. दिले व म्हणाले, 'याचे तू काहीही कर. मी तुला विचारणार नाही.' मी आश्चर्यचकित होऊन म्हणाले, ''बस एवढ्याच पैशांवर माझा हक्क आहे का? मला असा सवता सुभा नको आहे. संसार आपल्या दोघांचा आहे. माझ्या पैशांचे मी काहीही करीन असे मी कधीच म्हणणार नाही. आपण दोघेही जो खर्च करू तो योग्य कारणासाठीच केला असे एकमेकांना वाटायला हवे. तुम्ही मिळवलेल्या प्रत्येक पैशात व खर्चात मी अर्धी वाटेकरी असणार आहे.''

मी यांच्याजवळ बाहेरून B.A. ला बसण्याचा प्रस्ताव मांडला. त्याच वेळी नणंदेने पण बाहेरून इंटरला बसण्यासाठी पैशांची मागणी करणारे पत्र पाठवले. त्याच वेळी त्यांच्या दत्तक गेलेल्या भावाने ''मला B.Ed करावयाचे आहे. एक वर्ष बिनपगारी रजा घ्यावी लागेल तर तू काही मदत करू शकतोस का?'' असे पत्र लिहिले. सोळा सप्टेंबरला नणंद बाळंतीण झाली व बाळंतपणाच्या खर्चासाठी पैशांची मागणी करणारे पत्र आले. मी तर चक्रावूनच गेले. दरमहा जवळ जवळ अर्धा पगार घरी पाठवत असताना देखील प्रत्येक जण यांच्याकडे वेगवेगळ्या कारणाने पैसे कसे मागू शकतो हेच मला कळत नव्हते. असे काही झाले की आत्मग्लानीच्या भावनेने यांना नैराश्य येई आपण असायला हवे तितके कर्तबगार निघालो नाही असे वाटे. मी म्हणाले, ''मुलाने वडिलांना मदत करण्यात काहीच गैर नाही पण त्यांनीसुद्धा तुम्हाला समजून घ्यायला नको का? त्यांचा विस्तार इतका मोठा आहे की तुम्ही सगळा पगार जरी घरी पाठवला तरी त्यांच्या अपेक्षांना पुरेल अशा रीतीने घर चालवता येईल की नाही कोण जाणे. तुमच्या घरी जर इतकी हलाखीची परिस्थिती आहे तर मग मोठेपणाचा आव आणून मुलीला एकशे पंचवीस रुपयांचा चंदेरी शालू डोहाळजेवणासाठी घ्यायची काय गरज होती? साधी पन्नास साठ रुपयांची साडी घेऊन भागले नसते का? हा खोटा बडेजाव कशाला हवा?'' या माझ्या प्रश्नांचे यांच्याकडे उत्तर नव्हते. यांना अशा प्रकारची कोणाच्या तरी पाठिंब्याची गरज होती. प्रत्येक जण त्यांना ''ही तुझी जबाबदारी, आम्ही तुझे केले आहे. आता आमचे तू करायलाच हवे,'' अशी कळत न कळत भावनिक छळणूक करीत होते. यांनी भावाला शंभर, घरी शंभर

व बहिणीला ऐंशी रु. पाठवले व कपाळाला हात लावून म्हणाले, ''हे पैसे मी नानाला (मावस भावाला) पाठवणार होतो. नमीच्या लग्नासाठी मी त्याच्याकडून पाचशे रु. घेतले होते. माफ कर मला. मी तुला B.A. होण्यासाठी पैसे देऊ शकेन असे वाटत नाही.'' मला फार वाईट वाटले. हा मुलगा स्वत:च्या पोटाला चिमटा घेऊन आपल्या लहान–मोठ्या गरजा बाजूला ठेऊन आपल्याला मदत करतो याची घरात कुणालाच कदर नव्हती. यांनी कधी त्यांना सांगितलेच नाही तर कळणार तरी कसे? दिल्लीसारख्या ठिकाणी धड अंथरुण पांघरूण नाही, अंगात घालायला गरम स्वेटर नाही अशी स्थिती होती. या भावाबद्दल कृतज्ञता तर दूर पण त्याची कारकून म्हणून हेटाळणी करण्याची एकही संधी कुणी सोडत नव्हते. बोलणारा माझा दीर कमलाकर असला तरी त्याला घरातून छुपा पाठिंबा असावा कारण तू असे बोलता कामा नये असेही त्याला कोणी म्हणत नव्हते. खरं तर मी घरच्या पोशिंद्याची, मिळवत्या मुलाची बायको होते. किती डौल असायला हवा होता मला. ते तर दूर राहिले, उलट हेटाळणी व तुच्छता यांनाच मला सामोरे जावे लागले होते. मी अंतर्मुख होऊन विचार करू लागले. आपला नवरा संकोची व भिडस्त आहे, त्यांची आतल्या आत घुसमट होते आहे हे मला कळून चुकले होते. वाईटपणा आला तरी चालेल पण आपल्याला या माणसाच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे लागणार आहे याचाही मला अंदाज आला होता. या सगळ्या प्रकारात सासऱ्यांचाही सहभाग नव्हता असे नाही. त्यांनी यांना विचारले होते, ''आम्हाला सगळ्यांना शंभर रुपये व तुम्हा दोघांनाच शंभर रुपये ही वाटणी बरोबर आहे असे वाटते का तुला?'' माझी आई म्हणायची, आई गेली की बाप मावसा होतो हेच खरे. एलिचपूरला घरभाडे नाही, भाजी चार आणे शेर, दूध रुपयाला चार शेर, एक आण्याला चार लिंबे तर दिल्लीला भाजी चार आणे पाव, दूध दहा आणे शेर व एक आण्याला एक लिंबू. शिवाय एका खोलीचे भाडे दर महा रु. तीस इतकी तफावत असताना या B.A. LLB माणसाने असा प्रश्न विचारला याची खरोखर गंमत वाटली.

घरी हे रामायण चालू असतानाच बाहेर दुसरेच महाभारत सुरू होते. १५ ऑगस्ट, १९४७, नंतरचा तो काळ होता. दिल्लीला सारखे हिंदु–मुसलमानांचे दंगे उसळत होते. आर्य समाज रोडच्या एका बाजूला हिंदू व दुसऱ्या बाजूला मुस्लीम वस्ती होती. ''अल्ला हु अकबर'' व ''हर हर महादेव''च्या गर्जनांनी वातावरण भरून जाई. लोक नागव्या तलवारी घेऊन रस्त्याने जाताना दिसत. हे ऑफीसमधून घरी येईतो जीव मुठीत धरुन बसावे लागे. मधे पहाडगंज भाग थोडा खतरनाक

होता. अजमलखाँ पार्क, रामलीला मैदान इत्यादी ठिकाणी होणाऱ्या जाहीर सभांना आम्ही जात असू. शांतता पाळा, हिंसा करू नका इत्यादी नेहरु सांगत असताना एक सरदारजी व्यासपीठावर चढला व त्याने इंदिरा गांधींचा हात धरला. त्याबरोबर नेहरुंनी त्याच्यावर हात उगारला. हे पाहताच तो म्हणाला, ''मी नुसता तुमच्या मुलीचा हात धरला तर तुम्ही हात उगारलात, आमच्या डोळ्यांदेखत आमच्या बायका मुली पळवल्या गेल्या, त्यांची अब्रू लुटली गेली आम्ही काय करावे?'' जनमानस अत्यंत प्रक्षुब्ध होते. तशातच तीस जानेवारीला गांधींचा खून झाला व देशात एकच डोंब उसळला. त्या वेळी माझी एक कविता तरुण भारतमध्ये छापून आली होती. हे संघाचे कार्य करीत असत. संघावर आगपाखड होत होती. यांच्या नावाची पुण्याच्या ऑफीसात चौकशी झाली. तिथे हा माणून इथे नाही एवढेच सांगितले होते. दिल्लीच्या ऑफीसमध्ये M.G. Godbole संघात मधुसूदनजी व रेशन कार्डावर M.S. Ganesh Godbole अशा नोंदी होत्या. पण सरकारी यंत्रणा आमच्यापर्यंत पोचली नाही ही हितचिंतकांची कृपा की योगायोग देव जाणे.

या काळात एक दिवस आमची जेवणे झाल्यावर संघाचा एक कार्यकर्ता आमच्या इथे आला. पोलिसांचा ससेमिरा चुकवता चुकवता दोन दिवसांचा उपाशी होता. त्याला गाकर पिठले करून पोटभर जेवू घातले. आमच्या खिडक्यांना गज नव्हते. जेवण होताच खिडकीतून पॅरापेटवॉलवर उडी टाकून पसार झाला. थोड्याच वेळात त्याच्या मागावर असलेले पोलीस येऊन पोचले. घरात कोणी नव्हतेच पण त्यांचा संशय जाईना. ''हे ताट कोणाचे?'' म्हणून विचारले. मी प्रसंगावधान राखून ''आमचे'' म्हणून सांगितले त्यावर ''एकच ताट कसे?'' मी हसून म्हणाले, ''अहो नवरा-बायको आहोत आम्ही. दोन ताटे घासायला नको म्हणून एकाच ताटात जेवतो. यात एवढे नवल वाटण्यासाखे काय आहे?'' वेळ निभावली पण पोटात आवळे शिजत होते.

या मधल्या चार-सहा महिन्यांच्या अवधीत मी आमच्या संसाराची घडी बऱ्यापैकी बसवत आणली होती. एकदा दिवाळसणाला, एकदा भावाच्या मुंजीला कोट्याला जाऊन आलो. संक्रांतसण पण झाला. आई आपल्या कुवतीप्रमाणे जावयाचे कौतुक करीत होती. मी दरमहा यांच्या मावसभावाला पंचवीस रुपये पाठवू लागले. यांच्याकडे स्वेटर नव्हते. मी लोकरीसाठी पैसे मागितल्यावर म्हणाले, ''नको विणूस तू माझ्यासाठी स्वेटर. बायकोने विणले म्हणून बेडौल असले तरी घालणारे नवरे पाहिलेत मी. पण मी तसे स्वेटर घालणार नाही.'' यांच्या मावशीने यांच्या आजोबांसाठी विणलेले एक जुने स्वेटर आजोबांच्या मृत्यूनंतर यांच्या

मामीने यांना दिले होते. ते उंदराने कुरतडले होते. पण लोकर चांगल्या प्रकारची होती. मी ते स्वेटर उसवले. गाठी मारून गुंडा केला व मांडीभोवती गुंडाळून लड करून ती लोकर धुवून यांच्या नकळत स्वेटर तयार करून यांच्या वाढदिवसाच्या दिवशी यांना भेट म्हणून दिले. आश्चर्यचकित होण्याची त्यांच्यावर पाळी आली, इतके ते सुंदर झाले होते. शेजारचे इंजिनिअर पाठक बायकोला म्हणाले, ''मिसेस गोडबोल्यांना विचारून विणणार असशील तर तुला लोकर आणून देतो''. वडिलांनी grain shop मधून मिळालेली लोकर पाठवली होती. त्याचे मी मला ब्लाऊज विणणार होते, पण हे म्हणाले, ''तात्यांना स्वेटर विणून पाठव त्यांचे वय झाले आहे, थंडी सोसत नसेल.'' म्हणून त्यांना विणून पाठविले. तर लगेचच आम्हाला सगळ्यांना स्वेटर विणून पाठव असे पत्र आले. मी अर्थातच त्याकडे लक्ष दिले नाही.

आमच्या शेजारी श्री. भटनागर म्हणून एक गृहस्थ राहात होते. त्यांच्या मुलीकडून मी smocking नावाचा सुंदर प्रकार शिकले. उत्तर हिंदुस्थानात विणणे, भरणे, शिवणे इत्यादी गोष्टी अशाच शिकल्या जात. आपल्या इकडच्यासारखे विणकाम, भरतकामाचे क्लासेस नसतात. 'विद्यया विद्या' असे काहीसे स्वरूप असते. माझ्याकडे शिवणयंत्र नव्हते, पण त्यांचे मशीन माझ्याकडेच असे. त्यांचा संसार मोठा होता. फावल्या वेळात मी त्यांना शिवण शिवण्यात मदत करीत असे. हळूहळू संसाराची घडी बसत होती. वातावरण निवळत होते व २६ जानेवारीला पहिले राष्ट्रपती राजेंद्रबाबूंची मिरवणूक पाहायला मिळाली. लोकसभा पाहिली. व्हॉईस रीगल लॉज पाहिला. मी महिला मंडळाची सभासद झाले. तीन–चार महिन्यात नवा पाहुणा घरात येत असल्याची चाहूल लागली. पण हा आनंद फार काळ टिकला नाही. पाय घसरून पडल्याचे निमित्त झाले व त्रास सुरू झाला. डॉक्टरांनी Bed Rest सांगितली. आई येऊन विश्रांतीसाठी घेऊन गेली पण फारसा उपयोग झाला नाही. Miscarriage झाले. त्याच सुमारास वडिलांची प्रमोशनवर बलसाडला बदली झाली. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मुलांच्या परीक्षा होईतो आम्ही काकांकडे राहावयास आलो. आई वडिलांबरोबर बदलीच्या गावी गेली. परीक्षा संपल्यावर आम्ही सगळे जाणार होतो. परीक्षा सुरू असतानाच भावाला ताप येऊ लागला. सतत १०५° टेंपरेचर असे. दिवसभरात कधीच नॉर्मलवर येत नसे. मला टायफॉईड असल्याची शंका आली व ती मी आमच्या फॅमिली डॉक्टरना बोलून पण दाखवली. पण त्यांनी हा sun stroke चा ताप आहे असे सांगून मॅग्नेशियाचा डोस दिला. आम्हाला Home Science मध्ये रोगांची लक्षणे शिकवली होती.

तशीच भावाच्या तापाची लक्षणे दिसत असल्याने मॅग्नेशिया द्यावा की न द्यावा असा मला संभ्रम पडला. टायफॉईड असताना मॅग्नेशिया देणे म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूलाच निमंत्रण. खूप विचार करून त्या पुड्या फेकून दिल्या, न जाणो त्या देण्याचा मोह पडला तर! गावात जाऊन सिव्हिल हॉस्पिटलमधील सिव्हिल सर्जन डॉ. तलवार यांना घरी घेऊन आले. त्यांनी टायफॉईड कन्फर्म केला व उपाययोजना सुरू केली. त्या वेळी प्रत्यक्ष परमेश्वरच जणू माझ्या पाठीशी होता व त्यानेच या सर्व गोष्टी माझ्याकडून करवून घेतल्या असे आज वाटते. तेव्हा जर मॅग्नेशिया दिला असता तर! आपल्या दुर्लक्षामुळे आपला भाऊ गेला ही खंत जन्मभर मनावर ओझे बनून राहिली असती. दुसऱ्या दिवशी समस्त बालगोपाल मंडळींना Civil Hospital मधे नेऊन anti-typhoid टोचून आणले. घरात सगळे आजारी, बहिणीलापण ताप येत होता. चुलती डोक्याला फडके बांधून बसे. आठ–दहा माणसांचे स्वैंपाक पाणी, धुणे, केरवारे, आजाऱ्यांची शुश्रूषा सगळे मी कसे उरकत होते देव जाणे. अवघे बावीस वर्षांचे वय होते माझे. नुकतेच miscarriage झालेले. पाणी पण बाहेरून भरावे लागे. माझ्या त्या नाजूक अवस्थेत गर्भाशयावर कायम स्वरूपी विपरीत परिणाम झाला नाही ही ईश्वरी कृपा. बलसाडला पत्र पोचून आई येईतो आठ–दहा दिवस मधे गेले. रात्रभर जागरण दिवसभर घरकाम, भावाला भ्रम झालेला. खाटेला बांधून ठेवून सतत बर्फाची पिशवी डोक्यावर ठेवावी लागे. माझी बहीण त्याच्याजवळ बसून तेवढे काम करी. आमचा मुक्काम लांबल्याने काकीबाईंनी बडबड सुरू केली. किती खर्च होतो. कणिक कशी संपते वगैरे. आई आल्यावर म्हणाली, ''मालू, माझी चिखलात अडकलेल्या गाईसारखी अवस्था झाली आहे. तू आता तुझ्या घरी जा, मला इथे राहण्याखेरीज गत्यंतर नाही.'' त्या वेळी आईस फॅक्टरीचे मॅनेजर श्री. साधले यांची खूप मदत झाली. बर्फ संपल्यावर रात्री दोन वाजतासुद्धा मी जाऊन बर्फ घेऊन येत असे. गाव ओळखीचा असल्याने भीती वाटत नव्हती. शिवाय माझ्या चुलत आत्याचा मुलगा पण या कामात मदत करीत असे. त्याला माझ्या वडिलांनीच नोकरीला लावले होते. या साथीने माझ्या धाकट्या चुलत बहिणीचा बळी घेतला. याचे मुख्य कारण म्हणजे आमच्या चुलतीने तिची योग्य प्रकारे काळजी घेतली नाही हेच होते. घरात बेडपॅन नव्हते, संडास मागील दारी. मी दहा वर्षाच्या भावाला कडेवर उचलून संडासात नेत होते.

यापूर्वी पण माझ्या होम सायन्सच्या ज्ञानाचा आम्हाला उपयोग झाला होता.

माझा धाकटा भाऊ जिन्यावरून पडला व त्याचा हात धनुकलीसारखा झाला. हे green stick fracture असे वाटले व दोन फूट पट्ट्या दोन्ही बाजूला लावून साडीच्या तुकड्याचे तिकोनी बँडेज करून स्लिंगमधे हात अडकवून त्याला Civil Hospital मधे नेले. त्या वेळी तेथील डॉक्टर मोहनलाल यांनी आमच्या मुख्याध्यापिकांना अभिनंदनपर पत्र लिहून आमचे कौतुक केले. या सगळ्या कौतुकाचे स्वरूप 'गावंढ्या गावात गाढवी सवाशीण' असे होते हे आता कळते आहे, पण त्या वेळी आनंद झाला हे नक्की. पुढच्या आयुष्यातसुद्धा मुलींना मोठे करताना या शिक्षणाचा खूप फायदा झाला. चि. मीनाला झालेली कावीळ वेळीच ओळखता आली.

मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मी दिल्लीला परतले. दोन–तीन महिन्यात मी पुन्हा आई होण्याची स्वप्ने पाहू लागले. यावेळी अगदी सुरुवातीपासून डॉक्टरांचा सल्ला घ्यायला सुरुवात केली. त्यांनी लिहून दिलेली टॉनिक्स वगैरे सुरू केली. या वेळी हे S.A.S. पार्ट–२ चा अभ्यास करीत होते. पण सतत रात्री १२–१२ वाजेपर्यंत संघाच्या बैठकींना जात असत. आमचे शेजारी श्री. कुलकर्णींच्या जेव्हा ही गोष्ट लक्षात आली तेव्हा मला म्हणाले, आज तुम्ही त्यांना दार उघडायला खाली जाऊ नका मला हाक मारा. त्या दिवशी त्यांनी यांचे बरेच बौद्धिक घेतले व सांगितले, ''ही परीक्षा तुम्ही जितक्या लवकर पास व्हाल ते चांगले. एकदा का ही परीक्षा पास झालात की प्रगतीचा मार्ग तुमच्यापुढे मोकळा आहे. दिवसेंदिवस वाढत्या जबाबदाऱ्यांचा विचार कराल की नाही,'' वगैरे. यांचे बैठकींना जाणे बंद झाले पण आम्ही करू नये ती दुसरी चूक केली. त्याच वर्षी Leave travel concession सुरू झाले त्याचा फायदा घेऊन आम्ही दिवाळीसाठी एलिचपूर परतवाड्याला गेलो कारण यांना या परीक्षेच्या अभ्यासासाठी एक महिना अवांतर रजा मिळाली होती. तिथे गेल्यावर हे बराच वेळ लोकांना भेटायला जाण्यात खर्च करू लागले. मी त्यांना अभ्यासाची आठवण करून देत असे पण गोडबोल्यांना फार अभ्यास करावा लागत नाही अशी उत्तरे मिळत. आमच्या घरातील मंडळींना नव्हे तर एकूणच गोडबोले मंडळींना आपल्या बुद्धिमत्तेची फार घमेंड होती व ज्यांना बुद्धी नव्हती त्यांना तर ती जास्तच होती.

या वेळी पण मागच्या चुकीची पुनरावृत्ती झाली. डोहाळजेवणाचे निमित्त सांगून मला ठेवण्याचा आग्रह मोडता न आल्याने हे मला तिथे ठेवून परत दिल्लीला गेले. त्याच वेळी ३१ ऑक्टोबरला म्हणजे जेमतेम तेरा साडेतेरा महिन्यातच वन्सांना दुसरी मुलगी झाल्याचे पत्र आले. त्यांच्या सासूबाई म्हातारपणामुळे दृष्टीहीन असल्याने माझ्यावर घर सोपवून सासूबाई बाळंतपणासाठी जाणार होत्या.

हे मनात ठेवूनच मला ठेवून जाण्याचा आग्रह झाला होता की काय काही कळले नाही पण त्यांनाच टायफॉईड झाला. त्यामुळे पाचसहा जणांच्या स्वयंपाकपाण्याचा ताण माझ्यावर, त्यातच मला डॉक्टरांनी दुधाबरोबर घ्यायला सांगितलेल्या गोळ्या घेताच येत नसत कारण घरात दूधच नसे. व ''ही गोळ्या नाही तरी घेतच नाही,'' म्हणून त्या गोळ्या फेकून देऊन बाटली खोबरेल तेल ठेवायला रिकामी केली. मला ज्वारीची भाकरी सोसत नसे. रोज पोट दुखे, करपट ढेकरा येत व जीव कासावीस होई. 'तोंड दाबून बुक्कीचा मार' अशी स्थिती झाली. दिल्लीला याबद्दल काही कळवताही येईना कारण परीक्षेच्या अभ्यासात मानसिक ताण नसावा असे वाटले.

आमच्या घरात एक वेळ पोळी व संध्याकाळी भाकरी असे. संध्याकाळी भाकरी खावी लागू नये म्हणून आमचे दिरोबा संध्याकाळी ज्या काही पोळ्या उरल्या असतील त्या खाऊन टाकीत. सर्वांची भाकरी चुकवण्याची धडपड असे.

कुलुपात ठेवलेले लाडू प्रत्येक जण कपाट उघडून खाई व शेवटी इतक्या लवकर कसे संपले ही विचारणा होताच कानावर हात ठेवीत. आपली परिस्थिती नीट नाही, यातून आपण बाहेर पडायला हवे अशी कोणालाच आच नव्हती. नाही म्हणायला माझ्या सासूबाई त्यांच्या परीने प्रयत्न करीत असत. शेंगांचे पोते घेऊन दाणे काढून विकत, तूर घेऊन भरडून तुरीची डाळ विकत. त्यातल्या चुरीची घरात आमटी होई. यावर सुद्धा मंडळी कटकट करीत.

याच वेळी संघावर बंदी घालण्यात आली व बऱ्याच जणांना तुरुंगात टाकण्यात आले होते. या वेळी आमचे दिरोबा म्हणाले, ''दादाला पकडले तर काय मजा येईल.'' मला इतका राग आला, मी म्हणाले, ''त्यांना जर पकडून नेले तर ते तुरुंगात जेवतील. मी बाळंतपणासाठी माहेरी चालले आहे तिथे मी जेवीन, पण मग तुमचा शंभर रुपये महिना बंद होईल मग तुम्ही काय जेवाल याचा आधी विचार करा.'' गावातले लोक यांना नावाजत त्यामुळे यांच्याबद्दल कृतज्ञतेची भावना निर्माण होण्याऐवजी हा असा विखार निर्माण झाला होता. हा आईला म्हणे, ''काकू, मला नोकरी लागून जाऊ दे. मग बघ.'' पण या सद्‌गृहस्थांना मॅट्रिक व्हायलाच वयाची २२ वर्षे उलटावी लागली व प्रत्यक्षात २८व्या वर्षी नोकरी लागल्यावर 'आई–वडील मला मेले' असे सांगून मोकळा झाला. माझ्या सासूबाई व सासरे यांच्याजवळ एकमेकांच्या कागाळ्या करून त्यांची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करीत. गावातील लोकांना मुलगा पैसे पाठवतो हे कळू नये असे त्यांना वाटे. सासऱ्यांना वाटे पैसे चेकने त्यांच्या खात्यात जमा व्हावेत तर

सासूबाईंना वाटे मनिऑर्डर माझ्या नावे यावी. काही झाले तरी लहान गावात गोष्टी लपून थोड्याच राहाणार होत्या.

इकडे हे असे तर दुसरीकडे घरात धड अंथरुण पांघरूण नाही. वयात आलेल्या नणंदेला साडीच्या आतला एकच परकर अशी काहीतरी विचित्र काटकसर. मी माझ्या साड्या व परकर या मुलीसाठी ठेवून माहेरी बाळंतपणासाठी गेले. यावेळी पण वडिलांना पत्र लिहून डोहाळजेवण होताच 'मला येऊन घेऊन जा' म्हणून पत्र लिहून टाकले.

आम्ही जरी पैसे पाठवत असलो व मोठा मुलगा असलो तरी कर्त्या मुलाचे किंवा कुटुंब प्रमुखाचे कोणतेच अधिकार आम्हाला नव्हते. सर्व गोष्टी माझ्या जबलपूरच्या नणंदेच्या सल्ल्याने होत असत. या वेळी माझ्या लक्षात आलेली आणखी एक गोष्ट म्हणजे माझा हा कमलाकर दीर पोटदुखीचे नाटक करून गणिताच्या पेपरला दांडी मारत असे. ही गोष्ट घरात कुणाच्याच लक्षात येत नव्हती का जाणून बुजून तिकडे दुर्लक्ष करीत असत कोण जाणे. व हा मुलगा मेकॅनिकल इंजीनिअर होण्याच्या बढाया मारीत असे.

त्या लोकांचे हाल होत होते याबद्दल कोणाचे दुमत नव्हते. प्रश्न इतकाच होता की या सगळ्याचे खापर आमच्यावर फोडले जात होते, ते मला आवडत नव्हते. माझे विवाहापूर्वीचे आयुष्य व विवाहानंतरचे आयुष्य यात जमीन अस्मानाचा फरक होता. त्यामुळे माझ्या त्या त्या व्यक्तीबद्दलच्या प्रतिक्रिया त्या त्या प्रसंगांपुरत्याच मर्यादित होत्या. कालांतराने विचार करता असे वाटते की त्यांची तरी काय चूक होती? त्यांनी जगरहाटीप्रमाणे आम्हाला मोजण्याचा प्रयत्न केला. चूक असली तर ती आमचीच होती. कारण आम्ही जनसामान्यांपेक्षा वेगळा विचार करीत होतो. अर्थात, याचं मोजमाप करायला ती मंडळी अपुरी पडली हे जरी खरे असले तरी त्यांना सर्वस्वी खलनायकी वृत्तीचे शिक्का मारणे योग्य नव्हे. त्यांची चूक एवढीच होती की या सर्वाला आम्ही जबाबदार आहोत असे ते समजत होते. वास्तविक आमची भूमिका त्यांना दु:ख देणाऱ्याची नसून त्यांचे दु:ख कमी करणाऱ्याची होती याचा त्यांना विसर पडत होता. माणूस नेहमीच स्वत:च्या चुकांचे खापर दुसऱ्याच्या डोक्यावर फोडण्याचा प्रयत्न करीत असतो. माझ्या सासऱ्यांना मुलाची कर्तव्ये तोंडपाठ होती तर दिराला वडिलांची कर्तव्ये तोंडपाठ होती. ''आम्ही मधूचे शिक्षण केले आता त्याने आमचे केलेच पाहिजे,'' अशीच काहीशी भूमिका होती. ''आम्ही तुझे केले पण तू मात्र तुझी जबाबदारी योग्य तऱ्हेने पार पाडीत नाहीस,'' असे भावनिक दडपण सतत यांच्यावर ठेवण्याचा

प्रयत्न होत असे. नियोजन व व्यवस्थापन यांचा पूर्णपणे अभाव होता. सासरे म्हणत, ''माझ्यापुरतं मी मिळवतो,'' सासूबाई म्हणत, ''माझ्यापुरते मी मिळवते.'' मला प्रश्न पडे फक्त स्वतःपुरते मिळवून यांची जबाबदारी संपत असेल तर इतरांसाठी आम्ही कसे जबाबदार असू शकतो? आम्ही पण अशी जबाबदारी झटकून मोकळे नाही का होऊ शकणार? पण आम्ही तसे करण्याचा विचार कधीच मनात आणला नाही. मला सासरच्या कुटुंबासाठी करावे लागत होते याचा कधीच राग आला नाही. पैसे पाठवण्यावरून आमच्यात कधीच भांडणे झाली नाहीत. मला आमच्या कुटुंबात एकजिनसीपणा नव्हता हेच खटकत होते. अर्थात या विस्कटलेपणाचा तोटा आमच्यापेक्षा त्यांनाच जास्त झाला. तरी या सगळ्यात आम्ही मात्र निष्कारण होरपळून निघत होतो. एका विचित्र प्रकारच्या दडपणाखालीच आमच्या वैवाहिक जीवनाची सुरूवात झाली होती.

माझ्या पत्राप्रमाणे डोहाळजेवण पार पडताच माझ्या मावसबहिणीचे यजमान मला घेऊन जाण्यासाठी आले. मी या वेळी साडी पसंत करतांना कमी किंमतीची साडी पसंत केली कारण याचे पैसे यांच्याकडूनच घेतले जातील ही खात्री होती. यावर ''तिचे डोळे लहानच आहेत,'' अशी टीकाही ऐकायला मिळाली, पण मी दुर्लक्ष केले.

दवाखान्यात नाव घालायला गेल्यावर माझी अवस्था बघून डॉक्टर वडिलांना म्हणाले, ''अहो दांडेकर! काय ही मुलीची दशा? मुलगी तुम्हाला जिवंत राहायला हवी का नको?'' इतकी मी अशक्त झाले होते. औषधे, टॉनिके व विश्रांती घेता आली पण अशक्तपणा व्हावा तसा कमी झाला नाही. पण बाळ चांगले पोसले गेले. १८ फेब्रुवारी, १९४९, या दिवशी मीना झाली. त्या अगोदर दोन-तीन दिवस ताप येत होता, तो पुढे सहा महिने टिकला. डॉक्टरांना क्षयाची शंका आली. रक्त, थुंकी मुंबईला तपासायला पाठवली, पण क्षय नव्हता. Vitality low झाल्याने ताप येत होता. औषधे, इंजेक्शने चालू होती. नखे भाजल्या चुन्यासारखी पांढरी फटक पडली होती. वजन ७२ पौंड. अंगावर दूध भरपूर येत असल्याने औषध इंजेक्शनांचा माझ्यापेक्षा बाळाला जास्त उपयोग होत होता. मीना गुटगुटीत व बाळसेदार होती. सरतेशेवटी डॉक्टरांनी अंगावरचे दूध बंद करण्याचा निर्णय घेतला. एक दिवस तोही प्रयोग झाला. पण ती बाटली तोंडात धरीना. दुपारी चार वाजेपर्यंत उपास घडल्यावर कसे तरी थोडे दूध प्यायली. मला रडू कोसळले. आपण आई आहोत की वैरीण असे वाटू लागले. त्याच वेळी वडिलांनी मुंबईहून First class चे भाडे देऊन रेळे वैद्यांना माझी प्रकृती पाहण्यासाठी बोलावले होते.

आईने यांना पण बोलावून घेण्याची सूचना केली, कारण त्यांना पण सत्य परिस्थितीची कल्पना यावी असे तिचे मत होते. वैद्यांनी यांच्या समोरच बाईंची गर्भारपणात प्रचंड आबाळ झाल्याबद्दल खरपूस समाचार घेतला व ''तुम्ही इतके दुर्लक्ष कसे केलेत,'' असा ठपका ठेवला. त्यांनी सांगितले, ''काळजी करू नका, मी या मुलीला नक्की बरे करीन. बाळाचे दूध तोडू नका, आई व मुलगी दोघींची ताटातूट करू नका.'' काढे, भस्मे, चूर्णे इत्यादी उपाययोजना सुरू झाली. आहारात भाज्यांचे सूप, फळे, दूध व जाईल तितके जेवण यावर विशेष भर होता. एक हापूसचा आंबा चिरून किंवा रस काढून नव्हे तर मऊ करून तोंडाने चोखून खावयास सांगितले होते. हळू हळू प्रकृती सुधारत होती. त्या वेळी आमची ग्रहदशा बहुधा फिरली असावी. एकामागून एक संकटे आली. यांना पहाडगंजच्या उतारावर ॲक्सिडेंट झाला. नशिबाने रस्त्याच्या बाजूला पडले. दुसऱ्या बाजूने आठ फूट खोल दरी होती. लगेच ती सायकल पण चोरीला गेली. परीक्षेत अपयश आले. ऑफिसच्या प्रमोशनच्या एकूण टक्केवारी चांगली असून Precis writing च्या पेपरमध्ये दोन मार्क पन्नासपेक्षा कमी असल्याने पुन्हा परीक्षा द्यावी लागणार होती. पण एकूण टक्केवारी उत्तम असल्याने लगेच पुढच्या वर्षी परीक्षेला बसण्याची परवानगी मिळणार होती ही त्यातल्या त्यात जमेची गोष्ट होती. या परीक्षेचा निकाल दोन किंवा तीन टक्के लागत असे. त्यामुळे आत्तापर्यंत मिळणारा supervisory allowance बंद झाला व जबाबदारी वाढली. रु. १७५/ – कर्ज काढून नवी सायकल घेतली. त्याचाही हप्ता भरावा लागे. माझ्या दुखण्यापोटी आईवडिलांना होणारा खर्च मी पाहात होते. यातला थोडा तरी भार यांनी उचलावा असे वाटे पण ही सर्व परिस्थिती पाहता ते शक्य नाही हेही कळत होते. चि. मीनाचे सर्व milestones उत्तम होते. आम्ही कोणीच भावंडे पालथे पडलो नाही. मीना पावणे तीन महिन्यांची असतांनाच पालथी वळू लागली त्यामुळे आईला तिचे फार कौतुक वाटे. आमच्या शेजारच्या बंगल्यात कुटप्पा नावाचे ख्रिश्चन कुटुंब राहात होते. त्यांनी कोंबड्या पाळल्या होत्या. तिला व्हरांड्यात ठेवून आई जोंधळे टाकी ते टिपायला कोंबड्या येत. त्यांना बघून ती आनंदाने हातपाय हलवी. ते बघायला मोठी मजा वाटे.

एक दिवस ती अशीच व्हरांड्यात खेळत होती. मी जवळच झोपाळ्यावर बसले होते. माझे वडील Establishment Section ला असून पैसे खात नसत. डाह्याभाई नावाच्या एका गृहस्थांची पत्नी क्षयाने आजारी होती व सुरतेच्या रेल्वे हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होती. सदर गृहस्थांचे पोस्टिंग दोहदला असल्याने

जा–ये करणे अवघड पडत होते म्हणून त्यांनी सुरतेजवळ पोस्टिंग मिळावे असा अर्ज केला होता. त्याप्रमाणे त्यांचे पोस्टिंग केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायला ते आले असता परत जाताना खेळणाऱ्या मीनाच्या हातात 'ले बेबी' असे म्हणत त्यांनी एक नोट घातली. दहाची नोट असावी असे वाटून मी ती घेतली तर ती नोट शंभराची असल्याने माझीच घाबरगुंडी उडाली. वडील आता आपल्याला ती घेतल्याबद्दल खूप रागावणार असे वाटले. मी घाईघाईने ती नोट त्यांना नेऊन दिली. ती घेऊन वडीलही लगेच स्टेशनवर गेले. आमचे क्वार्टर स्टेशनजवळच होते. पण डाह्याभाईंनी पैसे परत घेण्यास नकार दिला. म्हणाले, ''तुम्ही काही घेत नाही हे मला माहीत आहे, पण मुलीच्या हातात दिलेले पैसे मी परत घेणार नाही. माझ्या मुलांची मुलं नाहीत. तुमची मुलगी खेळतांना दिसली, आवडली. मला एवढं तरी करू द्या. तुम्ही माझ्यासाठी जे केलं आहे, ते मी आयुष्यभर लक्षात ठेवीन, पण पैसे परत घेणार नाही.'' आई म्हणाली, नाही तरी आपण बाळाला सोने दिलेले नाही. या पैशांचे तोळाभर सोने घेऊन तिला साखळी करू.'' याला मात्र मी नकार दिला कारण माझ्या दुखण्यावर होणारा खर्च मी पाहात होते व त्याला आपण काहीच हातभार लावू शकत नाही हेही कळत होते. जवळ जवळ ६/८ महिने मी आई वडिलांकडे होते. पाऊस पडल्यानंतर टेंपरेचर नॉर्मल राहू लागले. या काळात घडलेली एक गोष्ट मला कधीच विसरता येणार नाही. एका पहाटे मी मीनाला प्यायला घेतले असताना मला माझ्या पाठीमागून दोन हात आलेले दिसले. त्या हातात गोठ, पाटल्या व राजवर्खी बांगड्या होत्या. व त्या स्त्रीच्या हातावरच्या पदरामुळे ती इरकली लुगडे नेसली असावी असे वाटले. मी जोराने म्हणाले, ''अहो बाई हात नका लावू तिला,'' त्यावर ती व्यक्ती उत्तरली, ''काही करीत नाही गं, नुसते बघते.'' आईला माझा आवाज ऐकू आला म्हणून ती उठून आली व विचारले ''काय झाले गं?'' मी मला झालेला भास सांगितल्यावर म्हणाली ''तुझी सासू नात बघायला आली असेल. आपण बारशाला त्यांच्या नावाची ओटी भरणारच आहोत. तू काळजी करू नकोस.'' मला आश्चर्य या गोष्टीचे वाटले की माझ्या सख्ख्या सासूबद्दल मी काहीच ऐकले नव्हते. त्यांच्या माहेरची मंडळी अथवा माझी मोठी नणंद यांच्या कोणाशीच माझे काही बोलणे झाले नव्हते. लग्नानंतर दोन तीन दिवसातच आम्ही पुणे सोडले होते व यांना तर त्यांची आई आठवतच नव्हती. सासरी पण त्यांचा विषय कधी निघाला नव्हता. पुढे चौकशी केल्यावर कळले की त्या नेहमी इरकली टोपपदरी लुगडे नेसत, राजवर्खी बांगड्या घालीत व सोन्याच्या बांगड्या घालीत

नसत. या घटनेचे कुतुहल आजही माझ्या मनात घर करून आहे. खरंच माणसाचा आत्मा अमर असू शकतो का, असा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाही.

बारशाला कोणीच आले नाही व ''आम्हाला नात बघायची आहे तर तुम्ही तिला इकडेच पोचते करावे,'' असे पत्र वऱ्हाडातून आले. या गोष्टीचा वडिलांना अतिशय राग आला व त्यांनी अत्यंत कडक शब्दात पत्र लिहिले, पण आईने त्यांना तोच मजकूर सौम्य भाषेत लिहावयास भाग पाडले. सासरी पत्र न लिहिता त्यांनी यांना पत्र लिहून कळवले की, ''जर तुमच्या बायकोने वऱ्हाडात जावे असे वाटत असेल तर तुम्ही स्वत: येऊन तिला घेऊन जावे. दिल्लीला यावे असे वाटत असेल तर मी तिला कोट्यापर्यंत घेऊन येतो तुम्ही तिथे येऊन तिला घेऊन जावे. माझ्या मुलीची तुमच्या वडिलांच्या घरी झालेली हेळसांड मला आवडलेली नाही. तिचा जवळजवळ पुनर्जन्म झालेला आहे. ती आत्ता कुठे बरी होते आहे. शिवाय तुम्ही दोघे जवळ जवळ दहा महिने एकमेकांपासून दूर आहात हाही विचार करायला हवा. तरी काय ते कळवावे.'' यांनी ''मी तिला न्यावयास कोट्याला कधी येऊ ते कळवावे,'' असे लिहिले व मी ऑगस्टमध्ये परत दिल्लीला गेले.

माझ्या आईला सासरच्यांना राग येईल अशी भीती वाटत होती. तेव्हा वडील आईला म्हणाले, हे बघ, ''चुलीतले लाकूड चुलीतच जळले पाहिजे या वृत्तीचा मी नाही. जगात कन्यादान हे एकच दान असे आहे की देणारास ते दिल्यानंतर 'इदं न मम' असे म्हणत नाही. माझ्या मुलीच्या भल्याबुऱ्याची काळजी मला आहे हे कळू दे तिच्या सासरच्यांना.'' आई म्हणाली, ''पण याची शिक्षा जावयाला कशाला देता? आपल्या मुलीने त्याला त्रास होतो हे कळवलेच नाही तर तो तरी काय करील? म्हणूनच रेळे वैद्य आले तेव्हा मी त्यांना बोलावून घ्या असे सांगितले होते.''

चि. मीनाच्या बाललीलांमध्ये वेळ मजेत जाई. गेल्या दहा महिन्यात बरेच पाणी पुलाखालून गेले होते. कुलकर्णी बदलून परत पुण्याला गेले होते. त्यांच्या जागेत टेंभुर्णीकर म्हणून नवीन कुटुंब राहावयास आले होते. या बाईंना पण दोन मुली होत्या. त्यांना बिल्डिंगमधल्या माझ्या व मिसेस कुलकर्णींच्या खेळीमेळीच्या संबंधाची कल्पना दिल्यावर या बाईला वाटले की ते Accountant असल्यामुळे मी त्यांची मर्जी सांभाळत असेन व त्यांनी पण तशाच प्रकारच्या अपेक्षेने माझ्याकडे पाहायला सुरवात केली. बाई अतिशय अजागळ, उठवळ व अहंमन्य होती. आता मी पूर्वीसारखी रिकामी राहिले नव्हते. माझे मला उद्योग होतेच. त्यातच शेजारी सहस्रबुद्धे म्हणून नवीन बिऱ्हाड आले होते. त्यांची व माझी विशेष दोस्ती झाली. शेजारच्या बिल्डिंगमध्ये राहणारे पाठक इंजिनिअर, वाळिंबे यांच्या मुलांचा मी अभ्यास घेत असे. कोणाला

स्वेटर विणून दे, ब्लाऊज शिवून दे असेही मी करी. पण या सगळ्यांचे आपण पैसे घ्यावे असा विचार कधीच मनात आला नाही. ही टेंभुर्णीकर बाई स्वत: नॉन–मॅट्रिक असून मी मॅट्रिक आहे असा डौल मिरवी. ''कुणास ठाऊक ही बाई खरंच इंटर आहे का थापा मारते,'' असे म्हणाली म्हणून मी मुद्दाम माझी सर्टिफिकीटे वडिलांकडून मागवून घेतली. दर बुधवारी मी महिला मंडळात जाई, त्यामुळे हे घरी येत तेव्हा मी घरी नसे यावर टीका टिप्पणी चाले. सुनंदा सहस्रबुद्धे, शकुंतला आचार्य व इंदुमती द्रविड अशा नवीन मैत्रिणी मिळाल्या. सुनंदा माहेरुन C.K.P. असल्याने तिच्याकडून रुमाली वड्या, कडक बुंदीचे लाडू, खाज्याच्या करंज्या, मोड आलेल्या कडधान्यांच्या उसळीचे विविध प्रकार शिकायला मिळाले. इंदुताईकडून कच्छी टाके, लोकरीच्या फुलांचे जाकीट वगैरे गोष्टी शिकले. आचार्य बाईंनी हलव्याचे दागिने करायला शिकवले. आमचे एकमेकींना शिकणे शिकवणे चालू असे. महिला मंडळाच्या नाटकात काम केले त्या वेळी मी तालमीला गेल्यावर सुनंदाने चि. मीनाला सांभाळले. तिचा मुलगा निनाद दोन अडीच वर्षांचा होता. दोघांची छान दोस्ती जमली होती. सहस्रबुद्धे आर्किटेक्ट होते. आमची घरमालकीण माझ्या व सुनंदाच्या स्वच्छतेची प्रशंसा करून टेंभुर्णीकर बाईंना त्यांच्या अस्वच्छतेबद्दल बोलत असे त्याचा पण त्यांना राग येई. म्हणत, ''कारकुंड्याची बायको आहे पण मिजास किती?'' आम्ही आपापसात या सगळ्या गोष्टी सांगून खूप हसत असू.

आचार्य बाईंची मुलगी मोठी धीट व चिमखडी होती. आम्ही सर्व मिळून एक प्रदर्शन बघायला गेलो होतो. ती गर्दीत चुकली पण न घाबरता माईकपाशी जाऊन सांगितले की मी चुकले आहे. जाहीर करा की कुमुद विठ्ठल आचार्य माईकपाशी आहे. आमची मात्र थोडा वेळ खूप तारांबळ उडाली होती.

या काळातली आणखी एक मजेशीर आठवण. इंदूताई द्रविडांच्या शेजारी बधिरे व कानविंदे राहात असत. श्रीमती कानविंदे व हेमू अधिकारीची बायको बहिणी–बहिणी होत्या. एका स्वेटरवर त्यांनी ऑस्ट्रेलियातून आणलेल्या पुस्तकावरून जुळ्या पानाची वीण घातली होती. मी त्यांच्याकडे ती वीण लिहून घेण्यासाठी पुस्तक मागितले तर त्यांनी नकार दिला. त्यांची मुलगी मी द्रविडांकडे गेलेली असताना मीनाला खेळवायला व तिच्याशी खेळायला आली त्या वेळी तिच्या अंगात ते स्वेटर होते. उकडू लागले म्हणून तिने स्वेटर काढून ठेवले होते. मी ते स्वेटर घेऊन वीण काढून घेतली. दुसऱ्या वेळी द्रविडांकडे गेले असता त्याच विणीचा स्वेटर मीनाच्या अंगात पाहून त्या चाटच पडल्या. पुढच्या आयुष्यात पण अशाच जपानमधून व अमेरिकेतून आणलेल्या स्वेटर्सच्या विणी मी काढल्या

होत्या. लोकरीचे व क्रोशाचे विणलेले नमुने बघून मला त्या गोष्टी कशा केल्या असतील याची कल्पना येत असे. आता मात्र मी हे सगळे साफ विसरले आहे. मीच विणलेली पोतीची बांगडी कशी विणली हे प्रयत्न करूनही आठवत नाही. ती मला कोणी, केव्हा शिकवली सगळे लक्षात आहे पण कशी विणायची हे मात्र आठवत नाही.

डिसेंबरमध्ये यांना पुन्हा अभ्यासासाठी सुट्टी मिळाली. आमच्याकडे एकच खोली होती. माझ्यामुळे व मीनामुळे अभ्यासात व्यत्यय येऊ नये म्हणून मी रोज अकरा ते पाच या वेळात मीनाला घेऊन आचार्यांकडे जाई. आम्ही दोघींनी मिळून साळीच्या, जोंधळ्याच्या व मक्याच्या लाह्या, मसाल्यातील बाद्यान, वेलदोडे, चारोळ्या, डाळे, भोपळ्याच्या बिया, बदामाची शकले वगैरे गोष्टींवर पाक चढवून हलवा केला व त्यापासून पुष्पगुच्छ, अननस, सिताफळ, फणस वगैरे गोष्टी तयार करून प्रदर्शनात ठेवल्या व पहिले बक्षीस मिळवले. हलव्याचे दागिने करून मीनाचा वाढदिवस व संक्रांत सण साजरा केला.

असे सगळे जरी असले तरी आर्थिक दृष्टीने हे आठ–दहा महिने फार त्रासाचे गेले. मावस भावाचे कर्ज फिटले होते ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट होती. परीक्षेतील अपयशामुळे मिळणारा supervisory allowance बंद झाला होता. एका मुलीची जबाबदारी वाढली होती व घरचे पैसे कमी केले नव्हते. त्यामुळे फार ओढाताण होई. आम्हा दोघांचे कपडे करायला झाले होते. पण हाताला सवड मिळत नव्हती. हळूहळू उन्हाळा जाणवू लागला होता. दिल्लीसारख्या ठिकाणी आमच्याकडे पंखा नव्हता. आमचे ठीक होते पण त्या बालजीवाची होणारी तगमग बघवत नव्हती. उन्हाळा टाळण्यासाठी तिला घेऊन आईकडे जावे म्हटले तर मी वर्षघडीच्या साडीचे दोन तुकडे करून नेसत होते व हे फाटके शर्ट दिसू नयेत म्हणून भर उन्हाळ्यात गरम कोट घालून ऑफीसला जात होते. त्यातच जवळ जवळ सात वर्षांनी menopause मुळे आईची पाळी अनियमित झाल्याने safe period चे बारा वाजले होते व मला १ एप्रिल, १९५० रोजी एक भाऊ झाला होता. आईची प्रकृती क्षीण झाल्याने भेटून जा असे वडिलांचे पत्र आल्याने बेचैनी वाढली. काय करावे सुचेना. दिल्ली बलसाड गाडीभाडे कुठून आणावे, कपड्यांची अडचण कशी सोडवावी कळेना.

या वेळी आमच्या मदतीसाठी माझी बहीण धावून आली. वडिलांची बलसाडला बदली झाली, त्या वेळी तिचे कॉलेजचे एक वर्ष झाले होते. तिने बाहेरून इंटरला बसावे असे ठरले. मुलींना फी नसे हे जरी खरे असले तरी आपल्या राहण्या जेवण्याचा खर्च काकांवर पडू नये व कोट्यात राहून मैत्रिणीच्या नोट्स वाचून परीक्षेला

बसता यावे म्हणून वडिलांनी तिला त्याच वर्षी रेल्वेच्या शाळेत vacancy होती त्यात शिवण शिक्षिका म्हणून नोकरीस लावले होते. तिला रेल्वे पास व privilege ticket order मुळे दर दोन–तीन महिन्यांनी दिल्लीला येणे जमत असे. त्या वेळी तिने आमची ही परिस्थिती कळल्यावर शंभर रुपये दिले. त्यातून आम्ही दोघांनी कपडे केले व मी एक दोन महिन्यांसाठी आईच्या मदतीला बलसाडला जावे असे ठरले. परीक्षा संपून सुट्टी लागली की बहीण येणार होती. सांगायची गोष्ट अशी की हे पैसे परत करायच्या वेळेपर्यंत तिचे लग्न झाले होते. त्यामुळे तिने हे पैसे वडिलांना दे असे सांगितले व वडील म्हणाले, ''हे पैसे तिने तिच्या पगारातून दिलेले असल्याने मला नकोत.'' आयुष्याच्या अखेरपर्यंत हे कर्ज डोक्यावर घेऊनच मला जगावे लागणार आहे.

या सगळ्या गोष्टी इतक्या विस्ताराने लिहिण्याचे एकच कारण आहे म्हणजे यातून आमच्या आई–वडिलांनी आमच्यावर कसे आणि किती उदात्त संस्कार केले होते याची जाणीव पुढच्या पिढीला व्हावी. बहीण चांगल्या मार्कांनी इंटरची परीक्षा पास झाली. मी मेच्या पहिल्या आठवड्यात बलसाडला आले. आई खूपच अशक्त झाली होती. भाऊ पण फार अशक्त होता. डॉक्टरांच्या सल्ल्याने मी त्याला अंगावर पाजायचे ठरवले. मीना आता जवळ जवळ दीड वर्षांची झाल्याने तिला सोडवायला हरकत नाही असे डॉक्टरांचे मत पडले. महिन्याभरात दोघांची प्रकृती सुधारली. आपण आपल्या आई–वडिलांच्या उपयोगी पडू शकलो या कल्पनेने मनाला फार आनंद वाटला. मी या भावाला माझ्या बरोबर घेऊन जाण्याची इच्छा दर्शवली, कारण त्यामुळे आईला पूर्ण विश्रांती मिळेल असे मला वाटले. पण आई–वडिलांनी सपशेल नकार दिला. ते म्हणाले, ''तुझा हेतू जरी चांगला असला तरी लोक त्यातून नको ते अर्थ काढून आम्हाला नावे ठेवतील. आमचे मूल आम्हालाच सांभाळू दे.'' मी म्हणाले, ''मी त्याला कायमचे नेत नाही आहे. शिवाय त्याचा खर्च तुम्ही मला द्या, जरा मोठा झाला की परत तुमच्याकडे आणून सोडीन.'' वडील म्हणाले, ''बेटा, जगात नुसते चांगले असून भागत नाही चांगले दिसावे पण लागते. आता दोघांची प्रकृती सुधारते आहे, त्याला पण गाईचे दूध पचू लागले आहे. तू काळजी करू नकोस.''

जूनमध्ये माझी नणंद तिच्या तीन मुलांना घेऊन माहेरी आली होती म्हणून मी पण आता नात दाखवायला वऱ्हाडात जायचे ठरवले. वडील माझ्याबरोबर भुसावळपर्यंत आले व मला भुसावळला गाडीत बसवून परत गेले. गाडीने वरणगाव सोडताच उन्हाची झळ लागून मीनाला ताप भरू लागला. दुपारी साडेबारा वाजता

मूर्तिजापूरला उतरून मूर्तिजापूर–एलिचपूरच्या नॅरोगेज रेल्वेत जाऊन बसले. गाडी कापूसतळणीला पोहोचेपर्यंत ताप इतका वाढला की तिने डोळे फिरवले. मी पदर पाण्यात भिजवून डोक्यावर ठेवत होते पण उपयोग होत नव्हता. सुदैवाने शेजारी बसलेल्या हळदणकर नावाच्या बाई अमरावतीच्या सरकारी दवाखान्यात डॉक्टर होत्या. त्यांनी ताबडतोब त्यांच्याजवळचा टॉवेल पाण्यात भिजवून मीनाला त्यात गुंडाळले तोपर्यंत गाडी अंजनगावला आली होती. पाऊस पडला व वातावरण थंड झाल्याने ताप पण उतरला. उन्हाची झळ तिला सहन झाली नाही. त्या डॉक्टर बाईंना घरी बोलावून कृतज्ञता व्यक्त करावी असे मला फार वाटत होते पण घरात कोणीच पुढाकार घेईना.

१६ सप्टेंबर, १९४७ ते ११ जानेवारी, १९५०, या कालावधीत माझ्या नणंदेला तीन मुले झाली होती. मी जाताच मोठी भाची माझ्या मांडीवर येऊन बसली व मला म्हणाली, ''मामी गं, मी नकता वला आहे.'' माझ्या सर्व नणंदांच्या मुलांचे माझ्यावर अजूनही फार प्रेम आहे.

ही माझी नणंद देखणी असून अत्यंत बुद्धिमान होती. ही जर मुलगा असती तर आमचे दिवस केव्हाच पालटले असते. केवळ परिस्थिती म्हणून तिला स्वत:पेक्षा १३ वर्षांनी जास्त वयाच्या माणसाशी लग्न करावे लागले होते. तिने आई–वडिलांना व भावंडांना बरीच मदत केली. या बहीण–भावंडांचे पण एकमेकांवर फार प्रेम होते. त्यांना हे स्थळ या अंतरामुळे फारसे पसंत नव्हते, पण थोरल्या चुलत्यांपुढे यांचे काही चालले नाही. त्या लग्नाची पण एक मजेदार कहाणी आहे. डॉक्टर फडणीस हे माझ्या चुलत जावेचे मामा लागत होते. बरीच मंडळी युद्धावर गेलेली परत आली त्यातले ते एक होते. ते त्यांच्या बहिणीकडे पुण्याला आले असताना माझी जाऊ त्यांना भेटायला गेली होती. तिथे एक वाईकर नावाच्या बाई आलेल्या होत्या. त्यांना म्हणे अंतर्ज्ञान होते. नमस्कार केल्यावर त्या डॉक्टरांना म्हणाल्या, ''उद्या तुला जी मुलगी सांगून येईल तिला तू हो म्हण. तुझा भविष्यकाळ फार उज्वल आहे.'' ही गोष्ट जावेने घरी येऊन सांगितल्यावर यांच्या चुलत्यांनी या संधीचा फायदा घेऊन हे लग्न ठरवून टाकले. वय एवढी एक गोष्ट सोडली तर डॉक्टर काका एक फार चांगला माणूस होते. ते उत्तम चित्रे काढीत, बासरी वाजवीत. महायुद्धात जपान्यांच्या कैदेत असताना त्यांनी तांदुळाच्या धुवणापासून नाना युक्त्या लढवून ''व्हिटॅमिन बी'' चे इंजेक्शन तयार केले व दोनशे–अडीचशे युद्ध कैद्यांना बेरी–बेरी रोगापासून मुक्त केले होते. यापैकी एक कैदी माझ्या दुसऱ्या चुलत जावेचा भाऊच होता. त्याच्याकडून ही हकीगत ऐकल्यावर मी ही

सत्यकथा टेलिव्हिजनवर आणण्याचा खूप प्रयत्न केला, पण यश आले नाही. त्यांच्यावर आझाद हिंद सेनेला सामील झाल्याचा आरोप पण करण्यात आला होता व सहा महिने कैदसुद्धा भोगावी लागली. 'धोबीका कुत्ता न घरका न घाटका' अशी त्यांची परिस्थिती झाली. स्वातंत्र्यानंतर त्यांच्यावरचे आरोप मागे घेतले गेले व पोस्ट अँड टेलिग्राफ डिपार्टमेंटमध्ये ते मेडिकल ऑफीसर म्हणून नोकरी करू लागले. ते व त्यांचे बंधू एकत्र राहत असत. हे बंधू विधुर असून त्यांना एक मुलगा होता व ते स्वत: एका ट्रान्सपोर्ट कंपनीत मॅनेजर म्हणून काम करीत. डॉक्टर काकांच्या आईपण त्यांच्याकडेच असत व त्यांना वयोमानामुळे अंधत्व आले होते. ही माझी नणंद चार मुले झाल्यावर Inter Science, M.B.B.S., व M.D. झाली. Medical College मध्ये Reader म्हणून नोकरीला लागली.

यावेळी आमच्या कमलाकरने तोडलेले अकलेचे तारे म्हणजे, ''दादाने नापास होऊन तात्यांच्या तोंडाला काळिमा फासला.'' आमच्याकडे दोन म्हशी होत्या. काही रतीबही माझा दीर घालत असे. पण घरात चार मुले असताना उरलेले दूध हा परस्पर विकून टाकीत असे. याबद्दल घरात कोणीच कसे त्याला बोलत नसत, माहीत नाही. शेवटी मी एक milk powder चा डबा आणला व चि. मीनाला व इतर भाचरांना दूध द्यावयास सुरुवात केली. पुढे ज्या गोष्टी कानावर आल्या त्यावरून असेही कळले की म्हशीसाठी गवत विकत घेतेवेळी गवतवाल्या बायकांशी असभ्य वर्तन केल्यामुळे त्याला चपला खाव्या लागत्या होत्या. पण यातले आमच्यापर्यंत कोणी येऊ देत नसत.

या मुक्कामात एक दिवशी सकाळी मला एक गमतीदार स्वप्न पडले. स्वप्नात यांचे लग्न दिसले. समारंभाची मालकीण मी होते. माझ्या हातात शिंदेशाही तोडे व बनारसी शालू होता. या दोन्ही गोष्टी नव्या नवरीला घालण्यासाठी मी मांडवाकडे निघाले होते. इतक्यात मला काय वाटले कुणास ठाऊक, कदाचित मला जाग येत असावी. मी आईला विचारले, ''आई, माझे लग्न मुंबई प्रांतात झाले ना गं! मला पोलिसात तक्रार करायला हवी. हे दुसरे लग्न करताहेत.'' त्या वेळी महाराष्ट्रात द्विभार्या प्रतिबंधक कायदा होता. चहा पितांना मी हे स्वप्न सगळ्यांना सांगितले. आम्ही खूप हसलो व मी तांदूळ कांडायला घेतले. इतक्यात हे परीक्षा पास झाल्याची यांच्या मित्राने केलेली तार आली. मामंजी आत येत येत म्हणाले, ''अकौंटंटीणबाई उठा, तुमचा नवरा परीक्षा पास झालाय.'' यांनी पत्र लिहिले होते, पण मित्र म्हणाला तू वहिनींना तार करणार नसलास, तरी मी करणार आहे. इतकी यांची स्वत:च्या बाबतीत काटकसर असे. दुपारी पत्र पण पोहोचले. यांना

मीरत किंवा पुणे असा पर्याय दिला होता. मी लिहिले की मुलगी लहान आहे तोवर फिरून येऊ. कानपूर-लखनौ बघून येऊ. पण शेवटी पुण्याचेच पोस्टिंग आले. या ग्रेडची सुरुवात रु. २५०/- ने असणार होती. सर्वांना खूप आनंद झाला. सासूबाईंनी चि. मीनाला सोन्याची एक तोळ्याची साखळी करून घातली, मला रु. १७/- किंमतीची साडी घेतली. त्यासाठी त्यांनी मामंजींकडे पैसे मागितले असणार व त्यांनी ते पैसे यांच्याकडून मागून त्यांना दिले. त्या मंडळींची चणचण कळत होती मला. पण ही अशी लपवालपवी कशाला? मी मला साडी घेतली नाही म्हणून रागावणार का होते? आपणच आपल्याला ओवाळून घेण्यासारखे नव्हते का हे? ही मंडळी मला त्यांच्यापासून वेगळी का मानतात, त्यांच्यापैकीच मी एक आहे असे का समजत नाहीत हेच माझे खरे दुःख होते. 'एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ', असे का समजत नाहीत ही खरी वेदना होती. माझ्याकडून मी माझे वागणे पारदर्शक ठेवण्याचा प्रयत्न करीत होते पण त्याला साद मिळत नव्हती. वेळप्रसंगी मी मला आलेल्या भाऊबीजेच्या पैशातून यांच्या बहिणींना भाऊबीज पाठवलेली होती. त्यावेळचा एक प्रसंग आठवला की अजून गंमत वाटते. मी मनिऑर्डर करून परत निघाले. इतक्यात कोणीतरी माझा पाठलाग करीत आहे असे वाटले. मागे वळून त्याला खडसावण्यासाठी तोंड उघडणार तोच त्याने हात पुढे केला, त्यात मी मोड घ्यायची विसरलेले पैसे होते. बिचारा त्यासाठी माझ्यामागे धावत आला होता.

आम्ही दोघे परत बलसाडला आलो. आईने यांना दोन शर्ट पीस, मला दोन बेडशीट्स देऊन आनंद साजरा केला. ही परीक्षा म्हणजे हे आज ना उद्या नक्कीच राजपत्रित अधिकारी होणार असल्याची नांदी होती. यांचे पोस्टिंग पण महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या A.N. सेक्शनला झाले होते. प्रगतीचा एक टप्पा पार पडला होता. मी काही दिवस बलसाडला राहून जागा मिळाल्यावर पुण्याला जाणार होते. यावेळी मी माझ्या मनाशी आणखी एक निर्णय घेतला तो हा की जोपर्यंत भाड्याचा खर्च करूनसुद्धा आपल्या राहण्याच्या खर्चापोटी आपण जास्त पैसे घरात देऊ शकत नाही तोपर्यंत घरी जायचे नाही, कारण सगळी सोंगे आणता येतात पण पैशाचे सोंग आणता येत नाही.

❍❍❍

# ८. आम्ही पुणेकर झालो

पुण्याला आम्ही सोमवार पेठेत सिन्नरच्या काळे वकिलांच्या वाड्यात दोन खोल्यांची जागा भाड्याने घेतली. भाडे दरमहा रु. ४०/- होते. मूळ बिल्डिंगच्या मागे आऊटहाऊससारख्या या चार खोल्यात दोन बिऱ्हाडे होती. शेजारी आगाशे नावाचे कुटुंब होते. त्यांचा मुलगा पण चि. मीनाच्या वयाचा होता. दोघे छान खेळत. समोर २० x २० चे भले मोठे फरशीचे अंगण होते. वर नुकतीच लग्न झालेली मालकांची सून होती. आमची तिघींची छान गट्टी जमली होती. आमच्या घरासमोर एक नंद म्हणून शिंपी राहात होते. युद्ध संपल्यामुळे त्यांच्याकडचे मिलिटरीचे कंत्राट बंद होते. त्यांनी जोड मिळकतीसाठी एक शिवण क्लास सुरू केला होता. फी दरमहा रु. तीन व एक रुपया प्रवेश फी. मी पाच महिने त्या क्लासला जात होते. फक्त सोळा रुपयांमध्ये मी पाच महिन्यात शर्ट, पायजमा, बुशकोट व पँटपर्यंतचे शिवण शिकले. या काळात चि. मीनाला आंघोळ, जेवण करून झोपवून क्लासला जात असे. शेजारी आगाशे बाईंकडे किल्ली दिलेली असे. पण चि. मीनाचे जेवणे, झोपणे इतके नियमित होते की या सहा महिन्यात ती एकदाही मी येण्याअगोदर उठली नाही. याच वेळी माझ्या नणंदेला स्थळे पाहण्यासाठी पुण्याला आणावे असे ठरले. ही माझी नणंद रंगाने गोरी असली तरी चेहऱ्यावर देवीचे वण होते व त्यातच डोळ्यांवर परिणाम झाल्याने जाड भिंगांचा चष्मा होता. त्या वेळेपर्यंत तरी लग्नाच्या बाजारात मुलीचे रूप व बापाची सांपत्तिक स्थिती याच दोन गोष्टींचा प्रामुख्याने विचार केला जाई. तिचे दातही किंचित पुढे होते. यावरून एका गोष्टीची अजूनही आठवण झाली की हसू येते. एक दिवस आपल्या अपेक्षा सांगताना हे म्हणाले होते, ''मला दात पुढे असलेली अथवा तिरळ्या डोळ्यांची मुलगी नको होती.'' त्यावर मुलींनी यांची खूप चेष्टा केली व म्हणाल्या ''दादा, हेच जर स्टँडर्ड धरले तर तुम्हाला आई म्हणजे अप्सराच मिळाली.'' माझे शिवण बघून नंद सरांनी माझ्यापुढे एक प्रस्ताव ठेवला. म्हणाले, ''माझ्याकडे ज्या वेळी जास्त शिवण येईल त्या वेळी तुम्ही मला मदत कराल का? दर्शनी भाग

मी शिवत जाईन व आतल्या भागाचे शिवण करायचे तुम्ही मान्य केले तर एक तृतीयांश शिवणावळ तुम्हाला देत जाईन. यासाठी शिवण मशीन घेणे आवश्यक होते. मला पाय मशीन घ्यावयाचे होते. हात मशीन वापरायची मला सवय होतीच पण पाय मशीनमुळे दोन्ही हात मोकळे मिळत. मी हप्त्यावर मशीन घ्यायचा विचार करू लागले. या वेळेपर्यंत माझी बहीण कोट्याची नोकरी सोडून बलसाडला आली होती. तिच्यासाठी पण स्थळे पाहावयाची होती. पुण्याला राहिल्यासारखे तिने S.T.C. ला नाव घालावे असे वडिलांचे मत होते व त्याबद्दल विचारणा करणारे पत्र लिहिले. ''तिच्यासाठी मी तुला दरमहा रु. २५/– पाठवत जाईन,'' असे सांगितले. या संधीचा फायदा घेऊन मी वडिलांना ''आगाऊ रु. ३००/– देऊ शकाल का,'' असे विचारले. त्यांचा होकार आल्यावर रु. २९७/– चे उषा कंपनीचे Tailor Model मशीन विकत घेतले व शिवण शिवून यांना मी तुम्हाला दरमहा रु. २५/– मिळवून देईन असे सांगितले. त्याचबरोबर वन्संचे नाव पण S.T.C. ला घालूया असे विचारल्यावर म्हणाले, ''दोन्ही कुटुंबांचा खर्च भागवून मी तिला शिकवू शकेन असे मला वाटत नाही,'' त्यावर मी त्यांना सांगितले ''आपण तिच्यासाठी प्रयत्न करतो आहोत पण ती कुठेच पसंत पडत नाहीये. जर हिचे लग्न झाले नाही तर तिने भावजयांची मुले सांभाळत जन्म काढायचा का? S.T.C. झाली तर स्वत: मिळवून मानाने जगू शकेल ती. मी तिची फी माझ्या शिवणाच्या मिळणाऱ्या पैशातून भरीन, मग तर झाले?'' यासाठी नंद सरांच्या ओळखीने मी एका कपड्यांच्या दुकानाकडे गाऊन्स व परकर शिवून देण्याचे काम मिळवले. महिन्याला आरामात चाळीस पन्नास रुपये मिळू लागले. यावेळी पण मला मनुष्य स्वभावाचे वेगवेगळे नमुने बघावयास मिळाले. यांचे मामा म्हणाले, ''काही मशीन घ्यायच्या भानगडीत पडू नकोस. बायका हट्ट करतात पण पुढे काही करीत नाहीत. उगीच पैसे वाया घालवू नकोस.'' शेवटी २८ फेब्रुवारी, १९५१ रोजी उषा मशीन घरात आले. वैवाहिक आयुष्यातली ही आमची दुसरी मोठी खरेदी. पहिली खरेदी सायकलची. पुढे माझ्या नणंदेला एक शिकवणी मिळाली. त्या शिकवणीच्या पैशातले तीस रुपये भर घालून मी बंब खरेदी केला. ही बातमी माझ्या जबलपूरच्या नणंदेपर्यंत कशी पोचली माहीत नाही, पण मला प्रेमीचे पैसे बंब घेण्यासाठी वापरल्याबद्दल जाब मागणारे पत्र आले. त्या वेळी मला फार वाईट वाटले व मी तरी शिवण शिवून तिची फी का भरली असा माझा मलाच प्रश्न पडला.

याच आठवणीशी जोडलेली एक अतिशय सुंदर आठवण पण आहे. वडिलांना

१९५० किंवा १९५१ च्या दिवाळीत प्रमोशन मिळाले. या आनंदाप्रीत्यर्थ मावशीकडील सर्व मंडळी दिवाळीत बलसाडला आली होती. मी मात्र गेले नाही. कारण नेहमीचेच, सांपत्तिक अडचण! आजारपणाचे कारण सांगून मी जाण्याचे टाळले होते. वडिलांनी पाडव्याची ओवाळणी म्हणून रु. २५/– पाठवले. यातून पाण्याचे पिंप घ्यावयाचे ठरवले. तरी पण धाकधूक वाटत होती. ''आम्हाला पैसे पाठवताना हा हात आखडता घेतो मग याला पंचवीस रुपयांचे पिंप कसे घेता आले,'' असे कोणी म्हणेल का अशी उगीचच भीती वाटत होती. एक दिवस माझे आतेदीर आमच्याकडे आले असताना त्यांनी पिंप पाहून कौतुक केले. मी ते भाऊबीज व पाडव्याच्या ओवाळणीतून घेतल्याचे सांगितल्यावर हे गमतीने म्हणाले, ''त्यात एक रुपया पंचवीस पैसे मी पण घातले आहेत, बरं का!'' यावर आतेदीर म्हणाले, ''वहिनी, आधी पाट मांडून रांगोळी काढून मला ओवाळा, मी तुम्हाला एक रुपया पंचवीस पैसे ओवाळणी घालतो, म्हणजे सगळे पीप भाऊबीज व वडिलांच्या पाडव्याच्या ओवाळणीतून घेतले असे तुम्हाला सांगता येईल.'' अशा कडू, गोड, खारट, तुरट आठवणीमधून आमचा संसार शकट वाटचाल करीत होता. पगार जरी वाढला असला तरी कधी ''वडिलांच्या औषधपाण्यासाठी जास्त पैसे पाठव,'' कधी ''गहाण टाकलेली चांदीची भांडी सोडवून घेण्यासाठी पैसे पाठव,'' अशा मागण्या होत व आम्ही त्या पुरवीत असू. एकदा तर खूप मोठी रक्कम पाठवावी लागली. कुठल्यातरी फंडाचे माझे सासरे विश्वस्त होते. ते पैसे त्यांनी घरात वापरले होते. त्याच्या व्याजातून जो काही दानधर्म करावा लागे ते व्याज ते देत असत. वयाची पासष्ठ वर्षे पूर्ण झाल्याने ते विश्वस्तपण दुसऱ्याकडे जाणार होते. प्रसंग नामुष्कीचा होता. माझी ७ तोळ्यांची चपलासाखळी विकून, काही आमच्या Defence Accounts च्या सहकारी बँकेतून कर्ज काढून पैसे पाठवले. आभाळच जिथे फाटले होते त्याला ठिगळे तरी कोण आणि किती लावणार? पुण्याला आल्यावर आला–गेला, लग्न कार्य या निमित्ताने पण खर्चात वाढ झाली होती. ऑफिसात S.A.S पास झालेला अकौंटंट मानाचा समजला जाई. खर्चाची तोंडमिळवणी करताना त्रेधा तिरपीट होई. परिस्थितीवरून नातेवाईकांची मुक्ताफळे ऐकावी लागत. एकदा रेशनवर घेतलेल्या वायल्स पहिल्या धुण्यातच विटल्या. पण टाकून तरी कशा देणार म्हणून मी घरात त्या विटक्या वायल्सच नेसत असे. एकदा घरी आल्यावर माझी चुलत जाऊ म्हणाली, ''बरे बाई भाऊजी तुम्हाला या वायल्स नेसू देतात. यांनी तर एक दिवससुद्धा मला अशी साडी नेसू दिली नसती.''

इथे आल्यावर माझा यांच्या मामा व मावश्यांशी जास्त संबंध आला. त्यातूनच

यांचे लहानपण उलगडत गेले. यांच्या दत्तक गेलेल्या भावाच्या आई-वडिलांशी पण विशेष स्नेह जुळला. त्यांच्या दोन मुली माझ्या वयाच्या आसपास असल्याने आमची बऱ्यापैकी मैत्री जमली होती. यांच्या आजोळची एक मावशी सोडून बाकीची सर्व मंडळी सुखवस्तू होती. त्या सर्वांकडे आळीपाळीने दिवाळीच्या फराळाला बोलवीत असत. भाऊबीजेच्या दिवशी यांच्या मामांकडे सर्व मंडळी फराळाला आली होती. तो महिन्यातला शेवटचा आठवडा होता. पाकिटात पुढच्या आठवड्याचे रेशन व थोडाफार भाजीपाला आणता येईल एवढेच पैसे होते. दिवाळीनंतर आपण एक तारखेनंतर या सर्वांना फराळाला बोलवावे असा विचार होता, पण आज आता आठ-नऊ मावस-मामे बहिणींना ओवाळणी घालावी लागेल त्याची काय व्यवस्था करावी असा प्रश्न पडला. शेवटी सासूबाईंनी पाणी साठवण्यासाठी एक फुटका हंडा याला बूड बसवून वापरा म्हणून दिला होता तो बूड बसवण्याऐवजी बारा रुपयांना मोडीच्या भावात विकून टाकला व वेळ भागवली. फ्री प्रेस जर्नलचे तीन महिन्यांचे बिल पण भरावयास हवे होते.

माझ्याकडे एक लहान करवत व हातोडी होती. ही करवत मला माझ्या वडिलांनी बक्षीस म्हणून आणली होती. या करवतीच्या साहाय्याने मी आईकडे फळकुटे ठोकून त्याला जुन्या लाकडी रिळांची चाके लावून मीठ, लिंबू, चटणी, लोणचे यांचे सट ठेवण्यासाठी एक गाडी बनवून दिली. अशी गाडी मी पुण्याला कुणाकडे तरी बघितली होती. या करवतीचा वापर करून मी ज्या खोक्यांमधून यांनी दिल्लीहून सामान भरून आणले होते त्यांच्या फळकुटांपासून भांडी वगैरे ठेवण्यासाठी मांडण्या तयार केल्या. एका चांगल्या खोक्याचा गाद्या ठेवण्यासाठी उपयोग करायचे ठरवले व खालच्या रिकाम्या खोक्यात पांघरूणे, उशा ठेवण्याचे ठरवले. मी दारा खिडक्यांना जुन्या साडीच्या धड भागांचे पडदे शिवत असे. यांच्या आजोळची सर्व मंडळी नवीन मांडलेले घर बघून गेली. प्रत्येकाने काहीना काही संसारोपयोगी वस्तू भेट म्हणून दिल्या. दिल्लीहून पुण्याला येतांना सर्व काचेच्या व चिनी मातीच्या सामानाचे फक्त तुकडेच हातात आले होते कारण मी दिल्लीला सामानाची आवराआवर करायला गेले नव्हते. यांना तर बदलीचा व पॅकिंगचा काहीच अनुभव नव्हता.

माझ्या एका मावससासऱ्यांनी माझ्या घर लावण्याचे फार कौतुक केले व ते यांना म्हणाले, ''मधुसूदन तुझी बायको सुगृहिणी आहे. ती तुझा संसार फार चांगला करील.''

मध्यंतरी एकदा मी माझ्या मोठ्या वन्संकडे जाऊन आले. त्यांची मुलगी

फर्ग्युसनच्या हॉस्टेलमध्ये होती. ती माझी भाची– cum मैत्रीण झाली. मालेगावला मोठ्या वन्संकडे यांच्या लहानपणच्या व आईच्या खूप आठवणी ऐकायला मिळाल्या आणि तिथेच त्या नेहमी इरकली टोपपदरी लुगडी नेसत असल्याचे व गोठ पाटल्या व राजवर्खी बांगड्या वापरत असल्याचे कळले. माझा धाकटा दीर चौदा दिवसांचा असतानाच त्यांचा मृत्यू झाला. त्या वेळी त्यांचे वय अवघे चोवीस होते. जाण्याअगोदर आपल्या दोन्ही मुलींना जवळ बोलावून त्या माऊलीने मुलींना सांगितले, ''आपला भाऊ लहान आहे, त्याला अजून बोलता येत नाही. कोणी जर त्याला त्रास देऊ लागले, तर त्याची बाजू घ्यावी. त्याला कधीही एकटा टाकूनका.'' तसेच त्या आपल्या बहिणीला म्हणाल्या, ''हे दुसरे लग्न केल्याशिवाय राहणार नाहीत. मुली तर लग्न होऊन सासरी जातील. हा चौदा दिवसांचा मुलगा जगेल का नाही माहीत नाही. मी काही आता जगेन असे वाटत नाही. माझा जीव मधूमधे अडकला आहे. त्याला अजून बोलतासुद्धा येत नाही.'' मातृत्वाच्या ह्या महन्मंगल साक्षात्काराने मी अतिशय भारावून गेले. हे स्वत:बद्दल कधीच फारसे बोलत नसत. इतरांकडून ऐकलेल्या गोष्टींवरून मला त्यांच्या पूर्वायुष्याबद्दल थोडेफार कळत असे.

पुण्याला आल्यावर यांच्या मित्रमंडळींनी फारच आग्रह धरल्याने आम्ही त्यांना Camp मधील Ritz हॉटेलमध्ये पार्टी दिली. त्यावेळी झालेल्या गप्पांमधून मला हे B.A. ला त्यांच्या कॉलेजमध्ये सर्वप्रथम व युनिव्हर्सिटीला Economics मध्ये दुसरे असल्याचे कळले. साधारणपणे गणित किंवा संस्कृत मुख्य विषय असलेला विद्यार्थीच कॉलेजला पहिला येत असे, पण या वर्षी Economics चा विद्यार्थी पहिला आला होता. यांना एम.ए.ला प्रवेश घेण्याची इच्छा होती. प्राध्यापक राजाभाऊ ओतुरकर त्यांना म्हणाले होते, ''तू एक वर्ष कसे तरी काढ. यंदाची tutorship रुइयाला आहे. पुढच्या वर्षी मी तुला tutorship देतो.'' यांचे सर्व शिक्षण फ्रीशिपवर झाले होते. तर्कशास्त्राचे Jog prize व अर्थशास्त्राचे रु. १५०/– चे बक्षीस मिळाले होते. त्या दिवशी घरी आल्यावर विचारले, ''ही गोष्ट घरी कुणालाच कशी माहीत नाही?'', तर म्हणाले ''कळून तरी काय उपयोग होता? Beg, Borrow or steal,'' असा लकडा होता माझ्यामागे. पहिले सहा महिने मी महाजन प्रिंटिंगप्रेस मध्ये Proof Reader चे काम करून M.A. च्या टर्म्स भरल्या, पण मला मलेरियाने गाठले.'' त्यावेळी ते मोहन गवंडी यांच्या पुरंदरे बागेतील बंगल्याच्या outhouse मध्ये राहात होते.

त्यांची एकूणच शैक्षणिक कारकीर्द म्हणजे अडथळ्यांची शर्यतच होती.

१९३६च्या जूनमध्ये ११वी पास झाल्यावर पुढे काय हा प्रश्न उभा राहिला. अमरावतीला कॉलेज होते पण अमरावती अथवा नागपूरला होस्टेलमधे ठेवून शिकवण्याची वडिलांची ऐपत नव्हती. पुण्याचे एकत्र कुटुंब मोडकळीला आलेले. विश्वनाथ नीलकंठांच्या दोन मुलांपैकी एक वेडा व दुसरा विधुळा, त्यामुळे ते frustrated. एक चुलत सासरे इस्टेट मिळवण्याच्या प्रयत्नात कोर्ट कचेऱ्यांमुळे कर्जबाजारी, दुसऱ्या चुलत्याची बायको गेलेली, एकाची वकिली चालत नव्हती व एक मॅट्रिक होण्याआधीच डॉक्टरकीची स्वप्ने पाहाणारा. एक तीन मुलांसकट माहेरी आलेली बहीण. हे सर्व गबाळ विश्वनाथ नीलकंठांनी आई होती तोवर सांभाळले. त्यांना यांनी ''मी पुण्याला येऊ का'', असे विचारल्यावर ते म्हणाले, ''मी तुझ्या नावाने घरात दरमहा पंधरा रुपये जास्त देत जाईन, पण मला हे एकत्र कुटुंब फार दिवस टिकेलसे वाटत नाही, तेव्हा तू हा विचार सोडलेला बरा.''

यांच्या एका मावशीचे यजमान हरिगावच्या साखर कारखान्यात मॅनेजर होते. ते लोकमान्य टिळकांच्या बहिणीचा मुलगा होते. उदार मनोवृत्तीचे गृहस्थ होते. स्वतःच्या बहिणीची मुले कोकणातून पुण्याला आणून त्यांचे शिक्षण केले. स्वतःच्या पुजाऱ्याच्या मुलाला शिकवले. शेअर्समधे बुडालेल्या आपल्या साडूला आर्थिक मदत करून तगवले, इत्यादी गोष्टी त्यांच्या जमेला होत्या. हा साडू डॉक्टर म्हणून युद्धावर गेला व परत आल्यावर त्यांचे पैसे परत केल्यावर ते स्वतः न घेता व्याजी लावून त्याचे व्याज दुसऱ्या साडूच्या खिळखिळ्या झालेल्या संसाराला मदत म्हणून दिले. असे त्यांचे एकूण व्यक्तिमत्व होते.

यांनी या मावशीकडे पत्र लिहून ती यांना काही मदत करू शकेल का, अशी विचारणा केली असता ''गणपतरावांनी स्वतः मला न विचारता मुलाकडून का पत्र लिहवले'', याचा त्यांना राग आला. आधीच या सर्व मंडळींचा त्यांच्यावर बायको गेल्यावर आठ–नऊ महिन्यांच्या आतच बोहल्यावर चढल्याने राग होताच. त्यात भर पडली व आजोबा मला न सांगता माझ्या जावयाला का पत्र लिहिले म्हणून रागावले. परिणामी एक वर्ष घरी बसून काढावे लागले. त्या काळात ११/१२ वर्षांच्या बहिणीच्या साहाय्याने आईचे बाळंतपण पार पाडले.

पुढच्या वर्षी माझ्या सावत्र सासूबाईंनी आपल्या भावाला पत्र लिहून यांना शिकावयास ठेवले. पहिल्या सहामाहीची फी यांच्या वडिलांनी भरली तेवढीच. इतर सर्व शिक्षण फ्रीशिपवर झाले. दीड वर्षांनी या मामांची सोलापूरला बदली झाली. त्यानंतर ज्या वाड्यात मामांचे बिऱ्हाड होते त्या वाड्याच्या मालकीणबाईंनी यांना आपल्या माळ्यावर झोपायची परवानगी दिली. त्यांचा मुलगा यांच्या वर्गात

होता. शनिवार पेठेतील एका काकांकडे जेवण, मित्रांच्या पुस्तकावर अभ्यास, झोपायला एक सतरंजी, उशाला वर्तमानपत्रांची रद्दी व पांघरायला दुसऱ्या दिवशी नेसायचे धोतर अशा परिस्थितीत अडीच वर्षे काढली व कॉलेजला पहिले आले होते. लोकांनी यांच्याकडे पेढे मागितल्यावर घरमालकीणबाई म्हणाल्या, 'त्याच्याकडे पेढे वाटण्याइतके पैसे असते तर काय हवे होते. मी वाटते त्याच्याऐवजी पेढे.' सांगायची विशेष गोष्ट म्हणजे त्यांचा स्वत:चा मुलगा नापास झाला होता. त्या वेळची त्यांची मित्रमंडळी, म्हणजे बाळ साठे, राजा खुर्जेकर, बाबा राजहंस, बाबा आगाशे, मोहन गवंडी, कर्नल जगदे, विश्वास कुंटे, नाना आपटे, नाना बेहेरे, इत्यादीकडून तुकड्या-तुकड्यांनी कळलेली हकीगत वर लिहिली आहे. त्याच काळात ताई आपटे यांच्याशी संपर्क झाला व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार यांच्यावर झाले. या काळात सुधीर फडके देखील यांच्या कंपूपैकी एक होते.

महाजन प्रिंटिंग प्रेसमध्ये प्रूफरीडर म्हणून काम करीत असताना यांच्या मामांनी (पटवर्धन) आजोबा आजारी पडल्यावर यांना त्यांच्या शुश्रुषेसाठी मदतीला बोलावून घेतले. आजोबा बरे झाल्यावर ''आता तू परत जा'' असे ज्या दिवशी मामीने यांना सांगितले, त्याच दिवशी यांना सडकून ताप भरला, नाकाचा घुळणा फुटला व बरेच रक्त गेले. तशाच अवस्थेत हे आपल्या मावशीच्या डॉक्टर यजमानांकडे औषधोपचारासाठी हेलपाटत गेले. त्यांनी यांच्या आजोळच्या सर्व मंडळींची सडकून हजेरी घेतली व त्यानंतर बरेच दिवस यांचे दुखणे चालले. घरातील कुणालाच यांनी आपल्या आजाराची कल्पना दिली नसल्याने हा प्रसंग ओढवला. सर्व त्रास निमूटपणे सोसण्याचा यांचा स्वभाव होता. त्यानंतर स्वत:च्या आजोळच्या मंडळींना यांनी आपल्या सेवाभावी वृत्तीने जिंकून घेतले. पटवर्धन आजोबांच्या सर्व नातवंडांमध्ये हा त्यांचा विश्वासू व लाडका नातू होता. या नातवावर आपण अन्याय केला याची त्यांना जाणीव झाली. परिणामत: यांचा धाकटा भाऊ विनायक ह्याला पटवर्धन आजोबा व महाजन यांनी मिळून शिक्षणाला मदत केली. हा भाऊ नापास वगैरे झाला नाही, पण यांच्यासारखा हुशारही नव्हता. सगळीकडे पास क्लासमध्ये पास होत असे. असो, योग असतो एकेकाचा. भट्टीतून तावून, सुलाखून निघालेले सुवर्ण अधिक झळाळते. या आजारानंतर यांची पुढे शिकण्याची उरली सुरली ऊर्मी संपुष्टात आली व १९४२ च्या जानेवारीत मिलिटरी अकौंट्समध्ये कारकून म्हणून रुजू झाले. त्या वेळची एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे हे आपल्या मावशीला ''नोकरी लागली,'' असे सांगावयास गेले असताना त्या यांना म्हणाल्या, ''अरे, बाबा. मला सांगताहेत की आत्ता तुझ्याकडे

जो आला आहे त्याला सांग की तुला पाचशे रुपये पेन्शन मिळेल. हे म्हणाले, ''अगं मावशी, मला आत्ता फक्त पंचेचाळीस रुपये पगार आहे.''

ही यांची सुंदरा मावशी म्हणजे बुध्दिवादी विचारसरणीचा प्रभाव असलेल्या मनाला कोडे घालणारी होती. अध्यात्मिक मनोवृत्तीची ही बाई सोमवार पेठेतील माळी महाराजांची भक्त होती. मराठी तीन यत्ता शिकलेली ही बाई trance मधे असतांना, एखाद्या समस्येची उकल सांगतांना अनेकानेक कठीण इंग्रजी शब्द वापरीत असे. त्यांना गुरुकृपेने पुढील घटनांची चाहूल लागत असे. सुरुवातीला त्यांच्यावर कुणाचाच विश्वास बसत नसे, पण जसा जसा प्रत्यय येत गेला तशी तशी लोकांची खात्री पटत गेली. त्यांच्या स्वत:च्या यजमानांचा पण या सगळ्या गोष्टींना फार विरोध होता, पण हळूहळू तोही मावळला. त्यांच्या अशा अनेक मी स्वत: अनुभवलेल्या गोष्टी संग्रही आहेत. विशेष सांगायची गोष्ट म्हणजे या घटनेनंतर जवळ जवळ सदतीस वर्षांनी यांना जे निवृत्ती वेतन निश्चित झाले ती रक्कम रु. ४९५/– होती. याच त्यांच्या मावशीने माझ्या मामे सासऱ्यांना सांगितले, ''या मुलाला तू जवळ कर. हा तुला तुझ्या म्हातारपणी उपयोगी पडेल.'' यांच्या आजारपणात यांच्याच डॉ. यजमानांनी यांच्यावर औषधोपचार केले. बिल विचारावयास हे गेले असता त्यांनी यांना सांगितले, ''आज तू मला काही देऊ नकोस. पुढच्या आयुष्यात मी तुझ्याकडून औषधाचे पैसे घेईन.'' त्या वेळी जवळ जवळ सतरा इंजेक्शन्स देऊन त्यांनी यांना मलेरियाच्या तडाख्यातून वाचवले होते. हे नोकरीला लागल्यानंतर मामांकडेच राहू लागले. मामीचाही यांच्यावर फार जीव होता. हे नसताना एखादी अपूवाईची गोष्ट घरात आणली गेली तर ही मामी त्यातील काही भाग वगळून यांच्यासाठी बाजूला काढून ठेवी. लवकरच, हे खात्याची पहिली परीक्षा पास झाले व १९४६ साली यांची सुपरवाईजरी स्केलवर दिल्लीला बदली झाली. तेव्हासुद्धा हे घरी गेले नाहीत. मामीनेच जुना स्टोव्ह, चार पातेली, एक जुनी गादी व ब्लँकेट बरोबर दिले.

❍❍❍

# ९. रोहिणी व कल्पनाचा जन्म

आज माझी रोहिणी एक ख्यातनाम शास्त्रज्ञ आहे. अनेक रौप्य व सुवर्ण पदकांची मानकरी आहे. भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरची अग्रगण्य वैज्ञानिक समजली जाते. जिनिव्हा येथे घडवून आणलेल्या विश्वोत्पत्तीचा शोध घेणाऱ्या महास्फोटात सहभागी असलेल्या भारतीय शास्त्रज्ञांपैकी एक आघाडीची शास्त्रज्ञ आहे. तिच्या जन्माची ही चित्तरकथा.

१९५२ च्या एप्रिलमध्ये माझ्या दत्तक गेलेल्या दिराचे लग्न झाले. त्यादिवशी माझ्या मावस सासूबाईंनी मांडवात मला बोलावून माझी ओटी भरली व म्हणाल्या ''मालती, कोल्हापूरच्या अंबाबाईला तुझ्या घरी यायचे आहे.'' त्या वेळी अशा गोष्टींवर माझा अजिबात विश्वास नव्हता, कारण लहानपणी एक 'ढोंगी गुरुच्या सैतानी लीला' नावाचे एक पुस्तक मी वाचले होते. घरी आल्यावर मी यांना म्हणाले, ''काहीतरीच सांगते तुमची सुंदरामावशी. तुमचे इतके सगळे श्रीमंत नातेवाईक सोडून हाका मारायला ती अंबाबाई आपल्याकडे कशाला यायला बसली आहे.'' पण बोलाफुलाला गाठ म्हणावी तसे आमची सर्व खबरदारी बाजूला सारून एका नवीन जीवाने आमच्या आयुष्यात प्रवेश करण्याचे ठरवले असल्याचे लवकरच माझ्या लक्षात आले.

तसे पाहिले तर मीनाही आता तीन वर्षांची झाली होती. नुकतीच बाल मंदिरात जाऊ लागली होती. ती जरा उशिराच बोलायला लागल्याने तिची बडबडगीते ऐकायला खूप गंमत वाटे.

दोन महिने झाल्यावर मला K.E.M. Hospital मधे दाखल व्हावे लागले. इतिहासाची पुनरावृत्ती होणार की काय अशी भीती वाटू लागली, पण आठ दिवसात घरी आले. त्या वेळी लक्षात आले नाही पण पुढे घडलेल्या घटनांवरून असे वाटते की मी पाय मशीनवर शिवण शिवल्यामुळे असे झाले असावे. आम्ही हँडल बसवून घ्यायचा विचार बाजूला ठेवला होता. आत्तापर्यंत बहीण S.T.C. होऊन मुंबईला नोकरी करू लागली होती. तिला कडक मंगळ होता त्यामुळे कुठे

पत्रिका जुळत नसे. नणंदेला स्थळे पाहण्यासाठी व तिचा परीक्षेचा काही भाग पुन्हा द्यावा लागणार होता म्हणून ती आमच्याकडेच होती. त्यामुळे दवाखान्यात राहावे लागले तरी फारसे जाणवले नाही. सगळे ठीक–ठीक चालले होते. माझी मावस नणंद Cantonment Hospital मध्ये डॉक्टर होती. तिची डायना नावगावकर नावाची मैत्रीण ससूनला प्रसूतिशास्त्र विभागात हाऊसमन होती. आम्ही सोमवार पेठेत राहात होतो. ससून हॉस्पिटल चालत जाण्याइतके जवळ होते व खाजगी दवाखान्यात दहा दिवसांसाठी शंभर रुपये खर्च करावा लागू नये म्हणून मी ससूनलाच नाव घालायचे ठरवले. यांना खरे तर हा निर्णय आवडला नव्हता, पण मी म्हणाले, ''अहो, रोज हजारो बायका ससूनमधे बाळंतीण होतात व जिवंत घरी परत जातात. मला काही होणार नाही. दहा दिवसांचा तर आहे. आणि डायना तिथे आपल्या ओळखीची आहे. डॉक्टरी मदतच खरी महत्त्वाची.''

दसरा दिवाळीच्या दिवसात खूप शिवण शिवल्यामुळे म्हणा, दिवाळीची दगदग झाली म्हणून म्हणा किंवा आणखी काही कारणाने त्रिपुरी पौर्णिमेनंतरच्या दशमीला १२ नोव्हेंबरला पहाटे एकाएकी पोट दुखू लागले. नणंद मामांकडे दोन दिवस राहावयास गेली होती. काय करावे सुचेना. त्या वेळी फोनबीन काहीच सोय नव्हती. माझी शिवण क्लासमधली आपटे नावाची लेकुरवाळी मैत्रीण होती. तिच्याजवळ मीनाला ठेवून आम्ही ससूनला गेलो. खरे तर आदल्या दिवशीच मी तपासून आले होते. सर्व आलबेल होते. दिलेल्या तारखेला अजून दीड महिना अवकाश होता. या कळा बाळंतपणाच्याच असल्याचे निश्चित झाल्यावर यांनी मला काय करू म्हणून विचारले. मी म्हणाले, आईला तार करून बोलावून घ्या. पहाटे ५ वा. २५ मि.नी रोहिणीचा जन्म झाला. अपुऱ्या दिवसांची असली तरी साडेपाच पौंड वजन होते. Incubator मध्ये ठेवावे लागणार नव्हते. आपटे बाई दिवसभर माझ्याजवळ बसून होत्या. हे जाऊन नणंदेला घेऊन आले. संध्याकाळी सात वाजता आईपण येऊन पोहोचली. माझी मावस बहीण मुंबईहून बलसाडला आली. माझ्या मावशीने मावस बहिणीच्या घराची पण जबाबदारी स्वीकारली. आई जवळजवळ दीड महिना राहिली.

अपुऱ्या दिवसांची असल्याने रोहिणीची टाळू भरून आली नव्हती. दूध नाकातून बाहेर येऊ लागले. आपण हँडल न घेण्याची काटकसर या बालजीवाला भोगावी लागणार असे वाटून मन सैरभैर झाले. त्यातच सातव्या महिन्यातले मूल जगते पण आठव्यातले जगत नाही असाही समज रुढ होता. दुसऱ्या दिवशी ह्यांचे गणपुले मामा मला भेटायला आले. ते म्हणाले, ''मालती, मी मुलीची कुंडली

मांडली आहे. या पत्रिकेत एकही कुयोग नाही. ही मुलगी नक्की जगेल. आणि आठव्या महिन्याची काय भीती घेऊन बसलीस? अगं, श्रीकृष्ण पण आठव्या महिन्यातच नाही का जन्माला आला?''

मला जवळ जवळ पंधरा दिवस दवाखान्यात राहावे लागले. तशी तिथे मी जरा privileged Patient होते. डायना माझ्या नणंदेची मैत्रीण, विभाग प्रमुख नणंदेचे गुरु व रोहिणी अपुऱ्या दिवसांची, म्हणून विभागप्रमुख डॉ. जंगलवालांची रोज व्हिजिट असे. पण या पंधरा दिवसात माझे मन अंतर्बाह्य ढवळून निघाले. मी जनरल वॉर्डमध्येच असल्याने संध्याकाळी भेटायला येणाऱ्यांच्या व बाळंतिणींच्या बोलण्यातून तळागाळातल्या भारतीय स्त्रीजीवनातील हाल अपेष्टांच्या, मानसिक भावनिक व शारीरिक छळवादाच्या अनेक हकीगती ऐकायला मिळाल्या. आपण कल्पनाही करू शकणार नाही अशा गोष्टी प्रत्यक्षात घडत होत्या. दारू पिऊन येणाऱ्या नवऱ्याचा मार खाणाऱ्या, आजारपणातही, फार काय ऋतुमती अवस्थेतही नवऱ्याला शरीर भोग द्यावा लागणाऱ्या, सासऱ्याच्या वा दिराच्या वासनेला बळी पडावे लागणाऱ्या, तिसऱ्या किंवा चौथ्या खेपेला मुलगीच झाली म्हणून नवरा आपल्या मुलींसकट घरातून हाकलून नवरा सवत तर आणणार नाही ना अशा काळजीने ग्रासलेल्या, अशा एक ना अनेक कहाण्या.

माझ्या शेजारची पेशंट तेराव्या खेपेला आली होती. वय चाळिशीच्या आसपास, चेहरा सुरकुतलेला, केस काळे पांढरे, डोळे विझलेले, तिला दूध अजिबात येत नव्हते. मुलगी रडू लागली की उठून लांब निघून जात असे. मला दूध भरपूर येत होते पण रोहिणीला ते संपत नव्हते. मी नर्सकडून पंप मागून घेतला व दूध काढून तिला पाजायला देऊ लागले. दोन दिवस झाल्यावर ती मला म्हणाली, ''ताई, तुम्ही आहात तोवर हिला दूध मिळेल हे जरी खरे असले तरी घरी गेल्यावर हिच्या नशिबी साबुदाण्याची पेजच आहे.''

या सगळ्यामुळे मला माझे दु:ख काहीच नाही असे वाटू लागले. प्रेमळ आई–बाप, काळजी करणारा, जीव लावणारा नवरा यापेक्षा माणसाला दुसरे काय हवे असते? थोडी पैशांची चणचण सोडली तर आपल्याला काय कमी आहे? ही चणचणसुद्धा कायमची नसून काही वर्षांपुरतीच असणार आहे. नवऱ्याची नोकरी चांगली आहे. आज ना उद्या आपलेही दिवस पालटतील या विचाराने नवी उभारी घेऊनच मी ससूनमधून घरी आले.

नवा जीव स्वत:ची सोय घेऊन आला. पुणे 'B' Area जाहीर झाला व घरभाड्यापोटी दरमहा २५/–रु. वाढून मिळू लागले. रु. १७५/– थकबाकी

म्हणूनही मिळाले. बाळंतपणाचा सर्व खर्च त्यात भागला. आता आम्हाला दरमहा साठ रुपयापर्यंत भाडे देता येणार होते म्हणून आम्ही हळूहळू मोठ्या जागेचा शोध घेऊ लागलो.

रोहिणी अजिबात रडकी नव्हती. तिचे सर्व milestones नॉर्मल होते. तीन महिन्याची पालथी वळू लागली आठव्या महिन्यात रांगू लागली. पण बहुधा नियतीला हे मान्य नसावे. अनेक अडचणी 'आ' वासून आमची वाट पाहात होत्या. याच वर्षी माझे दोन्ही दीर एक ऑक्टोबरमध्ये व दुसरा जूनमध्ये मॅट्रिक पास होऊन शिक्षणासाठी पुण्यात आले. फेब्रुवारीत सासूबाई व धाकटी नणंद राहावयास आल्या. नंतर कळले की आमच्या घरात एक वेगळेच नाट्य घडत होते. आपल्या मुलाला आपल्या संसाराचा भार उचलावा लागतो आहे, ही जबाबदारी तो इमाने इतबारे पार पाडतो आहे या कल्पनेने माझ्या सासऱ्यांनी स्वत:चे राहते घर यांच्या नावाने करून देण्याचे ठरवले होते. हे आमच्या सासूबाईंना मान्य नव्हते व यावरून नवरा–बायकोमध्ये सतत भांडणे होत होती. एका दृष्टीने विचार केला तर दोघेही आपापल्या ठिकाणी बरोबर होते.

जूनमधे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले. धाकटा दीर जयंतासाठी आम्ही सोमवार पेठेत राहात असल्याने वाडियाला प्रथम वर्ष विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. यांनी आपली सायकल त्याला दिली व स्वत: पायी ऑफिसात जाऊ लागले. थोरला कमलाकर वयाच्या बाविसाव्या वर्षी ऑक्टोबरमध्ये पास झाला होता. त्याला Engineer व्हावयाचे होते. माझ्या फीचे पैसे मी दुधाचा धंदा करून साठवले आहेत असे सांगून R.K.Engineering College नावाच्या प्रायव्हेट कॉलेजमधे त्याने नाव घातले. त्याच्या भ्रमाचा भोपळा लवकरच फुटला. पहिल्याच सत्र परीक्षेत कॉपी करताना सापडला व त्याला कॉलेजमधून काढून टाकले. थोडक्यात निभावले कारण हा मुलगा म्हणजे एक डोकेदुखी होती. आजपर्यंत आमच्याकडे पैसे कधीच कडीकुलपात नसत, पण हा मनाला येईल तेव्हा सिनेमा, हॉटेलिंग यासाठी न सांगता सवरता पैसे उचलू लागला व आमचे बजेट त्यापुढे टिकाव धरेना. सहा महिन्यात त्याने नुसते सळो की पळो केले. ही ब्याद दिवाळीच्या सुमारास गाशा गुंडाळून जबलपूरला नणंदेकडे बॉयलर अटेंडंटचा कोर्स करायला गेली. या नणंदेने आमचा जरी राग–राग केला असला तरी तिने माहेरच्यांसाठी खूप केले. या मुलाच्या वागण्यापायी तिला अनेक वेळा मान खाली घालावी लागली. त्याने स्वत:च्या शिक्षणासाठी दुधाचा धंदा करून पैसे साठवले असे चित्र जरी उभे केले असले तरी १९४७ ते १९५३ या काळात सासूबाईंनी म्हशी

घेण्यासाठी जवळ जवळ पंधरा ते वीस तोळे सोने विकले. ते मुद्दल त्यांना कधीच परत मिळाले नाही. हे सगळे कमी पडले म्हणून की काय आमच्या खबरदारीवर मात करून आणखी एका जिवाने आमच्या संसारात पदार्पण करण्याचे ठरविले आहे असे आमच्या लक्षात आले. काय करावे सुचेना. माझ्या डॉ. नणंदेने 'abortion' चा मार्ग सुचवला, पण आमचे संस्कारी मन त्याला तयार झाले नाही. रोहिणी व कल्पनामध्ये फक्त एक वर्ष चार महिन्यांचे अंतर आहे. रोहिणी आठ महिन्यांची असतांना तिला डांग्या खोकला, तिला व मीनाला गोवर झाला. घरात हा धिंगाणा व अडचणी यांनी मी गांजून गेले व आईला पत्र लिहून सर्व अडचणींचा पाढा वाचला. माणसाला कुठेतरी मन मोकळे करावेसे वाटते. या प्रसंगातून आपल्या आई–वडिलांना आपली किती काळजी वाटते व आपल्यावर त्यांचे किती प्रेम आहे याचा प्रत्यय आला. वडील आईला म्हणाले, ''ती नको म्हणत असताना तिला स्कॉलरशिपला नकार द्यायला लावून एखाद्याला हातपाय बांधून समुद्रात फेकून द्यावे तसे तिच्या प्रगतीच्या वाटा अडवून आपण तिचे लग्न करून टाकले आहे. आता तिची येईल ती अडचण आपण काढायला हवी. तिला सातवा लागताच इकडे बोलावून घे. अजून मी नोकरीत आहे तोवर काही अडचण नाही. पुढचे कोणी पाहिले आहे?'' आज माझी कल्पना B.J. Medical College मध्ये भूलशास्त्राची Head of the Department आहे.

ही मंडळी तुम्ही किती क्षुद्र आहात याची जाणीव करून देण्याची एकही संधी सोडत नसत. माझा धाकटा दीर परीक्षेनंतर गावाला जाण्याओदर बलसाडला आला होता. होळी पौर्णिमा होती. त्या वेळी पुरणपोळीबरोबर खाण्यासाठी त्याने ताकाची मागणी केली. या वेळेपर्यंत आपल्या घरच्या परिस्थितीची कल्पना अर्थातच वहिनीच्या माहेरी आली असू शकते ही जाणीवसुद्धा त्याला झाली नाही. आईला अर्थातच राग आला पण तरी संयम ठेवून एवढेच म्हणाली, ''तुमच्या इथल्यासारखी आमच्या दारात म्हैस बांधलेली नसली तरी गवळी दूध घालतो बरं का आमच्याकडे.'' हे चिरंजीवही पहिल्या वर्षाला नापास झाले, पुरवणी परीक्षा द्यावी लागणार होती. खापर अर्थातच आमच्यावर फुटले. पण पुरवणी परीक्षेत वर्ष पदरात पडले. याच सुमाराला आम्ही भिकारदास मारुतीसमोर तीन खोल्यांच्या जागेत राहावयास जायचे ठरवले व दिराचे नाव सर परशुरामभाऊ कॉलेजमध्ये घातले. त्या वेळी ''तुला सायन्स जमत नसले तर आर्ट्सकडे जातोस का? तुला क्लास लावायला हवा का?'', असे विचारल्यावर 'नाही' म्हणाला. पण सहामाहीला नापास झाला. सर्व विषयात १०० पैकी १५, १८ असे मार्क होते. त्याला इंग्रजी

माध्यम झेपत नव्हते की काही ऐकू येण्याचा प्रॉब्लेम होता काहीच कळत नव्हते. तो कधी मोकळा होऊन बोललाच नाही. आमची दिशाभूल करण्यासाठी गजर लावून पहाटे पाच वाजता उठे, दिवा लावी व थोड्या वेळाने दिवा ठेवून झोपून जाई. ही गोष्ट लक्षात आल्यावर मी त्याचे थोडे बौद्धिक घेण्याचा प्रयत्न केला व ''तू अशी फसवणूक का करतोस? यात तुझेच नुकसान नाही का?'', वगैरे विचारले. पण काहीच उत्तर मिळाले नाही. अभ्यासाच्या पुस्तकाची कव्हरे घालून हा कादंबऱ्या, प्रयोगांच्या फाईल्समध्ये मासिके ठेवून वाचतो असेही लक्षात आले. या सगळ्याची तक्रार मी दिवाळीत वऱ्हाडात गेल्यावेळी केल्यावर मला जी उत्तरे मिळाली ती ऐकून हसावे की रडावे हेच मला कळेना.

सासरे म्हणाले, ''तो वयात येतो आहे. तुम्ही दोघे वेगळ्या खोलीत झोपता याचा त्याच्या मनावर परिणाम होत असेल. म्हणून त्याचे अभ्यासात मन लागत नसेल'' Satan quoting the Bible असे वाटले मला. हे ब्रह्मज्ञान स्वत:ला वयाच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी मुलगा होणारा सासरा मला सांगत होता. सासूबाईंनी त्याला सांगताना ऐकू आले, ''जयंता, आपले हात दगडाखाली आहेत. ती म्हणेल ते आपल्याला ऐकून घेतले पाहिजे.'' माझ्या प्रामाणिक प्रयत्नांची व तक्रारीची अशी वासलात लागल्याने मला फार वाईट वाटले. याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. तो इंटरला नापास झाला. वहिनीची मुले सांभाळावी लागल्याने तो नापास झाल्याचे शिक्कामोर्तबही झाले.

जून १९५४ मधे माझ्या एका नणंदेचे लग्न झाले. लग्नाच्या खर्चापोटी पैशांची मागणी करणारे पत्र आले तेव्हा मात्र मी यांना म्हणाले, ''जे काय कर्ज काढायचे असेल ते त्यांना काढू द्या. तुम्ही काढू नका. त्यांच्या कर्जाची एक चतुर्थांश जबाबदारी आपली, पण तुम्ही काढलेल्या कर्जाची सगळी जबाबदारी आपल्यालाच उचलावी लागेल. आपल्यालाही आता तिसरी मुलगी झाली आहे.'' तरी पण आम्ही Thrift fund मधून १२००/– रु. काढून पाठवले होते. नणंदेच्या लनाला मी जाऊ न शकल्याने दिवाळीच्या सुटीत सासरी गेले व दिवाळसणासाठी म्हणून ५०/– रु. दिले. नणंदेने आपल्या सर्व भावंडांसाठी काही ना काही भेट वस्तू आणल्या पण माझ्या मुलींसाठी वारभर रिबिनसुद्धा आणली नव्हती याचे मला फार वाईट वाटले. याशिवाय मी मला खर्चासाठी दिलेले २५/– रुपयेसुद्धा ''आता दिवाळसणासाठी ५०/– रु. कसे पुरणार? माझ्याजवळ तर विष खायलासुद्धा पैसे नाहीत,'' अशी बडबड ऐकून मी सासुबाईंना देऊन टाकले होते. पाहुणे गेल्यावर मी त्या दोघांचे संभाषण ऐकले त्यावरून असे कळले की

त्यांनी हातचे म्हणून ५०/– रु. बाजूला ठेवले होते. मी मात्र माझ्याजवळचे सर्व पैसे देऊन मोकळी झाले होते. असा सगळा प्रकार होता. त्यात त्यांचा फारसा दोष होता असे म्हणत नाही मी. परिस्थिती त्यांना तसे करायला भाग पाडत असावी कदाचित, पण त्यात आम्ही निष्कारण भरडले जात होतो. आम्हीच मूर्ख त्याला कोण काय करणार? Over-sincerity हा एक प्रकारचा दोषच नाही का? माणूस अनुभवाने शहाणा होतो म्हणतात ते काय उगीच? तिथे चांगल्या सतरंज्या विणून मिळत म्हणून मी एक ६X१२ ची सतरंजी विणायची ऑर्डर दिली होती. त्याला २२/– रुपये पडणार होते. पाहुणे आल्यावर गाद्यांखाली घालायला माझ्याकडे सतरंज्या नव्हत्या. ही पुढच्या खोलीत बैठक म्हणून वापरता आली असती व गाद्याही घालता येणार होत्या. ''तर तो नक्की पाठवील ना गं सतरंजीचे पैसे,'' असे मला चार–चार वेळा विचारले गेले. त्यांची परिस्थिती कीव करण्याजोगी असली तरी attitude नक्कीच तशी नव्हती.

दिराचे बौद्धिक घेताना पण मी त्याला समजावताना म्हणाले होते, ''तू असे का वागतोस? चांगला शिकलास, पास झालास तर तुझेच आयुष्य सुखाचे नाही का होणार? आम्ही फार फार तर तुझ्या शिक्षणासाठी केलेल्या खर्चाची तुझ्याकडे मागणी करू पण बाकी सर्व तर तुझेच असणार नाही का?'' पण पालथ्या घड्यावर पाणी अशी एकूण परिस्थिती होती.

यावेळेच्या सासरच्या वास्तव्यात अशा काही गोष्टी घडल्या की मन अगदी विषण्ण होऊन गेले. परिस्थिती माणसाला किती लाचार बनवू शकते याचा प्रत्यय आला. हे Administration section मधे असल्याने यांचा अशा काही गोष्टींशी संबंध येई की मनात आणले असते तर भरपूर वरकमाई करता आली असती. पण हे तसे करीत नसत याचा मला अर्थातच आनंद व अभिमान वाटत असे. माझी नणंद आमच्याकडे राहात असताना तिच्या ही गोष्ट लक्षात आली असेल व त्याबद्दल ती कदाचित घरात बोलली पण असेल. एक दिवस माझे सासरे मला म्हणाले, ''का गं मालती? मी असे ऐकले आहे की मधूची जागा पैसे खाण्याची आहे, पण तो पैसे खात नाही.'' मी त्यावर ''हो, ते खरे आहे,'' असे सांगितल्यावर म्हणाले, ''पण काय हरकत आहे सुखाने मिळत असतील तर घ्यायला? आपली परिस्थिती ही अशी अडचणीची आहे म्हणून म्हणतो.'' मला अर्थातच अतिशय वाईट वाटले. एके काळी खोटी केस हातात न धरणारा असा ज्यांचा लौकिक होता, तोच का हा माणूस? असा प्रश्न पडला मला. मी एवढेच म्हणाले की मी पैसे न खाणाऱ्या बापाची मुलगी व पैसे न खाणाऱ्या नवऱ्याची बायको आहे याचा

मला अभिमान वाटतो. आपल्याला सगळ्यांना एक वेळ जेवून राहावे लागले तरी चालेल पण माझ्या नवऱ्याने पैसे खावे असे मी कधीही म्हणणार नाही. यावर सारवासारव केल्यासारखे म्हणाले, ''अगं नाही गं. मी आपले उगीच तुझे मन पाहायला म्हणून बोललो.'' तसेही असेल कदाचित. यावरुन मला माझ्या मावशीच्या दिरांची आठवण झाली. हा माणूस व्युत्पन्न व हुशार होता. अजमेरला मोठ्या हुद्यावर नोकरीला, घरात आबादी आबाद, गाण्याचे अंग होते, किर्लोस्करांच्या नाटकांचे हिन्दी अनुवाद करून (गाण्यांसकट) ती नाटके तिथल्या महाराष्ट्र मंडळात करीत. बायको गेल्यावर दुसरे लग्न न करता मुलांना वाढवले. दुर्दैवाने मोठा मुलगा नीट न निघाल्याने रिटायरमेंटनंतर त्याने केलेले कर्ज फेडून शेवटी पुण्याला येण्याचा रेल्वेचा पास व पाच–पंचवीस रुपये एवढ्यावर अजमेर सोडले. दोन लग्नाच्या मुली. एक जेमतेम मॅट्रिकपर्यंत शिकून अजमेरलाच रेल्वेत नोकरीला लागलेला मुलगा. छोट्या–मोठ्या नोकऱ्या करून प्रपंचाचा भार पेलत होते. मोठा मुलगा पण बरोबर होताच. इथेही त्याने परत इतिहासाची पुनरावृत्ती केली होती. योगायोगाने स्वातंत्र्योत्तर काळात नाशिकला सालवेज डेपो मॅनेजर म्हणून सदर गृहस्थाने न भूतो न भविष्यति इतका पैसा खाल्ला. एरव्ही कुठे कीर्तनाला गेले असताना झांजेला जर फाईलींना बांधून ठेवण्यासाठी म्हणून जे लाल–पिवळ्या दोरीचे टॅग असत असा टॅग बांधलेला असला तर अशी झांज मी वापरणार नाही असे म्हणत, त्याची मला आठवण झाली. ''कालाय तस्मै नम:'' हेच खरे.

याच संदर्भात आणखी पण काही गोष्टी लिहावयासारख्या आहेत. एक दिवस माझे एक चुलत दीर आमच्याकडे आले व म्हणाले, ''मला अमुक तमुकने तुझ्याकडे पाठवले आहे. तू Administration Section ला आहेस आणि तो तुझ्यासाठी मध्यस्थ म्हणून काम करायला तयार आहे. अर्थातच त्याचा योग्य तो वाटा तू त्याला देशीलच.'' हा अमुक तमुक यांच्याच Section ला असलेला कारकून होता. यांना या गोष्टीचा इतका राग आला की सांगून सोय नाही. म्हणाले, 'ताडीच्या झाडाखाली बसून माणूस दूध जरी प्यायला तरी लोकांना वाटते हा ताडीच पितो आहे.'

दुसऱ्या एका प्रसंगी यांचा दत्तक गेलेला धाकटा भाऊ म्हणाला, 'माझा साडू म्हणतो की तुला पगाराइतका पैसा वर मिळत असेल'. यावर हे एवढेच म्हणाले की, 'असे असते तर माझी बायको पंचेचाळीसाव्या वर्षी B.Ed होऊन नोकरीला लागली नसती'. याच साडूची पुढे यांनी महहून पुण्याला बदली केली तेव्हा भावाला विचारले, ''तुझ्या साडूला विचार मी त्याला महहून पुण्याला आणले

म्हणून त्याने मला किती पैसे दिले?''

एक दिवस ऑफिसमधून आल्यावर त्यांनी मला एक पत्र दाखवले व म्हणाले ''हे एक फ्रेम करून लावण्यासारखे प्रशस्तिपत्र आहे वाच.'' हे पत्र पुण्याच्या सप्लाय डेपोच्या मॅनेजरने C.D.A. ला लिहिले होते. पत्राची सुरवात, "Your L.A.O. is above suspision. पण त्याच्या हाताखालची माणसे आमच्याकडे सारखे तांदूळ, साखर, डालडा यांची मागणी करत असतात. कृपया या गोष्टीची नोंद घ्यावी.'' त्या वेळी पुण्यात या गोष्टींची प्रचंड टंचाई होती.

आमच्या आयुष्यात अनेक वादळे व वावटळी आल्या आणि गेल्या पण परमेश्वराने आमची बुद्धी भ्रष्ट होऊ दिली नाही याबद्दल त्याचे मानावे तितके उपकार थोडेच आहेत. सध्याच्या जगात सचोटीने वागणे दुर्मिळ होत चालले आहे. असा माणूस इतरांच्या लेखी वेड्यातच जमा होतो. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झाला आहे. याबद्दलची आणखी एक आठवण अशी की, शाळेत नोकरी करीत असताना मी ''समाजसेवा'' या सदराखाली इ. १० वीची एक दिवसाची राहती ट्रीप पुण्याजवळ खानापूर येथे नेण्याचे आयोजन केले होते. भोजन व्यवस्था, मुलींची ने–आण करण्यासाठी बसेस ठरवणे इत्यादी. सरते शेवटी बसवाल्यांचे बिल चुकते करण्यासाठी गेले असतांना त्यांनी शेकड्यावरची काही तरी ६०–६५ रुपयांची सूट दिली व पूर्ण रकमेची पावती माझ्या हातात दिली. मी त्यांना सांगितले की तुम्ही वरचे पैसे सूट दिली असे कृपया पावतीवर लिहून देता का? म्हणजे मला शाळेत हिशेब द्यायला सोपे पडेल. यावर ते म्हणाले 'बाई, असे लिहून मागणाऱ्या तुम्ही पहिल्या आहात.' यात माझे काय चुकले ते मला कळलेच नाही व तसे मी यांना घरी आल्यावर सांगितले तेव्हा हे मला म्हणाले, ''शोभतेस खरी माझी बायको. पण माझ्यापेक्षाही मट्ठ आहेस एवढे खरे. अगं, त्याने ते पैसे तू त्याला बिझनेस दिलास म्हणून सोडले. एवढेही तुला कळू नये? धन्य आहे तुझी. पण जे केलेस ते बरोबरच केलेस.'' असो, विषयांतर फार झाले. हरदासाची कथा पुन्हा मूळ पदावर आणते.

दिवाळी संपल्यावर एक दिवस माझे सासरे पाय घसरून अंगणात पडले. त्या वेळी त्यांचे वय ६५–६६ वर्षांचे असावे. त्यांना हात द्यायला कोणीही पुढे झाले नाही. सगळी गंमत पाहात होती. मी पुढे जाऊन त्यांना उठवले, कुठे लागले वगैरे नाही ना पाहून हात धरून घरात आणले. आत सासूबाई बडबडत होत्या, ''करील नाही तर काय त्यांची ऊठबस? कोणाला तुमचे घर नको आहे?'' मला इतका राग आला. त्यावेळी मात्र मी गप्प बसले नाही मी म्हणाले, ''माणसे आहात की

कोण आहात? काही माणुसकी आहे की नाही तुम्हाला? तुम्हाला काय वाटले, त्यांनी घर आम्हाला द्यावे म्हणून मी हे केले? मला या घरातली चिमूटभर माती सुद्धा नको आहे.'' जणू त्यावेळी भविष्यकाळच माझ्या तोंडातून बाहेर पडला असावा असे पुढे घडलेल्या घटनांवरून वाटते.

यानंतर लगेचच माझ्या सासऱ्यांनी सासूबाईंच्या नावाने घर करून दिले असे त्यांच्या मृत्युपत्राची तारीख पाहिल्यावर कळले. ही घटना १९५४ च्या दिवाळीत घडली. अशा किती तरी बारीक-सारीक गोष्टी होत्या ज्याचे मनावर ओरखडे उठत होते. एक दिवस सहज गप्पांमध्ये मी कर्जफेडीबद्दल काही तरी बोलले असता म्हणाले, ''तुम्हाला कसले एवढे कर्ज आहे? आम्ही तर त्याला कधीच आमच्यासाठी कर्ज काढ म्हणून सांगितले नव्हते,'' हे ऐकून मी अवाक झाले. दरमहा अर्धा पगार घरी पाठवून सतत एक-दोन जण आमच्या जवळ ठेऊन यांनी वेळोवेळी केलेल्या मागण्या पुरवण्यासाठी आम्ही G.P. Fund, thrift fund, विमा पॉलिसी यांच्यावर कर्ज काढावे लागले असल्याचे सांगितल्यावर म्हणाले, ''कशाला कर्ज काढून पाठवले पैसे? नाही म्हणायचे होते.'' माणूस आपला पराभव व अपयश मानायला सहजासहजी तयार होत नाही. त्यातून निसटण्याच्या वाटा तो शोधत असतो हेच खरे. असा हा 'तो मी नव्हेच' चा खेळ.

माझ्या डॉक्टर नणंदेने घर बांधले त्या वास्तुशांतीला पण मी गेले नव्हते म्हणून दिवाळीनंतर आठ दिवस जबलपूरला पण जाऊन आले.

जूनमधे Inter Science चा निकाल लागला. दीर अर्थातच नापास झाला होता. सगळीकडे १५ ते १८ इतके मार्क्स मिळाले होते. त्या वेळी हे त्याला म्हणाले 'तुला सायन्स जमत नाही असे दिसते तर तू आर्टस्‌ला नाव घाल आणि Employment Exchange मधे नाव नोंदवून ये. सकाळचे कॉलेज कर व दुपारी नोकरी असे दोन्ही तुला करता येईल. मी तुला Interview चा कॉल पाठवतो पण त्यासाठी Employment Exchange मधे नियमाप्रमाणे नाव नोंदणी केलेली असायला हवी आहे.' त्यावर चिरंजीव उद्‌गारले, ''मी पुन्हा परीक्षेला बसणार आहे. मला कारकुनी करायची नाही.'' तो आता अठरा वर्षांचा झाला होता. या सगळ्याचा अर्थ आम्ही जबाबदारी टाळतो आहोत असाच नेहमीप्रमाणे लावला गेला ते निराळेच. खरे तर ही एक स्वाभिमानाने जगण्याची संधी होती. सगळ्यांना इतक्या सहजासहजी नोकरीची संधी थोडीच मिळते? पण हे कोण समजावणार त्याला?

पुन्हा पहिले पाढे पंचावन्न, सहामाही परीक्षेत पण इतिहासाची पुनरावृत्ती

झाली. त्याच वेळी आमची पण देवळालीला बदली झाली. आमच्या नणंदेच्या मते मी पुण्याला जयंताच्या शिक्षणासाठी बिऱ्हाड करून राहावे असे होते. पण तीन ठिकाणचा खर्च आमच्या पगारात भागणे निव्वळ अशक्य होते. शिवाय बदली झाल्याने House Rent Allowance पण मिळणार नव्हता म्हणून माझ्या दिराची माझ्या मामे सासऱ्यांकडे (गणपुले मामांकडे) व्यवस्था करून आम्ही देवळालीला जाण्याचे ठरवले.

त्या वेळी मामा नंदुरबारला होते. त्यांच्या पुण्याच्या घरात त्यांचा मुलगा व त्यांच्या भावाची तीन मुले राहात होती. सगळी शाळा कॉलेजात शिकणारी, डबे आणून जेवीत. मामांचा मुलगा मला म्हणाला, ''वहिनी तुम्ही जयंताच्या राहण्याचे पैसे देऊ नका. आम्ही तीन डबे आणतो. आमटी व भाजी भरपूर असते. आम्ही भाताऐवजी पोळ्या आणू. घरात तांदूळ भरलेले आहेत. भात घरी लावून घेऊ, म्हणजे आमचे आहे तेवढ्याच डब्यांमधे भागेल.'' कधी कधी माझ्या दिराला पण भाताचा कुकर लावावा लागे. त्याने माझ्या सासूबाईंना ''मला स्वैंपाक करायला लावतात'' असे तक्रारवजा पत्र लिहिले. सासूबाईंनी मामांना ''आम्ही गरीब म्हणून तुझा मुलगा माझ्या मुलाला अपमानास्पद वागणूक देतो,'' असे पत्र लिहिले. मामांनी मुलाला खरमरीत पत्र लिहिले. परिणामी माझ्या मामे दिराने मला सर्व माहिती सविस्तर कळवली व ''तुम्हाला जादा खर्च पडू नये म्हणून केलेल्या योजनेबद्दल मला बोलणी खावी लागली,'' असे लिहिले. मी अर्थातच त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करणारे पत्र लिहिले. तोवर एप्रिल उजाडला व चिरंजीव परीक्षा आटोपून घरी गेले. आम्ही १४ जानेवारीला देवळालीत आलो. फक्त तीन महिन्यात या सर्व घडामोडी घडल्या. अन्नछत्रात जेवून मिरपूड मागावी अशी ही तऱ्हा! आपण नापास होतो, आपण पैसे देत नाही तेव्हा थोडी सोय पाहिली पाहिजे असा अजिबात विचार न करणारी मनोवृत्ती! या सगळ्या गोष्टींना सामोरे जातांना आमची मात्र निष्कारण दमछाक होत होती. दुसऱ्या वेळी पण तो नापास झाला व प्रकरण तिथेच संपले. १९५७ साली पुन्हा इंटरला तिसऱ्यांदा नापास झाला.

यानंतर दोन–तीन वर्षे रखडल्यावर १९६० च्या सुमारास त्याला M.S.E.B.त कारकून म्हणूनच नोकरी घ्यावी लागली. खरे तर अशा वेळी आई–वडिलांनीच मुलाचे समुपदेशन करणे अगत्याचे असते. पण आमच्या इथे या सगळ्याचा अभाव व आमच्यावर अविश्वास, त्याला कोण काय करणार?

ooo

# १०. देवळाली - एक अनुभव

१४ जानेवारी, १९५६, या दिवशी आम्ही देवळालीला गेलो. हे महिनाभर आधीच गेले होते. ज्याच्या जागी आम्ही जाणार होतो तो डिसेंबर अखेर बायकामुलांसाठी जागा सोडू शकणार नव्हता. हे एका कॅप्टनचे घर होते. जवळ जवळ सहा खोल्या, पाठीमागे सर्व्हंट्स क्वार्टर, स्वैंपाकघर, तीन बाजूला मोठे व्हरांडे, समोर बागेसाठी जागा, खूप मोठे घर होते. मी थोडी तात्पुरती भांडीकुंडी बरोबर आणली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे दिवस होते ते. कितीतरी दिवस आमचे सामान कल्याण स्टेशनवर पडून होते. जवळ–जवळ दीड महिन्याने सामान आले. आमच्याकडे फर्निचर वगैरे काहीच नव्हते. स्वयंपाकाची भांडी व काय गाद्या वगैरे असतील त्या. पण इथे भाड्याने सरकारी फर्निचर मिळू शकणार होते. इथल्या मोकळ्या हवेचा व मोठ्या घराचा फायदा म्हणजे मुलींना खेळायला भरपूर जागा. त्यामुळे त्यांच्या तब्बेती खूप सुधारल्या.

पण हे सुख फार काळ टिकले नाही. दोन–तीन महिन्यातच आम्हाला ही जागा सोडावी लागली कारण आमचेच साहेब! Coloured services च्या लोकांना सामावून घेतल्यावर मगच उरलेल्या जागा Civilians ना द्याव्या कारण त्यात सरकारचा फायदा आहे असे Audit Objection यांनी काढले. परिणामी आम्हाला जागा सोडावी लागली. भिंगारे नावाचे यांचे एक सहकारी म्हणाले, ''स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेणारा दादांसारखा माणूस मी पहिल्यांदाच बघतो आहे.''

मधल्या काळात १६ मार्चला माझ्या मोठ्या नणंदेच्या मोठ्या मुलीचे नाशिकला लग्न होते. त्या लग्नाला माझ्या सासूबाई व नवीन लग्न झालेली नणंद आल्या होत्या. नणंदेला दिवस होते व तिचे बाळंतपण आमच्याकडे करावे असा त्यांचा विचार दिसला, पण जिथे आमचेच देव देव्हाऱ्यात नव्हते तिथे ही जबाबदारी मला घेता येणार नाही असे नाईलाजाने सांगावे लागले. मधले दोन महिने फार त्रासाचे गेले. गावात एक दोन खोल्यांच्या जागेत सामान हलवले. त्या जागेत इतके ढेकूण होते की सांगून सोय नाही. एप्रिल व मे असे दोन महिने कसेतरी त्या जागेत

काढले. जूनमधे १५ ते २० दिवस पुण्याला एका लग्नाला जाऊन आले. या अवधीत Coloured services च्या सर्व लोकांना व waiting list वरील Civilianse ना सामावून घेण्यात आले होते व waiting list वर आता आमचाच पहिला क्रमांक होता. ''खुदा देता है तो छप्प्र फाडकर देता है,'' या म्हणीचा या वेळी प्रत्यय आला. यांचे सहकारी श्री. भिंगारे यांची पुण्याला बदली झाली व त्यांचे most-coveted quarter आम्हाला मिळाले.

हे सुभेदार category चे quarter होते. छोटासा बंगलाच म्हणाना! एक व्हरांडा, त्याला लागून एक sitting room, व्हरांडा जाळीने बंद केलेला, मधे विस्तीर्ण अंगण, एका बाजूला toilet, washing place दुसऱ्या बाजूला सरपणासाठी covered व्यवस्था, पुन्हा जाळीने बंद केलेला व्हरांडा. एका बाजूला बाथरूम दुसऱ्या बाजूला कोठी खोली, व्हरांड्याच्या निम्म्या भागात स्वयंपाकघर, बाथरूमपुढे कपडे बदलण्याची व्यवस्था व पाठीमागे दोन living rooms, सरकारी कपाटे, पलंग, टेबल, खुर्च्या वगैरे. आम्ही Local Audit Office मधले नं.२ चे अधिकारी व त्यातच Audit वाले म्हणून जरा जास्तच रुबाब होता. Official hierarchy त राहण्याचा एक वेगळाच अनुभव देवळालीच्या वास्तव्यात मिळाला. तसा विचार केला तर इथे राहणे म्हणजे पाण्यात राहून माशांशी वैर करण्यासारखे होते, कारण त्यामुळे आम्ही trouble-mongers च्या black list मधे होतो.

इथल्या नोकरदार व स्थानिक मंडळींचे एक दत्त मंडळ होते. नाशिकशी संलग्न भगिनी समाज होता. गावात ११ वी पर्यंत एक मराठी माध्यमाची व एक हिन्दी माध्यमाची शाळा होती. Barns school म्हणून एक convent शाळा पण होती. इथून जवळच सावरकरांचे भगूर गाव व जिथे त्यांनी 'मारिता मारिता मरेतो झुंजेन' अशी शपथ घेतली ते देऊळ होते. थंड हवेचे ठिकाण म्हणून अनेक पारशांचे कँटोन्मेंटच्या हद्दीत बंगले होते. कँटोन्मेंटचा एक दवाखाना. निमशहरी व cosmopolitan वस्तीचे गाव. आमचे घर मध्यवर्ती, स्वतंत्र व मोठे असल्याने मंडळाचे १५ ऑगस्ट व २६ जानेवारीचे झेंडावंदन, कोजागिरी इत्यादी कार्यक्रम आमच्या घरात होत असत. जुलै १९५६ ते फेब्रुवारी १९५८ अशी दीड दोन वर्षेच आम्ही या घरात होतो. या अवधीत मी माझी बागकामाची हौस भागवून घेतली.

भिंगारे बाईंना बागकामाची फारशी आवड नसावी पण त्यांच्या आधी राहणाऱ्या मंडळींनी लावलेली केळी व आळू होते. समोर विटांचे आखलेले वाफे वगैरे होते. कौलावर गारवेल व मोगऱ्याची एक–दोन रोपे. एका बाजूला एक रानगुलाब, बाकी सगळे पटांगण ओसाडच म्हणावे असे होते. फाटकापासून दारापर्यंत पंधरा ते

वीस फूट लांब व पाच फूट रुंद लहानसा रस्ता, एका बाजूला मध्यभागी झेंडावंदनासाठी उभारलेला खांब. मी या खांबाभोवती पांढरी व पिवळी शेवंती गोलाकार लावली. कुंपणावर कृष्णकमळ, जाई–जुईच्या वेली लावल्या. एका बाजूला बटाटे, भुईमूग, कोथिंबीर, पालक, मेथी इत्यादिंसाठी वाफे तयार केले. पुढे यांचा L.A.O. बदलून जाताना त्याने अनेक क्रोटन व गुलाबाच्या कुंड्या दिल्या. कॉसमॉस, झेंडू, झीनिया, ॲस्टरची रोपे जाण्यायेण्याच्या वाटेच्या दोन्ही बाजूने लावली. रानटी गुलाबाला आमचा बागाईतदार दूधवाला फडोळ याच्या साहाय्याने दोन–तीन रंगांच्या गुलाबाचे डोळे बांधून घेतले. एकाच रोपाला आलेले दोन–तीन रंगांचे गुलाब बघून खूप गंमत वाटे. पुढच्या हंगामात फडोळकडून रिकाम्या जागेत मका लावायचे ठरले, पण त्याच्या आधीच आमची पुण्याला बदली झाली.

भिंगारे जाताना त्यांचा कुत्रा आम्हाला देऊन गेले. टारझन एक गावठी कुत्रा होता. मुली त्याच्याशी खेळत. इतरांसाठी कर्दनकाळ असलेला हा कुत्रा त्यांनी केलेले हाल मुकाट्याने सहन करी. अगदी त्यांनी केलेला घोडा–घोडा सुद्धा त्याला चालत असे.

या मुक्या प्राण्याच्या स्वामिभक्तीची एक आठवण आजही मनात घर करून आहे. आमचे हे क्वार्टर तसे एकाकीच होते. मागच्या बाजूला सिंगल soldiers' बरॅक, समोर एक बंद पडलेली जुनी बर्फाची फॅक्टरी व त्या फॅक्टरीचा एक पाय गमावलेला बर्वे म्हणून ख्रिश्चन पहारेकरी. फाटकासमोरून जाणारा रस्ता शॉर्टकट म्हणून वापरला जाई एवढीच काय ती जाग. एका बाजूला नाला, मागच्या बाजूला एक सडक व दुसऱ्या बाजूला लांबवर वरिष्ठ हुद्देदारांची क्वार्टर्स. कँटोनमेंट असल्याने तसे सुरक्षित होतो आम्ही.

रोहिणीला ताप येत होता, ५ पर्यंत टेंपरेचर असे. सकाळी कँटोन्मेंटचे डॉ. पंडित तपासून गेले होते व ५ वाजेपर्यंत ताप उतरला नाही तर मला कळवा असे म्हणाले. त्यानंतर ते क्लबमध्ये जात असत. मीना शाळेत, हे ऑफीसात. ताप तर उतरण्याचे नाव घेईना. दिवसभर मिठाच्या पाण्याच्या घड्या ठेवत होते. साडेपाच खेरीज दोघेही घरी येणार नव्हते. डॉक्टरांकडे निरोप ५ च्या आधी जायलाच हवा होता. शेवटी, मनाचा हिय्या करून कल्पना वय वर्षे तीन व रोहिणी वय वर्षे साडेचार दोघींना घरात ठेवून जाण्याचा निर्णय घेतला. कल्पनाला ५–५ मिनिटांनी घड्या बदलायला शिकवले व अक्षरश: धावत जाऊन दवाखाना गाठला. डॉक्टरांना निरोप देऊन तशीच माघारी फिरले. जाताना टारझनला म्हणाले होते, ''टारझन, तुझ्यावर घर सोडून जात आहे. लक्ष ठेव.'' मी परत येईतो चिरंजीव कान उंच करून

दारात बसून होते. मी आल्यावर अंगावर उड्या मारल्या, माझे हात चाटले व बाहेर पळाला. आम्ही पुण्याला परतताना त्याला गावात श्री. बेंद्रे यांनी विनंती केली म्हणून त्यांच्याकडे पोचता केला, पण आमच्या सामानाची बांधाबांध चाललेली बघून तो रोज रडत असे. त्याला पुण्याला आणणे शक्य नव्हते. आम्हीच जिथे बेघर होतो तिथे त्याला कसा नेणार? आम्ही देवळाली सोडल्यावर एकदोन महिन्यातच त्याने अन्नपाणी सोडले व त्यातच त्याचा अंत झाला. आपण त्याला बरोबर आणले नाही ही अपराधी जाणीव आजही आठवण झाली की मन कुरतडते.

इथल्या वास्तव्यात काही स्नेहबंध असे जुळले, की ते आजतागायत टिकून आहेत. मनुष्य स्वभावाचे वेगवेगळे नमुने पाहावयास मिळाले. या वास्तव्यात बदलून आलेली तीन मंडळी सुरुवातीचे काही दिवस माझ्याकडे मुक्कामासाठी होती. एक उपाध्ये, एक पाध्ये व एक रिसबूड. पैकी उपाध्ये अजूनही कधीतरी घरी येतात. जुन्या आठवणी काढून माझ्या नातींना दर वेळी न चुकता, ''मालतीबाई त्या वेळी बाहेरून परीक्षेला बसत होत्या, पण त्यांनी, दादांनी ही ब्याद कशाला माझ्या मागे लावली म्हणून माझा कधी राग केला नाही. दादांबरोबरच त्या माझेही पान मांडीत.'' अशी गोष्ट सांगतात. वास्तविक यात मी विशेष काही केले असे मला कधीच वाटले नाही. गृहस्थाश्रमाचा पाहुणा हा एक अविभाज्य घटक आहे असे माझे वडील म्हणत असत. ते म्हणत, 'माणसाने तीन दगड मांडून चूल मांडली की त्यामागे या सगळ्या जबाबदाऱ्या आपोआपच येतात.' माझ्या आईकडे पण असे कितीतरी जण राहून गेले होते. पुण्या-मुंबईच्या मानाने परप्रांतातील महाराष्ट्रीय मंडळीत ही जाणीव जरा जास्त प्रकर्षाने जाणवते. उपाध्ये म्हणत, ''बायका साधी हिंदीची परीक्षा देतांनासुद्धा किती गाजावाजा करतात.'' त्या परीक्षेची देवळालीच्या वास्तव्यातील ही आणखी एक जमेची बाजू. पदवीधर होण्याचे अनेक वर्षे उराशी बाळगलेले स्वप्न इथल्या वास्तव्यात पूर्ण झाले. उपाध्यांच्या पत्नीचे नाव सुलभा होते म्हणून ते सुकाका व त्या सुकाकू.

दुसरे गृहस्थ रिसबूड. त्यांनी बिऱ्हाड मांडल्यावर एक दिवस आम्हाला जेवायला बोलावून मला ब्लाऊजपीस व यांना शर्टपीस देऊन कृतज्ञता व्यक्त करण्याऐवजी उपकाराची परतफेड केली असेच म्हणावे लागेल. कारण नंतर त्यांचेशी फारसे संबंध उरले नाहीत. सदर गृहस्थांना दादांचा थोडा हेवा वाटत असावा, कारण ते जवळ जवळ सहा सात वेळा S.A.S. part two ला नापास होऊन आयुष्याच्या शेवटी केव्हातरी Accountant झाले. त्यांची बायको पण हिन्दीच्या परीक्षा देऊन शिक्षक सनद झाली, पण मला नोकरी मिळाली व त्यांना मिळू शकली नाही

याचाही राग त्यांच्या मनात असावा, असे वाटते.

तिसरा पाध्ये नावाचा माणूस. त्याने आमच्याकडून गेल्यावर कुठलाच काहीच संबंध ठेवला नाही. कधी साधी ओळखही दाखवली नाही.

देवळालीच्या वास्तव्यात जुळून आलेले आणखी स्नेहाचे धागे म्हणजे श्री. गाडगीळ, श्री. जोशी व श्री. भिंगारे कुटुंबीय. श्री. गाडगीळ हे इथल्या मराठी शाळेचे मुख्याध्यापक. त्यांची पत्नी मीराबाई. यांची गौरी नावाची मुलगी कल्पना, रोहिणीच्या वयाची. त्यांची छान मैत्री होती. श्रीमती गाडगीळ बुद्धिमान असून S.P. च्या गणिताच्या केरकर Prize winner पण बाईला डामडौल व बडेजावीची हौस फार. लग्न करतेवेळी श्री. गाडगीळ हे धारवाडच्या कॉलेजमध्ये जर्मन विषयाचे प्रोफेसर होते. पुढे कॉलेजने जर्मन विषय बंद केल्याने अर्थातच त्यांची नोकरी सुटली. कदाचित त्यानंतरच B.Ed वगैरे करून शिक्षकी पेशा पत्करावा लागल्याने झालेला हिरमोड, त्यामुळे त्या नाराज असत.

देवळालीला सर्व मंडळी एकमेकांना दिवाळीत फराळाला बोलवीत. गाडगीळां–कडील फराळाच्या कार्यक्रमाचे वेळी त्यांच्याकडील करंजीची पारी जाड म्हणून एका आगावू बाईने त्यांची टिंगल केली तेव्हा मला अतिशय राग आला. मी विचारले, ''इथे जमलेल्या गृहिणींपैकी कितीतरी जणींनी S.S.C. चा उंबरठासुद्धा ओलांडलेला नाही व ज्यांनी तो ओलांडला असेल त्यांनी आपल्या गुणपत्रिकेत गणितात किती मार्क मिळाले आहेत ते तपासून बघावे. उत्तम स्वैंपाक करणे ही जरी कला असली तरी माणसाच्या योग्यतेचा तो एकच निकष असू शकत नाही. परमेश्वर स्वत: जरी निर्गुण निराकार असला तरी प्रत्येकाला तो काही ना काही गुण देऊनच जगात पाठवत असतो. आपल्याला जे नाही त्याची टिंगल करण्याऐवजी जे आहे त्याचा आदर करायला शिकले पाहिजे.'' त्यामुळे खिन्न झालेल्या मीराबाई सुखावल्या. श्री. गाडगीळ पुढे पुण्याला नानावाड्याच्या म्युनिसिपल स्कूलमध्ये मुख्याध्यापक म्हणून आले व इथे शिक्षण शास्त्रातली Ph.D. चित्राताई नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली मिळविली. मीराबाईंनी B.Ed वगैरे करून शाळेत नोकरी मिळवण्याचा प्रयत्न का केला नाही मला हे कधीच कळले नाही.

श्री. भिंगारे व्युत्पन्न व व्यासंगी माणूस! त्यांना तिघे मुलगे होते. कधी मुलगा–मुलगी असे विषय निघाले की म्हणत, ''अहो वहिनी, काय घेऊन बसलात मुलगा का मुलगी. तुमच्या मुलींसारख्या मुली असत्या तर डोक्यावर घेऊन नाचलो असतो मी! त्यांची मुले व पत्नी बुद्धिमत्तेच्या बाजूने अगदीच बेताची असल्याची खंत कुठे तरी त्यांना बोचत असे. त्यांचे व S.A.S. च्या परीक्षेचे गोत्र

कधी जमले नाही. मी त्यांना म्हणे, ''अण्णा, you are a misfit. कुठेतरी प्रोफेसर असायला हवे होतात तुम्ही.'' ते म्हणत, ''खरे आहे तुमचे म्हणणे, पण काय करणार? मोठा मुलगा पडलो मी. ग्रॅज्युएट झाल्या झाल्या मिळेल ती नोकरी स्वीकारावी लागली. पण मला त्याचा पश्चात्ताप नाही. त्यामुळेच माझा धाकटा भाऊ Ph.D. करू शकला.'' मागच्या पिढीत अशा कितीतरी बुद्धिमान व्यक्तींना प्रकाशात येण्याची संधी मिळाली नाही. याचे आणखी एक उदाहरण म्हणजे इथल्या मराठी माध्यमाच्या शाळेतील गणिताचे कापरेकर मास्तर. एक किरकोळ शरीरयष्टीचा, ठेंगणा, बावळट दिसणारा, लोकांच्या थट्टेचा विषय असलेला माणूस. सायकलवर जाताना belt व clips ऐवजी दोरीने पँट बांधणारा हा गृहस्थ एका गणिताच्या थियरमचा संशोधक आहे हे पुढच्या आयुष्यात मी रोहिणीकडे बंगलोरला असताना जेव्हा कळले तेव्हा मी अक्षरश: थक्क झाले. देवळाली ते डोंबिवली या प्रवासात त्यांना ही कल्पना सुचली म्हणून त्यांनी त्याचे डेम्लो थियरम असे नामकरण केले. खात्री करून घेण्यासाठी मी परत आल्यावर श्री. गाडगीळ यांचेकडे चौकशी केल्यावर कळले की त्यांच्या सर्व्हिसबुकमध्ये ते एकदा फ्रान्सला जाण्यासाठी रजेवर गेल्याची नोंद होती. पण ही गोष्ट गाडगीळ तिथे मुख्याध्यापक म्हणून जाण्याअगोदरची होती. विचार येतो, ''त्या वेळी जर किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना असती तर?'' अशी कितीतरी कापरेकरांसारखी झाकली माणिके स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळात पैलू पाडल्याशिवायच काळाच्या पडद्याआड गेली असतील. त्यांच्याबद्दल सांगताना रोहिणीचे एक सहकारी म्हणाले, त्यांना परदेशात फार मान होता. त्यांचे I.I.S.C.त एकदा व्याख्यान झाले त्या वेळी त्यांची ओळख करून देताना I.I.S.C चे गणिताचे Head of the Department म्हणाले होते, "Mathematics is the king of sciences and Arithmetics is the king of mathematics. Today, you are going to hear a king of Arithmetics," अशी ही वल्ली!

जोशी कुटुंब साधेसुधे इतरांच्या सतत उपयोगी पडणारे, काटकसरी पण कंजूस नसलेले. सदर गृहस्थांचे वडील लहानपणीच घर सोडून निघून गेलेले. त्यामुळे आईच्या माहेरी लहानपण गेलेले. अक्षरश: तुळशीबागेच्या बाहेर सतरंजीच्या तुकड्यावर पंचांग, वाती, उदबत्त्या वगैरे विकून प्रपंचाला थोडाफार हातभार लावीत. मॅट्रिक झाल्यावर नोकरीला लागले. शाळेत जात असतानाच एका घड्याळाच्या दुकानात नोकरी करीत असताना घड्याळ दुरुस्ती शिकले. गृहस्थ जन्मजात मेकॅनिक. कोणतेही मशीन असो, त्याच्या दुखऱ्या भागाची ते अचूक

पारख करीत. त्या वेळी ते देवळालीला C.M.E. मध्ये आर्टिलरीकडे सुपरवायझर होते. त्यांची मोठी दोन मुले त्यांच्या पुण्याच्या जागेत मावशीबरोबर राहात असत व धाकट्या दोन मुली देवळालीला होत्या. त्या मीनाच्या बरोबरीच्या होत्या. गोखल्यांचा बंडू, आपट्यांचे रवी व विनू, भिंगाऱ्यांचा गिरीश, जोश्यांच्या शैला व भारती आणि आमची मीना असा त्यांचा ग्रूप होता. सगळी कॉर्पोरेशनच्या शाळेत जात. एकदा काही कारणाने मला शाळेत जावे लागले. बारणे नावाच्या बाई. वर्गावर खिडकीला त्यांच्या बाळाची झोळी बांधलेली, अशा थाटात शिकवणे चालू होते. त्या वेळी मीना मराठी चौथीत होती.

काका जोशांचे लहानपण असे विस्कटलेले असल्यामुळे त्यांचा स्वभाव थोडा रुक्ष होता. गाणे बजावणे, हौसमौज म्हणजे वायफळ गोष्टी आहेत असे त्यांचे मत होते. परिस्थितीला माणूस कसा react होईल सांगता येत नाही. काही संधी मिळताच नाकारल्या गेलेल्या गोष्टी मिळतील तशा ओरबाडायला बघतात तर काही काकांसारखे! थंड पाण्याची आंघोळ, स्वत:चे कपडे स्वत: धुणारे व त्यांच्या मते वायफळ वाटणाऱ्या खर्चाला कात्री लावणारे. पण त्यांची एक गंमत अशी होती की त्यांना जर पटवून दिले की अमुक गोष्ट वायफळ नसून फायद्याची आहे, तर तत्काळ अंमलात आणणारे. गंमत अशी झाली, की मी माझ्याकडे एक जुना पितळी डबा होता त्यात कुकर लावीत असे. तो बुडातून फुटल्यावर मोडीत घातला व भर घालून नवा आणला. तो पाहिल्यावर इंदूताई म्हणाल्या, ''मी कधीची कुकरच्या डब्यासाठी यांच्या मागे लागले आहे पण ऐकतील तर शपथ.'' त्या डालडाच्या पत्र्याच्या डब्यात कुकर लावीत. कशी कोण जाणे मला एक कल्पना सुचली. मी त्यांना विचारले हा तुमचा पत्र्याचा डबा केवढ्याला मिळतो व किती दिवस टिकतो? त्या म्हणाल्या आठ आण्याला मिळतो व सहा महिने टिकतो. मी इंदूताईंना म्हणाले, ''तुम्हाला पितळेचा कुकर मिळवून देणे माझ्याकडे लागले.'' गप्पा गप्पांमध्ये विषय निघाल्यावर मी काकांना म्हणाले, ''काका, तुम्हाला जर पुराव्यानिशी पटवून दिले की पितळी डबा घेणे फायदेशीर आहे तर इंदूताईंना पितळी कुकर घेऊन देणार का?'' ते म्हणाले, 'आधी मला पटू दे मग सांगतो.' त्या वेळी मध्यम आकाराचा पितळी कुकर आठ रुपयांना मिळत असे. मी म्हणाले, 'तुम्ही आम्हाला आठ रुपये कर्जाऊ द्या. दर सहा महिन्यांनी पत्र्याच्या डब्यासाठी लागणारे आठ आणे त्याचे व्याज समजा व सरते शेवटी बुडात फुटेल तेव्हा त्याचे मोडीच्या भावाने जे पैसे येतील तो तुमचा फायदा. आहे की नाही फायद्यात पडणारा पितळी कुकर?'' हा युक्तिवाद त्यांना इतका पटला की दुसऱ्या दिवशी इंदूताईंना पितळी कुकर मिळाला. इंदूताई म्हणाल्या,

''आम्हाला नाही बाई तुमच्यासारखे बोलता येत.'' इंदूताईंचा आवाज इतका चांगला होता, की कोजागिरीच्या रात्री त्यांनी म्हटलेली 'अंबरात नाजुकशी चंद्रकोर हासे' ही विरहिणी आजही काळजाला हेलावून टाकते. त्यातली असाहाय्य विव्हळता, कातरता लाजवाब. पण गृहस्थाने त्यांच्या गाण्याला वाखाणले नाही. त्यांची मुलगी त्यांना औरंगजेब म्हणे कारण इच्छा असूनही त्यांनी तिला गाणे शिकू दिले नाही. इंदूताईंचे थोरले बंधू उत्तम गायक. त्यांच्या घरी संगीताच्या मैफली होत. कुटुंबातील सर्वच संगीतप्रेमी. कोणी तबल्यावर, कोणी पेटीवर अशा संगीतमय वातावरणात लहानपण गेल्यामुळे इंदूताईंच्या उपजत गोड आवाजावर संगीताचे सुंदर संस्कार रुजले होते. अशा वातावरणातून आलेल्या इंदूताईंना सासरी रुजताना किती त्रास झाला असेल हा विचार मनात आल्याशिवाय रहात नाही.

देवळालीच्या या वास्तव्यात एक घटना अशी घडली की ज्यामुळे माझे भावविश्व अंतर्बाह्य ढवळून निघाले. माझा भाऊ Textile Engineering च्या दुसऱ्या वर्षाला होता. वर्गात सतत पहिल्या दोन–तीन नंबरात असणारा हा मुलगा! टेबल टेनिस खेळणारा, नाटकात काम करणारा, बक्षिसे मिळवणारा. मागे केव्हातरी इंजिनियरिंगला ॲडमिशन मिळाली नाही तर काहीतरी हाताशी असावे म्हणून रेल्वेत त्याने apperentice या कोर्ससाठी trainee अर्ज केला होता. त्यात सिलेक्शन झाले व वाढत्या महागाईने बेजार झालेल्या वडिलांनी शिक्षण सोडून ही संधी घ्यावी असा आग्रह धरला. कारण त्यांना आमच्याच एका नातेवाईकाने सांगितले की Textile Engineering ला फारसा scope नाही. पूर्वीच्या काळी सामान्यत: अशी एक गैरसमजूत होती की खेळ किंवा नाटकात रुची असणे म्हणजे वेळ वाया दवडणे, म्हणून किंवा वय झाल्यामुळे आलेल्या असुरक्षिततेच्या भावनेमुळे म्हणा त्यांनी हा निर्णय घेतला. या कोर्सच्या काळात दरमहा रु. १२५/–विद्यावेतन मिळणार होते. माझ्या भावाने पत्र लिहून मी त्याला शिक्षणासाठी मदत करू शकेन का असे विचारले. एकादशीच्या घरी शिवरात्र पाहुणी असाच काहीसा प्रकार होता. एकीकडे आम्ही सतत नापास होणाऱ्या भावासाठी खर्च करीत होतो व दुसरीकडे एका होतकरू व हुशार मुलाला शिक्षण सोडावे लागत होते. कारण काय तर एक भाऊ नवऱ्याचा व दुसरा बायकोचा होता. मी आज मुलगा असते, मिळवती असते तर ही वेळ आली नसती असे वाटले. मुलगी म्हणून जन्माला आल्याचे इतके दु:ख यापूर्वी कधीच झाले नाही. संध्याकाळी घरी आल्यावर माझा उतरलेला चेहरा व मी करीत असलेली चिडचिड पाहून यांनी विचारल्यावर मी भावाचे पत्र यांच्यापुढे टाकले व माझी मनोव्यथा बोलून दाखवली. एक उसासा

टाकून म्हणाले, ''खरे आहे तुझे म्हणणे, पण काय करू गं? मला शक्य झाले असते तर मी याला पण शिकवले असते. तरी पण तू वडिलांना लिहून टाक की एक जूनपासून मी तुम्हाला दरमहा रु. २५/– पाठवू शकेन. या वर्षीची पंधरा रुपये पगारवाढ व G.P. fund minimum वर आणून तेवढे जमेल मला. शिक्षण सोडावे लागण्याचे दु:ख काय असते याचा अनुभव घेतला आहे मी. पण वडिलांनी हा प्रस्ताव नाकारला. म्हणाले, ''घरचे झाले थोडे व व्याह्याने धाडले घोडे असा हा प्रकार होतो आहे. आमचे प्रश्न आमचे आम्हालाच सोडवले पाहिजेत. शिवाय मी त्याला second best option निवडायला सांगतो आहे इतकेच.''

भट्टीत टाकल्यावर सोने अधिक झळाळून उठते तसाच काहीसा प्रकार या भावाच्या बाबतीत घडला. त्याने बाहेरून AMIE च्या परीक्षा दिल्या व UPSC selection मध्ये १९७० साली Assistant Executive Engineer या पदासाठी निवडला गेला. त्याच्या बुद्धिमत्तेचा कस लावणारी एक घटना त्याच्या ट्रेनिंगच्या काळात घडून आली. सयाजीराव गायकवाडांच्या महालात राजपुत्रांसाठी एक Toy Railway होती. तिचे कमेटी बागेत स्थलांतर करून बाल गोपालांसाठी खुली करण्याचा निर्णय स्वातंत्र्योत्तर काळात घेण्यात आला होता. कमीत कमी झाडे पाडून दीड किलोमीटर लांबीच्या मार्गावर ही गाडी धावणार होती. तज्ज्ञ तंत्रज्ञांनी तयार केलेल्या मार्गावरून धावताना ही रेल्वे पुन्हा पुन्हा रुळावरुन घसरत होती. चूक कुणालाच कळत नव्हती. म्हणून रेल्वे खात्याची मदत घेण्याचे ठरले. उद्‌घाटन आठ दिवसांवर आले होते. त्या वेळेच्या बडोद्याच्या Executive Engineer ने माझ्या भावाला या कामासाठी पाठवले. कुठलीही पूर्वीची माहिती नसताना माझ्या भावाने त्या curvatures मधली चूक निरीक्षणाने व गणिते करून शोधून काढली. आठ दिवस अविश्रांत प्रयत्न केले व उद्‌घाटनाच्या एक दिवस अगोदर जेव्हा ही गाडी न पडता तीन–चार वेळा त्या मार्गावर धावली तो क्षण अविस्मरणीय होता. जीवराज मेहता बरोबरच्या पार्टीला धुवट पायजमा सदरा घालून हा मुलगा सायकलवर निमेठ्याला गेला होता. त्या वेळी तो अवघा २२–२३ वर्षांचा होता. त्याने पुढे रेल्वेतून निवृत्त होण्या अगोदर कोकण रेल्वेवर track expert म्हणून काम केले व निवृत्तीनंतर England मधील गाड्यांचे वेग वाढवण्यासाठी तयार करण्यात आलेल्या यंत्रणेत पण track expert म्हणून काही काळ काम पाहिले. ''भगवानके घरमें देर होती है लेकिन अंधेर नही,'' या म्हणीचाच प्रत्यय आला. आपल्या नोकरीच्या काळात त्याने एक असे तळहाताएवढे उपकरण बनवले होते ज्यामुळे त्याला आवश्यक असलेली सर्व मापे घेता येत असत. पण त्याला त्याचे

पेटंट घेता आले नाही कारण तो सरकारी नोकर होता. माणसाच्या यशस्वितेचे मोजमाप पैशात न करता कर्तृत्वात करावयाचे ठरवले तर आम्हा भावंडांमध्ये त्याला पहिला क्रमांक द्यायला हरकत नसावी.

देवळालीला असताना यांना दर सहा महिन्यांनी भुसावळला ऑडिटसाठी १५ दिवस जावे लागत असे. भुसावळ म्हणजे केळ्यांचे आगर. येताना केळ्यांचा घड आणीत. मुलींना रोज घडावरून काढून केळे खाताना खूप मजा वाटे. याच वेळी मोठ्या मामांची प्रमोशनवर जळगावला बदली झाली होती. एका ऑडिटच्या वेळी ठरवून आम्ही पण चार दिवस जळगावला गेलो व हे भुसावळहून आले. अजिंठ्याची लेणी पाहून आलो. दत्त मंडळाची ट्रीप वणीला गेली त्या वेळी सप्तशृंगी देवीची यात्रा घडली. ऑफिसच्या ट्रीपबरोबर दारणा डॅमला गेलो.

हे वर्ष टिळक जन्म शताब्दी वर्ष असल्याने भगिनी मंडळात सावरकरांच्या वहिनी माई सावरकर उपस्थित होत्या. त्या करारी त्यागमूर्तीला बघून व त्यांनी सांगितलेल्या आठवणी ऐकून मन भारावून गेले. एकूण पुण्याच्या आयुष्यापेक्षा नाशिकचे वास्तव्य सामाजिक जाणिवेच्या मर्यादांची व्याप्ती वाढवणारे ठरले असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

देवळालीचे दत्त मंडळ पुणे विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळाशी संलग्न असल्याने अनेक मान्यवरांच्या व्याख्यानांची तीन दिवसांची सत्रे होत असत. त्या निमित्ताने कमलाबाई देशपांड्यांचा पाहुणचार करण्याची संधी मिळाली. मंडळाच्या गणपती उत्सवात भगिनी मंडळातर्फे एक-अंकी नाटक बसवून सादर केले. ब्रुक बाँड कंपनीचे मॅनेजर श्री. शुक्ल यांच्या पत्नीकडून क्रेपची फुले शिकायला मिळाली. हा दोन वर्षांचा काळ खूप आनंदात गेला.

देवळालीच्या ह्या वास्तव्यात विशेष लक्षात राहिलेले आणखी एक पाहुणे म्हणजे माझे सर्वांत मोठे डॉ. चुलत दीर श्री. सदूभाऊ गोडबोले.

ते घरी आले तेव्हा दुपारचे साडेतीन-चार वाजले होते. त्या वेळी हल्लीसारखी फोन वगैरेची सोय नव्हती. ह्यांना यायला एक दीड तासाचा अवधी होता. मीना शाळेतून यायला अवकाश होता. मी चहापाण्यात गुंतलेली असताना कल्पना, रोहिणीनी त्यांचे भरपूर मनोरंजन केले. मीना तेव्हा चौथीत होती. तिच्या पुस्तकातल्या सर्व कविता त्या दोघींनी त्यांना म्हणून दाखवल्या. कल्पनाच्या बोबडया आवाजातल्या कविता ऐकून दोघांची हसून-हसून मुरकुंडी वळली. आमचे छोटेखानी स्वतंत्र घर, बाहेरील बाग बघून ते खूप खूष झाले. टेबलावरील अभ्यासाची पुस्तके पाहून त्यांना मी बाहेरून B.A. ला बसत असल्याचे कळले.

मी उत्तर भारतातली हिन्दी माध्यमातली असूनही मराठी ऑनर्स घेऊन परीक्षेला का बसते आहे असा त्यांना प्रश्न पडला. तेव्हा मी इंग्रजी चौथीत असताना माध्यम बदलल्याचे सांगितले व गेली ७–८ वर्षे पुण्यात काढली आहेत तेव्हा मराठी जमेल असे वाटल्याचे सांगितले कारण देवळालीला राहून हिन्दी घेऊन बसावयाचे झाल्यास हिन्दी लायब्ररीसाठी H.P.T. कॉलेजमध्ये जावे लागणार होते व ते कॉलेज आमच्या घरापासून खूपच लांब होते. मराठीसाठीसुद्धा नाशिकला जावे लागे, पण त्या मानाने ते जरा सोपे होते.

त्या दिवशी आम्ही रात्री बारा वाजेपर्यंत गप्पा मारीत बसलो होतो. सगळ्या मागच्या गोष्टींची उजळणी झाली. एकत्र कुटुंबातल्या गमती–जमती, हेवेदावे, कुरबुरी, भांडणे, उखाळ्या–पाखाळ्या सगळ्यांची हजेरी लावली. करता करता गाडी लग्न जुळवताना होणाऱ्या फसवणुकांवर आली. भावजी गमतीने म्हणाले, ''मालती, तुझी कशात झाली आहे फसवणूक? आमची बायको म्हणते तिची गड्डयातच फसवणूक झाली आहे.'' मी म्हणाले, ''नाही माझी गड्डयात फसवणूक झाली नाही कारण तो आम्ही नीट पारखून घेतला होता. पण तपशीलात मात्र नक्कीच फसवणूक झाली आहे. मुलाच्या माहितीत एक भाऊ व एक बहीण अशी नोंद असली तरी प्रत्यक्षात अर्ध्याहून जास्त क्रिकेटची टीम घरात होती. प्रत्येक मुलगा आई–वडिलांची म्हातारपणाची काठी असतो हे माहीत आहे मला, पण आम्हाला जेवायला तूच घाल, आमच्या मुलींची लग्ने व मुलांची शिक्षणे पण तूच कर इतका भार या काठीवर आहे हे माहीत नव्हते मला. आणि भाऊ तरी कसे, नुसते परीक्षा पंढरीचे वारकरी. एकेका वर्गात तीन–तीन वर्षे काढणारे. दहा वर्षे झाली आमच्या लग्नाला पण एकाचेही हाताशी येण्याचे नाव नाही. धरले तर चावते आणि सोडले तर पळते अशी स्थिती झाली आहे आमची. मनावरचे संस्कार जबाबदारी झटकून मोकळे होऊ देत नाही आणि ती पेलवत पण नाही अशी अवस्था आहे आमची. शेवटी आता या दोघी शाळेत जायला लागल्या की B.Ed करून नोकरी करावी असा विचार करते आहे. S.N.D.T. चे B.Ed कॉलेज ११ ते ५ असते ते जमेल मला. म्हणजे काडी मोडायला नको आणि डोळा पण फुटायला नको.'' वातावरण एकदम जरा गंभीर झाले.

मी त्यांना माझ्या भावाची हकीगत सांगून माझी मनोव्यथा बोलून दाखवल्यावर म्हणाले, ''खरंय तुझं म्हणणं. या सगळ्याला गणूतात्यांचा आडमुठा स्वभावच कारणीभूत आहे. कमलाकरच्या जन्मानंतर तुमच्या दुसऱ्या बायकोला पण आता मुलगा झाला आहे तर तुम्ही फॅमिली प्लॅनिंगचे ऑपरेशन करून घ्या असा सल्ला

मी दिला होता. पण त्यांनी माझे म्हणणे ऐकले नाही. ऐकले असते तर आज ही वेळ आली नसती.'' तोच धागा पुढे पकडून मी त्यांना म्हणाले, ''भाऊजी, तुम्ही पुढच्या पिढीतला मोठा मुलगा म्हणजे पुढच्या व मागच्या पिढीतला दुवाच म्हणाना. एक विचारले तर न रागावता उत्तर द्याल मला? सरला वहिनींचा भाऊ तुमचा मित्र होता. अशा परिस्थितीत तुम्ही हे लग्न कसे होऊ दिलेत? वेडा माणूस लग्न केल्याने सुधारत नाही हे बापूसाहेबांना माहीत नसले तरी as a doctor तुम्हाला तर माहीत होते ना? का मोडता घातला नाही तुम्ही या लग्नाला?'' ''अगं, मी माझ्या मित्राला म्हणालो होतो की तुझ्या जागी मी असतो तर या ठिकाणी मी बहीण नसती दिली.'' ''म्हणजे तुम्ही 'नरो वा कुंजरो वा' असेच वागलात ना?' ''मालती, अशी उलट तपासणी नको घेऊन माझी. आजपर्यंत मला असे प्रश्न कोणी विचारले नाहीत आणि तू पण विचारू नकोस. मी उत्तर नाही देऊ शकणार तुझ्या प्रश्नांना. असे जरी असले तरी मी सरलाच्या हिताची, बापूसाहेबांचा मुख्य विश्वस्त म्हणून पूर्ण जबाबदारी निभावतो आहे. यशवंता चांगला नोकरीला लागला आहे. तिच्या मुलींची लग्ने चांगल्या ठिकाणी झाली आहेत. सरलाने पण शिवण काम शिकून पुढच्या बाजूला दोन दुकाने बांधून वाढत्या महागाईला तोंड दिले आहे.'' ''काही जरी असले तरी एका भाबड्या जिवाची हकनाक होरपळ झाली असे नाही वाटत का तुम्हाला? माझ्या सासूबाई व सरला वहिनी या दोघींवर फार अन्याय झाला आहे असे माझे स्पष्ट मत आहे,'' मी म्हणाले.

या माझ्या जाऊबाई नावाप्रमाणेच सरळ व देवभोळ्या होत्या. एकदा मी त्यांना विचारले, ''सरला वहिनी तुम्ही कशासाठी हरताळका, वटसावित्रीसारखी व्रते करता? तुम्हाला सात जन्म असा वेडा नवरा हवा आहे का? त्यावर त्या म्हणाल्या, ''नाही हो, मी देवाला सांगते की हाच नवरा मला शहाणा करून दे.''

या माझ्या दिराच्या मनात माझ्या सासऱ्यांबद्दल बराच राग होता. त्यांच्या वडिलांच्या कागदपत्रांमध्ये त्यांना माझ्या सासऱ्यांनी त्यांच्या वडिलांकडून लिहून घेतलेली एक प्रॉमिसरी नोट सापडली होती व ती खंत त्यांनी या वेळी पुन्हा बोलून दाखवली. तेव्हा हे त्यांना म्हणाले, ''भाऊ, आपण किती दिवस या जुन्या गोष्टी उगाळत बसणार आहोत? माझे वडील tax payer होते. त्यांना या नोटेमुळे tax मध्ये सवलत मिळणार असेल व म्हणून त्यांना ती लिहून घ्यावी लागली असेल, असे निदान मला तरी वाटते. कारण जर तुझ्या वडिलांनी पैसे फेडले असते तर ती नोट नियमाप्रमाणे फाडून टाकायला हवी होती व फेडले नसतील तर ती माझ्या वडिलांकडे असायला हवी होती. ती तुला तुझ्या वडिलांच्या

कागदपत्रांमध्ये सापडली यावरून अविश्वासाशिवाय दुसरेच काही तरी कारण ती लिहून घेण्यामागे असेल असे वाटत नाही का तुला? वामन तात्यांकडून पण याबद्दल मी ऐकले आहे. त्याच्याही पुढे जाऊन मला असे म्हणायचे आहे की आपण झाले गेले विसरून जाऊ व नव्याने सुरुवात करू या. माझ्यापुरते बोलायचे झाले, तर तू वेळेवर माझे हार्नियाचे ऑपरेशन करवून घेतलेस व मला एक निरोगी आयुष्य दिले आहेस.'' यांच्या या बोलण्याने वातावरणातला गढूळपणा किंचित कमी झाला. मग हजेरी लागली धाकट्या काकांनी बापूसाहेबांना लिहिलेल्या पत्राची. माझ्या धाकट्या चुलत सासऱ्यांनी विश्वनाथ नीलकंठांना एक पत्र लिहून त्यात त्यांच्या मुलाच्या देखभालीसाठी दरमहा शंभर रुपयांची मागणी करणारे पत्र लिहिले होते. हेच पत्र एकत्र कुटुंबाचे विभाजन होण्याचे मुख्य कारण होते. त्यानंतरच बापूसाहेबांनी आपल्या संपत्तीचा ट्रस्ट केला व डॉ. भाऊजींची मुख्य विश्वस्त म्हणून नेमणूक केली. हे धाकटे चुलत सासरे सात वेळा ऐन वेळी कच खाऊन एल.एल.बीला बसले नाहीत. काही दिवस आपल्या मामांकडे उमेदवारी करून स्वतंत्र प्रॅक्टिस सुरू केली पण मिळकत व खर्च यांचे प्रमाण मियाँ मूठभर व दाढी हातभर असेच राहिले. पुढे मुलाच्या मुंजीत कोणाचे तरी पैसे वापरले व ते परत करू न शकल्याने पोलिस पकडतील या भीतीने त्यांना घेरले. त्यातून त्यांचे मानसिक संतुलन बिघडले. अगदी वेड जरी नाही तरी प्रॅक्टिसवर परिणाम झालाच. या कुटुंबाचे फार हाल झाले. त्यांची पत्नी श्रीमंताकडची पण बाईने व मुलांनी कुटुंब सावरून नेले. मुलगी नोकरीला लागली. माझा दत्तक गेलेला दीर हाताशी आला, मामाने थोडीफार मदत केली. त्यांची दोन मुले कर्तबगार निघाली. मोठा शिकवण्या करून कुटुंबाला हातभार लावत सी.ए. झाला. मधला, रात्रीच्या शाळेत शिकवून आपली मेडिकलची फी भागवत असे.

थोड्याच दिवसातच आम्ही देवळालीहून पुण्याला प्रयाण करते झालो.

झाले असे की यांच्या खात्याने seniority प्रमाणे प्रमोशन्स न करता मुलाखती घेऊन प्रमोशन्स करावयाचे ठरवले. हे दिल्लीला मुलाखतीसाठी जाऊन आले. निकालाची वाट पाहात असताना वऱ्हाडातून मामंजींचे S.O.S.- type पत्र आले. ''मला घरातली माणसे फार त्रास देतात. मी आहे नाही ते त्यांना देऊन टाकतो, तू येऊन मला घेऊन जा.'' आम्ही विचारात पडलो. जर सिलेक्शन झाले तर पोस्टिंग कुठे मिळेल कळत नव्हते. घरी काय झाले होते काहीच कळत नव्हते. पण या वेळी मात्र यांना वडिलांचा जरा रागच आला होता. यांच्या मते जर घर नावाने करून ते आमच्याकडे आले तर बाकीची मंडळी खातील काय? घराचे तुकडे मोडून थोडेच खाता येणार होते? गावात छी–थू होईल ती निराळीच. यांनी

पहिल्या प्रथम वडिलांना जरा कडक पत्र लिहिले व सांगितले की, ''त्या मंडळींच्या हाल अपेष्टांना पर्यायाने तुम्ही कारणीभूत आहात. तुम्ही स्वत:ला त्यांच्यापासून असे निराळे काढू शकत नाही. मी जे पैसे पाठवतो ते तुमच्या एकट्यासाठी नसून सर्वांसाठी पाठवतो. माझ्या बदलीच्या नोकरीत मी तुमची जबाबदारी घेऊ शकत नाही. काही कारणाने उद्या जर फ्रंटवर जावे लागले तर माझी बायकोच मुलींना घेऊन परतवाड्याला येऊन राहील. मीना आता चौथीत आहे. ती S.S.C. होईपर्यंत तरी मी पुण्याला बिऱ्हाड ठेवून बदलीच्या गावी जाणार नाही. ज्या शाळेत आम्ही शिकलो तिथेच मुली पण शिकतील. मी दोन–दोन बिऱ्हाडांची कसरत कशी पार पाडतो आहे हे माझे मलाच ठाऊक. तरी भांडणे न करता जुळवून घेऊन घरीच राहिलात तर बरे होईल.'' आणि बोलाफुलाला गाठ पडावी असे झाले. आम्हाला मित्रांची अभिनंदनाची पत्रे आली, कारण मुलाखतीत यांचा भारतात प्रथम क्रमांक आला होता व दिल्लीला जावे लागणार होते. पण हा आनंद सुद्धा फार काळ टिकला नाही. या सिलेक्शनमध्ये कोणाचा तरी कोणीतरी शेवटचे तीन सलग confidential reports नीट नसल्याने निवडला गेला नव्हता. त्यामुळे हे सिलेक्शनच रद्दबातल करण्यात आले व आमची बदली दिल्लीऐवजी पुण्याला झाली. ती बदली सुद्धा एका विशिष्ट जबाबदारीची कामगिरी यांच्यावर सोपवण्यासाठी झाली होती. अशा रीतीने आम्ही १६ फेब्रुवारी, १९५८, या दिवशी परत पुणेकर होणार असे ठरले.

माझी B.A. ची परीक्षा पाच एप्रिल रोजी सुरू होणार होती. पूर्ण विचारांती पुणे सेंटरची निवड केली होती त्यामुळे एक प्रश्न सुटला होता. १ फेब्रुवारी ते ५–६ मार्चपर्यंत सामानाची बांधाबांध, मुलींचे शाळा प्रवेश यातच गेले. जागेचा प्रश्न तात्पुरता सोडवला होता. मोठ्या मामांची जळगावला बदली झाली होती. पुण्याला धाकटे मामा–मामी, त्यांची दोन मुले व मोठ्या मामांच्या दोन मुली राहात होत्या. त्यांच्या स्वयंपाक घरासमोरची पडवी व तिला भिंतीमधल्या जिन्याने जोडलेली वरच्या मजल्यावरची एक खोली मामांना पत्र लिहून तीन महिन्यांपुरती मिळवली व आम्ही पुण्याला आलो. त्या दिवशी महाशिवरात्र होती.

परीक्षा संपल्यावर मी जागा शोधायला सुरुवात केली. रेव्हेन्यू कॉलनीत चितळे यांच्या बंगल्यात तीन खोल्यांची जागा दरमहा साठ रु. भाड्याने मिळू शकणार होती. मुलींना हुजूरपागेतून मॉडर्न हायस्कूलमध्ये घालायचे ठरवले व तसे मामांना सांगितले. त्यावेळी शाळा बदलणे आजच्याइतके अवघड नव्हते.

याच सुमाराला मामांच्या धाकट्या बहिणीचे यजमान क्षयाने आजारी पडले.

सदर गृहस्थ B.A.LL.B. असूनही काही न करणारे होते. वडिलांनी यांच्या नावे ठेवलेली बरीचशी इस्टेट उधळून झाली. पाच मुली व दोन मुलगे इतका परिवार होता. ''तुझे भाडे मला सुमतीला द्यायला उपयोगी पडेल, तेव्हा तू दुसरीकडे राहावयास न जाता इथेच राहिलास तर बरे होईल,'' असे मामा यांना म्हणाले.

आमच्या दृष्टीने पण हा प्रस्ताव फायदेशीर होता. इथे फक्त पंचेचाळीस रु. भाडे द्यावे लागणार होते. जागा जुनी असली तरी मध्यवर्ती होती. शाळा बदलावी लागणार नव्हती व पुढे मागे एकटीने बिऱ्हाड करून राहावयाची वेळ आली तर आपल्या माणसांशेजारी होती. अडचण एकच होती, मामा आम्हाला बिन–पावतीचे बिऱ्हाड म्हणून ठेवणार होते.

कदाचित हा प्रस्ताव आम्ही मान्यही केला असता पण याच वेळी मोठ्या मामींची बहीण मुंबईहून पुण्याला स्थायिक होणार होती. त्यातच धाकट्या मामींना आमचे वाड्यात राहाणे फारसे पसंत नसावे असे एकूण त्यांच्या वागण्यावरून माझ्या लक्षात आले होते. काय करावे याचा निश्चय होत नव्हता. मामांकडे जागा शेणाने सारवावी लागणार होती व मला या गोष्टीची सवय नव्हती. या सर्व गोष्टी स्पष्टपणे मामांपुढे मांडाव्यात असे माझे मत यांना पटत नव्हते. मधल्या अवधीत यांच्या दोन्ही भावांना नोकऱ्या मिळाल्या होत्या. धाकटी बहीण पण Dip.T चा कोर्स करून नोकरीला लागली होती. आता माझ्या मते त्यांनी आपण होऊन आम्हाला जबाबदारीतून मोकळे करावे अशी माझी रास्त अपेक्षा होती. आमचा Basic Pay पाचशेच्या आत असल्याने flat rate ने House Rent Allowance पावती न देता मिळू शकणार होता व हाच या घरात राहाण्याच्या बाजूने निर्णय घेण्यामागचा हेतू होता. घरी पाठवावे लागणारे पैसे बंद करण्यावरूनही आता आमच्या दोघांमधे वाद सुरू झाला होता. आतापर्यंत मी एकदाही घरी पैसे पाठवू नका असे म्हणाले नव्हते. देवळालीपेक्षा पुण्यातील राहणीमान खर्चिक होते. मुली मोठ्या झाल्या होत्या व घरी पण पैसे मिळवणारी मंडळी होती. ती घराचा भार उचलायला तयार नव्हती ही गोष्ट निराळी. या वेळी मी माझा आक्रमक पवित्रा सोडायला तयार नव्हते. एक दिवस रागाने हे मला 'घर सोडून निघून जा' असेही म्हणाले. त्या वेळी मी त्यांना निक्षून सांगितले की 'तुम्ही मिळवलेल्या पैशांवर सर्वप्रथम माझा व माझ्या मुलींचा अधिकार आहे. तुमची आई जीव देण्याच्या धमक्या देऊन तुमचे Emotional Blackmailing करते आहे. पैसे पाठवले नाही तर त्या जीव देणार असतील तर पाठवले तर मी जीव देईन. धमक्या मलाही देता येतात.' शेवटी राग ओसरल्यावर मामांशी मोकळेपणाने बोलायला हे तयार झाले. घरभाड्यापोटी मिळणाऱ्या पंचवीस

रुपयात पदरचे पंचवीस घालून पूर्वीइतके नाही तरी दरमहा पन्नास रु. पाठवायचे ठरले. अधून मधून जबलपूरची नणंद त्यांना कसे हलाखीत दिवस काढावे लागतात याची पत्रे लिहीत असे. पण आम्ही सुद्धा काटकसरीतच राहात होतो.

मामांशी बोलणी करताना मी मामांना म्हणाले, ''तुम्ही आम्हाला बिन पावतीचे बिऱ्हाड म्हणून राहायला सांगता आहात कारण आज आम्ही तुम्हाला हवे आहोत. उद्या तुमची अडचण भागली व आम्ही नकोसे झालो तर आमचे भवितव्य काय? कारण आम्ही आता अशा वळणावर आहोत की इथून पुढे लांब बदली झाली तर इथले बिऱ्हाड मोडता येणार नाही. मुलींच्या शिक्षणासाठी काहीतरी कायम स्वरूपी निर्णय आम्हाला घेणे भाग आहे. माझ्या मनात स्वत:चे घर बांधून इथून बाहेर पडावे असे आहे. पण माणसाच्या सर्वच इच्छा पूर्णत्वास जातातच असे नाही'' यावर मामा म्हणाले, ''मी तुला कधीही जा म्हणणार नाही. माझ्यावर विश्वास ठेव. म्हातारपणी मला मधुसूदन जवळ हवा आहे. मला मुलगा नाही.'' त्यावर मी विचारले की इथपर्यंत सर्व ठीक आहे पण उद्या तुमच्या वारसांना आम्ही नकोसे झालो तर आम्ही म्हातारपणी कुठे जावे? आम्हालाही मुलगा नाही आहे.'' त्यावर ते म्हणाले, ''एवढेच असेल तर मी तुला लिहून देतो की माझ्या वारसांना तुम्हाला जा म्हणण्याचा अधिकार असणार नाही.'' शेवटी त्यांच्याकडून तसे लिहून घेतल्यानंतरच मी ३९ बुधवार पेठ इथे पटवर्धन वाड्यात राहाण्याचा निर्णय घेतला.

❍❍❍

# ११. ३९, बुधवार पेठेतील दीर्घ कालखंड

मामांकडून काही लिहून घेणे वगैरे यांच्या स्वभावात बसणारे नव्हते. खरे तर मलाही आवडत नव्हते, पण आई–वडिलांच्या छत्राखालून बाहेर पडल्यावर, जगाचे निरनिराळे अनुभव घेतल्यावर आलेल्या शहाणपणामुळे हा निर्णय घेणे भाग होते. तब्बल चाळीस वर्षे आम्ही या जागेत वास्तव्य केले. ही जागा आम्हाला लाभली. मुली चांगल्या शिकल्या. नावारूपाला आल्या. मामांच्या परवानगीने फरशी घालून घेतली.

पुण्याला आल्यावर मुलींचे शाळा प्रवेश, रेशन कार्ड, बँकेत खाते उघडणे, मोलकरीण शोधणे या सर्वांत अभ्यास पूर्णपणे मागे पडला. हे तर नवीन जबाबदारीत इतके अडकले की रोज घरी यायला साडेसात–आठ वाजत असत.

सर्वांत जवळची व वसतिगृह असलेली शाळा म्हणून हुजूरपागेत प्रवेश घ्यावा असा विचार केला. माझी मामे नणंद माया मला हुजूरपागेच्या प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिकांकडे घेऊन गेली. त्या म्हणाल्या की प्राथमिक शाळा प्रवेशासाठी Education Officer कडून परवानगी आणावी लागेल. सुदैवाने त्यांचे office शाळेच्या इमारतीतच होते. त्यांनी मला हेही सांगितले, ''त्यांच्याशी बोलताना वसतिगृह व मध्यवर्ती सरकारी नोकरीचा आवर्जून उल्लेख करा म्हणजे प्रवेश मिळेल. तोपर्यंत स्वतःच्या जबाबदारीवर मुलींना मी वर्गात बसवायची व्यवस्था करेन, पण नाव मात्र घालणार नाही.''

Education Officer ना भेटल्यावर त्यांनी मला दक्षिणमुखी मारुतीजवळच्या म्युनिसिपल स्कूलमध्ये प्रवेश घेण्यास सांगितले. ते म्हणाले तुमच्या मुली देवळालीला म्युनिसिपल स्कूलमधून आल्या आहेत आणि आता हुजूरपागेत प्रवेश कशासाठी हवा आहे? तेव्हा बाईंनी दिलेल्या सल्ल्याचा उपयोग झाला व शाळेत १ एप्रिलपासून प्रवेश मिळाला. मध्यवर्ती सरकारी नोकरांच्या मुलांसाठी शाळा प्रवेशासाठी मान्य प्रवेश संख्येपेक्षा दोन टक्के जादा प्रवेश दुसऱ्या सहामाहीच्या शेवटी देण्याची सुविधा असते ही गोष्ट या वेळी मला कळली. मला तर अहिल्यादेवी व हुजूरपागा पुण्यात

प्रथम क्रमांकाच्या पसंतीच्या शाळा आहेत हेही माहीत नव्हते. शाळेला शाळा एवढे एकच समीकरण मनात होते. खरे तर माझे एक मावससासरे D.E. Society च्या फर्ग्युसनचे उप–प्राचार्य. त्यांच्या वशिल्याने अहिल्यादेवीमध्येसुद्धा प्रवेश मिळवता आला असता. एक मावससासरे व एका भाचीचे सासरे व चुलत सासूबाईंचे भाऊ हुजूरपागेच्या कौंसिलवर, पण असे काही शाळा प्रवेशासाठी करावे लागते याची मला काहीच कल्पना नव्हती. निव्वळ मी मायाबरोबर गेल्यामुळेच सर्व सुरळीत पार पडले कारण मुख्याध्यापिकांना या नातेसंबंधाबद्दल कल्पना असावी. आंधळ्याच्या गायी देव राखतो हेच खरे.

वार्षिक परीक्षेत रोहिणीचा वर्गात २६ वा क्रमांक आला व ५९ टक्के मार्क मिळाले. मी तिला १२ नोव्हेंबरला ५ वर्षे पूर्ण झाली म्हणून दुसऱ्या सहामाहीत शाळेत घातले होते. मला तिचा हा निकाल फारसा पसंत पडला नाही. आपण एक वर्ष वाचवण्याच्या नादात तिचे नुकसान तर करीत नाही ना असे वाटून मी बाईंना तिला परत पहिलीतच राहू दे अशी विनंती करायला गेले. त्या म्हणाल्या, ''अहो, सहामाहीनंतर शाळेत घातलेली, फेब्रुवारीत बदली होऊन पुण्याला आलेली असतानासुध्दा तिने ५९ टक्के मार्क मिळवले आहेत. दोन–तीन विषयात नापास होऊनसुद्धा मुलीला वरच्या वर्गात घालण्याची गळ घालणारे पुष्कळ पालक मी आजपर्यंत बघितले आहेत. चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झालेली असताना देखील मागच्या वर्गात ठेवा अशी गळ घालणाऱ्या तुम्ही पहिल्याच पालक आहात. नियमाप्रमाणे तसे करता येणार नाही. तसेच, एक शिक्षिका म्हणून माझ्यावर विश्वास ठेवा. ही तुमची मुलगी तुम्हाला वाटते तशी मागे पडणार नाही याची मला खात्री वाटते''. रोहिणीने बाईंचा विश्वास सार्थ ठरवला. दुसरीतून तिसरीत जाताना वर्गात ६वी आली. तिसरीतून चौथीत जाताना दुसरी आली. यावेळी गणिताचा पेपर झाल्यावर म्हणाली, ''आई, मला गणितात सत्त्याण्णव मार्क मिळतील. माझे तीन मार्कांचे चुकले आहे.'' निकालानंतर तिच्या वर्गशिक्षिका चांदेकर बाई म्हणाल्या, ''इतक्या वर्षात ९७ मिळतील असे म्हणून ९७ मार्क मिळवणारी ही पहिली विद्यार्थिनी आहे.'' चौथीतून पाचवीत जाताना ती सर्व तुकड्यांमध्ये पहिली आली व हा पहिला क्रमांक तिने ११वी पर्यंत जाऊ दिला नाही. चौथीत असताना 'माझा आवडता छंद' या विषयावर पाचे बाईंच्या मार्गदर्शनाखाली भाषण करून आंतरशालेय स्पर्धेत पहिला क्रमांक मिळवला. चौथीची शिष्यवृत्ती मात्र तिला मिळू शकली नाही. त्या वेळी ती मला म्हणाली होती, ''आई, मी सातवीची शिष्यवृत्ती नक्की मिळवीन,'' व त्याप्रमाणे तिने ती मिळवली. रोहिणीच्या प्रगतीचा आलेख उत्तरोत्तर

उंचावतच गेला.

मीना scholarly career ची नसली तरी सतत पहिल्या दहात असायची. कल्पनाला नूतन मराठीच्या शिशुशाळेत घातले. ती पाच वर्षांची झाल्यावर तिला पण हुजूरपागेत घातले. कल्पनानेही रोहिणीच्या पावलावर पाऊल ठेवून शाळेत उत्तम चमक दाखवली. आता मी S.N.D.T. च्या B.Ed कॉलेजची चौकशी करायला सुरुवात केली. हा अभ्यासक्रम ११ ते ५ या काळातला असल्याने माझ्यासाठी सोयीचा होता. परंतु सर्वच गोष्टी आपण ठरवल्याप्रमाणे पार पडतातच असे नाही. १९५९ च्या मे महिन्यात एक अशी घटना घडली ज्यामुळे माझा B.Ed ला प्रवेश घेण्याचा निर्णय मागे पडला. ही घटना म्हणजे माझी मावस बहीण मंगला वझे हिच्या यजमानांचे नागपूर येथे अत्यंत नाट्यमय परिस्थितीत घडून आलेले दु:खद निधन. या बहिणीचे व माझे लग्न तीन आठवड्यांच्या अंतराने झाले होते. ही माझी बहीण नाकी–डोळी नीटस पण रंगाने सावळी म्हणून म्हणा किंवा ग्रहयोग म्हणून म्हणा लग्नाला त्या काळच्या मानाने बरीच मोठी, म्हणजे पंचवीस वर्षांची झाली होती. त्या वेळी कौटुंबिक परिस्थिती किंवा अन्य कारणांनी लढाईवर गेलेली माणसे परत येत होती. अशा एका डॉ. मुलाशी तिचे लग्न ठरले. पूर्वी B.J. Medical ला फक्त L.C.P.S. चीच सोय होती. मधल्या काळात M.B.B.S चा दर्जा B.J. Medical ला मिळाला होता. लढाईवरून परतल्यावर त्यांनी M.B.B.S च्या condensed कोर्सला प्रवेश घेऊन तो पूर्ण केला. गृहस्थ उमदा, हुशार व दिलदार स्वभावाचा. आम्हाला सर्वांनाच तिला इतके छान स्थळ मिळाले म्हणून खूप आनंद झाला. M.B.B.S. झाल्यानंतर बाबासाहेबांनी स्वतंत्र प्रॅक्टिस न करता त्यांनी सरकारी नोकरीत जाणे पसंत केले. काही वर्षे ते आसाममध्ये होते व नंतर नागपूरला आले होते. या बहिणीला स्वत:चे मूल नव्हते. नागपूरला आल्यावर आपल्या मोठ्या बहिणीची एक मुलगी व एक मुलगा तिने शिक्षणासाठी स्वत:कडे नेला होता.

या माझ्या मेव्हण्यांचा मृत्यू म्हणजे आजतागायत आम्हाला न उलगडलेले एक कोडे आहे. त्यांच्या पायाला जखम झाली होती व ती लवकर भरून येत नव्हती. माझ्या मोठ्या मावसबहिणीचा लहान ३/४ वर्षांचा मुलगा नुकताच धनुर्वाताने वेळेवर निदान न झाल्यामुळे दगावला होता. यामुळे कदाचित त्यांनी anti-tetanusचे इंजेक्शन घेण्याचे ठरवले असावे. त्यांना स्वत:ला horse hair allergy होती. मागे एकदा दिल्लीला interview साठी आलेले असताना टांग्यात बसल्याचे निमित्त होऊन दम्याच्या त्रासाने कासावीस होऊन ते आमच्या घरी आले होते. त्या वेळी माझ्या मावस नणंदेची मैत्रीण व मामे सासूबाईंच्या भाची डॉ. कालिंदी गोखले

(साठे) यांनी योग्य ती उपाय योजना करून त्यांची प्रकृती ताळ्यावर आणली होती. तेव्हापासून आमच्या नात्यातला ''मावस'' हा शब्द गळून पडला व बहीणपणा शिल्लक राहिला. त्यांना स्वत:ला anti-tetanus घेतल्यामुळे येणाऱ्या reaction ची बाबासाहेबांना कल्पना असावी, कारण शेजारी दुसरी ॲड्रिनिलिनची सिरिंज भरुन ठेवली होती पण ती स्वत:ला टोचून घेण्याचे अवसान न राहिल्यामुळे ती सिरिंज घेऊन हेलपाटतच आपल्या शेजाऱ्याकडे गेले व त्याला ''ही मला टोच,'' असे सांगू लागले. तो शेजारी मल्होत्रा non-medico असल्याने घाबरला व दोन्ही सिरिंज घेऊन civil lines च्या रस्त्यावर धावत ओरडत सुटला ''अरे कोई डॉ. हो तो निकल आओ. ये लिया है और ये माँगते हैं।'' पण इतके सगळे होईपर्यंत reaction ने आपले काम केले होते. हाच निर्णय त्यांनी दोन दिवसांनी माझी बहीण नागपूरला आल्यानंतर घेतला असता तर कदाचित वाचू शकले असते असे वाटते, कारण त्यांनी तिला इंजेक्शन द्यायला शिकवले होते. आपला मुलगा अल्पायुषी आहे हे त्यांच्या आईला बहुधा माहीत असावे. त्या उत्तम पत्रिका पाहात असत व बऱ्याच चिकित्सा करून त्यांनी माझ्या बहिणीची पत्रिका पास केली होती. पण नियती अटळ असते हेच खरे.

यानंतरच खरा संघर्ष सुरू झाला. त्यांची आई सुनेच्या बहिणीच्या मुलांना मुलाने जवळ केल्यामुळे आधीच रागावली होती. त्यांच्या पायगुणामुळेच आपला मुलगा दगावला असे त्यांच्या मनाला वाटले व तसे त्यांनी बोलूनही दाखवायला कमी केले नाही. आपल्या मुलाला स्वत:चे मूलबाळ नसल्याने ही मंडळी त्याच्या पैशांवर डोळा ठेवून आहेत असे त्यांना वाटत होते. त्या वेळी आम्हा सर्व नातेवाईकांपेक्षा या बहिणीची सांपत्तिक स्थिती चांगली होती.

बाबासाहेबांचे वडील त्यांच्या लहानपणीच गेलेले होते. म्हातारीने कोंडयाचा मांडा करून मुले मोठी केली होती. सदाशिव पेठेतील वडिलोपार्जित घरातील त्यांच्या वाटणीचा भाग व विधवा असल्याने पोटगीदाखल कूळकायद्यातून सुटलेली भातशेती एवढीच काय ती जमेची बाजू. त्यांच्या वाड्यातील अर्धा भाग माझ्या बहिणीच्या चुलतदिराने डॉ. पेंडसे यांना विकला. या पेंडसे मंडळींनी उरलेला भागही आपल्याला विकत मिळावा म्हणून नाना प्रकारे प्रयत्न केले. अगदी बाईच्या चारित्र्यावर संशय घ्यायला पण कमी केले नाही. त्या दिसायला खरोखरीच फार सुरेख होत्या. केशर घालून मळलेल्या मैद्याप्रमाणे सुरेख गोरा रंग, सरळ नाक, लहानशी जिवणी व हुशारीची चमक असलेले घारवट डोळे. डोळे जरा लहान; हसल्या की चिमुकल्या रेघाच होत असत. बाईने खंबीरपणे या सगळ्याला तोंड दिले. योगायोग असा की

दिल्लीला बाबासाहेबांवर उपचार करणाऱ्या कालिंदी गोखलेची मोठी बहीणच शेजारच्या वाड्याची मालकीण होती. बाबासाहेबांचे मामा वकील होते. धाकटा भाऊ भास्कर यांचे लग्न त्यांच्या अगोदर झाले होते. B.Sc. होऊन पोस्टात नोकरीला होते. त्यांची बायको किंचित विक्षिप्त व संशयी स्वभावाची होती. त्यांना दोन मुलगे होते.

आम्ही पुण्यात आल्यावर आपल्या बहिणीची म्हातारी सासू एकटी असते म्हणून साधारण महिन्यातून एकदा त्यांची विचारपूस करायला मी जात असे. माझे त्यांच्याशी सलोख्याचे संबंध होते. दर वर्षी वानगीदाखल एक-दोन किलो आंबेमोहोर तांदूळ व एक दोन किलो चुरी मला देत असत. मुलाला सांगत, ''तुझ्या बायकोचे बाकीचे नातेवाईक काही संबंध ठेवीत नसले, तरी माली बरीक महिन्यातून एकदा येऊन विचारपूस करून जाते.''

त्यांच्या फटकळ स्वभावाला घाबरून इतर कोणी फारसे त्यांच्या वाऱ्याला उभे राहात नसत. परिस्थितीने त्यांच्या स्वभावात हा कडवटपणा आला असावा. बाबासाहेब गेले त्यावेळी बहिणीचे वय फक्त सदतीस वर्षांचे होते. मूलबाळ नाही. सबंध जन्म एकटीने काढायचा. घरात बसून रडत बसण्यापेक्षा तिने कुठेतरी आपले मन रमवावे असे मला वाटत होते. तिला शिक्षणाची फारशी हौस नव्हती. अशा वेळी तिने बालमंदिराचा कोर्स करावा असा विचार करून मी तसा प्रस्ताव तिच्या सासूबाईंपुढे ठेवला. सुदैवाने त्यांनाही तो पटला. लहान मुलांमध्ये तिचे मन रमेल व शक्य झाले तर ती स्वतःची लहानशी शिशुशाळा पण काढू शकेल असे वाटले. जागेची अडचण नव्हतीच. त्या वेळी चंदूताई कर्नाटकी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन होत्या. त्यांना भेटून त्या कोर्सच्या प्रवेशासाठी लागणारी वयाची अट आम्ही शिथिल करून घेतली व तिचे नाव त्या कोर्सला घातले.

इथपर्यंत सर्व ठीक झाले. खऱ्या अडचणी पुढे सुरू झाल्या. तिच्या घरच्यांना वाटत होते की ही आहे नाही ते गोळा करून माहेरी निघून जाईल. मला वाटत होते की त्यांनी सर्व गोष्टींचा ताबा घेऊन हिला हाकलून दिले तर? दोघेही एकमेकांबद्दल मनात संशय बाळगून होतो. हिला त्यांच्या आर्थिक व्यवहारांची सुतराम कल्पना नव्हती. विमा, G.P. Fund, Gratuity वगैरे ठिकाणी nominations होती पण काही रक्कमांना nominations नसल्याने succession certificate काढणे आवश्यक होते. तिचे मामे सासरे वकील होते. त्यांनी succession certificate तिच्या सासूबाईंच्या नावाने काढण्याचा निर्णय बोलून दाखवला व इतर सर्व रक्कम दोघींच्या joint account ला जमा करावयास सांगितले. मला ते पटेना. मी तिला म्हणाले, ''तू ही रक्कम तुझ्या एकटीच्या नावाने खाते उघडून त्यात जमा करावी

हे बरे.'' त्यावर तिला असे सांगण्यात आले की, एका बँकेत दोन खाती उघडता येणार नाहीत. हे विधान सरळ सरळ दिशाभूल करण्यासारखे वाटले म्हणून यांच्या सल्ल्याने मी प्रत्यक्ष तिच्या मामेसासऱ्यांना भेटले. बराच वाद झाला. शेवटी तिच्या एकटीच्या नावाचे खाते उघडून रक्कम जमा केली. त्या वेळी तिचे मामेसासरे म्हणाले होते, ''मालीची परिस्थिती बेताची आहे व तिला तीन मुली आहेत. ही बहीण आपल्याला मदत करील या अपेक्षेने तिची ही बहीण तिच्या व्यवहारात लक्ष घालते आहे.'' कोणी कोणासाठी निरपेक्ष वृत्तीने काही करू शकते यावर जगाचा विश्वास बसत नाही हेच खरे. पण काळाने सूड उगवला. याच मामेसासऱ्यांचा मुळात हुशार असलेला मुलगा मॅट्रिकनंतर वसतिगृहात मुलांच्या संगतीने बिघडू लागला, यांच्या प्रयत्नांनी त्याला Defence Accounts मध्ये नोकरी लागली तेव्हा आम्हा दोघांना श्रीखंड पुरीचे जेवण व कृतज्ञता म्हणून शर्टपीस व ब्लाऊजपीस देऊन त्यांनी आमचा सन्मान केला. तोपर्यंत त्यांना यांच्या ऑफिसमधील हुद्याची काहीच कल्पना नव्हती कारण आमचे राहणीमान आमच्यावरील जबाबदाऱ्यांमुळे बरेच निम्न दर्जाचे होते.

असो! तोपर्यंत सर्वांच्या संशयाचे निराकरण झाले होते. तीही घर सोडून गेली नाही. त्यांनी पण तिला अखेरपर्यंत प्रेमाने सांभाळले. आजही या कुटुंबाशी माझे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध आहेत. सुरूवातीचा कटुपणा कुठे औषधालासुद्धा उरला नाही.

यावेळी तिच्याकडे असलेली माझ्या दुसऱ्या मावसबहिणीची मुलगी माझी मावसबहीण माझ्याकडे ठेवून गेली. बहिणीला तिची माया लागली होती. मी जर B.Ed ला गेले असते तर अर्थातच घरातली जबाबदारी तिला उचलावी लागली असती व मलाही पूर्णत्वाने बहिणीच्या व्यवहारांमध्ये लक्ष घालता आले नसते. शिवाय आमच्या मुलीला राबवून घेतले हा ठपका आला असता तो निराळाच.

आम्ही ५९ च्या दिवाळीत बडोद्याला यावे असे वडिलांचे पत्र आले. भावाला नोकरी लागली होती, बहिणीला मुलगा झाला होता. आम्ही दिवाळीसाठी बडोद्याला गेलो व नंतर एलिचपूरला पण घरी गेलो. या खेपेस एलिचपूरचे वास्तव्य बरेच सुखाचे झाले. दोन्ही मुले नोकरीला लागली होती. नणंद पण नोकरी करीत होती. सासूसासरे, धाकटा दीर व नणंद एवढी चारच माणसे घरात होती. या वेळी खऱ्या अर्थाने मुलींना दोन्हीकडील आजी–आजोबांची ओळख पटली. माझ्या सासूबाईंना मीना व कल्पना दिसावयास चांगल्या म्हणून आवडत तर मामंजींना रोहिणीने हुशारीने जिंकून घेतले. आमच्या घरी खूप पुस्तके होती. रोहिणी दिवसभर माडीवरच

असे. भागवताचे स्कंध तिने वाचून काढले. गप्पांच्या ओघात एकदा मत्स्यभेदावरून सासरे म्हणाले, 'कृष्णाने लक्ष्मणेला मत्स्यभेद करून जिंकून आणले त्यानंतर अर्जुनाने मत्स्यभेद केला.' त्यावर रोहिणी लगेच म्हणाली, ''अहो तात्या, उपरिचर राजाने पण मत्स्यभेद नव्हता का केला?'' हे ऐकल्यावर त्यांना इतका आनंद झाला की मोठ्याने ओरडून सगळ्यांना म्हणाले, ''ऐकले का सर्वांनी? आज आमच्या नातीने माझा पराभव केला आहे. मी उपरिचर राजाचा मत्स्यभेद विसरूनच गेलो होतो.''

तेव्हा कल्पना केवळ पाच वर्षांची होती. तात्या तिला 'झाकले माणिक' म्हणत असत. पुढे कल्पनाच्या बुद्धिची चमक दिसल्यावर हे म्हणत, ''आमचे तात्या मुळातच हुशार! त्यांनी कल्पनाची हुशारी लहानपणीच ओळखली.''

रोहिणीला वाचनाची अतिशय आवड होती. शाळेत असतांना सुटीत लायब्ररीच्या बाईंना मदत करायला जायची व भरपूर पुस्तके आणून वाचीत असे. त्या वेळी ती मराठी तिसरीत होती व तिचे वय फक्त सात वर्षांचे होते. आजही तिच्या घरी कमीत कमी ४/५ कपाटे भरून पुस्तके आहेत.

आमच्या मामंजींना स्वत:च्या पत्नीच्या सुग्रणपणाचा सार्थ अभिमान होता. पहिल्या दिवशी जेवायला बसल्यावर, ''काय कशी झाली आहे आमटी?'' असा प्रश्न त्यांनी विचारला. त्यांच्या प्रश्नातला गर्भित अर्थ ओळखून म्हणा किंवा अन्य काही कारणाने असेल, रोहिणी पटकन म्हणाली, ''आमच्या आईची याहून चांगली असते.''

यावेळी सासूबाई म्हणाल्या, ''मालती, आता गावातल्या सगळ्याच सुना पाचवारी नेसतात. पुण्याला तू नेसतेस माहीत आहे मला. पण आज पाचवारी नेसून त्याच्याबरोबर जाताना मला तुला पाहावयाचे आहे.'' अशा प्रकारे एकूण खेळीमेळीत परतवाडयाचा मुक्काम पार पडला. आम्ही पुण्याला परत आलो.

❍❍❍

# माझे आजोळ-सासर

गोडबोल्यांच्या मानाने माझे आजोळ–सासर बऱ्यापैकी सुखवस्तू होते. माझे आजेसासरे शंकरराव पटवर्धन मिलिटरी अकाऊंट्समध्ये असिस्टंट अकाउंट्स ऑफिसरच्या हुद्यापर्यंत पोहोचलेले असून त्यांना रावसाहेब हा किताब मिळालेला होता. यांना एकूण सहा मुली व दोन मुलगे. माझ्या सासूबाई सर्वांत मोठ्या. त्यांच्या पाठची बहीण महाजनांकडे दिली होती. हे महाजन लोकमान्य टिळकांच्या बहिणीचा मुलगा असून हरिगावच्या साखर कारखान्यात मॅनेजर होते. त्यानंतरची मुलगी डॉ. ग. स. मराठे यांना दिली होती. ते एम. बी. बी. एस. असून ॲक्च्युरी मराठ्यांचे बंधू. त्यानंतरची मुलगी सांगलीच्या रावबहादूर काळ्यांच्या पुतण्याला दिली असून ते बी.ई. होते. (दोन्ही मामा एल.आय.सी.त नोकरीला होते.) पाच नं.ची मुलगी आपट्यांकडे दिलेली होती. हे विसुभाऊ आपटे फर्ग्युसन कॉलेजमध्ये उपप्राचार्य होते. सर्व मंडळी सुखवस्तू. आई–वडिलांची आर्थिक ऊब पाठीशी असलेली, अशी होती. अपवाद फक्त सर्वांत धाकट्या मावशीचा होता.

मावशीच्या या कुटुंबाचा बराचसा भार यांचे मामा व मावशा मिळून उचलीत असत. माझ्या नं. ३ च्या मावससासूबाईंचे यजमान डॉ. मराठे यांनी कॉटनक्रॅशच्या मंदीत शेअर्सच्या व्यवहारात खूप मोठी खोट खाल्ली. त्या वेळी त्यांना त्यांचे साडू श्री. महाजन यांनी बऱ्याच मोठ्या रकमेची मदत केली. त्यानंतर मराठे कमिशन घेऊन युद्धावर गेले व बऱ्यापैकी पैसे मिळवले. युद्ध संपल्यावर त्यांनी महाजनांनी दिलेले पैसे त्यांना परत केले. परंतु महाजनांनी ते घ्यावयास नकार दिला. तेव्हा ही रक्कम व्याजी लावून त्याचा विनियोग या परिवाराला वर्षाचे कपडे पुरवण्यासाठी होत असे. मला स्वत:ला या कुटुंबाला पैशांची मदत करणे शक्य नसल्यामुळे मी शिवण शिकत असताना मदत म्हणून विनामूल्य कपडे शिवून देण्याची जबाबदारी स्वीकारली. पण पहिल्या वर्षीच घरी शिवलेल्या कपड्यांना शिंप्यासारखी सफाई येत नाही असा आहेर ऐकण्यास मिळाला. तरी बरे, हे स्वत: जवळ–जवळ दहा

वर्षे मी शिवलेले शर्ट, बुशकोट व पायजमे वापरत होते. गॅझेटेड पोस्ट मिळाल्यावर मी यांचे शर्ट शिवणे थांबवले. कारण माझी कॉलर टाय बांधण्यासाठी लागते तशी बिनचूक शिवली जात नसे.

या सर्व परिस्थितीत मामांच्या वाड्यात राहाणे म्हणजे थोडीफार तारेवरची कसरतच होती. कारण सर्वच माणसे सारखी नसतात. काहींना त्यांच्या सुखवस्तू–पणाचा डौल मिरवावासे वाटे. एकदा माझी एक मावसजाऊ मी नुकतेच कढवलेले तूप पाहून म्हणाली, ''अगं बाई! तूप–बीप परवडते वाटते तुला? आणि कोशिंबीर पण केलेली दिसते आहे?'' मी फक्त एवढेच उत्तर दिले, ''माझ्या घरी काटकसर फक्त नोकर–चाकरात व कपड्यालत्त्यात आहे. खाण्याच्या बाबतीत भाजीपाला, दुधदुभते व पौष्टिकतेत काटकसर नाही.'' ही सर्व मंडळी वरचेवर आईस्क्रीम, भेळ, इडली चटणी वगैरे बाहेरून मागवीत असत. पण मुली इतक्या शहाण्या की कधीही त्यांच्याकडे टुकून बसल्या नाहीत किंवा घरात हट्टही केला नाही. मीच पुढे माझ्या एका दाक्षिणात्य मैत्रिणीकडून इडली, डोसे करायला शिकले व चुरमुरे वगैरे आणून घरीच भेळ बनवी. मेहेंदळ्यांच्या बेकरीतून त्यांनी दिलेल्या प्रमाणानुसार पीठ भिजवून बिस्किटे व नानकटाई करवून आणी. हळूहळू आईस्क्रीम पॉट पण खरेदी केले.

माझ्या दोन–तीन मावससासवांना माझ्या नीटनेटका व टापटिपीने संसार करण्याचे कौतुक पण वाटत असे व तसे त्या उघडपणे बोलूनही दाखवीत.

काही दिवसानंतर ॲग्रीकल्चर कॉलेजतर्फे विनामूल्य चालवणाऱ्या जाणाऱ्या फूड प्रिझर्वेशनच्या क्लासला जाऊन मी जॅम, जेल्या, सरबते पण करायला शिकले. एखाद्या रविवारी सकाळी ब्रेड भाजून त्यावर लोणी व पेरूची किंवा कवठाची जेली लावून खाण्याचा कार्यक्रम करत असू. छोट्या छोट्या गोष्टींमधून मोठा आनंद मिळवीत असू. रविवारचा विशेष बेत म्हणजे केळीचे शिकरण व पाटवडी. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच संत्री व अननसाचा रस काढून सरबते करून ठेवीत असे. कोकमे आणून बारीक चिरून त्यात साखर घालून ठेवत असे. त्याचे सरबत करत असे. कोकमाच्या बिया ठेचून उकळवून त्यातून निघालेल्या तेलाचा गोळा थंडीत पायाच्या भेगांना लावायला उपयोगी पडे. आमच्याकडे जाणे–येणे फार असे. त्यामुळे या गोष्टींचा यथायोग्य आदरसत्कार करायला उपयोग होत असे.

आमच्या वाड्यात मालकांसकट अजून चार कुटुंबाचे वास्तव्य असे. देशमाने पती–पत्नी, दिवाकर पती–पत्नी व त्यांची तीन मुले, सहस्रबुद्धे पती–पत्नी,

सौ. सहस्रबुद्धे यांची एक बहीण व त्यांचा भाऊ. यांच्यापैकी सहस्रबुद्धे कुटुंबाची व आमची जवळीक वाढली. सौ. चंपूताई सहस्रबुद्धे जोगेश्वरीच्या देवळात पुराणाला जात असत. मुलींचा त्यांच्याकडे पुराणातील गोष्टी ऐकण्यासाठी सततचा अड्डा असे. या कुटुंबाने मुलींची आजी–आजोबांच्या सान्निध्याची उणीव भरून काढली. असे म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही.

श्री. सहस्रबुद्धे विरागी व उदार मनोवृत्तीचे गृहस्थ होते. अहमदाबाद, अकोला वगैरे ठिकाणी कापडाच्या गिरणीत ते काम करीत होते. आपल्या सासऱ्यांच्या मृत्यूनंतर चंपूताईंची माघारी आलेली बहीण, तिची दोन मुले व किंचित अशक्त असलेला त्यांचा भाऊ यांच्याजवळ मुलांना शिकायला ठेवून या कुटुंबाचा निर्वाह त्यांनी केला होता. व आता सेवानिवृत्तीनंतर स्वत:पण इथे राहावयास आले होते. अनेक नातेवाईकांना त्यांनी संकटकाळात उदाहरहस्ते मदत केलेली होती. चंपूताईंचे वडील केशवराव बाळ ज्ञानप्रकाश छापखान्यात काम करीत व लोकमान्य टिळक छपाई संदर्भात विचार–विनिमय करण्यास अनेकदा वाड्यात येत असत. चंपूताईंच्या दुसऱ्या भावाचा मुलगा श्रीकांत बाळ टेलिफोन एक्स्चेंजमध्ये कामाला होता. त्याची बायको सौ. दया बाळ यांच्याशीही पण आमची छान मैत्री जमली होती. दयावहिनी मितभाषी व कष्टाळू असून ससून हॉस्पिटलमध्ये नर्स होत्या. माझी आई उन्हाळ्यात आमच्याकडे राहावयास येत असे. तिला बडोद्याच्या उन्हाळ्याचा फार त्रास होई. तिला दयावहिनी रोज इन्सुलिनचे इंजेक्शन देत असत व विशेष म्हणजे अनेकदा विनंती करूनही त्यांनी कधी पैसे घेतले नाहीत.

देशमाने गृहस्थ सज्जन व शांत वृत्तीचे गृहस्थ होते. आपण बरे आपले काम बरे. सांगली बँकेत नोकरी करीत. मुंबईला ते व मोठे मामा–मामी सरदारगृहात शेजारी शेजारी राहात असत. त्या ओळखीवर पुण्यात आल्यावर ते आमच्या वाड्यात राहावयास आले होते. बाई हुशार, महात्त्वाकांक्षी, पण नशिबाने डाव्या पडलेल्या त्यांच्यात एक प्रकारचा हपापलेपणा होता. दुसऱ्याच्या आनंदात त्यांना कधीच निखळपणे सहभागी होता आले नाही व ही गोष्ट मला मिळू शकली नाही याची रुखरुख त्यांच्या साध्या वागण्याबोलण्यातून कळून आल्याशिवाय राहात नसे. एक मुलगी होती. तिचे लग्न झाले होते. त्या उत्तम ब्रिज खेळत असत. त्यांचा धाकटा भाऊ यांचा जवळचा मित्र होता.

दिवाकर कुटुंब आमच्याच वयोगटातले होते. त्यांची व आमची जवळीक असायला हवी होती. पण का कोणास ठाऊक तसे कधीच होऊ शकले नाही. आमच्या मुली व त्यांची मुले समान वयोगटातली होती. स्वत: दिवाकर पोस्टात

नोकरी करीत. बाई पण बऱ्यापैकी सुग्रण व हुशार होती. पंढरपूरसारख्या गावातून पुण्यात आल्यावर हिंदीच्या परीक्षा वगैरे दिल्या होत्या. पण या कुटुंबाने सतत आमचा राग व हेवाच केला. मुलांना म्हणावे असे वळण नव्हते. मोठ्या माणसांची टिंगल करणे, वाकुल्या दाखवणे वगैरे चाळे चालत. यात मुलांचा दोष होता असे नाही. कारण अशा वेळी आईने मुलांना रागे भरणे आवश्यक होते व ते होत नसे. त्यामानाने आमच्या मुलींची वागणूक नम्र व विनयशील व मोठ्यांना मान देणारी असे. त्यामुळे सर्व त्यांना नावाजत असत. हेही एक कारण आमच्यात जवळीक न वाढण्याचे असू शकते.

त्यांच्या मुलांच्या पेन्सिलीसारखी पेन्सिल मुलींकडे दिसली की ''ही आमची पेन्सिल तुमच्या मुलीने चोरली आहे'' असे म्हणत. मग त्यांना मी माझ्याकडच्या तशाच अनेक पेन्सिली काढून दाखवत असे. मी वर्षांच्या सुरुवातीलाच पेन्सिली, रबर, फूटपट्ट्या, टाक, निफे वगैरे डझनावारी खरेदी करून ठेवीत असे. शाईचा मोठा बुधला घेतला की स्वस्त पडे व दर वेळी बाजारात जावे लागत नसे. वह्या शाळेतूनच मिळत असत. गेल्या वर्षीच्या वह्यांचे कोरे कागद काढून बाईंड करून रफवर्कसाठी वापरता येत असत. कमीत कमी खर्चात कुठेही उणे न दिसू देता कार्यभाग साधणे हा आमच्या घराचा जणू स्थायी भाव झाला होता. मला शिस्तीच्या बाबतीत मुलींविषयी कुणाकडून कधीही काहीही ऐकावे लागले नाही. आमच्याकडे रेडिओ, पंखा वगैरे गोष्टी बरेच दिवस नव्हत्या. मालकांकडे रेडिओवर बालचित्रवाणीचे कार्यक्रम व क्रिकेट कॉमेंटरी वगैरे ऐकायला मुली जात असत. एकदा मालकांच्या मुलाचा चेंडू खेळता खेळता रेडिओवर आपटून रेडिओ नादुरुस्त झाला. कोणीतरी म्हणाले, 'मालतीच्या मुलींनी चुकीची बटने फिरवली असतील.' त्यावर त्यांच्यापैकीच कोणीतरी ग्वाही दिली की तिच्या मुली कोणी रेडिओ लावला तरच ऐकतात. त्या कशालाही हात लावीत नाहीत. पुढे ६० साली आम्ही रेडिओ घेतला व एक टेबल फॅनपण घेतला. मुलींच्या शिष्यवृत्तीच्या पैशातून अभ्यासाचे टेबलपण खरेदी केले.

मीनाचे ड्रॉईंग चांगले होते. ड्रॉईंग हा आठवा विषय घेऊन ती एस. एस. सी. करणार होती. एका दिवाळीत तिने कपड्यांना घालतो ती नीळ व रांगोळी यांच्या मिश्रणातून गौतम बुद्धाला कमळ वाहणाऱ्या स्त्रीची रांगोळी काढली होती. ती अतिशयच सुरेख जमली होती. कर्णोपकर्णी हे आळीतल्या लोकांना कळले व अक्षरश: रांग लावून बोळातली अनेक मंडळी ती रांगोळी पाहाण्यासाठी आली व प्रशंसा करून गेली. दुसऱ्या दिवशी पहाटे मी मागीलदारी जाण्यासाठी दरवाजा

उघडला तर समोर दिवाकर बाई ती रांगोळी पायाने फिसकटून टाकताना दिसल्या. रांगोळी एका बाजूला होती. जाण्या-येण्याच्या मार्गावर अजिबात नव्हती.

कल्पना एम. बी. बी. एस. झाली त्या दिवशी फोनवर तिचा निकाल ऐकला. ती एकुणात सातव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली होती. मी दारातच गहू निवडीत बसले होते. माझ्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. मुलाने आईला सांगितले, ''गोडबोले बाई रडताहेत. बहुतेक कल्पना नापास झाली असावी.'' बाईंचा पट्टा सुरू. ''गर्वाचे घर खाली, दुसरे काय? फार घमेंड होती ना हुशारीची,'' वगैरे. त्यांचा मुलगा व कल्पना एकाच वर्षी एस. एस. सी. झाले होते. त्यालाही चांगले ७२ टक्के मार्क मिळून तो इंजिनिअरिंगला होता, पण कल्पना बोर्डात १४ वी आली होती म्हणून हा राग. मुलींनी कोणतेही यश मिळवले की यांची मुलूखमैदान तोफ गर्जू लागे. अशा वेळी दार बंद करून घेणेच श्रेयस्कर वाटे.

मी नोकरी करू लागल्यावर कल्पना मेडिकलला गेली. तिचा डबा मी शेजारी मालकांकडे ठेवून जात असे. दिवाकर बाईंनी धाकट्या मामेसासूबाईंना सांगितले, ''त्या नोकरी करणार, पैसे मिळवणार, तुम्ही तिच्या डब्यासाठी का म्हणून दुपारच्या झोपेचे खोबरे करावे.'' झाले, उषामामींनी डबा दुसरीकडे ठेवायची व्यवस्था करायला सांगितले. त्या वेळी मोठ्या मामेसासूबाई बऱ्याच वेळा मुंबईला मुलीकडे असत. मी मग शाळेत पहारेकऱ्याकडे डबा ठेवू लागले. खरी गंमत पुढेच आहे. आमच्या बोळात एक कोळशाची वखार होती. गॅस व गीझर घेण्याअगोदर कोळसा, कांडी कोळसा, बंबफोड वगैरे आम्ही तिथूनच खरेदी करीत असू. एक दिवस वखारीच्या मालकाने विचारले, ''बाई, तुम्ही रोज कोणासाठी डबा घेऊन जाता?'' मी त्याला सांगिले, 'आपली ताई डॉक्टर होते आहे. तिच्यासाठी हा डबा मी शाळेच्या पहाऱ्यावर ठेवते'. तो पुढे मला म्हणाले, ''एखादे वेळी डबेवाला आला नाही तर?'' मी म्हणाले, ''त्या दिवशी ताई उपाशी राहते किंवा बाहेर काही तरी खाते.'' त्यावर तो म्हणाला, ''बाई, आपल्या बोळातली एक मुलगी डॉक्टर होते आहे याचा आम्हाला अभिमान वाटतो. तुम्ही तो डबा समोरच्या करवड्यांकडे ठेवा. डबेवाला आला नाही तर माझा माणूस डबा पोचवेल. वखारीत डब्यावर उगाच काळी धूळ जमेल.'' या त्याच्या बोलण्याने माझे मन भरून आले. त्या करवडें बाईंची व माझी चांगली ओळख होती. त्यांच्या मुलाची शाळेची फी व वह्या पुस्तकांची जबाबदारी मी घेतली होती. या मुलाने पुढे कुरियर कंपनी काढली. त्यानेसुद्धा माझ्याकडून कुरियरचे पैसे कधीही घेतले नाही. अशा कितीतरी गोड-कडू आठवणी आहेत.

आपल्या पडत्या काळात मानवी स्वभावाचे कंगोरे आपल्याला अनुभवायला मिळतात. माझ्या मामे दिराच्या मुंजीतली एक गोष्ट. एक मोठा पाणी भरलेला हंडा उचलून दुसरीकडे ठेवायचा होता. मामेसासूबाईंनी माझ्या एका मावसदीराला तसे सांगताच त्याची जवळच उभी असलेली आई म्हणाली, ''सरला, त्याला नको सांगूस तो जड हंडा उचलायला.'' त्यावर त्यांनी दुसऱ्या मावसदीराला हाक मारली. पण त्याच्या आईनेही बहिणीची री ओढली. त्यानंतर त्यांनी यांना हाक मारली. मी जवळच उभी होते. मग मला राहवले नाही. मी म्हणाले, ''हे पाहा त्यांची आई हयात नसली तरी त्यांची बायको इथे उभी आहे. त्यांचे हर्नियाचे ऑपरेशन लहानपणीच झाले आहे. तेही एकटे हा हंडा उचलणार नाहीत. त्यांना कोणी मदतीला येणार असेल तरच ते हा हंडा उचलून तुम्हाला हव्या त्या ठिकाणी ठेवतील.''

आमच्या आयुष्यातला फार मोठा कालखंड आम्ही या वाड्यात घालवला. १६ फेब्रुवारी, १९५८, ते १० फेब्रुवारी, १९९७, अशी उणीपुरी ३९ वर्षे आम्ही या वाड्यात काढली. वर लिहिले त्यासारखे काही अपवाद सोडले तर आमची ही वर्षे सर्वच बाबतीत आम्हाला प्रगतीपथावर नेणारी ठरली.

मी माझ्यापुरते एक धोरण ठरवले होते. कुणाचीही बरोबरी करण्याचा प्रयत्न केला नाही. शक्य तो आपल्यापासून कोणाला त्रास होता कामा नये, याची खबरदारी घेत असे. परंतु स्वाभिमानाशी कधी तडजोड केली नाही. या वाड्यात राहाताना लहान-सहान कुरबुरी सोडल्या तर आमचे आयुष्य सुखात गेले असेच म्हणावे लागेल. काही सुखद आठवणी पण गाठीशी आहेत.

१९६४ साली यांच्या एका मित्राच्या बहिणीमुळे मला Rear Admiral औटी यांच्या मुलाची शिकवणी घेणार का अशी विचारणा करण्यात आली. या मुलाचे लहानपण इंग्लंडमध्ये गेले होते. त्याला लवडेल इथल्या पब्लिक स्कूलमध्ये ठेवायचे ठरले होते. त्या शाळेत प्रवेश मिळविण्यासाठी इयत्ता ४ थी पर्यंतचे हिंदी येणे आवश्यक होते. महाराष्ट्रात हिंदीच्या परीक्षा दिलेले बरेच शिक्षक होते पण इंग्रजी माध्यमातून हिंदी शिकवणारा शिक्षक मिळणे जरा अवघड होते. मी ही संधी स्वीकारण्याचे ठरवले. डेक्कन जिमखान्यावर शिकवणीसाठी जावे लागे. विभावरी तीन वाजता मॉंटेसरीतून आल्यावर तिला निजवून, तिचे दूध, खाणे टेबलावर ठेवून मी जात असे. माझ्या मोठ्या मामेसासूबाई ती उठल्यावर तिला दूध वगैरे देऊन मी येईपर्यंत तिला घेऊन झोपाळ्यावर बसलेल्या असायच्या.

आमची जागा Internaly connected असल्याने दोन-चार दिवस आई-वडिलांना भेटून येण्यासाठी मुलींना एकटे ठेवून मी बडोद्यास जाऊ शकत असे.

असे एकत्र कुटुंब नसले तरी नातेवाईक असल्याने मुली सुरक्षित असत. वडील निवृत्त झाल्यावर मी मुलींना घेऊन जास्त मुक्कामासाठी मोठ्या भावाला नोकरी लागेपर्यंत जात नव्हते.

अशीच एक सुखद आठवण माझ्या मोठ्या मुलीचे लग्न झाले तेव्हाची. नोव्हेंबर अखेरीस तिचे लग्न ठरले. तिच्या सासूबाईंना १५ दिवसांच्या आत लग्न व्हावयास हवे होते. कारण नंतर गुरु बदलत होता. ७ डिसेंबरचा मुहूर्त. त्याच वेळी फर्ग्युसनचे उपप्राचार्य असलेले माझे मावससासरे निवृत्त झाले होते. त्यांनी यांना बोलावणे पाठवून विचारले, ''मी आत्ताच निवृत्त झालो आहे. तुला १५ दिवसांचे आत मुलीचे लग्न करावे लागणार असल्याचे कळले. मी अजून कुठेच पैसे गुंतवले नाही आहेत.'' तुला पैशांची जुळवाजुळव करायला सवड हवी असेल तर मला आकडा सांग. आमची पैशांची अडचण नसल्याचे यांनी त्यांना सांगितले. पण त्यांनी आमच्यावर दाखवलेला विश्वासच खूप काही सांगून गेला.

ही मंडळी ३९, बुधवारचा उल्लेख HQ असा करीत. साधारण १९२३ च्या सुमाराला शंकररावांनी हा वाडा विकत घेतला. १९२० च्या आसपास माझ्या सासूबाईंची आई निवर्तली व २२ साली माझ्या सासूबाईपण गेल्या. हे दोन्ही आघात शंकररावांना सहन झाले नाहीत व त्यांनी मुदतपूर्व निवृत्त होण्याचे ठरवले. मिलिटरी अकाऊंट्सच्या नोकरीत सदैव बदलीची धास्ती असे. मध्यंतरी तीन वर्षे त्यांना एडनला पण जावे लागले होते. बायकोच्या मृत्यूनंतर वय वर्षे १६ ते दीड वर्षे वयाचा मुलगा अशी ४ अपत्ये होती. त्यांनी दुसरे लग्न करावयाचे नाही असे ठरवल्यामुळे त्यांचे सासू सासरे आपले धुळे येथील चंबूगबाळे आवरून जावयाकडे रहावयास आले व त्यांनी या मुलांची जबाबदारी पार पाडली. निवृत्तीनंतर मिळालेल्या पैशांमधून हा वाडा विकत घेतला. माझ्या महाजन सासूबाईंची चार मुले पण या वाड्यातच लहानाची मोठी झाली. कारण त्यांचे वास्तव्य हरिगावला असल्याने शिक्षणासाठी ही मुले पुण्यात असत. महाजन, मराठे, काळे, आपटे व भट या सर्वांचे आई–वडील हयात नसल्याने व इतर मुलींचे वास्तव्य पुण्यातच असल्याने त्या सर्वांच्या अडीअडचणीच्या वेळी या वाड्याने त्यांना आधाराचा हात दिला. शंकररावांच्या पेन्शनमध्ये हे सर्व निभावले जात नसे, पण माईचे कष्ट, शंकररावांची देखरेख व थोडाफार महाजनांचा आर्थिक सहभाग यामुळे या आधारवडाने सर्वांना आपली सावली दिली. यांच्या शिक्षणाच्या वेळी सासरे जावयांमधील इगो प्रॉब्लेममुळे आमच्या वाट्याला या आधारवडाची सावली फार उशीरा आली. पण ती अखेरपर्यंत टिकली. माझ्या सासूबाईंच्या आईला ताई व आजीला माई म्हणत असत. ही माई

कष्टाळू व तोंडाळ, पण मायाळू होती. यांच्या वाढदिवशी यांना हाक मारून म्हणत असे, 'ये मेल्या, आज तुझा वाढदिवस आहे. तुझ्या डोक्याला तेल लावून देते'. सर्व नातवंडांना तिने धाकात ठेवले होते. म्हणे, ''शांती जोवर मैत्रिणीकडे जाते व भाऊ मित्राकडे तोवर ठीक आहे. उलट झाले तर मेल्यांची धडगत नाही.'' तिच्या तोंडाळपणामुळे सासू व जावयाची बाचाबाची झाली की म्हातारी आपले लुगडे काखोटीला मारून घर सोडून जाण्याच्या धमक्या देई व रागाचा पारा खाली येताच दिंडी दरवाजापासून परत फिरे. शंकरराव १९४५ पर्यंत हयात होते. माई १९४९ च्या आसपास गेली. मी त्यांना बघितले आहे. माझ्या लग्नात माझ्या सासूने त्यांना आजेचीर घेतले नाही म्हणून रुसल्या होत्या. मोठ्या मामा–मामींनी त्यांचा शेवटपर्यंत सांभाळ केला व आदराने वागवले. मोठे मामा प्रेमळ व मृदुभाषी होते. कधी काही कुरबुर झाली तर म्हणत, ''मालती, जे कोणी काही बोलले असेल तर ते माणूस आपल्यापेक्षा मोठे आहे असे समजून सोडून दे.'' त्यांचा प्रयत्न सदैव माणसे जोडण्याचा असे. सहसा कोणाला लागेल असे बोलत नसत. वडिलांच्या मृत्यूनंतरसुद्धा त्यांनी मदत करण्यात बहिणीच्या संसाराला हात आखडता घेतला नाही. आमच्याकडून मिळणाऱ्या भाड्याचा विनियोग त्यांच्या मदतीसाठी करीत.

हे १९४२ ते १९४६ अशी चार वर्षे त्यांच्या घरात राहात होते. त्यामुळेच घरभाडे व खानावळीचे जेवण यातून सुटका झाली. आजोबा, मामी व मामा यांचा ह्यांच्यावर जीव होता. आमचे लग्न ३९, बुधवार मधूनच झाले. त्याची हकीकत मागे लिहिली आहे. यांची सर्व मावसभावंडे यांना रावसाहेब म्हणत. कारण आजोबांच्या खात्यातच हे नोकरीला लागले होते. सर्व मावसभावंडांचे एकमेकांशी खूप चांगले संबंध होते.

या आधारवडाने आम्हाला १९८८ साली खरीखुरी सावली दिली. १९८८ साली वाड्याचा पुनर्विकास करण्याचे ठरले. त्या वेळी इतर भाडेकरूंप्रमाणे आम्हालासुद्धा ७०० स्क्वेअर फुटाचा ४ खोल्यांचा फ्लॅट सवलतीच्या दरात मिळाला. यावेळची गोष्ट पण लक्षात घेण्याजोगी आहे. मोठे मामा व धाकटे मामा दोघेही त्या वेळी हयात नव्हते. त्यांचे जावईच सर्व व्यवहार पहात होते. त्यांना बिल्डर आमच्या बिनपावतीचे बिऱ्हाड असल्याचा बागुलबुवा दाखवून, पाडून किंमत ठरवू पाहात होते. कारण आमच्याकडे वाड्याचे २/३ ग्राऊंड फ्लोअर फ्रंटेज होते व आम्ही adverse possesion claim केल्यास कसे असे विचारीत. दोन–तीन लोकांशी वाटाघाटी फिसकटल्यावर आम्हाला या गोष्टीची कुणकुण लागली. मग आम्ही दोघे मिळून दोन्ही जावई व माझा मामेदीर यांना भेटलो व

आडून आडून काही सांगण्याऐवजी स्पष्टपणे सांगितले की, ''आम्ही Adverse Possesion मागणार नाही आहोत. कारण तसे करणे हलकटपणाचे लक्षण आहे, असे आम्हाला वाटते. तेव्हा तुम्हीसुद्धा आम्हाला बिल्डरच्या सांगण्यानुसार बिनपावतीचे बिऱ्हाड म्हणून घालवण्याचा विचार न करणे आपल्या दोघांच्याही हिताचे असणार आहे. आपण दोघांनी एकमेकांच्या विरोधात जाण्याऐवजी सामंजस्याने हा प्रश्न सोडवणे श्रेयस्कर आहे. आम्ही आमची बाजू स्पष्ट केली आहे. पण तुम्ही जर आम्हाला वाटाण्याच्या अक्षदा लावणार असाल तर आम्हालाही वाकड्यात शिरण्याशिवाय अन्य पर्याय उरणार नाही. कारण हा आमच्याही अस्तित्वाचा प्रश्न आहे. आम्ही आता म्हातारपणी कुठे जावे? तुम्ही बिल्डरकडे चारऐवजी पाच फ्लॅट मागा व एक आम्हाला तहहयात राहण्याच्या करारावर द्या. आमच्याकडे पन्नास हजार रुपये आहेत. त्याचे व्याज आम्ही तुम्हाला भाडे म्हणून देऊ व आमच्यानंतर सदर जागेचा ताबा तुम्हाला मिळावा असे लिहून देण्यास आम्ही तयार आहोत. आमची कुठलीच मुलगी या जागेवर हक्क सांगणार नाही, याची खात्री बाळगा.'' यानंतर त्यांनी आपसात विचारविनिमय करून आम्हाला इतर भाडेकरूंप्रमाणे सवलत देण्याचे ठरवले व प्रश्न सोयिस्करपणे सुटला. आता पुढे विचार करण्याची आमची पाळी आली. माझ्या डॉ. मुलीने व जावयाने आम्ही गावात राहण्याऐवजी गावाबाहेर राहावे असे सुचवले. त्याला मात्र यांनी स्पष्ट नकार दिला. हे म्हणाले, ''मामांनी मला 'म्हातारपणी तू मला जवळ हवा आहेस. तू ही जागा सोडून दुसरीकडे जाऊ नकोस' असे सांगितले होते. आता मामी एकट्या आहेत. त्यांच्या दोन्ही मुली मुंबईला असतात. तेव्हा मामींची देखभाल करण्याची नैतिक जबाबदारी माझ्यावर असल्याने मी ३९, बुधवार सोडून कुठेही बाहेर जाणार नाही.'' मामींच्या दुखण्यात शेवटचे दोन महिने रजा घेऊन त्यांची मोठी मुलगी माया त्यांच्यापाशी येऊन राहिली होती. तोपर्यंत आम्हाला जमली तशी आम्ही त्यांची देखभाल करीत होतो.

❍❍❍

# कमलाकरचे लग्न व इतर बरेच काही

परीक्षा पंढरीच्या वाऱ्या करता करता १९५९ साली ह्यांचा भाऊ कमलाकर रेल्वेच्या कल्याण येथील पॉवरहाऊसमध्ये बॉयलर अटेंडंट म्हणून नोकरीला लागला. हे बाळ बरेच गुणवान होते. शाळेत असतानाचा माझा अनुभव मी लिहिलाच आहे. त्याचीच री ओढून म्हशीसाठी गवत खरेदी करताना केलेल्या चाळ्यामुळे गवताच्या भारेवाल्या बायकांडून चपला खाणे, बहिणीकडे जबलपूरला शिकायला असताना भाजीपाला बाजार वगैरे करताना वाटमारी करणे, परीक्षेत कॉपी करताना पकडले जाणे वगैरे अनेक गोष्टी त्याच्या नावावर जमा होत्या. कल्याण येथे नोकरीला असताना हा माझ्या डोंबिवलीतील चुलतदीराकडे वर्षभर राहात होता. त्या वेळी त्याने गावात अशी काही कीर्ती संपादन केली होती की माझ्या डॉ. चुलत दीरांची बायको कमलाकरचे हे मोठे भाऊ म्हणून आमच्याकडे यायलाच तयार होईना. तिची बऱ्याच प्रकारे समजूत घातल्यावर ती आमच्याकडे आली. तसेच, १९९३ साली माझ्या नातीसाठी एलिचपूरच्या पांगारकरांचे स्थळ पाहात असताना कमलाकरशी आम्ही संबंधित असल्याचे कळल्यावर नकार कळविला. त्यावेळी कमलाकर एम. एस. ई. बी. त नोकरीला असून पांगारकर त्याचे वरिष्ठ होते.

अशा परिस्थितीत ६१ च्या मे महिन्यात एक दिवस इगतपुरीचे गोखले नावाचे गृहस्थ आमच्याकडे स्थळ म्हणून चौकशी करावयास आले. मुलगी बघून पसंती वगैरे झाली होती. असे त्यांनी आम्हाला सांगितल्यावर यांनी त्यांना विचारले, ''तुम्ही आमची नीट माहिती काढली आहात ना?'' हे गोखल्यांनी कमलाकरला सांगितल्यावर त्याने गोखल्यांना सांगितले, ''तो माझा सावत्र भाऊ असून माझे चांगले झालेले त्याला पाहवत नाही. म्हणून तो असे म्हणतो आहे. नोकरीला लागल्याबरोबर तो घरापासून वेगळा झाला व मीच दुधाचा धंदा करून घराला आधार दिला,'' तरी रीतीप्रमाणे मोठा भाऊ म्हणून तुम्ही त्याच्याशीच बोलणी करावीत. कारण माझे वडील आजारी असतात,'' त्याच दिवशी सायंकाळी यांना कंट्रोलर बरोबर फिरतीवर जावयाचे असल्याने यांनी गोखल्यांना गणपुले मामांबरोबर बोलणी करावयाचा सल्ला दिला व स्वतःची सुटका करून घेतली.

२२ नोव्हेंबर, १९६०, रोजी विभावरीचा जन्म झाला होता. ही मुलगी सोनपावलांनी आमच्या घरात आली. तिच्या जन्माअगोदर काही महिने कंट्रोलरने यांच्यावरच्या दोन–तीन सिनीयर्सना डावलून confidential reports च्या आधारावर पी. ए. म्हणून यांची निवड केली होती. त्यांच्याबरोबर फिरतीवर गेले म्हणजे टी. ए. डी. ए. मिळत असे. आठवड्याला साधारण ५० ते ६० रुपये सहज वाचत असत. जिथे जिथे जात तिथे बऱ्याच ठिकाणी, म्हणजे बडोदा, जबलपूर, नागपूर, दिल्ली, फार काय अगदी वास्को–द–गामालासुद्धा, नातेवाईक असल्याने डी. ए. खर्च करावा लागत नसे. कुठलीही लबाडी न करता प्रथम वर्गाने प्रवास करून सुद्धा हे पैसे वाचत असत. त्या एक–दीड वर्षात आमची आजपर्यंतची सर्व किरकोळ देणी भागवून लग्न झाल्यानंतर पहिल्यांदाच ७५० रु. चे. पाच तोळे सोने घेऊन मी स्वत:साठी पाटल्या करू शकले. आतापर्यंत मी गुंजभरसुद्धा सोने खरेदी केले नव्हते किंवा चांदीचा लहान चमचासुद्धा विकत घेतला नव्हता. अगदी हँड–टू–माऊथ जगत होतो आम्ही!

कमलाकरपंतांनी नोकरी लागल्या लागल्याच, ''मला माझे आई–वडील मेले व मी आई–वडिलांना मेलो,'' असे जाहीर रीतीने सांगून टाकल्यामुळे आम्ही कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे लोकलाजेस्तव पाहुण्यासारखे लग्नाला गेलो. दोन्हीकडील व्यवस्था गोखल्यांनीच केली होती. एखाद्या क्षेत्राच्या ठिकाणी जाऊन लग्न पार पाडावे असा १५–२० माणसांच्या उपस्थितीत लग्न समारंभ पार पडला. मामांनी एलिचपूरच्या मंडळींचे भाडे वधूपित्याकडून मागून घेतलेले असल्याने आम्हाला तो खर्च करावा लागला नाही.

गोखल्यांची मुलगी काळी सावळी, ठेंगणी व गणित, इंग्लिश सोडून १० वी पास झालेली होती. विशेष बुद्धिमान नसली तरी आवाज बरा होता. शिकली नसली तरी बरी गाणी म्हणू शकत असे व वडिलांच्या सांगण्यावरून रांगोळीची पण चित्रे वगैरे काढत असे. मला तिच्यामध्ये विशेष काही जाणवले असेल तर तिचे डोळे. विलक्षण भावदर्शी व सात्विक वृत्तीची साक्ष देणारे होते! हिचे याच्याशी कसे काय जमेल असा प्रश्न मनाला पडल्यावाचून राहिला नाही. गोखल्यांनी मुलाची नीट चौकशी करावयास हवी होती असे वाटले. गोखले मंडळी साधी सरळ देवभोळी व पापभीरू वाटली. त्यांची परिस्थिती चांगली होती. नाशिकला जॅकसन बागेजवळ स्वत:चे घर होते. दोन मुलगे व ही मुलगी एवढाच परिवार होता. वडील इगतपुरीला रेल्वेत नोकरीला होते.

लग्नानंतर दोन ते अडीच वर्षांनी कमलाकरची बायको आमच्याकडे आली व म्हणू लागली, ''हे माझ्याशी एकनिष्ठ नाहीत, म्हणून मी यांना सोडून जायचे ठरवले आहे.'' तिच्या या निर्णयाचे आश्चर्य जरी वाटले नाही, तरी काळजी मात्र

वाटल्याशिवाय राहिली नाही. तोपर्यंत तिला दोन मुलगे झाले होते. वीस–बावीस वर्षांची, गणित, इंग्लिश सोडून १० वी पास झालेली ही मुलगी कशी काय आयुष्य जगू शकेल असा विचार मनात आला. हे तिला म्हणाले, ''हे बघ, तू तुझ्या आई–वडिलांशी याबाबत विचार विनिमय करून पूर्ण विचारांती काय करावयाचे याचा निर्णय घ्यावास असे मला वाटते. मी तुझ्याशी सहमत असलो तरी मी तुझ्या कितपत उपयोगी पडू शकेन याची मला शंका वाटते. आतापर्यंत वडिलांचा संसार कडेला लावता लावता मी मोडकळीला आलो आहे. माझी नोकरीची १७–१८ वर्षे उरली आहेत. त्यात मला माझ्या चार मुलींची शिक्षणे व लग्ने करावयाची आहेत. तुझ्या दोन मुलांसकट मी तुझी जबाबदारी पेलू शकेन असे मला वाटत नाही. तुझे वडील जर तुझी व तुझ्या मुलांची जबाबदारी स्वतःच्या हयातीत आणि हयातीनंतरही पार पाडू शकणार असतील तरच तू हा निर्णय घ्यावास. हे तुला सांगताना मला फार दुःख होते आहे, पण माझा नाईलाज आहे. भावांच्या, वडिलांच्या घरात आश्रितासारखे आयुष्य जगावे लागेल, याचाही विचार तुला करावयाला हवा. मी तुझ्या वडिलांना सूचक प्रश्न विचारला होता, पण तिथे माझा सावत्रपणा आडवा आला.'' या दोन–अडीच वर्षांमध्ये ती जबलपूरला गेली असताना ती आमच्याबद्दल काहीतरी बोलली. त्या वेळी माझ्या वन्सं तिला म्हणाल्या होत्या, ''काय बोललीस? परत बोल. आमचा दादा नसता तर आज तुला आमच्यापैकी कोणीच जिवंत दिसले नसते.'' यावरून व प्रत्यक्ष अनुभवावरून त्यांना खऱ्या वस्तुस्थितीची ओळख पटली असावी.

पुढे त्यांचे काय ठरले माहीत नाही. पण ती घर सोडून गेली नाही, एवढे मात्र खरे. १९६७ च्या जुलैमध्ये माझ्या नणंदेच्या धाकट्या मुलीच्या लग्नाला आम्ही नाशिकला गेलो असताना व्याही म्हणून जावेच्या माहेरी त्यांच्याकडे भेटावयास गेलो. चहा पाणी झाल्यावर आम्ही जायला उठलो. इतक्यात एकाएकी तिचे वडील उठले व यांच्या पायावर डोके ठेवून म्हणाले, ''तुम्ही मला क्षमा केली असे म्हटल्याशिवाय मी तुमचे पाय सोडणार नाही. तुमच्याबद्दल मी फार वाईट विचार मनात बाळगले होते. मला आता सत्य काय ते कळले आहे आणि मला पश्चात्ताप होतो आहे. मी तुमचा फार मोठा अपराधी आहे.'' आम्ही दोघेही चक्रावून गेलो. काय करावे सुचेना. कशीबशी त्यांची समजूत काढून आम्ही काढता पाय घेतला. इतक्या सात्विक वृत्तीच्या माणसाला असा जावई मिळाला याची खंत वाटली. आजपर्यंत सिनेमा नाटकात असे प्रसंग पाहिले होते, पण Truth is stranger than fiction याचा अनुभव आला.

❍❍❍

# पानशेतचा पूर

**१२ जुलै, १९६१. पुणेकरांच्या आयुष्यातील काळा दिवस.**

सकाळपासून नदीचे पाणी वाढत असल्याच्या बातम्या येत होत्या. नदीकाठच्या लोकांना सावधानतेचा इशारा देण्यात येत होता. पण त्याकडे कोणी फारसे गंभीरपणे लक्ष देत नव्हते. त्यांना वाटत होते चढून चढून किती वाढेल पाणी! फार फार तर वाड्याच्या एक–दोन पायऱ्या आणि जास्तच झाले तर अंगणापर्यंत येईल पाणी. पण तसे झाले नाही. पाणी भराभर वाढतच गेले. शनिवार, नारायण, कसबा पेठांमधील नदीकाठची घरे पूर्णपणे पाण्यात बुडाली. हवालदील झालेले लोक स्वत:चा जीव वाचवण्यासाठी नेसत्या वस्त्रानिशी बाहेर पडले. ओंकारेश्वर पाण्यात बुडाला.

त्या वेळी माझी बहीण बाळंतपणासाठी पुण्यात आलेली होती. पाच जुलै रोजी फडणीसांच्या 'श्री' क्लिनिक मध्ये तिला मुलगा झाला होता. आमच्या वाड्यात पुराबद्दल गंधवार्ता नव्हती. थोड्या वेळातच मुली बातमी घेऊन शाळेतून घरी आल्या. आमच्या मावससासूबाई सुंदरामावशी व त्यांच्याकडची मंडळी पण आली. त्यांचे घर पाण्याने भरले होते.

आमच्या तिन्ही बाजूला पाणी होते. फायर ब्रिगेड, प्रभात टॉकीज व जेस्ते बोळापर्यंत पाणी पसरले होते. पण आमचे घर सुरक्षित होते. मी बहिणीची काळजी वाटून तिला घरी घेऊन येण्यासाठी बाहेर पडले. मी कशीबशी विजय टॉकीजपर्यंत पोहोचले अन् पाहते तो काय? हॉस्पिटलचे दोन मजले पाण्यात. जिवाचा थरकाप उडाला. तिचा दोन वर्षांचा मोठा मुलगा व ७–८ महिन्यांची विभावरी घरी होती. जीव मुठीत धरून परत आले. काहीच सुचेना. इतक्यात सासरे गेल्याची तार आली. 'गंडस्योपरी पीटिका' दुसरे काय? पाणी, दूध, भाजीपाला, वीज सगळेच बंद. अक्षरश: कणीक संपल्यावर जात्यावर बसून गहू दळले. ऑफिसच्या कॅन्टीनमधून मिल्क मेड व दुधाची पावडर मागवली. घरात धान्य भरलेले असल्याने

खिचडी, आमटी–भात, पिठलं–भात यावर दिवस काढत होतो.

दुसऱ्या दिवशी पाणी ओसरल्यावर सात दिवसांची बाळंतीण बहीण व मी, बाळ व तिचे इतर सामान घेऊन चालत चालत घरी आलो. डॉक्टरांनी बाळंतिणींना गच्चीवर हलवले होते. त्या रात्री पाऊस पडला नाही. ही देवाची कृपाच समजावी लागेल.

शाळा सोडून दिली असली तरी मुलींना ध्वनिक्षेपकांवरून सूचना देण्यात आल्या होत्या. ''तुमचे घर पाण्याखाली असेल तर परत शाळेत या. घाबरू नका. शाळेत तुम्ही सुरक्षित असाल. तुमच्या घरच्या लोकांना आम्ही शोधून काढून तुम्हाला त्यांच्या हवाली करू.''

बऱ्याच पूरग्रस्तांना शाळांमध्ये तात्पुरता निवारा देण्यात आला होता. घरेच्या घरे उद्ध्वस्त झाली होती. कित्येकांचे संसार वाहून गेले होते. पुण्यावर भयानक शोककळा पसरली होती. या पुराने दिवसाची वेळ असल्याने फारशी मनुष्यहानी झाली नसली तरी वित्तहानी मात्र बेसुमार झाली होती.

आठवड्याभरात मेहुणे येऊन बहिणीला घेऊन गेले. मुलींना आमच्या मालेगावच्या वन्सं घेऊन गेल्या. त्यांची मुलगी एम. ई. एस. च्या होस्टेलमध्ये राहात होती. अर्धे एम. ई. एस. कॉलेज पाण्याखाली होते. सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

मामांजीचे दिवस पुण्यालाच करावेत असा निरोप आला. कसेबसे दिवस पार पडले. सर्वच नदीकाठ ओसाड झाला होता. दिवस आवरून आम्ही एलिचपूरला गेलो. जाताना मामंजींनी गावात कुणाकडून काही कर्ज वगैरे घेतले असले तर फेडून टाकण्यासाठी पॉलिसीवर ५–६ हजार कर्ज काढून बरोबर घेतले. ते बरेच झाले. कारण गेल्या गेल्याच त्यांच्या बाबू सोमण नावाच्या भाच्याकडे देणेकरी आम्ही केव्हा येणार याची चौकशी करून गेले होते.

एलिचपूरला गेल्यावर असे कळले की आमचे मामंजी जाताना राहते घर सासूबाईंच्या नावे करून गेले आहेत. हाही आमच्यासाठी एक धक्काच होता. कारण आमच्याकडे मामंजींच्या सहीचे पत्र होते. त्यात त्यांनी लिहिले होते, ''माझा हा संसार तू कडेला लाव. माझे आहे नाही ते मी तुला देऊन जाईन.'' त्याचा आधार घेऊन इच्छापत्राला challenge करावे असा सल्ला बाबू सोमणने दिला व मामंजीच्या कर्जाची जबाबदारी पण सासूबाईंवरच ढकलावी असे त्यांचे मत होते. आम्हाला असे करणे प्रशस्त वाटले नाही. कारण गृहकलह चव्हाट्यावर आले असते व १९४२ ते १९६२ पर्यंत जे केले त्यावर पाणी फिरले असते. खरे तर त्या वेळी मला माझ्या सासूबाईंचा राग आला नाही. कारण अजून त्यांच्या एका

मुलीचे लग्न व एका मुलाचे शिक्षण बाकी होते. घर ताब्यात आल्यावर आम्ही हात वर केले असते तर त्या काय कारणार होत्या? कमलाकर त्यांना जरासुद्धा मदत करीत नव्हता. इतकेच नव्हे तर त्याने नवाच वाद उकरून काढला होता. त्याचे नुकतेच लग्न झाले होते. ''काकूने वहिनीला बारा तोळे सोने घातले, पण माझ्या बायकोला काहीच दिले नाही,'' असा कांगावा करू लागला. त्याच्या सासऱ्याने लग्नात मुलीच्या अंगावर दागिने घातले होते. यांनी मला अंगावरचे सोने काढून सासूबाईंच्या हवाली करण्यास सांगितले. मग मात्र मला राग आला.मी म्हणाले, ''माझ्या वडिलांनी १२०० रु. हुंडा तुम्हाला दिला, म्हणून तुम्ही सोने घातलेत. मी वडिलांच्या व नवऱ्याच्या अशी दोन्ही बाजूंनी या सोन्यासाठी कुणाची मिंधी नाही आहे. कारण आमच्या लग्नाच्या एकच वर्ष अगोदर यांनी नमूताईंच्या लग्नाचा खर्च केलेला आहे. आणि आता तर घरही तुमच्या नावे झाले आहे.'' याच माझ्या दिराने ६२ साली शरूच्या (धाकटी नणंद) लग्नासाठी पैशाची मागणी केली असता, ''घर लिहून दे,'' असे आईला सुनावले. आम्ही मात्र १००० रु. देण्याचे ठरवले व त्याप्रमाणे ५ तोळ्यांच्या बांगड्या करून दिल्या. त्या लग्नाची हकीकत पुढे येतेच आहे.

यावेळी माझा सर्वात धाकटा दीर अकोल्याला प्री डिग्री कॉमर्सला होता. या मुलाची व्यावहारिक जाण वाखाणण्याजोगी होती. कॉलेजमध्ये असतानाच त्याने कॉमर्सशी संबंधित वेगवेगळ्या परीक्षांसाठी मार्गदर्शनपर पुस्तिका लिहिल्या. B. Com. झाल्यानंतर काही वर्षे महाराष्ट्र सरकारच्या करसंकलन विभागात नोकरी केली. त्यानंतर अकोल्याला स्वतःचे कोचिंग क्लासेस सुरू केले. M. Com., M.A. in economics च्या पदव्या संपादन केल्या. यांच्या आणि कमलाकरच्या जागांची अदलाबदल झाली असती, तर आमच्या कुटुंबाची एक वेगळीच प्रतिमा जगापुढे आली असती. या मुलाने अकोल्यात चांगला नावलौकिक मिळवला. मानवी आयुष्यात या जरतर मुळेच सुखदुःखांची उलटापालट होत असते. यांच्याशी आजतागायत आमचे सलोख्याचे संबंध आहेत. या मुलाने आईचे पांग फेडले. शरूचे लग्न होईपर्यंत आम्ही घरी पैसे पाठवले. लग्न झाल्यावर हे आईला म्हणाले, ''आता तुझ्या जबाबदाऱ्या संपल्या आहेत. तू घर विकून तुझे जे काय कर्ज असेल ते फेडून टाक. उरलेले पैसे मी तुझ्या नावे डिपॉझिट करतो. त्याचे व्याज तुला हातखर्चाला होईल. तू बाळला घेऊन पुण्याला चल. आपण त्याला बी. एम. सी. सी. त घालू. मी जेवेन ते तू जेवशील व माझी बायको जे नेसेल ते तू नेसशील.'' पण त्यांना हा सल्ला मानवला नाही. मग मात्र आम्ही पैसे पाठवणे पूर्णपणे बंद

केले. १९४२ च्या जानेवारी ते १९६२ जुलै अशी सतत वीस वर्षे आम्ही घरी पैसे पाठवले. शिवाय बहीण–भावांना जवळ ठेवून शिकवण्याचा प्रयत्न केला. बहिणींच्या लग्नात मदत केली. अधूनमधून कधी गहाण टाकलेली भांडी सोडवायला तर कधी मामंजीच्या दुखण्याचा खर्च म्हणून पैसे पाठवले. या सर्वांची इतिश्री झाली. पण याचे फळ असे मिळाले की पैसे बंद केल्यावर सासूबाईंनी ''मधू फिरला, त्याने पैसे पाठवणे थांबवले, असे पत्र जबलपूरच्या नंणदेला लिहिले व नमूताईंचे आम्हाला जाब विचारणारे पत्र आले. हे पाहून आम्ही खरोखरच थक्क झालो.

मामंजी गेल्यानंतर त्यांच्याकडे येणाऱ्या केशव पांडे नावाच्या मुलाला सासूबाईंनी सोबतीला ठेवून घेतले होते. सदर गृहस्थ एलिचपूरच्या ट्रेनिंग स्कूलमध्ये शिक्षक म्हणून नोकरीला होते. संस्कृत घेऊन एम. ए. करीत होते व त्यासाठी चर्चा व विचार विनिमयासाठी मामंजींकडे येत. माझी सर्वांत धाकटी नणंद शरदिनी हिने विद्यावेतन घेऊन वर्षभर नागपूरला राहून Dip. T. हा सरकारी कोर्स केला होता व एलिचपूरजवळ सिंदी बुद्रुक गावी सरकारी शाळेत नोकरी करीत होती. ही मुलगी १८ वर्षांची असताना एक–दोघांकडून लग्नासाठी विचारणा झाली होती. पण मोठी मुलगी मागे ठेवून धाकटीचे कसे करावे या कारणाने त्याचा विचारच केला नाही. आम्हाला ही गोष्ट बऱ्याच उशीरा कळली. आधी कळली असती तर आम्ही असे होऊ दिले नसते. परिणामी ही मुलगी २८ वर्षांची होईतो लग्नाची राहून गेली. आम्ही प्रमिलाताईंचे लग्न झाल्यावर तिने हा कोर्स केला व पाच वर्षे नोकरी केली. ६० साली तिला पुण्याला आणून तिच्यासाठी खूप स्थळे पाहिली, पण यश आले नाही. काणे नावाचे आमचे एक स्नेही पत्रिका बघत असत. त्यांना तिची पत्रिका दाखवली असता त्यांनी सांगितले, ''वडील गेल्यानंतर चौदा महिन्यांच्या आत या मुलीचे लग्न होईल व ती स्वत: स्वत:चे लग्न ठरवील. तुम्ही निश्चिंत राहा.''

काही दिवसानंतर पांडे व शरदिनी यांनी लग्न करण्याचे ठरवले व तसे सांगितल्यावर आमच्या घरात एकच खळबळ माजली. मुलगा देशस्थ, हातची कमावती मुलगी जाणार अशी अनेक कारणे असावीत. शेवटी हो ना करता लग्नाची बैठक घेण्याचे ठरले. प्रेमविवाह असूनही त्यांच्याकडून ३२ तोळे सोन्याची मागणी केली गेली. जवळजवळ आठ तास बैठक चालली होती. शेवटी आमच्या गाडीची वेळ झाली. मी उठतो असे म्हणून हे टोपी घालून उठले व शेवटी १२ तोळे देण्याचे कबूल करून लग्न ठरले. यामुळे सर्व मंडळी आमच्यावर रागावली. सासूबाईंनी खूप बडबड केली. लग्न नाही झाले तर काय जीव जातो का वगैरे. पण आम्हाला मात्र हे लग्न ठरल्याने आनंदच झाला. एक मोठी जबाबदारी पार पडली, असे वाटले. मी म्हणाले, ''लग्न

न होण्याचे काय दु:ख असते हे काकूला (म्हणजेच सासूबाईंना) कसे कळावे? त्यांना तर लग्न या शब्दाचा अर्थ कळण्याअगोदर मुले होऊ लागली होती. काही विपरीत घडण्याऐवजी १२ तोळे देऊन का होईना लग्न ठरते आहे हे बरे नाही का?'' या लग्नामुळे आम्ही सोडून इतर सर्वांनी शरूताईंशी संबंध तोडले. पुढे पांड्यांना सेंट्रल स्कूलमध्ये पोस्टग्रॅज्युएट टीचर म्हणून उत्तम पगाराची नोकरी लागली.

तसा विचार केला तर या मुलीने पाच वर्षे नोकरी करून पगार घरात दिला होता. पण हे बोलणार कोण? कधी कधी गाडी चुकली तर जीव मुठीत धरून तिला त्या खेडेगावात राहावे लागत असे. शरूचा आवाज अतिशय गोड व खणखणीत होता. कितीही वर गेला, तरी चिरकत नसे. गाणे शिकली असती तर उत्तम गायिका म्हणून नाव कमावले असते.

शरूची मुले हुशार निघाली. दोन मुलगे व एक मुलगी. दोन्ही मुले मेजर, कर्नल हुद्यापर्यंत पोहोचली. मुलगी एका कॉलेज मध्ये प्रिन्सिपल म्हणून कार्यरत आहे. शरुचा संसार गरिबीचा असला तरी सुखाचा होता.

पुढे १९६६ ते ६७ साली गणपुले मामा अकोल्याला गेले असताना सासूबाईंनी आपण आपले घर विकून कर्ज फेडून उरलेले पैसे स्वत:च्या तीन मुलांमध्ये वाटण्याचे ठरवले असल्याचे सांगितले.

मामा त्यांना म्हणाले, ''तू असे करू नकोस. असे करणे कृतघ्नपणाचे ठरेल''. त्यावर त्या म्हणाल्या, ''मी त्याचे केले आहे. बाकीच्या मुलांचे मी काहीच केले नाही. म्हणून हा निर्णय घेत आहे.'' त्यावर मामा म्हणाले, ''त्याने तुझ्या संसाराच्या कोसळणाऱ्या डोलाऱ्याला सतत २० वर्षे हातभार लावला, हे तू कसे विसरतेस? तुझा स्वत:चा मुलगा तुला विचारीत नाही त्याचे काय? सावत्र असला तरी माझे त्याच्यावर प्रेम आहे. जबाबदारीची जाणीव ठेवून त्या दोघांनी सख्खा मुलगा करणार नाही इतके तुझ्यासाठी केले आहे आणि जर तू असेच करणार असलीस तर इथून पुढे तुझ्या माझ्यातील बहीण भावंडांचे नाते संपुष्टात आले आहे असे समज.'' त्यावर ''मधू पैसेवाला आहे म्हणून तू त्याच्या बाजूने बोलतो आहेस,'' असे म्हणाल्या. ही सर्व हकीकत परत आल्यावर मामांनी यांना बोलावून घेऊन सांगितली व मरेपर्यंत बहिणीशी बोलले नाहीत. इतकेच नव्हे तर ७२ साली बाळच्या लग्नानंतर आम्हाला दोघांना जवळ बसवून आमच्या पाठीवर हात फिरवून म्हणाले, ''माझी बहीण जरी तुझ्याशी कशीही वागली असली तरी तुम्ही दोघे शेवटपर्यंत कर्तव्याला जागलात.''

घराचे पैसे स्वत:च्या मुलांमध्ये वाटण्याची सासूबाईंची इच्छा नमूताईंनी

त्यांच्या निधनानंतर पूर्ण केली. घर विकून आलेले पैसे, ‘हे’ सोडून बाकी सर्व भावंडांमध्ये वाटून घेतले. ही गोष्ट त्यांच्या मनाला फार लागली. त्यांनी एकच वाक्य उच्चारले : ‘‘मी माझ्या बायका–मुलांचा भविष्यकाळ यांना भरवला, पण यांनी माझा विश्वासघात केला.’’ हा घात त्यांना जिव्हारी लागला. आपण वापरले गेलो असे वाटले. त्या दोन–तीन हजारांनी आमच्या घरावर सोन्याची कौले घातली जाणार नव्हती व ते मिळाले नाही म्हणून आम्ही भिकेलाही लागणार नव्हतो. पण विश्वासाच्या ठिकाणी बसलेला चटका नेहमीच दाहक असतो.

❍❍❍

# एक सीमोल्लंघन : वाटचाल प्रगतीच्या दिशेने

आम्ही १९५८ च्या फेब्रुवारीपासून ज्या प्रमोशनची आतुरतेने वाट पाहात होतो ते प्रमोशन १९६२ च्या जानेवारीत जाहीर झाले व घरात आनंदीआनंद पसरला. हे सनदी अधिकारी झाले. आमच्या संसारात प्रगतीची पहाट उगवली. आतापर्यंत पुरत नाही या व्याख्येतून आता उरत नाही या अवस्थेला सुरुवात झाली. कारण आजपर्यंतच्या खडतर वाटचालीत निर्माण झालेले खळगे भरून काढून मुलींच्या भवितव्याच्या दृष्टीने विचार करायला आम्ही मोकळे झालो होतो.

सुरुवातीला या बातमीला एक गालबोट लागले होते. कारण पोस्टिंग अंबाल्याला मिळाले होते. इंडो-चायना वॉर सुरू होते. शत्रूंची विमाने अंबाल्यावर घिरट्या घातील होती. पण जावे तर लागणारच होते. आम्ही तयारीला सुरुवात केली. गरम कपडे शिवायला टाकले. होस्टेलची चौकशी सुरू केली. आता मीना नववीत, रोहिणी सहावीत व कल्पना चौथीत होती. विभावरी अजून शाळेत जात नव्हती. दोन बिऱ्हाडे ठेवावीत की मुलींना होस्टेलमध्ये दाखल करावे, निर्णय होत नव्हता. पण या वेळी दैवाचे फासे आमच्या बाजूने पडले. त्या वेळचे C.D.A. श्री. सुकुल यांना आम्ही पुण्यातच असायला हवे असे वाटत होते व त्यांनी पंजाबमध्ये बदली हवी असल्याचा कुणाचा अर्ज आहे का याची चौकशी करण्याचे फर्मान काढले. मुंबईला सी. डी. ए. नेव्हीत एका सरदारजींना पंजाबमध्ये बदली हवी असल्याचे कळले व पुण्याहून एका गृहस्थांना मुंबईला पोस्टिंग हवे होते. 'राजा बोले व दळ हाले' या न्यायाने आम्ही पुण्यातच राहिलो व खऱ्या अर्थाने प्रमोशनचे सर्व फायदे पदरात पडले. मुलींना बोर्डिंगमध्ये राहावे लागले नाही व दोन बिऱ्हाडे पण ठेवावी लागली नाहीत.

माझ्या माहेरी आतापर्यंत आमचे कोणतेही नातलग सनदी अधिकारी नसल्याने सगळ्यांनाच खूप आनंद झाला. यांच्या आजोळी, आमच्या सासरी सर्वांनाच या प्रमोशनचे खूप अप्रूप होते. Upper division clerk पासून खात्याच्या Chartered Accountant च्या समकक्ष परीक्षा नोकरी सांभाळून दिल्यामुळेच हे यश प्राप्त झाले होते.

पोस्टिंग पण महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या administration या विभागात मिळाले.

सतत बदलीची टांगती तलवार डोक्यावर असणाऱ्या या खात्यात ही टळलेली बदली आमच्या दृष्टीने फार फायद्याची ठरली, कारण त्यानंतर ७१ नोव्हेंबरपर्यंत आम्ही पुण्याबाहेर गेलो नाही. मुलींच्या प्रगतीच्या व शिक्षणाच्या दृष्टीने हे पुण्यातील वास्तव्य फार मोलाचे ठरले व मुलींनी या मिळालेल्या संधीचे अक्षरश: सोने करून दाखवले. या सर्वाला कारणीभूत ठरलेली गोष्ट म्हणजे माझ्या यजमानांची प्रामाणिक, कष्टाळू व निरलस सेवाभावी वृत्ती. कोणताही कंट्रोलर त्यांना सोडायला कधी तयार होत नसे. यामुळे आम्ही त्यांच्या ३५ वर्षांच्या सेवाकाळात सुरुवातीला दिल्लीतील तीन वर्षे व देवळालीची दोन वर्षे व सरतेशेवटी नागपूरची दोन वर्षे सोडली तर जवळ जवळ २८ वर्षे पुण्यात राहू शकलो. पदोन्नतीचे सीमोल्लंघन झाले तरी महाराष्ट्रातून बाहेर जावे लागले नाही.

गोडबोल्यांकडेसुद्धा माझे थोरले इंजीनिअर चुलत सासरे वगळता कोणीच सनदी अधिकारी या पदापर्यंत पोहोचले नव्हते. काहींना वैषम्य तर काहींना आनंद अशा संमिश्र प्रतिक्रिया अनुभवायला मिळाल्या. एका आईवेगळ्या जिवाने आपल्या कष्टाळू स्वभावाने इतरांना मदत करीत करीत गाठलेला आपल्या प्रगतीचा हा शेवटचा टप्पा होता. मी आजपर्यंत अनेकदा त्यांना विचारले होते, ''तुम्ही जर सरकारी नोकरीत शिरणार होतात तर यू. पी. एस. सी. ची परीक्षा देण्याचा प्रयत्न का केला नाहीत?'' त्यावर उत्तर मिळाले होते की ''असफल झालो असतो तर परीक्षेसाठी भरलेले ८५ रुपये वाया गेले असते.'' इतरांपुढे स्वत:ला कायमच दुय्यम स्थानावर ठेवण्याचा त्यांच्या स्वभावाचा हा भाग आता माझ्या परिचयाचा झाला होता. त्याचा तोटा असा होई की इतर त्यांना सतत गृहीत धरीत असत व ते मला आवडत नसे. आमच्यात अनेकदा यावरून वाद होत असत.

आईला जून १९१२ ते मे १९२२ या कालखंडात सहा बाळंतपणांना सामोरे जावे लागलेल्या अवघ्या २४ व्या वर्षी झालेले हे पाचवे अपत्य. जन्मापासूनच अशक्त होते. मुडदूस झालेला, सतत आजारी असणारा हा मुलगा आई गेली तेव्हा फक्त अडीच वर्षांचा होता. बोलताही येत नव्हते. याचे कसे होईल या काळजीतच त्या माऊलीची प्राणज्योत मालवली. त्या वेळी यांचा धाकटा भाऊ १४ दिवसांचा होता. आई आजूबाजूला दिसत नाही, बोलताही येत नाही अशा या बालजीवाची काय सैरभैर अवस्था झाली असेल याची कल्पनाच करता येत नाही.

मृत्यूच्या आदल्या दिवशी या माऊलीची मानसिक अवस्था कशी होती याच्या दोन आठवणी मला ऐकायला मिळाल्या. माझ्या थोरल्या वन्सं (आई गेली

तेव्हा १० वर्षांच्या) व ७ वर्षांची दुसरी बहीण यांना समोर बसवून त्या म्हणाल्या, ''दुर्गे, कुसुमे आपला भाऊ लहान आहे. त्याला बोलता येत नाही. इतरांनी त्याला त्रास दिला तर त्याची बाजू घ्या. जपा त्याला''. आपल्या बहिणीला त्या म्हणाल्या, ''मुली लग्न होऊन सासरी जातील, हा चौदा दिवसांचा मुलगा जगेल की नाही सांगता येत नाही. हे दुसरे लग्न करतील पण मधूचे कसे होईल याची मला काळजी वाटते. त्याला अजून बोलता सुद्धा येत नाही.'' खडीसाखरेचा खडा हातात धरून त्या या मुलाला म्हणत, ''म्हणं आई, दे'', आपण आपल्या आईला कोणतेच सुख देऊ शकलो नाही याची त्यांना सतत खंत वाटत असे. मला हे नेहमी म्हणत, ''सामान्य परिस्थितीत का होईना पण आई–वडिलांच्या प्रेमळ छायेखाली आयुष्य गेलेल्या तुला उपरेपणाचे दु:ख काय असते हे कसे कळावे? तुझे आई–वडील तुझ्या प्रत्येक अडचणीला आपल्या उपयोगी पडले आहेत. कधीतरी तुझी आई तुला 'मी तुझे केले आहे', असे म्हणाली का सांग मला. मी लहानपणापासून सतत हेच ऐकत आलो आहे की आम्ही तुझे केले आहे. आई नसलेला माणूस सतत उपरेपणाचे आयुष्य जगत असतो.''

खरं तर स्वत:चे दु:ख कुरवाळत बसण्याचा स्वभाव नव्हता त्यांचा. आपल्या मनाची कवाडे ते फारशी कधी उघडून दाखवीत नसत. इतरांकडून किंवा क्वचित एखाद्या प्रसंगी काढलेल्या उद्‌गारावरून थोडेफार कळत असे तेवढेच. दुसऱ्याला सुखी करण्यासाठी वेळप्रसंगी गैरसोय सोसून, स्वत:चे हाल करून मदतीचा हात पुढे करीत. मला या अशा वागण्याचा राग आला तर म्हणत, ''अगं, मी आधी स्वत:ला नाही म्हणतो आणि मग तुला आणि त्यानंतर मुलींना नाही म्हणतो. कारण मला हे माहीत आहे की मी तुम्हाला नाही म्हणालो तर त्याचा गवगवा होणार नाही.'' असे जरी असले तरी एखादे वेळी असे काही तरी घडे की त्यांच्या मनावरची खपली उचकटली जाई व दु:ख भळभळू लागे.

परीक्षेच्या दिवसात एकदा रोहिणी मराठीचे पुस्तक त्यांच्या हातात देऊन म्हणाली, ''दादा, उद्या आमची मराठीची तोंडी परीक्षा आहे. माझ्या मराठीच्या कविता म्हणून घेता का?'' एका मागून एक कविता ती म्हणत होती. तिचे खणखणीत पाठांतर बघून त्यांनी कौतुकाने माझ्याकडे पाहिले. मी म्हणाले, ''उगीच नाही दरवर्षी पहिला नंबर मिळत तिला. तुम्हाला वेळ कुठे मिळतो मुलींच्या अभ्यासाकडे बघायला.''

रोहिणी म्हणत होती –

*पोर खाटेवर मृत्युच्याच दारा, कुणा गरिबाचा तळमळे बिचारा*
*दूर आई राहिली कोकणात, सेविकेचा आधार एक हात*

पाहाता पाहाता यांच्या डोळ्यात अश्रू दाटून आले व गालांवरून ओघळू लागले. रोहिणी घाबरून म्हणाली, ''अहो दादा, काय झाले? तुम्ही रडताय का?'' नकारार्थी मान हलवत म्हणाले, ''बेटा म्हण पुढे, ऐकतोय मी.'' सगळ्यांनाच एकदम काय झाले कळेना. वातावरण एकदम गंभीर झाले. कविता सगळ्यांच्याच मनात कणव दाटून यावी अशी असली तरी सगळ्यांनाच इतके अनावर दु:ख कशामुळे दाटून आले असावे असा प्रश्न पडला. सगळ्यांचे बावचळलेले चेहरे बघून डोळ्यातले अश्रू पुसून हे म्हणाले, ''काही नाही गं. कविता ऐकता ऐकता मला भूतकाळातला एक प्रसंग आठवला. तेरा चौदा वर्षांचा असेन मी. त्या वेळी मल्लखांब खेळता खेळता पायाला हिसका बसून म्हणा किंवा आणखी काही कारणाने म्हणा मला हार्नियाचा त्रास सुरू झाला. माझा एक चुलतभाऊ मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये हाऊसमॅनशिप करत होता. वडिलांनी त्याला पत्र लिहून माझ्यासाठी हर्नियाचा पट्टा मागवला, पण तो म्हणाला, 'त्याचे वय लहान आहे. सगळे आयुष्य तो पट्टा बांधून घालवणार आहे का? त्याला मुंबईला आणा. आपण त्याचे ऑपरेशन करू.'

मी एकटाच मुंबईला आलो. सर्जन मुळगावकरांनी ऑपरेशन केले. जवळ कोणीच नव्हते. भूल देण्याअगोदर काही तास पोट रिकामे ठेवावे लागते. पण नर्सने मला चुकून दूध दिले. ऑपरेशन टेबलवरच मला उलटी झाली. डॉ. मुळगावकर वैतागून ओरडले. Who is the fool that gave milk to this boy? पण सुदैवाने ऑपरेशनच्या जखमेला काही धोका पोहोचला नव्हता. पण नंतर रात्रभर सारख्या उलट्या होत होत्या. तेव्हा मला पण डॉ. ना विचारावेसे वाटत होते की, 'आता मरणार काय मी हो.'

त्या वेळी मी आईवेगळा आहे या कल्पनेने मला फार दु:ख झाले होते. या मुलाची कोकणात का होईना पण आई होती आणि मी तर लहानपणापासूनच आईवेगळा होतो. आज माझी आई असती तर काही तरी करून तिने कोणाला तरी माझ्या सोबतीला पाठवले असते, असे वाटले. माझ्या आजोळची माणसे एकमेकांना बऱ्यापैकी धरून होती. कारण त्या सगळ्यांना एकत्र बांधून ठेवणारे माझे आजोबा व आजीची आई हयात होती. पण वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत आजोळच्या या आधारवडाची सावली माझ्या वाट्याला आली नाही. कारण मधला दुवा निखळला होता. त्या वेळी जरी असे वाटले असले तरी आता विचार करता असे वाटते की लहानपणापासून सतत मनात सलत असलेल्या आईच्या अभावाच्या जाणिवेचाच तो एक अविष्कार होता. काकू माझी सावत्र आई. माझ्याशी कधीच वाईट वागली नाही किंवा तिने माझा कधी छळही केला नाही. तीही त्या वेळी शरूच्या वेळी बाळंतीण

होती. नुकतेच तिने माझ्या मोठ्या बहिणीचे बाळंतपण पार पाडले होते. तात्यांच्या डोळ्यात खुपऱ्या वाढल्या होत्या. माझ्यासाठी कोण कसा वेळ काढू शकणार होते? तरी पण शेवटी एक गोष्ट मात्र खरी, की आई ही आईच असते. तिची सर कुणालाच येत नाही. इतरांनी कितीही केले तरी ते धर्माचे. आईवेगळ्या मुलाला जगात सत्तेचे असे काहीच नसते. हीच जाणीव सतत मनाला अस्वस्थ करीत असते. एक कधीच न संपणारी रुखरुख व उपकारांच्या छायेत आपण वाढत असल्याचे दडपण! आईवेगळ्या मुलाच्या मनाचे काय हाल होतात याची कल्पना कधीच येणार नाही तुम्हाला. बरं का मीने, तुला सांगतोय मी हे, येता जाता आईवर 'हे दिले नाही ते मिळाले नाही' म्हणून डाफरत असतेस ती.'' त्या वेळी मीना टीनएजर होती.

''असे का म्हणता दादा आता. आम्ही सगळ्या आहोत ना तुमच्या सत्तेच्या,'' रोहिणी म्हणाली.

''आहात गं तुम्ही सगळ्या. नाही कुठे म्हणतो मी. पण 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' हेच खरे आहे.''

त्यांच्या मनातील आईच्या अभावाचे हे शल्य अजून एका प्रसंगी समोर आले.

विभावरीचे टॉन्सिल्सचे ऑपरेशन झाले होते. संध्याकाळी डॉक्टरांच्या सूचनेनुसार मी तिला आइस्क्रिम भरवरत होते. घसा दुखत असल्यामुळे ती खाण्यास खळखळ करीत होती आणि मी गोड बोलून तिची समजूत घालत होते.

अनिमिष नेत्रांनी आमच्याकडे पहात हे म्हणाले, ''कळलं, आई कशासाठी लागते ते?''

ते शब्द ऐकून आमचे सर्वांचेच डोळे पाणावले.

माझ्या आठवणींच्या लॅपटॉपमधली त्यांच्या शैशवाची फाईल मी जेव्हा जेव्हा उघडते तेव्हा तेव्हा बालसुलभ खोड्या, अवखळपणा, खोडकर, व्रात्यपणा अशी कुठलीच माहिति किंवा चित्रे सापडत नाही. सापडते ते आजारी बाळ व समजूत आल्यानंतरचा आज्ञाधारक, सोशिक, कष्टाळू, अभ्यासू, धार्मिक वृत्तीचा, पापभीरू, प्रामाणिक, अंगावर सोपवलेली कुठलीही जबाबदारी व्यवस्थित पार पाडणारा एक मुलगा, बाळपण हरवलेला, अकाली प्रौढत्व आलेला एक मुलगा. प्रकर्षाने जाणवलेल्या दोन गोष्टी म्हणजे त्यांच्यातली अध्यात्माची आवड व सार्वजनिक जीवनाकडे असलेला कल. खेळ, अभ्यास, नेमून दिलेली कामे सांभाळून घरासमोरच्या विठ्ठल मंदिरातील कीर्तनासाठी न चुकता वेळ काढीत असत. शाळेच्या ग्रंथालयाची देखरेख करत. एकच गमतीदार गोष्ट सापडली ती म्हणजे

त्यांची चित्रकला या विषयातील अनन्यसाधारण (अ) प्रगती. इतर विषयांचे मार्क बघून ड्रॉईंगमुळे या मुलाचा पहिला नंबर जाऊ नये म्हणून चित्रकलेचे शिक्षक अक्षरश: डोळे मिटून प्रगती पुस्तकात ५० पैकी १७ गुण लिहीत असत. इतक्या या गुणी मुलाचे अक्षर अजिबात चांगले नव्हते. अक्षराचे वळण समजल्यावर वाचता येई इतकेच काय ते.

वेळप्रसंगी स्वत:चा अभ्यास बाजूला ठेवून मित्रांना विषय समजवण्याच्या नादात मार्क कमी मिळाले म्हणून ओरडा खावा लागे. तेव्हा म्हणत, ''मला चार मार्क कमी पडले म्हणून काय फरक पडतो? पण त्यामुळे तो नापास न होता पास झाला हे जास्त चांगले नाही का झाले?'' कॉलेजमध्येसुद्धा यांचा कंपू म्हणे यांच्या नोट्सवरून अभ्यास करी. त्या सर्व मित्रांनी यांचे नाव 'एनसायक्लोपीडिया' असे ठेवले होते व यांचा उल्लेख ते 'एन'. असा करीत. कॉलेजमध्ये एल. टी. एम. लायब्ररीचे सेक्रेटरी म्हणून निवडून आले ते. करंदीकर प्राथमिक शाळेच्या संस्थापिका मामी करंदीकर या गरजू स्त्रीला ते इंग्रजी शिकवीत होते. त्यांचे शिक्षण कशा परिस्थितीत व कशा प्रकारे झाले याची माहिती मागे आलीच आहे.

हे सगळे जरी असे असले तरी कधीकधी इतरांना त्यांच्याकडून असलेल्या अवाजवी अपेक्षांमुळे होणारा मनाचा कोंडमारा असह्य होई. सहनशीलतेची तार प्रमाणाबाहेर ताणली जाई व पाणी संपल्यामुळे शिट्टी उडून गेलेल्या प्रेशर कुकरमधील उसळणाऱ्या वाफेबरोबर बाहेर पडणाऱ्या पदार्थांसारखा राग उफाळून येई व अद्वातद्वा बोलू लागत. त्यात सुद्धा इतरांना काही म्हणण्याऐवजी स्वत:वर राग काढीत. भिंतीवर डोके आपटून घेत व स्वत:च्या तोंडात मारून घेत. सुरुवातीला मला या सगळ्याची फार भीती वाटत असे. पण जसजशी मी यांना समजून घेऊ लागले तसतशी मला त्यांना सावरण्याची अटकळ येत गेली. त्यांना आधार हवा होता. कुणाच्या तरी खांद्यावर डोके ठेवून दु:खाला वाट करून द्यायची होती. मन मोकळे करावयाचे होते. मी ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली. कारण मला कळले होते की एका फार चांगल्या माणसाशी देवाने माझी गाठ बांधली आहे. त्यांच्या पाठीशी मला निर्धाराने, खंबीरपणे उभे रहावयाचे आहे. माझी आई नेहमी म्हणत असे, ''जो नवरा लग्न झाल्या झाल्या बायकोच्या मनाप्रमाणे वागू लागतो ते रंग कच्चे असतात व लवकर उडून जातात. पण जसजसा सहवास वाढत जातो तसतशी आपली बायको चांगली हे कळल्यामुळे जेव्हा तो बायकोला किंमत देऊ लागतो ते रंग शेवटपर्यंत टिकतात.'' मला या सल्ल्याचा चांगला उपयोग झाला. ते असुरक्षिततेच्या दडपणाखाली असावेत या माझ्या समजुतीला दुजोरा देणारी दुसरी गोष्ट म्हणजे

लग्नाअगोदर त्यांना इसबाचा इतका त्रास होत असे की, कधी कधी मामी त्यांना चमच्याने जेवण भरवीत असत. मामांच्या घरी राहायला आल्यावर मोठ्या मामी काळजी घेत, त्यांचे हवे–नको बघत असत. मामीभाच्याचे गूळपीठ होते. लग्नानंतर मानसिक स्वास्थ्य व स्थैर्य लाभल्याने हा त्रास कमी झाला असे डॉक्टरचे मत पडले.

त्यांची शिकवण्याची हातोटी वाखाणण्याजोगी होती. अनेकांना विनामूल्य मार्गदर्शन करीत असत. कधीही कोणाकडून पैसे घेतले नाहीत. म्हणत असत, माझा चरितार्थाचा व्यवसाय वेगळा आहे. कधीकधी या स्वभावामुळे अभावितपणे असे काही घडत असे की परमेश्वरानेच त्यांच्या चांगुलपणासाठी हा कृपाप्रसाद पाठवला आहे असे वाटावे. बरशेनचे सोल एजंट श्री. एल. डी. भावे यांची मुलगी व माझी धाकटी मामेनणंद रेखा मैत्रिणी होत्या. त्या दोघी यांच्याकडे लॉजिक शिकायला येत. दोघींना छान मार्क मिळाले तेव्हा भाव्यांनी शिकवणी म्हणून किती पैसे देऊ असे विचारल्यावर हे अर्थातच नाही म्हणाले. पुढे पाकिस्तान युद्धामुळे ६७–६८ च्या सुमारास रॉकेलची टंचाई निर्माण झाली. हे त्या वेळी फिरतीवर गोव्याला गेले होते. अक्षरश: जोगेश्वरीच्या देवळातून नारळाच्या शेंड्या आणून शेगडी पेटवावी लागे. महाग पडतो म्हणून गॅस घेतला नव्हता. स्कूटर, मोटारधारकांना पेट्रोल पंपावर ५ लिटर रॉकेल मिळे. पण हे १५–१५ दिवस फिरतीवर त्यामुळे तोही मार्ग बंद. एक दिवस मी वैतागून रेखाला म्हणाले, ''पडू दे महाग पडला तर, पण विचार गं तुझ्या मैत्रिणीच्या वडिलांना की नाव नोंदवल्यापासून किती दिवसांत गॅस मिळेल?'' तिने विचारल्यावर ते म्हणाले, ''कोणाला हवे आहे गॅस कनेक्शन.'' यांचे नाव सांगितल्यावर म्हणाले, ''त्यांना सांग तुम्हाला नंबर नाही, कधीही या व कनेक्शन घेऊन जा.'' मी पत्र पाठवून यांची परवानगी घेतली व दसऱ्याच्या मुहूर्तावर आम्ही गॅस घरी आणला.

जात्याच सार्वजनिक कार्याची आवड असल्याने आमच्या खात्याच्या को–ऑपरेटिव्ह बँकेचे डायरेक्टर म्हणून काम पाहात. कन्झ्युमर्स सोसायटीचे तोट्यात चालणारे कापड दुकान बंद करण्याचा निर्णय घेतला तेव्हा दुकानात काम करणारी ४–६ माणसे बेकार होऊ नयेत म्हणून ती जबाबदारी अंगावर घेतली. कुठे कुठे काय अवैध घडते आहे याचा शोध घेऊन भ्रष्टाचार निपटून काढला व तोट्यात चालणाऱ्या दुकानाचे फायद्यात चालणाऱ्या दुकानात परिवर्तन झाले. दुकानाचे मॅनेजर श्री. देशमुख कधीही कापड दुकानात गेले तरी आदराने वागवीत व मी घरी शिवण शिवते हे माहीत असल्याने डिस्काऊंटमध्ये विकले जाणारे कट

पीसेस माझ्यासाठी बाजूला काढून ठेवून निरोप पाठवीत. सुरुवातीलाच दुकानाच्या कारभारात लक्ष घातल्यावर घोडे कुठे पेंड खात आहे हे यांना कळले होते. होलसेलरनी खरेदी संपल्यावर बिल कितीचे करू एवढे विचारल्यावर सुतावरून स्वर्ग गाठला. निवृत्तीनंतर मॅनेजर म्हणून या बँकेचा कार्यभार सांभाळला व बँकेला सतत 'ए' ग्रेड मिळेल अशी सर्वतोपरी काळजी घेतली. त्याचबरोबर निवृत्तीनंतर एकता मासिकाचे कार्यवाह म्हणून १२–१५ वर्षे काम पाहिले. हे बँकेचे मॅनेजर म्हणून रुजू झाल्यावर अनेकांनी मोठमोठ्या रकमा फिक्स डिपॉझिट म्हणून बँकेत ठेवायला सुरुवात केली.

त्यांच्या सेवाकालात ए. एन. सेक्शनमध्ये काम करीत असताना कधीकधी चाकोरीबाहेर जाऊन, तरीही कायद्याच्या चौकटीत राहून अनेकांना मदत केली. श्री. दबडगाव नावाचे त्यांचे स्नेही यांनी यांच्या मृत्यूनंतर मला फोन करून सांगितले, ''मी आज जी काही ओली, कोरडी भाकरी खातो आहे ती गोडबोल्यांमुळे.'' हा मुलगा राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरील बंदीच्या काळात संघाचा स्वयंसेवक म्हणून तुरुंगात जाऊन आला होता. पुढे, शिक्षण पूर्ण करून डिफेन्स डिपार्टमेंटमध्ये नोकरीला लागला. एका हितशत्रूने त्याला क्रिमिनल रेकॉर्ड असल्याचे भासवत त्याच्या Suspension ची ऑर्डर काढावी अशी याचिका दाखल केली. त्यावेळी हे अकाऊंटस् ऑफिसर होते. साहेबांनी यांना बोलावून सल्ला विचारला. ते म्हणाले, ''साहेब, तो तुरुंगात गेला तेव्हा संघावर बंदी होती व हा १८ वर्षे पूर्ण वयाचा नव्हता. दुसरे म्हणजे आता संघावर बंदी नाही व १८ पूर्ण झाल्यानंतरचे याचे कुठलेही क्रिमिनल रेकॉर्ड नाही. शिवाय संघाची माणसे वाईटच असतात असे कोणी सांगितले तुम्हाला? मी स्वत: संघाचा आहे. तुम्हाला माझ्यात काही खोट आढळते का सांगा?'' परिणामी त्याची नोकरी गेली नाही.

दुसरा प्रसंग जरा वेगळ्या पार्श्वभूमीचा. दाणे आळीतली एक मुलगी defence accounts मध्ये नोकरीला होती. तिने गरोदरपणाच्या रजेसाठी अर्ज केला. ती विवाहित नसल्याने त्या वेळचा तिचा अकाऊंटस् ऑफिसर रजा मंजूर करीना. साहेबांनी परत यांना बोलावणे पाठवले. हे साहेबांना म्हणाले, ''साहेब, आपल्याकडे गरोदरपणाच्या रजेसाठी लग्नाचा दाखला हवा असा कुठलाही नियम नाही. ती गरोदर आहे हे सत्य आपल्याला नाकारता येत नाही. म्हणून आपल्याला तिला नियमाप्रमाणे रजा नाकारता येणार नाही व तिला नोकरीवरून कमी पण करता येणार नाही. शिवाय, ती ज्या समाजातून आली आहे तिथे लग्न या विषयाला स्थान नाही. तिने कुठलाही आडमार्ग न पत्करता कुमारी माता होण्याचा धाडसी

निर्णय घेतला आहे. त्याचा आपण मान राखायला हवा.'' तिची रजा मंजूर झाली. तिची मुलगी तिने उत्तम प्रकारे मोठी करून शिकवून लग्न करून दिले व तिची नात एका प्रथितयश डॉक्टरची प्रथितयश डॉ. पत्नी आहे. या धाडसी महिलेने खात्याच्या परीक्षा दिल्या व अकाऊंटस् ऑफिसर या पदापर्यंत मजल मारली.

हे सगळे करताना आपल्याविरुद्ध टीकेचे मोहोळ उठेल याची यांना पूर्ण कल्पना होती. त्यासाठी हे सगळे करण्याआधी मला विश्वासात घेऊन सत्य परिस्थिती सांगितली व ''लोक तुला नाना प्रकारच्या चौकशा करून भंडावून सोडतील. तरी त्यांच्याकडे लक्ष देऊ नकोस,'' म्हणून सांगितले. त्या मुलीला पण बोलावून साहेबांसमोर नेऊन सांगितले, ''आता आम्ही तुला रजा मंजूर करणार आहोत, पण हे वारंवार घडता कामा नये, याची तुला काळजी घ्यावी लागेल''. प्रकरणावर इथेच पडदा पडला.

या ३७, ३७।। वर्षांच्या सेवाकालात अनेक कसोटीचे प्रसंग आले. त्या सर्वांतून तावून सुलाखून सहीसलामत बाहेर पडलो. कुठल्याही मोहाला कधीही बळी पडलो नाही. शॉर्ट कट शोधला नाही. स्वार्थापोटी कुठलीही तडजोड स्वीकारली नाही व स्वाभिमान सोडला नाही. कुणाच्याही धमक्यांना भीक घातली नाही.

यांच्या एका कंट्रोलरची बायको सप्लाय डेपोमधून सामान मागवीत असे. दोन–तीन महिन्यानंतर कंट्रोलरने बोलावून सांगितले की मागवलेले सामान वजनात कमी भरते असे माझी बायको म्हणते व तिने कुठे कुठे किती किती वजन कमी आले याची एक यादी यांच्यासमोर ठेवली. हे गोंधळून गेले. यांनी पुढच्या महिन्यात स्वतःसमोर वजने करून सामान भरून पाठवले तरी तीच तक्रार आली. मग त्यांनी कमी आलेल्या वजनांच्या यादीवरून आलेली व केलेली वजने तपासून पाहिली व समस्या लक्षात आली. आलेली वजने पौंडामध्ये व केलेली वजने किलोमधली आहेत हे स्पष्ट झाले. यांनी कंट्रोलरला सर्व खुलासेवार सांगून सप्रमाण सिद्ध केले व ''आपल्या पत्नीचा मी व माझ्या माणसांवर विश्वास नसेल तर इथून पुढे मला ही जबाबदारी सोपवू नये. मी अविश्वासाच्या छायेत जगू शकणार नाही,'' असे सांगितले. कंट्रोलरकडे ''सॉरी'' म्हणण्यापलीकडे दुसरा पर्याय नव्हता.

दुसऱ्या प्रसंगात संबंधित कंट्रोलर ड्रग ॲडिक्ट होता व सारखा, ''खडकीच्या A.F.M.C. रुग्णालयामधून मला पॅथेडिन नामक ॲम्प्यूल्स आणून दे,'' म्हणून लकडा लावी. या दोन्ही हॉस्पिटलचे ऑडिट यांच्याकडे होते. साहेबांची मागणी पूर्ण करणे फारसे अवघड नव्हते, पण ते यांच्या तत्त्वात बसत नसल्याने यांनी स्पष्ट नकार

देऊन सांगितले, ''मी हे अवैध कृत्य करणार नाही. कारण त्यानंतर मला ऑडिट ऑब्जेक्शन्स मध्ये फेरफार करावे लागतील व प्रसंगी काही इतर गैरकृत्यांकडे काणाडोळा करावा लागेल. ह्या गोष्टी माझ्या तत्त्वात व स्वभावात न बसणाऱ्या आहेत.''

लिहितांना या सर्व गोष्टी १५–२० ओळीत लिहिता आल्या असल्या तरी दोन ते तीन महिने यांनी या प्रकारामुळे विचार करण्यात घालवली. शेवटी मला समोर बसवून खुलासेवार सगळे सांगून म्हणाले, ''मी हा निर्णय घेऊन माझ्याबरोबर तुला व मुलींना पण अडचणीत टाकतो आहे, हे मी जाणतो. पण जगात सर्रास या गोष्टी चालत असल्या तरी माझी सदसद्‌विवेक बुद्धी हिरवा झेंडा दाखवत नाही. त्याचे काय करू? हा माणूस पिंडीवरचा विंचू असला तरी अडचणींच्या ठिकाणी फुटकळ आरोपाखाली शिक्षा म्हणून माझी बदली करण्यापलीकडे माझे काहीही वाकडे करू शकणार नाही. कारण वर असलेल्या मंडळींना मी कसा आहे आणि तो कसा आहे हे चांगलेच माहीत आहे. शिवाय, आता माझ्या नोकरीची पाच वर्षे उरली आहेत व नियमाप्रमाणे मी दोन वर्षांनंतर हक्काने होम स्टेशनला बदली मागू शकतो. काय वाटते आहे तुला? पटतंय का मी काय म्हणतो ते!'' मी म्हणाले, ''अहो पटण्या न पटण्याचा प्रश्नच येतो कुठे? जे योग्य आहे तेच तर करता आहात तुम्ही. आता मी नोकरी करीत असल्याने दोन बिऱ्हाडांचा खर्च सहज परवडेल आपल्याला. आणि समजा तसे जरी नसले, तरी १ तारखेचा व ३० तारखेचा मेळ घालायची जुनी सवय पण आपल्या उपयोगी पडेलच की.'' मनाची तळमळ व अपराधीपणाची मळमळ संपली व आम्ही दोघेही खळखळून हसलो.

दरम्यान या साहेब मजकुरांची ख्याती दिल्लीपर्यंत पोहोचली होती व त्यांची दिल्लीच्या मेन ऑफिसमध्ये उचलबांगडी करण्यात आली.

Office ettiquettes, Office ethics व procedures मधला यांचा अनुभव मुरलेल्या लोणच्यासारखा होता. दुसऱ्यांना नोकरीत सामावून घेण्यासाठी मदतीचा हात पुढे करणारा हा माणूस माझ्या भावासाठी शब्द टाकायची वेळ आली तेव्हा मला म्हणाला, ''माझ्या बरोबर कंट्रोलरकडे येतेस काय?'' आम्ही दोघे गेलो. हे साहेबांना म्हणाले, "Sir, Mrs. Godbole has a request for you." साहेबांनी प्रश्नार्थक मुद्रेने माझ्याकडे बघताच पढवलेल्या पोपटाप्रमाणे मी त्यांना सांगितले, ''माझे वडील वर्षापूर्वी निवर्तले आहेत. माझे तिघे भाऊ well settled आहेत. ते माझ्या आईची चांगली काळजी घेतात. पण माझा सर्वांत धाकटा भाऊ बी. कॉम असून बेकार आहे. त्याला भावांनी पोसावे, असे मी कसे म्हणू शकते?'' हाताने मला थांबवीत साहेब म्हणाले, "I get your point." पुढे ते यांना म्हणाले, "Godbole

you know the office procedure, we are holding an entrance exam, at Deolali on January 5. Do the needful and see to it that this boy qualifies in it and absorbed in to our department." घरी आल्यावर म्हणाले, ‘‘मी माझ्या मेव्हण्याला ऐनवेळी परीक्षेला त्याचा अर्ज नसताना कॉल पाठवला अशी तक्रार कोणी करू नये म्हणून हा खटाटोप केला. आता मी जे काय करीन ते राजाज्ञेनुसार असेल, आणि कुणाला तक्रारीला वाव मिळणार नाही.’’

❍❍❍

# अविश्वसनीय तरीही खरे असे काही तरी

मी स्वत: बुद्धिवादी प्रवृत्तीची असून, अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विचारांशी पूर्णपणे सहमत असूनही काही अनुभव असे आले आहेत की त्यांना खोटे म्हणता येणार नाही.

मला माझ्या मोठ्या मुलीच्या वेळी भास झालेल्या स्त्रीचे वर्णन माझ्या सासूबाईंशी मिळते जुळते निघावे हा त्यातलाच एक प्रकार! माझ्या मनात त्यांच्याविषयी कुठलीच व कसलीच प्रतिमा तयार झालेली नसताना झालेला तो भास या विषयी मी मागे लिहिले आहे.

त्याचप्रमाणे माझ्या मावस सासूबाई सुंदरामावशी यांना पुढे घडणाऱ्या घटनांची चाहूल लागत असे व प्रसंगी त्यामुळे त्या इतरांना सावध करीत व दिलासा देत असत. त्या फारशा शिकलेल्या नसल्या तरी Trance मध्ये असताना कठीण इंग्रजी शब्द सहजगत्या उच्चारीत असत हे मी स्वत: अनुभवले आहे व त्यामुळे एखाद्याला अतींद्रिय शक्ती असू शकते हे मान्य करण्यापर्यंत माझ्या मनाची तयारी झाली आहे व अशाच काही घटना मी लिहिणार आहे.

माझे यजमान त्यांना नोकरी लागल्याचे सांगण्यासाठी त्यांच्याकडे गेले, त्या वेळी झालेला संवाद व जवळजवळ ३५, ३६ वर्षे गेल्यावर आलेली त्याची प्रचीती मागे लिहिली आहे.

रोहिणी आमच्या कुटुंबात समाविष्ट होण्याआधीची हकीकत व माझी त्यावरील प्रतिक्रियापण मी मागे लिहिली आहे.

मुंबईचे प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ आर. व्ही. साठे यांची भाची सौ. सुधा चिंतामणी गोडबोले दोघेही व्यवसायाने डॉक्टर. एक एफ. आर. सी. एस. व दुसरी स्त्री रोग तज्ज्ञ. त्यांची ही हकीकत. सुधामामींची गर्भाशयाशी संबंधित एक शस्त्रक्रिया झाली होती. जखम वगैरे भरून आली. टाके पण काढले. पण ताप थांबत नव्हता व प्रकृती दिवसेंदिवस खालावतच चालली होती. श्री. चिंतामणी माझ्या मावस जाऊबाईंचे भाऊ असून त्यांचे ठाण्याला स्वत:चे रुग्णालय आहे. काय करावे काहीच

सुचत नव्हते. माझे मोठे मावस दीर श्री. मनोहर महाजन शेवटचा उपाय म्हणून सुंदरा मावशींकडे आले व सर्व हकीकत निवेदन केली. सर्व ऐकून घेतल्यावर त्या म्हणाल्या, ''अरे पाहता काय? जे ऑपरेशन केले आहे ते परत करा. नाहीतर पोरगी हातची जाईल''. शेवटचा उपाय म्हणून जखम उघडली तर आत सेप्टिक झाले असल्याचे कळले. योग्य ती उपाययोजना झाली व सुधामामी आजतागायत निरोगी आयुष्य जगत आहेत. स्वत: आर. व्ही. साठे येऊन सुंद्रा मावशीच्या पाया पडले.

रोहिणी जून ८६ ते जून ८८ या कालखंडात अभ्यासवृत्ती घेऊन जर्मनीत Dortmund येथे गेली असताना तिने आम्हाला एप्रिल १९८८ मध्ये जर्मनीला नेले होते. दोन महिने आम्ही मजेत जर्मनीला राहिलो. तीन दिवस इंग्लंडला जाऊन आलो. ॲमस्टरडॅमला जाऊन आलो. अनेक स्थळे पाहिली. शेवटच्या दिवशी रोहिणीने तिथल्या बँक अकाऊंट मधली रक्कम भारतात ट्रान्स्फर केली व आम्ही आवराआवरीला सुरुवात केली. सर्व आवराआवर झाल्यावर घरच्या व युनिव्हर्सिटीच्या तिच्याकडे असलेल्या किल्ल्या योग्य त्या व्यक्तीच्या हवाली करण्यासाठी पाहिले तर किल्ल्या कुठेच सापडेनात. सर्वत्र शोधले. सामान पुन्हा पुन्हा बाहेर काढून तपासले. राहत्या जागेचा कानाकोपरा पिंजून काढला. पण कुठेच किल्ल्या सापडल्या नाहीत. परत ऑफिसमध्ये जाऊन पाहून आली. दिवसभर काय काय केले याचा आढावा घेतला, पण काहीच उपयोग झाला नाही. रोहिणी म्हणाली, ''आई, या दोन वर्षात जे मिळवले ते सर्व इथेच ठेवून जावे लागेल. कारण या किल्ल्यांनी सबंध युनिव्हर्सिटी उघडली जाते व त्या हरवल्याचा दंड म्हणून जवळजवळ ७० ते ८० हजार रुपये मोजावे लागतील. शिवाय मी आत्ताच पैसे ट्रान्स्फर करून आले आहे.'' मावशी त्यावेळी त्यांच्या डॉ. नातीकडे मुंबईला होत्या, तिचा फोन नंबर मिळवला. शेवटचा उपाय म्हणून तिच्याकडे फोन केला. त्या वेळी त्यांचे वय ऐंशीच्या आसपास असावे. आजारी होत्या, पण सर्व ऐकल्यावर म्हणाल्या, ''घाबरू नका. किल्ल्या अयोग्य व्यक्तीच्या हाती गेलेल्या नाहीत. त्या घरात नाही आहेत, घराबाहेर आहेत. तुम्ही राहात असलेला भाग दोन डोंगरांनी जोडून बनलेला आहे. सदर व्यक्ती दुसऱ्या डोंगरावर राहते. या दोन डोंगरांना जोडणारी एक अधांतरी रेल्वे आहे. तुम्ही त्यातून बसून आला आहात व उद्या सकाळी विमानात बसण्याअगोदर किल्ल्या सापडतील.'' सदर व्यक्ती त्या दिवशी दुपारी काय, ''कसे काय? कधी जाणार?'', वगैरे विचारून गेली होती व अनावधानाने टेबलावरील किल्ल्यांचा जुडगा उचलून घेऊन गेली होती. ती व्यक्ती

येऊन गेल्याचे जरी आम्हाला माहीत होते तरी त्यांनी किल्ल्यांचा जुडगा उचलला का, हे आम्ही कसे विचारू शकणार होतो? पण सुंदरा मावशींनी सांगितल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी फोन केला तेव्हा ते म्हणाले, ''कालपासून हा अनोळखी किल्ल्यांचा जुडगा कुणाचा हे आठवण्याचा प्रयत्न करतो आहे. हा जुडगा फिजिक्स डिपार्टमेंटचा आहे, म्हणजे तो तुमचाच असणार. मी आत्ता येतो. आपण खात्री करू व मी तुम्हाला किल्ल्या मिळाल्याची पावती देतो,'' आम्ही सुटकेचा नि:श्वास टाकला व एअरपोर्टवर जाण्यासाठी निघालो.

एक ना अनेक अशा कितीतरी गोष्टी. बी. एसस्सी. च्या परीक्षेच्या वेळी रोहिणी पाया पडायला गेली तेव्हा म्हणाल्या, ''तुझी सर्व तयारी उत्तम आहे, पण सबंध वर्षात तू ज्या एका प्रॅक्टिकलला गैरहजर होतीस ते जरा नीट बघून ठेव. एक गरम, एक गार, नवीन असे काही तरी ते प्रॅक्टिकल आहे. आणि तेच तुझ्या टेबलावर असणार आहे.'' विशेष म्हणजे तेच प्रॅक्टिकल रोहिणीला विचारले गेले.

मीनाच्या लग्नाबद्दल बोलताना म्हणाल्या, ''या मुलीचे लग्न ठरल्यापासून १५ दिवसांच्या आत करून द्यावे लागेल. पैशांची जुळवाजुळव करून ठेव,'' व झालेही तसेच. लग्न ठरले १९ नोव्हेंबरला व ७ डिसेंबरला झाले. तिच्या सासूबाईंना त्या वेळेचा गुरु बदलायच्या आत मुलाचे लग्न व्हायला हवे होते.

कल्पनाच्या लग्नाच्या वेळी मी ज्या स्थळाची चौकशी करीत होते त्या मुलाची मावशी माझ्या दुसऱ्या मावससासूबाईंच्या शेजारी राहात होती. महाशिवरात्रीला माझे आजेसासरे शंकरराव पटवर्धन यांच्या पुण्यतिथीला जमल्यावेळी त्या सासूबाई म्हणाल्या, ''अगं मालती, तू ज्या मुलाची चौकशी करणार आहेस त्यांना डॉ. मुलगी नको आहे, असे त्यांची मावशी म्हणत होती.'' कल्पना त्या वेळी त्याच्याच हाताखाली इण्टर्नशिप करीत होती व ती संपल्यावर मी त्याची चौकशी करावी असे तिचे म्हणणे होते. कारण जर नाही असे ठरले तर तिला त्याच्याबरोबर काम करणे अवघड झाले असते. त्या वेळी सुंदरा मावशी म्हणाल्या, ''कशाला काळजी करतेस? या महिनाअखेर तोच तिला 'माझ्याशी लग्न करशील का?' असे विचारील,'' आणि झालेही तसेच.

रोहिणी पीएच. डी. होऊन परत आल्यावर तिने त्यांना ''मी परत कधी परदेशी जाईन का?'' असे विचारल्यावर म्हणाल्या, ''अगं, तू अंगण-ओसरी अशी परदेशी जात राहणार आहेस.'' रोहिणी अजूनही वर्षातून दोनदा-तीनदा तरी परदेशी जात असते. युरोप, अमेरिका, जपान, चीन, आफ्रिका, रशिया, इराण, कोरिया, फिलिपीनस अशा कितीतरी ठिकाणी ती जाऊन आली आहे. आतापर्यंत ती न गेलेला एकच खंड म्हणजे ऑस्ट्रेलिया. बाकी जगभर ती

कामानिमित्ताने जाऊन आली आहे.

या माझ्या सासूबाईंना शाहू उद्यान जलतरण तलावाच्या मागे असलेल्या समाधीचा साक्षात्कार झाला होता असे म्हणतात. तिथे असलेले त्यांचे गुरू म्हणजे सयाजीनाथ माळी. त्यांना माळी महाराज म्हणत असत. यांना. माझ्या यजमानांनी प्रत्यक्ष पाहिले होते. अत्यंत सात्विक प्रवृत्तीचे गृहस्थ! त्यांना त्यांच्या शेतात ही समाधी असल्याचे स्वप्न पडले. त्या ठिकाणी एक गाय येऊन पान्हा सोडून जात असे. तिथे खणल्यावर ही समाधी सापडली. त्या समाधिस्थ गुरूचे नाव नागनाथ असे होते. नाथ पंथांशी संबंध असला तरी जादू-टोणा, जारण-मारण असे काही उपाय माळीबाबा किंवा सुंद्रामावशी सांगत नसत. समाधीला, शंकराला, देवीला, गणपतीला प्रदक्षिणा घालणे वगैरे अगदी साधे सोपे, असे त्यांचे उपाय असत. त्यांच्या स्वतःच्या मुलाला ही अतींद्रिय शक्ती प्राप्त होती व तो पैसे घेऊन रेसचे घोडे सांगू लागला म्हणून त्याला माळी महाराजांनी घराबाहेर काढले होते. आजही आम्ही त्या समाधीच्या दर्शनाला जातो. आता तिथे कोणी अधिकारी व्यक्ती आहे किंवा कसे माहीत नाही, पण आम्ही स्थानमाहात्म्य म्हणून जातो व त्या स्थानाची देखभाल करण्यासाठी जो खर्च येतो त्याला आपला यथाशक्ती हातभार लागावा या इच्छेने शक्य असेल ती मदत दानपेटीत टाकतो.

माझ्या सासूबाईंना पहिल्या गर्भारपणी झटके येत असत. त्याला काही तरी वैद्यकीय स्पष्टीकरण असेलही कदाचित, पण त्या काळी प्रचलित असलेल्या समजुतींप्रमाणे आपल्या ऑफिसातल्या एका दाक्षिणात्य सहकाऱ्याच्या सांगण्यावरून माझ्या सासूबाईंना त्यांचे वडील महाराजांकडे घेऊन आले होते असे सांगतात.

या बाबतीतला अगदी दोन-तीन वर्षांपूर्वीचा अनुभव म्हणजे माझ्या मोठ्या मुलीने पुण्याला एक सदनिका विकत घेतली होती व त्या सदनिकेचा मिळकत कर भरल्याची पावती तिला परदेशी जाण्यासाठी सादर करायला हवी होती. त्यांनी तशी मागणी केल्यावर मी तीन-तीनदा माझ्याजवळची कागदत्रे तपासून पाहिली, पण कुठेच सापडेना. शेवटी एक दिवस रात्री १२ वाजता झपाटल्याप्रमाणे उठून पुन्हा सगळी तपासणी केली, पण हाती काहीच लागले नाही. म्हणून अत्यंत व्यथित होऊन अश्रू भरल्या डोळ्यांनी उशीवर डोके टेकून म्हणाले, ''बाबा, मानहानीचा प्रसंग आला आहे. काय करावे सुचत नाही. मार्ग दाखवा.'' त्या दिवशी माझे धाकटे जावई हैद्राबादहून बसने पुण्याला येत होते. रात्रीचा प्रवास होता. त्यांना स्वप्नात ती पावती त्यांच्या कपाटाच्या खणात असल्याचे दिसले. मध्यंतरी काही कामासाठी त्यांनी माझ्याकडून मागून घेतली असावी, पण आम्ही दोघेही ही गोष्ट विसरलो होतो. प्रवासातून घरी आल्यावर सर्वप्रथम त्यांनी कपाटाचा खण उघडून

पाहिला आणि ती पावती सापडली. दोन–तीन दिवस पावतीची चर्चा घरात होत असल्याने Subconcious level वर त्यांच्या मनाने स्वप्नात ती पाहिली असावी, असे म्हटले तरी घटनांचा सिक्वेन्स आश्चर्यकारक होता, हे नाकारता येत नाही. एवढे मात्र खरे, की अटळ गोष्टी त्यांना कळत नसत. स्वत:चा मुलगा गेला त्या वेळी कोणीतरी कर्ता पुरुष जाणार आहे एवढीच सूचना त्यांना मिळाली होती.

❍❍❍

# हुजुरपागा, मुली आणि मी

हुजुरपागा पुण्यातील अग्रगण्य मुलींची शाळा. आधी पालक म्हणून आणि नंतर शिक्षक म्हणून उणीपुरी २७ वर्षे मला या शाळेचा सहवास लाभला. माझ्या आयुष्यात आणि भावविश्वात या शाळेला एक अनन्यसाधारण स्थान आहे.

शहराच्या मध्यवस्तीत हिरवाईने नटलेली, भारदस्त देखण्या खानदानी इमारती असलेली, गजबजलेल्या लक्ष्मी रोडवरच्या भव्य प्रवेश दारातून आत शिरताक्षणीच बाहेरची गजबज मागे पडून शांत आणि चैतन्यमय वातावरणाची शरीराला आणि मनाला भुरळ घालणारी निसर्गरम्य, विस्तीर्ण परिसर लाभलेली, पुण्यातील एकमेव मुलींची शाळा. या शाळेत शिफ्ट पद्धत नव्हती; ११ ते ५ या वेळातच पहिली ते अकरावीचे वर्ग सामावून घेण्याची क्षमता असलेली शाळा. जलतरण तलाव सोडला तर इतर सर्व क्रीडा प्रकारांच्या सरावासाठी आवश्यक ती साधनसामग्री व क्रीडांगणे शाळेच्या आवारातच असलेली शाळा. समृद्ध ग्रंथालय, प्रशस्त मध्यवर्ती सभागृह, गृहशास्त्र, वाणिज्य, चित्रकला, संगीत या विषयांसाठी त्या त्या विषयातील तज्ज्ञ शिक्षक व आवश्यक त्या सुखसोयींनी समृद्ध विशाल वर्ग खोल्या असलेली, आणि अगदी दशरथ शिपायापासून ते मुख्याध्यापिकेपर्यंत विद्यार्थिनींवर अपत्यवत प्रेम करणारी, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी धडपडणारी, विद्यार्थी केंद्रित दृष्टिकोन जोपासणारी शाळा. त्या वेळी 'Multipurpose'चा विशेष बोलबोला होता. या शाळेत गृहविज्ञान, चित्रकला, संगीत, वाणिज्य व स्पेशल अंकगणित यांपैकी कोणताही एक विषय घेऊन गणित, इंग्रजी अथवा सायन्स यांपैकी एखादा विषय वगळून किंवा आठ विषय घेऊन त्यांपैकी ७ विषयातले जास्तीत जास्त मार्कांची बेरीज करून एस.एस.सी. होता येत असे.

माझी शाळेत कोणाशीच ओळख नसताना निव्वळ मुलींचे गुण पाहूनच शाळेने त्यांना वेगवेगळ्या उपक्रमात सहभागी करून घेतले. इयत्ता सातवीत मीनाला ऐन परीक्षेच्या तोंडी कांजिण्या झाल्या. दीड महिना शाळा बुडाली, पण स्वत:च्या फ्री पीरियडमध्ये माझ्या विनंतीवरून मला वृत्तचिती व क्षेत्रफळाची गणिते समजावून

सांगणाऱ्या सुमती आपटे बाई, ''हिचे ड्रॉईंग चांगले आहे, हिला ड्रॉईंगच्या परीक्षांना बसवा'' म्हणून सांगणारे जोशी सर; ११ वी मध्ये विशेष सवलत देऊन पोहोण्याच्या स्पर्धेत भाग घ्यायला लावणाऱ्या साठेबाई; मधल्या सुट्टीत मैत्रिणीशी भांडताना ऐकलेल्या आवाजातल्या ठसक्यावरून जिल्हा परिषदेच्या नाट्य स्पर्धेमध्ये खडाष्टकातील रागिणीच्या पात्रासाठी तिची निवड करणाऱ्या भागवत बाई; कल्पना सातवीत असताना ''हिचा आवाज चांगला आहे, हिला गाण्याच्या क्लासला घाला,'' असे मला बोलावून सांगणाऱ्या चंदूताई साठेबाई. किती नावे सांगावीत. ''आमच्या वझेबाईंसारख्या बाई तुला भूगोल शिकवायला असत्या तर तुलासुद्धा भूगोल आवडला असता'', असे म्हणणारी कल्पना, तर ''वर्गातल्या शेवटच्या मुलीला गणित समजल्याशिवाय भागवतबाई पुढे जात नाहीत'', ही मीनाची टिप्पणी.

आमची १९६२ जानेवारीतली टळलेली बदली हा आयुष्यातला एक अमृत–सिद्धी योग होता, असेच म्हणावे लागेल. पुण्याला विद्येचे माहेरघर म्हणतात. विद्येच्या माहेरघरातल्या ज्ञानवृक्षाखाली आपला अभ्यास व अभ्यासेतर कार्यक्रमांचे असंख्य सुवर्णकण टिपत आपल्या प्रगतीचा आलेख सतत उंचावत ठेवणाऱ्या मुली ही आमच्या आयुष्यातील फार मोठी जमेची बाजू होती. काय नव्हते या आलेखात? त्यात लहानग्या विभावरीने शिशु शाळेत असताना बालोद्यान कार्यक्रमात ''बदक चालले जत्रेला'' ही गोष्ट सांगितली होती, रोहिणीने चौथीत असताना आंतरशालेय स्पर्धेतला नियोजित भाषणात मिळवलेला दुसरा क्रमांक होता, मीनाच्या ड्रॉईंगच्या परीक्षा, कल्पनेच्या गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षा, रोहिणीला मिळालेली सातवीची शिष्यवृत्ती, कल्पनाने आपल्या सुरेल स्वरात कविता सादर करून त्यावर केलेले रेडिओवरील कवितेचे रसग्रहण, रोहिणीने U.N.O. च्या स्पर्धेत इंग्लिश मीडियम मधल्या मुलांना मागे टाकून इंग्रजी भाषेतील निबंधाला मिळावलेला पहिला क्रमांक, अशा कितीतरी गोष्टी. कल्पना, रोहिणी सतत प्रकाशझोतात! रोहिणी पाचवी ते अकरावीत सतत पाच तुकड्यात पहिली तर कल्पना पहिली किंवा दुसरी. नववीतून दहावीत जाताना पहिल्या क्रमांकासाठीची सर्वच्या सर्व १४ बक्षिसे कल्पनाने पटकावली होती. नाट्यवाचन, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या संस्कृतच्या परीक्षा, राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या हिंदीच्या परीक्षा, गीताधर्म मंडळाच्या विविध स्पर्धा, सगळीकडे या दोघींचा मुक्त संचार असे. एस. एस. सी.च्या परीक्षेत दोघी बोर्डात आल्या. कल्पनाला गणितात १०० पैकी १०० व यमुनाबाई दळवी शिष्यवृत्ती मिळाली. त्या मानाने अभिनय व क्रीडाक्षेत्रात या दोघींना म्हणावी तशी गती नव्हती. असे म्हणा, किंवा ती आवड

निर्माण करण्यात मी कमी पडले असे म्हणा. तो भाग थोडा दुर्लक्षितच राहिला. इतके सर्व असूनही गृहकृत्यांमध्येही मला मुलींचा सतत मदतीचा हात असे. त्यांच्या भोंडल्यांच्या खिरापती, दिवाळीतले आकाशकंदिल, शाळेतल्या हस्तलिखितासाठी चालणारी धडपड, वेगवेगळ्या स्पर्धांसाठी केलेली तयारी यात दिवस कसे संपले कळलेच नाही.

१९६५ ला मीना एस. एस. सी. झाली. सायन्सला गेली. पुढे ६७ ला इंटर सायन्स नंतर तिच्यापुढे तीन पर्याय उपलब्ध होते. जी.डी.आर्ट, आर्किटेक्चर किंवा मेडिसीन. तिला मेडिकलला प्रवेश मिळत असूनही डॉक्टर व्हायचे नव्हते. पुण्यात नव्याने सुरू झालेल्या अभिनव कला महाविद्यालयात जी. डी. आर्ट किंवा आर्किटेक्चरला प्रवेश मिळाला असता, पण अजून या विद्यालयाला सरकारी मान्यता मिळाली नव्हती. पण विचार चालू होता. तिला नव्याने सुरू झालेल्या मायक्रोबायॉलॉजीत बी. एसस्सी. करावे असे वाटत होते, पण पुण्यात ती सोय नव्हती. मुंबईला ठेवले तर काय याचा अंदाज घेतला, पण खर्च आमच्या आटोक्याबाहेर होता. त्याच वेळी माझा मोठा भाऊ वसंता पुण्याला मुली पाहण्यासाठी आला असताना मामा–भाचीचे काय बोलणे झाले माहीत नाही, पण बाईसाहेबांनी रसायनशास्त्र मुख्य विषय घेऊन बी. एसस्सी.ला प्रवेश घेतला. रोहिणी ६८ ला एस. एस. सी. झाली. स. प. महाविद्यालयात शास्त्र शाखेला प्रवेश घेतला. मीना ६९ला बी. एसस्सी. झाली, त्याच वर्षी रोहिणीला सायन्स टॅलेंट शिष्यवृत्ती मिळाली. ही शिष्यवृत्ती तिला पीएच. डी. होईपर्यंत मिळू शकणार होती. पुढच्या वर्षी कल्पना एस. एस. सी. झाली, ७२ ला मेडिकलला गेली. रोहिणी पुणे विद्यापीठात प्रथम क्रमांकाने बी. एसस्सी. झाली व आय. आय. टी. मुंबईला निघाली. बी. एसस्सी. च्या परीक्षेत मीनाला अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्यामुळे एम. एससी. ला प्रवेश मिळू शकला नाही. बॉटनी, झूओलॉजी ला प्रयत्न केले, पण तिथेही प्रवेश मिळू शकला नाही. वर्षभर तिने खटावकरांकडे पोर्ट्रेट पेंटिंगसाठी उमेदवारी केली आणि तिच्या लक्षात आले की चित्रकला हा तिचा छंद आहे. तिने बी. एड. करावे असे आमचे मत पडले. कारण बँकेत किंवा ऑफिसात नोकरी करण्यापेक्षा बाई जर शिक्षकी पेशात असेल तर घर संसार व मुलांचे अभ्यास चांगल्या प्रकारे सांभाळू शकते, कारण शालेय आयुष्यातच मुलांना पालकांच्या मार्गदर्शनाची जास्त आवश्यकता भासते. तिने बी. एड.ला प्रवेश घेतला. याच वर्षी माझ्या सासूबाई वारल्या व वडीलही वारले. वडिलांच्या दिवसांसाठी गेले असताना भाऊ म्हणाला की त्याचा मित्र सुहास कार्लेकर बी. ई. झालेला असून मुली बघतो आहे. कार्लेकर

मंडळी आईच्या घराच्या जवळच राहात होती. दांडेकर, कार्लेकर २-३ पिढ्यांपासून एकमेकांना ओळखत होते. काही दूरचे नातेसंबंधही होते. माहिती काढायची गरजच नव्हती. मुलगा रोजच्या पाहाण्यातला होता. पत्रिका द्यायला गेले तेव्हा तो आलेला असल्याने बघायला मिळाला. सगळे छान होते. काही दिवसांत त्यांनी पत्रिका जुळत असल्याचे सांगितले, पण नर्मदामाई व मुंबईचा पाऊस यांची मर्जी सांभाळता सांभाळता तिला बडोद्याला पाठवायला नोव्हेंबर उजाडला. पुढच्या सर्व घडामोडी खूप लवकर झाल्या व ७ डिसेंबरला लग्न करावयाचे ठरले. बी.एड.चे वर्ष पूर्ण करावयाचे या अटीवर लग्न ठरले. दोन्हीकडील मंडळी समजूतदार असल्याने लग्न खेळीमेळीत छान पार पडले. त्यांना लग्न बडोद्यातच व्हावयास हवे होते. मला नुकतीच नोकरी लागल्याने रजा घेऊन लग्नाची तयारी करायला जाणे शक्य नव्हते. पण आईने ''तू काळजी करू नकोस, मी सगळी तयारी करीन,'' असे सांगितले व माझ्या मेहुण्यांच्या मदतीने सर्व तयारी करून घेतली. साठेबाईंनी एक आठवड्याची रजा मंजूर केली. मनाजोगा जावई मिळाला म्हणून आम्ही आनंदात होतो. सर्व कार्यक्रम उरकल्यावर पुण्याला परत येऊन वर्ष पूर्ण केले व लेकबाई अहमदाबादला रवाना झाल्या. एकटी लांब राहणार म्हणून थोडी काळजी वाटत होती. पण बडोद्यात आई व माझी बहीण होती. प्रांत माझ्यासाठी अनोळखी नव्हता. मीना म्हणाली, ''आई, तू पण एकटीच गेली होतीस ना दिल्लीला? का उगीच काळजी करतेस.'' आनंदाची गोष्ट म्हणजे गेल्या गेल्या जूनमध्ये महाराष्ट्र समाजाने चालवलेल्या मराठी माध्यमाच्या शाळेत लगेच तिला नोकरीपण मिळाली. संक्रांत सण, मंगळागौर, दिवाळ सण आनंदात पार पडले आणि नोव्हेंबरमध्ये बदलीची माशी शिंकली. अंबाझरी फॅक्टरी, नागपूरला यांची बदली झाली. जाणे भाग होते. खरे तर हे अहमदाबाद किंवा बडोदा येथे पोस्टिंग मिळवण्याच्या खटपटीत होते, पण त्या आधीच ही ऑर्डर आली होती. अंबाझरी फॅक्टरी नागपूरपासून ८ मैलांवर होती. फॅक्टरीची वसाहत वगळता आजूबाजूला सर्व ओसाड होते. खानावळ नाही की, एखादे थिएटरपण नाही. फॅक्टरीतील मुलांना नागपूरमध्ये शाळेत ने-आण करणारी एक बस दोन वेळा आवारात येई.

माझा प्रोबेशन पीरियड संपला नसल्याने मला त्यांच्याबरोबर जाणे शक्य नव्हते. एक टू रूम किचन क्वार्टर घेतले व डिसेंबरच्या सुट्टीत बिऱ्हाड मांडले. गॅस लगेच मिळाला. थोडेफार सामान, भांडीकुंडी, अंथरुण, पांघरूण, एक कॉट, दोन खुर्च्या. तात्पुरता छोटेखानी संसार मांडला. कॅम्पसवर एक वाण्याचे दुकान होते. रेशन मिळे. आठवड्यातून दोन दिवस भाजीबाजार भरत असे. एक कामवालीबाई

यांचे एक सहकारी श्री. पावडे यांच्या मदतीने मिळाली. ती एकदाच दोन वेळचा स्वयंपाक करी व झाडू पोछा, धुणे–भांडी वगैरे करीत असे. खाली श्री. ताम्हणकर यांचे बिऱ्हाड होते. या बाईपण स्वभावाने चांगल्या होत्या. वेळप्रसंगी मदत करीत. असा ७१ नोव्हेंबर ते ७३ ऑगस्ट हा काळ संमिश्र स्वरूपाचा गेला. काही कडू, काही गोड असे दिवस जात होते. यांना स्वत:ला चहापलीकडे काहीच करता येत नव्हते. गावापासून लांब सोयी सुविधांचा अभाव या सगळ्यांनी त्रासून गेले होते. खडकी फॅक्टरीमधील श्री. कृष्णमूर्ती यांना नागपूरला बदली हवी होती व त्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू होते. परंतु दिल्लीला जो माणूस होता त्याचे व कृष्णमूर्तीचे संबंध चांगले नसल्याने त्यांच्या प्रयत्नांना यश येत नव्हते. त्यांनी यांना Mutual concent साठी विचारणा केली होती. आमचा अर्थातच होकार होता. तरी, नियमाप्रमाणे दोन वर्षे झाल्याशिवाय आम्ही या बदलीत पुढाकार घेऊ शकत नव्हतो. असे सगळे भिजत घोंगडे पडले होते. आम्ही आजी–आजोबा होणार असल्याची सुवार्ता ७२ फेब्रुवारी–मार्चच्या सुमाराला मिळाली, पण हा आनंद आपल्याबरोबर काळजीची एक काटेरी कड घेऊन आला होता. अहमदाबादच्या प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ नाडकर्णींकडे गेल्यावर त्यांना काही शंका आल्यामुळे त्यांनी प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ पटेलांकडे जाऊन तपासणी करण्याचा सल्ला दिला. त्यांच्याकडे जाऊन आल्यावर असे कळले की मीनाला Mitral strenosis नावाचा हृदयविकार आहे. लहानपणी Acute toncilitis चा attack आल्यानंतर कधीकधी अशी विकृती निर्माण होते, तरी पण काळजीचे विशेष कारण जरी नसले तरी सासरच्या मंडळींनी आम्ही मुलीचे दुखणे लपवून लग्न लावून दिले, असा समज करून घेतला तर आम्ही काय करणार होतो? तसे प्रत्यक्ष कोणी बोलून दाखवले नाही. तरी मनात आल्याशिवाय राहिले असेल का? ही शंका काळीज कुरतडत होती. त्यातच तिच्या प्रकृतीची काळजी वाटत होती. जिथे आम्हीच या दुखण्याबद्दल अनभिज्ञ होतो, तिथे दुसऱ्यांना काय सांगणार होतो? आम्हाला माहीत असते तर वेळीच योग्य ती उपाययोजना नसती का केली? त्यांना पत्राने सर्व कळवून, जावई व मुलीला पण बोलावून घेतले व माझ्या डॉ. मावसनणंदेच्या सल्ल्यानुसार पुण्यातील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. बानू कोयाजींचा सल्ला घेण्याचे ठरवले. तसेही पुण्याचे के. ई. एम. हॉस्पिटल गव्हर्नमेंट सर्व्हंट साठी Authorised medical Hospital होते. डॉ. बाईंनी तिला तपासून ''काळजीचे अजिबात कारण नाही,'' असे सांगितले. त्या म्हणाल्या मुलीची एकूण प्रकृती इतकी चांगली आहे की तिचे हे काय आणखी पण दोन बाळंतपणे सुखरुप पार पडतील. जीव भांड्यात पडला

तरी मनात धाकधूक होतीच. जावई पण घाबरून गेले होते, कारण दोन वर्षांपूर्वीच त्यांचे वडील हार्ट ॲटॅकने अचानक निवर्तले होते. आम्हाला प्रश्न हा पडला होता की ह्या विकृतीचा तिला आजपर्यंत काहीच कसा त्रास जाणवला नाही. सतत एस. पी. च्या टँकवर पोहोणारी, दिवसातून दोन वेळा सायकलवर फर्ग्युसनचा चढ चढून जाणारी, कधीच कशी तिची दमछाक झाली नाही. पण आता या शंकांचा काय उपयोग होता? आल्या प्रसंगाला तोंड देणे भाग होते.

डॉक्टरांनी तिला नोकरी चालू ठेवण्यास हरकत नाही असे सांगितले. शाळेतील मंडळींनी ''तुम्हाला हवी तितक्या दिवसांची रजा आम्ही मंजूर करू,'' असे आश्वासन दिले, तरी जावई कोणताही धोका पत्करायला तयार नव्हते. वडिलांच्या मृत्यूमुळे ते फार हळवे झाले होते. त्यामुळे मीनाने नोकरीचा राजीनामा दिला व २९ जुलै रोजी आम्हाला एक नक्षत्रासारखी सुरेख नात झाली. सुरुवातीला वाटले तितके या दुखण्याचे स्वरूप गंभीर नव्हते. ठराविक कालाने केलेल्या तपासण्या व काही किरकोळ निर्बंध पाळले असता हे दुखणे तीव्र स्वरूप धारण करीत नसल्याचा अनुभव आला. नंतर ७९ मे ला तिला दुसरी मुलगी झाली. पुढे तिने २०–२२ वर्षे शाळेत नोकरी पण केली. आज तिचे वय ६५ च्या पुढे असून दुखण्याचे स्वरूप ७२ साली होते तितकेच राहिले आहे. त्यात वाढ झालेली नाही, ही समाधानाची गोष्ट. तिच्या दोन्ही मुली कॉम्प्युटर इंजिनिअर आहेत. मोठी Morgen Stanley कंपनीत exeutive director मुंबईला आहे तर धाकटी मुलगी व जावई अमेरिकेत वॉशिंग्टंन येथे आहेत. दोघींना दोन, दोन मुलगे आहेत. परमेश्वर कृपेने सुखी संसार आहे.

गौरीच्या जन्माच्या दिवशी दुपारच्या डेक्कन एक्स्प्रेसने रोहिणी आय. आय. टी. पवईला गेली. कल्पना तिला सोडायला गाडीवर गेली. ती पण एक चित्तरकथाच झाली. मुंबईला झालेल्या पावसामुळे गाडी घाटकोपरला टर्मिनेट झाली. माटुंग्याला निघालेल्या एका गुजराथी जोडप्याने रोहिणीला सांताक्रूझ लेव्हल क्रॉसिंगपाशी सोडण्याचे कबूल केले व अडचण निभावली. सांताक्रूझ लेव्हल क्रॉसिंगजवळच्या रेल्वे क्वार्टरमध्ये माझा मावसभाऊ राहात असल्याने तिला सुखरुप घरी जाता आले. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी कसे, कोणी कॉन्टॅक्ट केले ते आठवत नाही, पण ती सुखरूप असल्याची बातमी आम्हाला कळली व जीव भांड्यात पडला.

या तीन मुलींचे पालक म्हणून हुजूरपागेशी असलेले माझे नाते संपुष्टात आले असले तरी मी शिक्षिका म्हणून व धाकटी विभावरी विद्यार्थिनी म्हणून अजूनही शाळेशी जोडलेल्या होतो.

एकेक जबाबदारी यशस्वीपणे हातावेगळी करीत होतो. पाहता पाहता ७३ साल उजाडले. आता निवृत्तीचे वेध लागले होते. एक नोव्हेंबर, ७७ ही यांच्या निवृत्तीची तारीख चार वर्षांवर येऊन ठेपली होती.

❍❍❍

# वेध निवृत्तीचे

१९७३ च्या ऑगस्टमध्ये कृष्णमूर्तींच्या प्रयत्नांना यश आले आणि आम्ही Mutual Concent देऊन At Govt. Cost पुण्याला परतलो. ही दीड–पावणे दोन वर्षे त्रासाची गेली. तरी गेल्या २०–२५ वर्षांत जे घडले नाही ते या काळात घडले. आमचे साहेब स्वयंपाक करायला शिकले. कारण काही दिवसांनी कामवाली बाई काम सोडून गावी गेली व परत प्रश्नचिन्ह उभे राहिले. सुदैवाने त्यावेळी मी तिथे होते व यांना स्वयंपाक करायला शिकवायचे ठरवले. वेगवेगळे चार्ट बनवून स्वयंपाकाच्या ओट्यावर चिकटवले व स्वत:च्या देखरेखीखाली यांच्याकडून स्वयंपाक करवून घेतला व पुण्याला परतले. सुदैवाने विद्यार्थ्याची परीक्षा घेण्याची लवकरच संधी मिळाली. मला Vocational guidance च्या एका सेमिनारसाठी नागपूरला जावे लागणार होते. मी व श्री. गिरीश वाळिंबे दोघेजण बरोबर होतो. नागपूर स्टेशन बाहेर आल्यावर मला फॅक्टरीची गाडी दिसली. मी ड्रायव्हरला भेटले. तो कोणाला तरी सोडायला आला होता. ओळख देऊन ''मला अंबाझरीला नेतोस का,'' विचारले. तो अर्थातच हो म्हणाला. कारण हे तिथे नं. २ चे अधिकारी होते. आम्हाला जिथे उतरावयाचे होते तिथे वाळिंब्यांना सोडले व संध्याकाळी सेमिनार हॉलवर भेटण्याचे ठरवून क्वार्टरवर गेले. हे एक वाजता जेवायला आले व छान जेवण केले. विद्यार्थी बऱ्यापैकी स्वयंपाक करू लागला होता. पोळीला मात्र पोळीऐवजी रोट म्हणणेच अधिक संयुक्तिक वाटले.

मला ७३ च्या एप्रिलमध्ये Confirmation ची ऑर्डर मिळाली. काही तांत्रिक अडचणीमुळे एक वर्ष उशीर लागला, म्हणून उगीचच काळजी वाटत होती. आता उन्हे कलायला लागली होती. शेवट दृष्टिपथात आला होता. यांच्या सेवाकाळातच कल्पना एम. बी. बी. एस. होणार होती. रोहिणीला पीएच. डी. पर्यंत पुरणारी भरघोस शिष्यवृत्ती मिळाली होती. आता फक्त विभावरीच्या शिक्षणाची काय ती जबाबदारी उरली होती. यांचे पेन्शन व माझा पगार यात आम्ही ती सहज पार पाडू शकणार होतो. आता आम्ही स्वत:च्या निवृत्तीनंतरच्या तजविजीचा विचार

करू लागलो. मला लहानसे का होईना स्वत:चे घर बांधावे असे वाटत होते. लोन काढल्यास पुढची दहा वर्षे विनासायास हप्ता फेडू शकणार होतो. म्हणून ७३ च्या दसऱ्याला कर्वे रोड चर्चच्या मागे एका सोसायटीत छोट्याशा प्लॉटसाठी पैसे गुंतवले. पण आमचे स्वत:च्या वास्तूचे स्वप्न साकार होण्याचा अजून योग आला नव्हता असे म्हणावे लागेल. कारण ७५ च्या आणीबाणीत ही जमीन अर्बन लँड सिलिंगमध्ये अडकली आणि त्यातून ती तब्बल १९ वर्षांनंतर, ९४ साली सुटली. मध्यंतरी आम्ही पैसे काढून घेण्याचा विचार केला, पण आमच्या प्रमोटरचे व वकिलांचे असे म्हणणे पडले की नियमानुसार ही जमीन मूळ मालक प्रमोटरशिवाय दुसऱ्या कुणाला विकू शकणार नव्हता व प्रमोटरलापण आमच्याकडून घेतलेल्या रकमेतच ती आम्हाला द्यावी लागेल. तोपर्यंत जमिनीच्या किमती बेसुमार वाढलेल्या असतील. पैशांच्या मोहाने नव्हे पण जमिनीच्या मोहाने आम्ही ती जमीन काढून न टाकता फक्त ती रोहिणीच्या नावे करून देण्याची प्रमोटरांना विनंती केली. प्रमोटरांनी पण काही रकमेच्या मोबदल्यात आमची विनंती मान्य केली. ती जमीन सुटली तेव्हा तिची बाजारभावाने किंमत आम्ही गुंतवलेल्या पैशांपेक्षा कितीतरी पटीने जास्त होती. यासाठी आवश्यक तो सर्व खर्च रोहिणीने केला होता. आतापर्यंत रोहिणी परत आली होती व गोडबोले आडनाव लावणारी असल्याने हे शक्य होणार होते.

रोहिणी ७४ च्या जूनमध्ये एम. एसस्सी. झाली. तिथेही ती प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली व जी. आर. ई. Tofel देऊन स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क, स्टोनी ब्रुक लाँग आयलंड येथे पीएच. डी.साठी अमेरिकेला गेली. तिचे G. R. E. चे subject percentile ९९.९९ होते. तिला चार विद्यापीठांमध्ये शिष्यवृत्तीसह प्रवेश मिळाला होता. पण हे ठिकाण सर्वांत सोयिस्कर वाटले म्हणून इथे प्रवेश घेतला. तसा ३९, बुधवार ते अमेरिका हा बदल जरासा आव्हानात्मकच होता, पण रोहिणीने हे आव्हान लीलया पेलले. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे २०१३ चे नोबेल ज्या हिग्ज यांना मिळाले ते डॉ.हिग्स यांना रोहिणीचे परात्पर गुरू आहेत. आणि हिग्ज बोसॉन वर काम करणाऱ्या जगातील अग्रगण्य शास्त्रज्ञांपैकी एक रोहिणी आहे. ती ७४ ऑगस्ट ते ७९ ऑगस्टपर्यंत अमेरिकेत होती. दोन–तीन ठिकाणी तिची Post Doctoral Research साठी निवड पण झाली होती. तरी पण तिने भारतात परतणे पसंत केले व टी. आय. एफ. आर. ला Post Doctoral fellow म्हणून जॉईन झाली.

रोहिणी एम. एससी. झाल्यावेळची एक सुखद आठवण म्हणजे ती पहिली

आली असली तरी दीक्षान्त समारंभाला अमेरिकेत गेली असल्याने हजर राहू शकली नाही. तिचे प्रशस्तिपत्र व पहिल्या क्रमांकाचे तळहाताएवढे भलेमोठे रौप्यपदक रजिस्टर पोस्टाने आमच्याकडे आल्यानंतर, महापालिकेकडून एक पत्र मिळाले की तुम्ही चांदी आयात केली आहात, ती घेऊन महापालिकेच्या ऑफिसात यावे. मी सर्व कागदपत्रे घेऊन महापालिकेत गेले. सर्व तपासून संबंधित अधिकाऱ्याने हिरवा बावटा दाखवला व मी परत फिरले. कॉरिडॉरमधून बाहेर पडत असताना एक शिपाई माझ्या मागे धावत आला व मला कमिशनर साहेबांनी बोलावले आहे म्हणून सांगितले. आता आणखी काय? असा विचार करीतच मी साहेबांच्या केबिनमध्ये पाऊल टाकले. मला पाहताच कमिशनर पाळंदे हसून म्हणाले, ''अहो, आम्हाला तरी बघू दे आय. आय. टी. चे रौप्यपदक कसे असते ते.'' त्यांच्या दृष्टीने ती चांदी नसून एक सन्मानचिन्ह होते. एका आय. ए. एस. अधिकाऱ्याने दिलेली ही दाद निश्चितच मनाला सुखावून गेली. 'गुणी गुणं वेत्ति', हेच खरे.

कल्पना १९७६ च्या ऑक्टोबरमध्ये एम. बी. बी. एस. झाली. गुणानुक्रमानुसार भूलशास्त्रात एम. डी. करण्यासाठी तिचा प्रथम क्रमांक होता. आता आम्ही तिच्यासाठी स्थळे बघायला सुरुवात केली होती. Internship साठी तिला पहिली टर्म मेडिसिनची करावयाची होती. दुसऱ्या सर्जरीच्या टर्मसाठी ती डॉ. विनोद केळकर यांच्या हाताखाली काम करणार होती. ते एम. एस.च्या शेवटच्या वर्षाला होते. त्यांचे स्थळ आम्हाला कळले होते. परंतु तिची त्यांच्याकडची टर्म संपायची आम्ही वाट पाहात होतो. टर्म संपता संपता त्यांनीच तिला लग्नाबद्दल विचारले. आम्हाला सगळ्यांना असे काही तरी होईल असा अंदाज होताच. तो खरा ठरला. त्यांच्या आईला डॉक्टर सून नको होती, पण घरातल्या इतरांनी त्यांना त्यांचा विरोध मागे घ्यायला लावला व लग्न ठरले. एम. एस. ची परीक्षा झाल्यावर लग्न करावयाचे ठरले. हे १ नोव्हेंबर, ७७, ला निवृत्त झाले व ११ फेब्रुवारी, ७८, ला कल्पनाचे लग्न पार पडले.

मार्च १९८१ मध्ये कल्पनाने आई आणि एम. डी. दोन्ही पदव्या मिळवल्या. चिरंजीव आईसाठी नोकरी घेऊनच जन्माला आले. त्याच दिवशी तिचा इंटरव्ह्यू होता. तिच्याऐवजी डॉ. विनोद मुलाखत देऊन आले व योग्य वेळी ती बी. जे. मेडिकल कॉलेज मध्ये लेक्चरर म्हणून रुजू झाली. ती आता प्राध्यापक असून भूलशास्त्रविभाग प्रमुख आहे. तिच्या क्षेत्रात तिला मोठा मान आहे. भारतात ठिकठिकाणी होणाऱ्या चर्चासत्रांमध्ये ती सहभागी होऊन व्याख्याने देते. तिचा मुलगा पीएच. डी. असून संशोधन क्षेत्रातच Epigenetics या विषयावर काम करीत

आहे. त्याची पत्नी इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर असून स्वत:च्या वडिलांबरोबर स्वतंत्र व्यवसाय करते. या जोडप्याला वर्षी २५ जुलै, २०१४, रोजी पुत्ररत्न प्राप्त झाले आहे.

कल्पनाचे तीन कविता संग्रहसुद्धा प्रकाशित झाले आहेत. किंबहुना माझ्या वडीलांकडून मिळालेला कवित्वाचा वारसा माझ्या सर्वच मुली व नातवंडे पुढे चालवत आहेत. मीनाची एक कविता तर गुजराथ सरकारच्या मराठी माध्यमाच्या इयत्ता सहावीच्या पुस्तकात समाविष्ट केली गेली आहे. कल्पनाचा मुलगा आश्विन हा सुद्धा इंग्रजीमध्ये कविता करतो.

सरकारी नोकरीत असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कोणत्याही उपक्रमात सहभागी होणे यांना तत्त्वत: मान्य नसल्याने आतापर्यंत बाजूला सारलेली इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांनी 'एकता' मासिकाचा कार्यवाह म्हणून काम करायला सुरुवात केली. ही जबाबदारी त्यांनी शेवटपर्यंत जवळजवळ १६ ते १७ वर्षे पार पाडली. पण नियतीला त्यांचे इतक्यातच निवृत्ती स्वीकारणे मान्य नव्हते. एप्रिल ७८ मध्ये आमच्या बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सतर्फे त्यांना ''तुम्ही बँकेच्या मॅनेजरपदाची धुरा सांभाळू शकाल का?'' अशी विनंतीवजा विचारणा करण्यात आली. निवृत्तीनंतर एखादा अकाऊंटस् ऑफिसर हे काम करीत असे व जुने मॅनेजर श्री. आर. आर. कुलकर्णी ६५ वर्षांचे झाल्यामुळे निवृत्त होणार होते. समोरून आलेली ही संधी स्वीकारावी असे आम्ही ठरवले. कारण अजून विभावरीचे सर्वच बाकी होते. प्रकृतीची पण काही तक्रार नव्हती. मी पण नोकरीत. घरी एकटे बसून काय करणार म्हणून १ एप्रिल, ७८ रोजी यांनी मॅनेजर म्हणून पदभार स्वीकारला. आता आम्ही सकाळी ८ ते रात्री ८ या वेळात एकमेकांना भेटू शकत नव्हतो. जेवणाच्या टेबलावर पाटीवर निरोप ठेवू लागलो. यांची कामाची वेळी सकाळी ८ ते १२ व दुपारी ४ ते ८. मी ११ ते ५ शाळेत. नवीन जीवनक्रमाला सुरुवात झाली.

लवकरच म्हणता म्हणता १९८२ च्या सुरुवातीला विभावरीचे ग्रॅज्युएशन दृष्टिपथात आले होते. विभावरी दिसायला शंभर जणीत उठून दिसणारी असल्याने तिला एक-दोन ठिकाणाहून, समोरून मागणी आली होती. आम्ही तिचे ग्रॅज्युएशन पूर्ण करून घेऊ असे आश्वासन द्यायला पण ती मंडळी तयार होती. परंतु आम्हाला डिग्री हातात पडल्याशिवाय तिचे लग्न करावे असे वाटत नव्हते. आमचे वय झाले होते, म्हणून म्हणा किंवा कल्पना, रोहिणींच्या एक दोघी मैत्रिणींची फसवणूक झाल्याचे माहीत असल्याने म्हणा, आम्हाला आमच्या या शेंडेफळाची

फार काळजी वाटत असे. हिला कोणी फसवणार तर नाही ना, अशी भीती वाटे. तसा तिच्या वागण्या बोलण्यात यत्किंचितही चवचालपणा नव्हता. सरळ मनाची, खूप मोठा मित्र परिवार असलेली, सार्वजनिक कार्याची आवड असणारी ही मुलगी. सर्व मित्रमंडळी नेहमी घरी येणारी, माहीत असलेली होती. तरी पण धाकधूक वाटत असे. अतिस्नेह पापशंकी हेच खरे. तिच्या एका मैत्रिणीच्या आग्रहाने ती रोटरॅक्ट क्लबची मेंबर झाली होती. त्यांच्या क्लबतर्फे कधी निवारा वृद्धाश्रमाचे रंगकाम कर, कधी कासेवाडी झोपडपट्टीची सफाई करून शाळा सुरू करणे, तर कधी बालनाट्य महोत्सवाचे आयोजन कर अशा अनेक कार्यक्रमात तिचा सहभाग असे.

ही माझी मुलगी म्हणजे एक अजब रसायन होते. अतिशय बुद्धिमान पण अजितबात महत्वाकांक्षा नसलेली ही मुलगी! जरुरीपुरता अभ्यास करुन त्यातच समाधान मानण्याची तिची वृत्ती होती परीक्षेत मिळालेल्या गुणांची तिला अजिबात फिकीर नसे.

ती आठवी किंवा नववीमधे असतानाची गोष्ट सहामाही परीक्षेचे पेपर मिळाले होते. रोहिणीने तिचा गणिताचा पेपर बघितला आणि विचारले ''अग विभावरी हे उदाहरण तर बरोबर सोडवलं आहेस! चुक का दिले आहे तुला?'' ''अग पुस्तकातल्या उदाहरणाचे उत्तर आठं आहे आणि माझे उत्तर अपुर्णांकात येते आहे ना!'' हे विभावरीचे उत्तर.

झाले असे होते की प्रश्नपत्रिका तयार करताना पुस्तकातील उदाहरण थोडे बदलून घातले होते पण पुस्तकाप्रमाणेच सोडवले होते व शिक्षकांनी पण तेच उत्तर ग्राह्य धरले होते. आम्ही पुस्तक कधी सोडवलेच नसल्यामुळे समोर आलेले उदाहरण, माहितीप्रमाणे समीकरण तयार करून सोडवले.

रोहिणी तो पेपर घेऊन शाळेत गेली पण पेपर तपासणाऱ्या शिक्षिका शाळेत नवीन असल्यामुळे त्यांना रोहिणीबद्दल काहीच माहीत नव्हते. त्या स्टाफरुममध्ये येऊन तावातावाने बोलू लागल्या ''कोण कुठली ती रोहिणी गोडबोले! मला म्हणते मी चुकीचे पेपर तपासले आहेत!'' दुसऱ्या एक ज्येष्ठ शिक्षिका त्यांना म्हणाल्या ''रोहिणी गोडबोले म्हणते आहे ना चूक आहे? मग ते चुकीचे असण्याचीच जास्त शक्यता आहे.''

अश्या रितीने रोहिणीच्या प्रयत्नाने बाईसाहेबांचे पाच गुण वाढले पण तिला गुण वाढले ह्यापेक्षा आपले उदाहरण बरोबर होते ह्याचाच आनंद जास्त होता.

एकदा मी इंग्रजीची प्रश्नपत्रिका काढली होती उताऱ्यावरील प्रश्नोत्तरांमध्ये

एक उत्तर Indirect Speech मध्ये अपेक्षित होते. पाचही तुकड्यांमध्ये ही एकटीच मुलगी अशी होती जिने हे उत्तर बरोबर लिहिले होते. मला चिंता पडली की माझ्या मुलीला पेपर सांगितल्याचा ठपका येईल. त्यावर वझे बाई म्हणाल्या ''अहो गोडबोले बाई काय काळजी करता? त्या एका मार्काने काय ती पहिली येणार आहे का? ही तर तिची खासियतच आहे. वर्गातल्या सगळ्यात कच्च्या मुलीला जे उत्तर येते ते कदाचित तिला येणार नाही. कारण तिने धडाच वाचलेला नसतो. पण हुशाऱ्यातल्या हुशार मुलीला जे येणार नाही ते हिला येते!''

अशी ही आमची विभावरी! अवांतर वाचनाची अतिशय आवड. शाळेच्या मधल्या सुट्टीत देखील लायब्ररीला वाहिलेली असे. खऱ्या अर्थाने बहुश्रृत! अभ्यासावरुन मात्र आमचे सतत वाद व्हायचे.

तिने तिची ही सर्व बुद्धी पुढे तिच्या व्यवसायात पूर्णपणे वापरली. हुशार किंवा बेताच्या कोणत्याही विद्यार्थ्याच्या पातळीवर उतरुन गणित समजावून सांगण्याची तिची हातोटी वाखाणण्याजोगी आहे.

रीतीप्रमाणे स्थळे पाहावयास सुरुवात करण्याअगोदर, ''बाई आम्ही आता तुझ्यासाठी स्थळे बघणार आहोत. तुझे तू कुठे ठरवले असशील तर आताच सांगून टाक. मागाहून गडबड नको,'' असे विचारले असता स्पष्ट नकार किंवा होकार मिळाला नसला तरी कुठेतरी पाणी मुरते आहे अशी शंका आल्याशिवाय राहिली नाही. एका दोघा मित्रमैत्रिणींकडे चौकशी केल्यावर कळले की डोंबिवलीच्या रोटरॅक्ट शाखेतला कोणी गजानन ठकार नावाचा मुलगा हिला आवडतो व त्यालाही ही आवडते. त्यांना दोघांना एकमेकांवरून मित्रमंडळीत थोडीफार चिडवाचिडवी पण होत असे. खोदून विचारल्यावर हो म्हणाली. पण त्याबरोबर हेही म्हणाली की तुमची परवानगी असेल तरच मी त्याला होकार देईन, कारण तसेच काही कारण असल्याशिवाय तुम्ही नकार देणार नाही, याची मला खात्री आहे. आता तिच्या विश्वासाला पात्र ठरण्याची आमच्यावर जबाबदारी आली. डोंबिवलीचा हा मुलगा. कुठे चौकशी करणार याची, असा प्रश्न पडला. माझा एक चुलत दीर डोंबिवलीत होता त्याला विचारावयाचे ठरवले. त्या अगोदर तिने दिलेल्या जुजबी माहितीवर चौकशी केल्यावर कळले की या मुलाचे आजोबा (आईचे वडील) मोठ्या मामाचे वर्गमित्र होते व ते गोल्ड मेडॅलिस्ट एम. ए. विथ इंग्लिश होते. शाळेच्या त्या वेळेच्या मुख्याध्यापिका भडभडे बाईंच्या माहेरचे बिऱ्हाड त्यांच्या वाड्यात होते व त्यांनीच बाईंना इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन केले होते. त्यांच्याकडून असेही कळले की या गृहस्थांनी लग्न झाल्यानंतर स्वतःच्या पत्नीला

मॅट्रिकपर्यंत शिकवून एस. टी. सी. केले व त्या सेवासदन शाळेत शिक्षिका होत्या. तसेच त्यांची आई समाजाचा रोष पत्करून भिडे वाड्यातील सावित्रीबाई फुल्यांच्या शाळेत शिकवायला जात असत. काका खडकवासला येथे सी. डब्ल्यू. पी. आर. एस. मध्ये अभियंता होते. बालगंधर्वांना ऑर्गनवर साथीला असत व आता नाट्यसंगीताचे मार्गदर्शन करीत असत. एक चुलत मावशी आमच्या शाळेची माजी विद्यार्थिनी होती. आमच्या समोरच्या साक्रीकर वाड्याच्या मालकीणबाई, मुलाच्या आईची सख्खी मावशी होती. त्यामुळे चौकशी करायला कुठेच लांब जावे लागले नाही. ठकार मंडळी खेड शिवापूरची असून मुलाचे काका रमणबाग प्रशालेचे मुख्याध्यापक होते. वडील कल्याणला रेल्वेच्या पॉवर हाऊसमध्ये नोकरीला असून नुकतेच निवृत्त झाले होते व निगडीला त्यांच्या घराचे बांधकाम सुरू असल्याची माहिती मिळाली. आम्हाला एकच गोष्ट खटकत होती ती म्हणजे मुलगा नुसताच बी. एसस्सी. असून एका कंपनीत सेल्समॅन म्हणून कामाला होता. पण शेवटी लग्न हे डिग्री किंवा पगाराशी करावयाचे नसून माणूस महत्त्वाचे, हेही पटत होते. आपण तिला राजपुत्र बघून दिला आणि ती जर त्याच्याशी समरस नाही होऊ शकली तर काय उपयोग? मनाची पाटी कोरी असेल तर त्यावर अक्षरे काढणे सोपे असते, पण असलेली अक्षरे पुसून तिथे नवीन अक्षरे काढणे तितकेच कठीण आणि चुकीचे. आम्ही असा विचार केला, आपल्या तिन्ही मुली सुस्थितीत आहेत. येऊन जाऊन कधी आर्थिक अडचण उद्‌भवली तर आपण थोडीफार मदत सहज करू शकू, पण तशी वेळ आमच्यावर कधीच आली नाही.

आम्ही कोणताच पर्याय शिल्लक ठेवायचा नाही असे ठरवून पत्रिकेची मदत घेण्याचे ठरवले. कल्पनाच्या वेळी सुद्धा आधी पत्रिका जुळवून मगच आम्ही त्यांच्याकडे गेलो होतो. तिथे सुद्धा मुलाची आत्या माझ्या मावसजावेची काकू असल्यामुळे सगळी माहिती नीट मिळाली होती. आमचा पत्रिकेवर अगदी खूप नाही तरी बऱ्यापैकी विश्वास होता व आहे. भविष्य अगदी तंतोतंत नसले तरी एक गाईडलाईन मिळते असे मला वाटते. मुलाची पत्रिका मागून घेतली व माझ्या पुतण्याला दाखवली. तो उत्तम पत्रिका पाहात असे. दोघांच्या पत्रिका पाहून त्याने आम्हाला आणखीनच गोंधळात टाकले. म्हणाला, ''काकू, ही माझी बहीण आहे म्हणून मला नीट काही सांगता येत नाही. दोन्ही पत्रिका आपापल्या ठिकाणी चांगल्या आहेत, पण हिच्या पत्रिकेत मला घरी परत येणारी पत्रिका असा योग आहे असे वाटते व माझा गोंधळ उडाला आहे. तू माझे स्नेही श्री. कडूसकर यांना या पत्रिका दाखव. ते पूर्वग्रहदूषित नसल्याने योग्य तो निर्णय देतील.''

आम्ही कडूसकरांकडे जाऊन पत्रिका दाखवल्यावर त्यांनी सगळ्या गोष्टीतली हवाच काढून टाकली. ते म्हणाले, ''तुम्ही हजार पत्रिका शोधल्या असत्या तरी इतकी जुळणारी पत्रिका तुम्हाला सापडली नसती. मुलगा आता काय आहे यावर जाऊ नका. हा मुलगा कर्तबगार आहे. सध्या मुंबईत असला तरी थोड्याच दिवसात ग्रेटर पुण्यात आणि नंतर काही वर्षातच प्रॉपर पुण्यात स्थायिक होईल.'' आम्ही आता निश्चिंत मनाने त्यांच्या लग्नाला होकार दिला आणि २२ जानेवारी, १९८४ रोजी विभावरीचे लग्न झाले.

आता आम्ही रोहिणीच्या मुंबईत स्थिरस्थावर होण्याच्या दृष्टीने विचार करू लागलो. रोहिणीची टी.आय.एफ.आर. मधली नेमणूक दोन वर्षांपुरती होती आणि ती इतरत्र नोकरीची खटपट करीत होती. कधी कधी भारतात परत येण्याचा निर्णय चुकीचा तर ठरणार नाही ना, अशीही भीती वाटत होती. तिला नोव्हेंबर ८२ साली मुंबई विद्यापीठात लेक्चरर म्हणून नोकरी मिळाली. She was the most qualified person serving on the least important position. या नोकरीमुळे तिला टी. आय. एफ. आर. शी संबंधित राहून संशोधन क्षेत्रात राहता येणार होते. तिला संशोधनाशी फारकत घेण्याची इच्छा नव्हती.

पैशाचाच विचार करायचा असता तर तिला टाटा उद्योग समूहाच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेक्शनमध्ये पाच हजार पगार व furnished क्वॉर्टर मिळणे सहज शक्य होते कारण तिने अमेरिकेत side by side कॉम्प्युटर सायन्समध्ये एम. एस्सी. केले होते. या प्राविण्याचा तिला तिच्या संशोधन क्षेत्रात उपयोग होत होता. त्याबद्दल बोलताना ती मला म्हणाली होती, ''आई, माझ्यामागे जर शिकणारे भाऊ, लग्नाच्या बहिणी अशी जबाबदारी असती तर कदाचित मी अशा नोकरीचा विचार केला असता. परंतु सुदैवाने तशी कोणतीही जबाबदारी माझ्यावर नाही आहे. तुम्हाला पण तुमच्यापुरते मिळते आहे. युनिव्हर्सिटीतला पगार टाटांच्या तुलनेत खूपच कमी असला तरी मला एकटीला पुरेसा आहे. कारण त्यामुळे मला संशोधन क्षेत्रात राहता येणार आहे.'' मागे वळून पाहता हा तिचा निर्णय किती योग्य होता हे ती आज ज्या ठिकाणी आहे, त्यावरून कळून येते.

असे जरी असले तरी तिच्यासमोर राहात्या जागेचा प्रश्न होताच. टी. आय. एफ. आर. मधली खोली सोडावी लागणार होती. युनिव्हर्सिटी तिला क्वॉर्टर द्यायला तयार नव्हती. ती जर लेडिज होस्टलची रेक्टर व्हावयास तयार असेल तरच क्वॉर्टर अलॉट करू असे त्यांनी सांगितले. ही अट अर्थातच मान्य होण्याजोगी नव्हती, कारण त्यामुळे तिला बराच वेळ कँपसवरच राहावे लागणार होते व टी. आय.

एफ. आर. ला जाता येणार नव्हते. फिजिक्सचे एच. ओ. डी. श्री. रंगवाला फारच सज्जन होते. त्यांनी तिची संशोधनाबद्दलची तळमळ जाणून घेतली होती व शिकवणे संपल्यानंतर तिला टी. आय. एफ. आर. ला जाण्याची परवानगी दिली.

आम्ही मुंबईत जागा मिळवण्यासाठी काय करावे लागते याची चौकशी करायला सुरुवात केली. दोन खोल्यांच्या जागेसाठी जवळजवळ दोन लाखांपर्यंत सोय करायला हवी होती. आमच्याजवळ असलेले पैसे व रोहिणीने तिकडून येताना आणलेली रक्कम यातून फार फार तर १ लाखांपर्यंत सोय होऊ शकणार होती. उरलेल्या रकमेचे कर्ज घ्यावयाचा विचार केला, तरी त्यासाठी नोकरी कायमस्वरूपी होईपर्यंत वाट पाहावी लागणार होती. तेव्हा तूर्तास काही दिवस कुठेतरी पेईंग गेस्ट म्हणून राहावे व ८४ च्या नोव्हेंबरमध्ये Confirmation झाल्यावर व ८५ एप्रिल मध्ये मी निवृत्त झाल्यावर मिळणारी रक्कम व काही कर्ज काढून जागेची सोय करावी असा विचार केला.

त्याप्रमाणे ती काही दिवस माझ्या चुलतजाऊबाईंकडे शिवाजी पार्कला राहिली, त्या भाड्याच्या ब्लॉकमध्ये एकट्याच राहत असत, नंतर प्रभादेवीला एका विद्या पित्रे नावाच्या विकलांग बँक अधिकारी होत्या, त्यांच्याकडे राहिली व काही दिवस विभावरीबरोबर डोंबिवलीला राहत होती. हा काळ तिच्यासाठी अक्षरश: तपश्चर्येचा होता. सकाळी ८ वाजता खांद्याला बॅग अडकवून बाहेर पडे ती रात्री दहा वाजता दमून भागून घरी येई.

आता आम्हाला थोडा फार श्वास घ्यायला उसंत मिळणार होती. तिला १ मे, ८६ ते ३१ मे, ८८, अशी जर्मनीतील डॉर्टमुंड विद्यापीठाची अभ्यासवृत्ती मिळाली होती व त्या काळात आम्ही तिच्यासाठी जागेचा प्रयत्न करणार होतो. त्या अगोदर एक दिवस एक घटना अशी घडली ज्यामुळे तिच्या राहत्या जागेचा प्रश्न अचानक सुटला. तिला १ एप्रिल, १९८६, पासून कालिना कँपसवरील एक सदनिका मिळणार असल्याचे पत्र आमच्या हातात पडले.

माझे एक आतेदीर श्री. बापूसाहेब जोशी हे मुंबईच्या टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सचे पदवीधर असून पुण्याच्या बाल सुधारगृहाचे अधीक्षक असताना निवृत्त झाले होते. हे व ते समवयस्क असल्याने आमचे एकमेकांकडे जाणे येणे होत असे. ते आजारी आहेत असे कळले म्हणून आम्ही त्यांना भेटायला गेलो असताना रोहिणीचा विषय निघाला, व बोलता बोलता तिच्या राहण्याच्या अडचणींची चर्चा झाली. त्यावर बापूसाहेब एकदम म्हणाले, ''अरे, हे मला अगोदरच नाही का सांगायचे? सध्याचे मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरू माझे मित्र आहेत. या अशा लोकांसाठी नियमांना अपवाद नको का करायला? उद्या ती कंटाळून परत परदेशी

निघून गेली तर? आपल्याला ब्रेन ड्रेन बद्दल तकार करण्याचा काय अधिकार? त्यांनी बायकोकडून एक अंतरर्देशीय पत्र मागून घेतले. त्यांना स्वत:ला लिहिण्याची शक्ती नव्हती म्हणून मला उपकुलगुरूंसाठी पत्र डिक्टेट केले व त्यावर सही केली. पत्र पोस्टात पडले आणि रोहिणीच्या नशिबाची दारे उघडली. झारीतल्या शुक्राचार्यांना डावलून योग्य व्यक्तीपर्यंत आमचे गाऱ्हाणे पोहोचले होते. ते गृहस्थ एप्रिलमध्ये कार्यभार सोडणार होते. त्या अगोदर आमची अडचण दूर झाली.

आता प्रश्न होता रोहिणीने १ जानेवारी ८६ ते १ एप्रिल ८६ कुठे राहावे असा. विभावरी बाळंतपणासाठी पुण्याला येणार होती व गजाननपण नोकरी बदलून पुण्याला यायचा प्रयत्न करीत होते. त्यात त्यांना यश आले होते. त्यांच्या राहात्या जागेत रोहिणी एकटी राहू शकणार नव्हती. कारण ती सकाळी ८ ते रात्री १० बाहेर असे. पाणी येण्याच्या वेळेला कोणीच घरी असणार नव्हते. माझा एक मामे दीर, वसंत गणपुले, दिल्लीला सुप्रीम कोर्टात वकील होता. पार्ल्याला तेजपाल स्कीममध्ये त्याची चार खोल्यांची जागा असून, सध्या तिथे त्याचा भाऊ राहात होता, असे मोठ्या गणपुले मामांकडून कळले म्हणून त्याला पत्र लिहिले. त्याने लगेचच होकार दिला व हे शेवटचे तीन महिने ती चंद्रशेखर गणपुले व सौ. शीला गणपुले यांच्याकडे राहिली. ही गोष्ट विशेष लिहिण्याचे कारण की या जोडप्याने रोहिणीला इतके प्रेमाने व आपुलकीने वागवले की ते तिला कधीच विसरता येणार नाही.

आता प्रश्न असा होता की एक एप्रिलला जागा ताब्यात घेऊन जर्मनीला जागा बंद ठेवून जाणे कितपत योग्य ठरेल? ती युनिर्व्हसिटीच्या रजिस्ट्रारना भेटली व त्यांना सांगितले की मला दोन वर्षांनंतर जागा मिळाली तरी चालणार आहे. इतर कुणा गरजू व्यक्तीला ही जागा उपयोगी पडेल. यावर रजिस्ट्रारसाहेब हसून म्हणाले, ''तुझी इच्छा जरी स्तुत्य असली तरी असले काही करू नकोस. तुला दोन वर्षांनी परत आल्यावर जागा मिळेलच याची खात्री कोण देणार? या विद्यापीठात माझे काळ्याचे पांढरे झाले आहेत. तुझी फॅमिली म्हणून तुझ्या आई-वडिलांना अधून मधून येथे येऊन राहायला सांग व विचार न करता जागेचा ताबा घेऊन टाक''.

आम्ही सुटकेचा नि:श्वास टाकला. आता आम्ही सर्वार्थाने सर्व जबाबदाऱ्यांमधून निवृत्त झालो होतो. सर्व मुलींची आयुष्ये मार्गाला लागली होती. आम्ही डेक्कन क्वीनचा पास काढला व अधून मधून मुंबईला जाऊन राहू लागलो.

○○○

# निवृत्तीनंतर

विभावरीचे लग्न झाल्यावर ८४ एप्रिल अखेर यांनी बँकेतील नोकरी सोडली. मी पण ८५ एप्रिल अखेर निवृत्त झाले. निवृत्ती नंतरही काही काळ मी वनिता समाजाच्या कामामध्ये मदत करीत असे, कारण ते काम माझ्या आवडीचे होते. माझी नोकरीची पंधरा वर्षे खूप आनंदात गेली. मी जे करत होते ते सर्व मला आवडत होते. त्यातून मी आनंद मिळवीत होते. एक तारखेला मिळणाऱ्या पगारासाठी आपल्याला नोकरी करावी लागते आहे, असे कधीच वाटले नाही. काही छान मैत्रिणी मिळाल्या. माझ्यातील सुरवंटाचे फुलपाखरू होताना अनेकांनी मदतीचे हात पुढे केले. त्यामुळे गृहिणीमधून वर्किंग वुमन होताना फारसा त्रास झाला नाही. या काळात एक गोष्ट माझ्या विशेष करून अशी लक्षात आली की आपण आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असलो की लोकांच्या आपल्याकडे बघण्याचा दृष्टिकोनात बदल घडून येतो. काहींना आदर तर काहींना असूया. मनुष्य स्वभावाचे कंगोरे बघायला मिळतात. मार्च ८५ मध्ये रोहिणीला इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्सेस, बंगलोर, या संस्थेने यंग असोसिएट म्हणून गौरविले. डिसेंबर ८५ ला विभावरी आई झाली. नातीच्या संगोपनात छान दिवस जात होते.

पण ८६ च्या ऑक्टोबर मध्ये विभावरीच्या आयुष्यात एक वावटळ आली. गजानन ऑफिसच्या कामानिमित्त नेहमी फिरतीवर जात असे. ते चेन्नईला गेले असताना कसल्या तरी इन्फेक्शनने खूप आजारी पडले. हाय टेम्परेचर. कुठल्याही तपासणीतून इन्फेक्शन कसले आहे ते कळत नव्हते. कल्पना, विनोद व डॉ. बहुलीकर प्रयत्नांची शर्थ करीत होते. त्यांची मूळची उत्तम प्रकृती, डॉक्टरांची योग्य उपचार पद्धती व परमेश्वरी कृपा यामुळेच या जीवघेण्या दुखण्यातून ते सुखरूपणे बाहेर पडले.

या प्रसंगाने आम्ही अंतर्बाह्य ढवळून निघालो. या मुलीला स्वत:च्या पायावर उभे राहण्यायोग्य करण्यासाठी आपण कुठे तरी कमी पडलो ही जाणीव अस्वस्थ करू लागली. आपण हातावरचे पोट असलेली मध्यमवर्गीय मंडळी. आता ती

पुण्यात आली आहे, तर काय करू शकतो असा विचार करू लागलो. त्यात एक अडचण ही वाटत होती की पूजा दोन महिन्यांची असताना तिची आजी एकाएकी हार्ट अॅटॅकने स्वर्गवासी झाली होती. घरात विभावरीशिवाय बाईमाणूस नव्हते. आम्ही बघू म्हणावे तर निगडी ते पुणे हे अंतरच अडचणीचे होते. शेवटी आम्ही तिच्या सासऱ्यांशी या बाबतीत विचारविनिमय करावयाचे ठरविले. आमचे विचार आम्ही त्यांच्यापुढे मांडल्यावर त्यांनाही आमचे म्हणणे पटले व विभावरीने ८७ जून पासून बी. एड. ला प्रवेश घ्यावा असे ठरवले. तिचे सासरे म्हणाले, ''तुम्ही आमची काळजी करू नका. आम्ही एक वर्ष निभावून नेऊ. निगडी वाढते आहे, पुढे मागे पुण्यातील शिक्षण संस्थांच्या शाखा इथे निघतील. तोवर मुलगी पण मोठी होईल. त्या वेळी तिला या शिक्षणाचा उपयोग करून घेता येईल.'' त्यांच्या समजूतदारपणामुळे सर्व सोपे झाले.

बी. एड.ला प्रवेश घेतल्यावर विभावरीला तिचा सूर सापडला. अत्यंत आवडीने ती हा कोर्स करीत होती. गुरुजनांकडून शाबासकी मिळवीत होती. तिला वर्ष संपता संपता मुलाखतीशिवाय नू. म. वि. मुलींच्या शाळेत नोकरी मिळू शकणार होती. परंतु निगडी ते पुणे हे अंतर दृष्टिआड करणे शक्य नव्हते व सासऱ्यांच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेणे इष्ट वाटले नाही. म्हणून तिने ही संधी स्वीकारू नये असे आमचे मत पडले.

रोहिणी ८७ च्या दिवाळीत रीडरच्या जागेसाठी मुलाखत द्यायला आली होती. ही दिवाळी आम्ही मुंबईच्या क्वॉर्टरमध्ये साजरी केली. मुंबईतील सर्व नातेवाईकांना घर पाहायला बोलावले. खूप छान वाटले. त्या मुलाखतीबद्दल थोडे लिहावेसे वाटते.

निवड समितीवर त्यावेळचे उपकुलगुरू, तिचे एच. ओ. डी. श्री. रंगवाला, आय. आय. टी. मुंबईचे डॉ. पाटील, रोहिणीने ज्यांच्यासमवेत एक पेपर लिहिला होता ते राजशेखर व अहमदाबादहून एक प्रोफेसर आले होते.

मुलाखत आटोपल्यावर रोहिणी काहीशा विमनस्क स्थितीत घरी आली. उपकुलगुरूंनी मुलाखतीत असे काही प्रश्न विचारले ज्यामुळे तिला अशी शंका आली की, त्यांची कोणीतरी पद्धतशीरपणे दिशाभूल केली असावी. त्यांनी तिला विचारले, ''या मुलाखतीसाठी तू जर्मनीतून एवढा मोठा खर्च करून आलीस, म्हणजे तुला आपण नक्की निवडले जाणार याची खात्री असावी!'' तिने उत्तर दिले, ''मी आता जरी जर्मनीत असले तरी भारतात मुंबई विद्यापीठात राहून मला माझी प्रगती साधायची आहे आणि माझीच निवड होईल अशी खात्री नसली तरी या जागी निवड होण्यासाठी आवश्यक ती गुणवत्ता व योग्यता माझ्याकडे

आहे, याची मला खात्री आहे. शिवाय मला माझ्या नातेवाईकांना पण या निमित्ताने भेटता येईल म्हणून मी आले आहे''. यावर त्यांचे असे म्हणणे पडले ''तुझी निवड व्हावी या हेतूनेच निवड समितीवर अशा मंडळींना बोलावले आहे जे तुला आधीपासून ओळखतात. पाटलांची तू विद्यार्थिनी आहेस, राजशेखरांबरोबर तू एक पेपर लिहिला आहेस, आणि डॉ. रंगवाला तुझे एच. ओ. डी. आहेत. यावर तुला काय म्हणायचे आहे?'' यावर रोहिणीने उत्तर दिले ''निवड समितीवरील मंडळी आमच्या क्षेत्रातील मातब्बर मंडळी आहेत व त्यांच्याशी योगायोगाने माझा परिचय आहे. एवढेच मी म्हणू शकते. रंगवालांबद्दल मी म्हणेन की मी विद्यापीठाला देत असलेल्या योगदानाबद्दल ते संतुष्ट आहेत. मी त्यांच्या परवानगीने शिकवणे संपल्यानंतर टी. आय. एफ. आर. ला जाते हे खरे आहे, पण ते सुद्धा शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांसाठी स्वत:च्या विषयातील अद्ययावत ज्ञानाशी निगडित असावे म्हणून. ही विद्यापीठाला शिक्षकांकडून असणाऱ्या अपेक्षांना पूरक गोष्ट आहे, असे निदान मला तरी वाटते.'' यावर पुढे त्यांचे असे म्हणणे पडले की ''तुझा प्रत्येक पेपर तू दुसऱ्या कोणाबरोबर तरी लिहिला आहेस. तुझे स्वत:चे एकटीचे असे काहीच योगदान नाही हे कसे?'' यामुळे तिला आपली निवड होणार नाही असे वाटणे साहजिकच होते.

आम्ही सर्व असे उदास मन:स्थितीत असताना खालच्या मजल्यावरील प्रोफेसर कुलकर्णी आले व रोहिणीची रीडर म्हणून निवड झाल्याबद्दल अभिनंदन करू लागले. त्यांच्याकडून कळलेली हकीकत अशी की, मुलाखती संपल्यानंतर परीक्षकांचा विचार विनिमय सुरू असता अहमदाबादहून आलेल्या प्रोफेसरांनी उपकुलगुरूंना स्पष्टपणे निक्षून सांगितले, ''मी डॉ. रोहिणी गोडबोलेंना ओळखत नाही. त्यांचे व माझे संशोधन क्षेत्र ही वेगळे आहे. तरी पण माझे असे स्पष्ट मत आहे की आलेल्या उमेदवारांपैकी त्याच सर्वोत्कृष्ट आहेत आणि हे जर निवड समितीला मान्य नसेल तर झालेल्या निवडीवर निदान मी तरी सही करणार नाही.'' यावर उपकुलगुरूंचा भ्रमनिरास किंवा नाईलाज झाला असावा व त्यांनी रोहिणीच्या निवडीवर शिक्कामोर्तब केले असावे. सदर प्रोफेसर श्री. कुलकर्णी यांचे स्नेही असून परत जाण्याअगोदर त्यांना भेटावयास आले असता वरील हकीकत कळली. आमच्या घरी त्या संध्याकाळी खऱ्या अर्थाने दिवाळी उजाडली. त्याच वेळी रोहिणी आम्हाला म्हणाली, ''अमेरिकेत मी नोकरी न पत्करल्यामुळे तुम्हाला नेऊ शकले नाही. पण आता मी परत येण्याअगोदर तुम्ही विभावरीची परीक्षा संपल्यावर जर्मनीला यावे अशी माझी इच्छा आहे.''

आम्ही मेच्या पहिल्या आठवड्यात जर्मनीला सर्व सोपस्कार पार पाडून

निघालो. मध्ये दोन दिवस कल्पनाच्या सकिना नावाच्या वर्ग मैत्रिणीकडे दुबईला राहून दुबई पाहून पाच मे ला जर्मनीला पोहोचलो. तिथे गेल्यावर कळले की आणखी एक आनंदाची बातमी आमची वाट पहात होती. रोहिणी व तिचे एक सहकारी श्री. मारेक नोवाकोस्की विवाह करण्याचा विचार करीत होते. आम्हाला फार आनंद झाला, कारण आतापर्यंत आम्ही तिच्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांना यश येत नव्हते. प्रत्येक ठिकाणी तिची बौद्धिक व शारीरिक उंची आड येत होती. माणसाला आपल्यापेक्षा रुपाने, पैशाने वरचढ बायको चालते, पण बुद्धिने वरचढ बायको नको असते.

जवळजवळ दीड महिना आम्ही जर्मनीत होतो. दर शनिवारी, रविवारी बाहेर जात असू. वेगवेगळी चर्चेस, निरनिराळ्या रंगांच्या ट्यूलिपच्या फुलांनी फुललेल्या बागा, फ्लॉवर शोज, ऱ्हाईन नदीतील सहल, युनिव्हर्सिटीचा रम्य परिसर. मध्यंतरी तीन दिवस इंग्लंडला जाऊन आलो. हाईड पार्क, जेम्स पार्क, Change of guards, Buckingham Palace, पिकॅडली सर्कस, मार्गारेट थॅचरचे घर, ट्रॅफलगार स्क्वेअर मधला नेल्सनचा पुतळा, उंच बोटींना जाण्यासाठी वाट करून देणारा दुभंगणारा पूल, लंडन टॉवरमधील कोहिनूर जडवलेला राजमुकुट. हिऱ्यातले काहीही कळत नसले तरी तो आपल्या गोवळकोंड्याच्या खाणीतला आहे हेच जास्त कौतुकाचे वाटले. टॉवरमधील संग्रहालय व वेस्ट मिनिस्टर ॲबीमधून फिरताना सातवा हेन्‌री ते सहावा जॉर्ज आणि रॉबर्ट क्लाईव्ह ते माऊंटबॅटन ह्या शाळेत शिकलेल्या इतिहासाची धावती उजळणी झाली. कुठल्याही भारतीयाला युरोपमधील इतर देशांपेक्षा इंग्लंड व जर्मनी हे दोन देश जास्त जवळचे वाटतात. जर्मनी अर्थातच नेताजी सुभाष यांच्यामुळे.

मध्यंतरी तीन दिवस आम्ही नेदरलँडला जाऊन आलो. रात्री दिव्यांच्या मंद प्रकाशात, कालव्यामधून केलेली सहल, कालव्यांच्या किनाऱ्यांवरच्या उंच उंच इमारती, ॲन फ्रँक राहात असलेले घर, नदी काठावरील फुलांचे ताटवे, सर्वच वेडावून टाकणारे. तिथल्या समुद्र किनाऱ्यावर गेल्यानंतर या देशाला हॉलंड (Hollowland) का म्हणतात ते कळले.

महिना–दीड महिना जर्मनीत घालवून, आम्ही २२ जून, ८८, ला भारतात परतलो. मी जाण्याअगोदर आईला भेटायला जाऊ शकले नव्हते, म्हणून जुलैच्या पहिल्या आठवड्यात बडोद्याला जाऊन तिला भेटून आले. मला म्हणाली, ''माझ्या मुलाने मला विमानात बसवले. तुझ्या मुलीने तुला परदेशी नेऊन आणले''. यानंतर लगेचच २५ सप्टेंबरला तिला मृत्यू आला. भेट झाली नसती तर जन्मभर रुखरुख वाटली असती.

पुण्याला आमच्या वाड्याचे नूतनीकरण चालू असल्याने सर्वत्र धुळीचे साम्राज्य

होते. त्यामुळे आम्ही मुंबईतच राहाणे पसंत केले होते. मी बडोद्याहून परत आल्यावर एक दिवस गजानन मुंबईला आले व काहीतरी महत्त्वाचे बोलायचे आहे म्हणाले. मला तर काळजी वाटली. काय झाले असावे, काही अंदाज लागेना. चहा वगैरे झाल्यावर त्यांनी आम्हाला सांगितले की त्यांनी वडिलांचे घर सोडण्याचा निर्णय घेतला असून तसे करण्याअगोदर आमच्या कानावर आपला निर्णय घालण्यासाठी ते आले आहेत. विभावरी वर्षभर आमच्याकडे राहिली हे तिच्या सासऱ्यांना मनापासून आवडले नव्हते म्हणून म्हणा किंवा त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना भरीला घातले म्हणून म्हणा, त्यांनी एका गरजू विधवेशी आपण लग्न करणार असल्याचे सांगितले. साहजिकच गजानन म्हणाले की ही गोष्ट त्यांनी आधी सांगितली असती तर बरे झाले असते. विभावरीने चालून आलेली नोकरी नाकारली नसती. त्यावर ते म्हणाले, ''मी कुठे तिला नोकरी नाकारायला सांगितले. घर माझे आहे. मला काय हवे ते मी करीन.'' ''घर माझे आहे'', या शब्दाने गजानन दुखावले होते. आपले आणि माझे यातील फरकाने मन खट्टू झाले होते.

आम्ही त्यांना सबुरीने घेण्याचा सल्ला दिला. नाती अशी तडकाफडकी भावनेच्या भरात तोडणे बरोबर नाही, असे आम्हाला वाटले. ''येणारी बाई चांगली नसेल कशावरून? अनुभव घेऊनच काय तो निर्णय घ्या,'' असे सांगितले, व त्यांनाही ते पटले.

आता आमच्या फ्लॅटचे बांधकाम सुरु होणार होते. त्यामुळे आपल्याला हव्या त्या सोई करून घेण्यासाठी आम्ही पुण्याला परतलो. मधल्या काळात काही अशा अप्रिय घटना घडल्या की गजानन यांनी घर सोडण्याचा घेतलेला निर्णय बरोबर आहे, असे आमचेही मत झाले. परंतु त्यांनी पिंपरी-चिंचवड, किंवा निगडीसारख्या अनोळखी ठिकाणी बिऱ्हाड मांडण्याची कल्पना पसंत नव्हती. ते पंधरा पंधरा दिवस फिरतीवर असत. कित्येक वेळा भारताबाहेर मध्य पूर्वेत किंवा मलेशिया, थायलंड असेही जावे लागे. अशा परिस्थितीत अनोळखी परिसरात विभावरीने एकटीने राहाणे आम्हाला पसंत नव्हते. गरज पडली तर रात्री बेरात्री आम्ही म्हातारी माणसे कशी तिच्यापर्यंत पोहोचू शकणार होतो? आम्ही आता चार खोल्यांच्या प्रशस्त व सोयिस्कर अशा सदनिकेत काही महिन्यातच राहायला जाणार होतो. तिथे त्यांनी तूर्तास आमच्या बरोबर राहावे व नंतर निवांतपणे काय ते ठरवावे असे सांगितले. पण ते त्यांना पटेना. त्यांचे म्हणणे असे होते की आतापर्यंत आम्ही भाड्याच्या जागेत राहात होतो त्यामुळे प्रश्न नव्हता, पण आता आम्ही मालकीच्या जागेत राहायला जाणार आणि त्या जागेवर चौघी

बहिणींचा अधिकार असणार आहे. ''आम्हाला बाजारभावाने बहिणींना वाटणी देऊन टाकणे जमणार नाही आणि म्हणून आम्ही येणार नाही,'' असे म्हणाले. आम्हाला त्यांच्या या नि:स्पृह विचारसरणीचे फारच कौतुक वाटले. आम्ही त्यांना सांगितले, ''ही तात्पुरती उपाययोजना आहे. अंतिम निर्णय काय घ्यायचा याचा विचार आम्ही करू. आमच्याजवळ जे काही आहे ते सर्व स्वकष्टार्जित आहे आणि माझ्या सर्व मुली समजूतदार आहेत. शिवाय, आमच्याकडे काही डिपॉझिटस काही सोने–नाणे व एक अर्बन लँड सीलिंग मधून सुटण्याची शक्यता असलेला जमिनीचा तुकडा आहे. काही दिवसांनी आपण सर्वानुमते योग्य तो निर्णय घेऊ.'' त्यांनी आमचे म्हणणे मान्य केले व आम्ही विभावरीसाठी नोकरी शोधण्यासाठी प्रयत्न करू लागलो. जानेवारी ८९ पासून तिला रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत तीन महिन्यांच्या लीव्ह व्हेकेंसीमध्ये नोकरी मिळाली. त्या वेळी गजानन फिरतीवर गेलेले असल्याने तिच्या सासऱ्यांच्या परवानगीने तिला पुण्याला घेऊन आलो. थोडासा तणाव निर्माण झाला तरी संबंध तुटू दिले नाहीत. एकमेकांकडे शेवटपर्यंत येणे जाणे कायम राहिले, ही जमेची बाजू. सगळ्या aided शाळांमध्ये आरक्षणाचा अनुशेष भरून काढणे सुरू असल्याने नोकरी मिळायला अडचण येत होती. फेब्रुवारी ८९ मध्ये मारेक नोवाकोस्की भारतात आले आणि रोहिणीच्या मुंबईच्या घरात आम्ही दोघे आणि मुली, जावई व नातवंडे यांच्या उपस्थितीत वैदिक पद्धतीने रोहिणीचा विवाह संपन्न झाला.

जून ८९ मध्ये विभावरीला दिघीला सैनिकांच्या मुलांसाठी चालवल्या जाणाऱ्या शाळेत एक वर्षाची नोकरी मिळाली. उमेदवारी म्हणून ही नोकरी घेतली असली तरी इथे कायमस्वरूपी नोकरी मिळाली तरी ती न घेणेच श्रेयस्कर वाटले. कारण सकाळी ८ वाजता डबा घेऊन कार्पोरेशनचा बस स्टॉप गाठावा लागे व परत यायला चार साडेचार वाजत. पण ९० च्या जूनमध्ये तिला मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये नोकरी मिळाली व त्यातच ती कायम पण झाली. शाळेत नोकरी करीत असताना माझा वनिता समाजाचा नाटक, नाट्यवाचन इत्यादि वारसा तर तिने चालावलात पण शास्त्रीय प्रदर्शने, quiz competitions यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, शिष्यवृत्तीसाठी मार्गदर्शन या उपक्रमांमध्ये तिने हिरिरीने भाग घेतला व तिच्या अनेक विद्यार्थ्यांनी त्यात यश संपादन केले.

त्याच सुमारास गजाननलाही मोठी बढती व पगारवाढ मिळाली व स्वत:चे हक्काचे ठिकाण असावे असे त्यांना वाटू लागले. आमच्या शेजारी राहणाऱ्या मालतीबाई देशमाने यांचा वृद्धापकाळाने मृत्यू झाला. त्यांच्या मुलीला हा दोन

खोल्यांचा फ्लॅट विकून त्यात भर घालून मोठा फ्लॅट घ्यावयाचा होता. आमच्यासाठी ही फार फायद्याची संधी होती. दोनच असल्या तरी एकसंध सहा खोल्यांची जागा आम्हाला मिळू शकणार होती. पैशांची जुळवाजुळव करून विभावरी–गजाननने ती जागा विकत घेतली. यानंतर आम्ही त्यांना ''तुम्हाला वेगळे बिऱ्हाड मांडावयाचे असल्यास आमची हरकत नाही,'' असे सांगितले. पण गजानन व विभावरीने एकत्रच राहण्याचा निर्णय घेतला. पुढे ९४ मार्चला एका गोड नातीचे आगमन झाले. आजी–आजोबांना एक खेळणे मिळाले. अशा रीतीने मुलगी, जावई, नातवंडे यांच्या समवेत सुखी निरामय आयुष्य जगू लागलो. त्या दिवाळीला चारही जावई, मुली व नातवंडे यांच्या समवेत यांची पंच्याहत्तरी घरातल्या घरात साजरी केली. आता आम्ही नातजावई शोधू लागलो होतो. सर्व काही अलबेल आहे, असे वाटत असतानाच २ एप्रिल, १९९५, रोजी तो काळा दिवस उजाडला.

❍❍❍

# पती निधनाचे दुःख

रोहिणीने १९८५-८६ सालापासून संशोधन क्षेत्रात बऱ्यापैकी नाव मिळवले होते. तिला अनेकदा परदेशी जावे लागे. दर वेळी ती जाण्याअगोदर पुण्याला येऊन आम्हाला भेटून जात असे, पण ९५ च्या एप्रिलमध्ये कार्यबाहुल्यामुळे ती आम्हाला भेटायला येऊ शकणार नाही असा तिचा फोन आला. हे म्हणाले, ''मी तुला भेटायला येऊन जातो.'' अनुजाच्या जन्मानंतर आम्ही दोघेही एकाच वेळी बाहेर जात नव्हतो. परंतु यावेळी मी पण त्यांच्याबरोबर जायची इच्छा प्रदर्शित केली, तर मला गमतीने म्हणाले, ''तू नको येऊस माझ्याबरोबर. तू अजिबात चालत नाहीस. सारखी तुला रिक्षा, टॅक्सी करावी लागते.'' त्यावर मी पण गमतीने उत्तर दिले, ''माहीत आहे मला ते, पण तुमच्या एवढे नसले तरी माझ्या रिक्षा, टॅक्सीचे भाडे देण्याइतके पेन्शन मिळते बरं का मला.'' आम्ही दोघेही शुक्रवारी संध्याकाळी निघून शनिवार, रविवारची सकाळ तिच्याबरोबर घालवून रविवारी डेक्कन क्वीनने परत येणार होतो, परंतु कल्पना म्हणाली, 'दादा तुमची दोघांची आता वये झाली आहेत. हे असे की Hectic कार्यक्रम ठरवणे आता बंद करा. तुम्ही आमची गाडी व ड्रायव्हर घेऊन जा.'' हे म्हणाले, ''तू माझ्याकडून पेट्रोलचे पैसे घेणार असशील तरच मी गाडी घेऊन जाईन.'' यावर ती म्हणाली, ''दादा मी तुम्हाला नवऱ्याच्या जिवावर गाडी न्या असे म्हणत नाहीये. गाडी माझी स्वतःची, माझ्या पैशातून घेतलेली आहे. तरी पण तुमच्या समाधानासाठी मी पेट्रोलचे पैसे घेईन. पण तुम्ही गाडी घेऊन जावे हे उत्तम.''

शुक्रवारी संध्याकाळी आम्ही गाडी घेऊन निघालो. जाताना माळी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. दुसऱ्या दिवशी गुढीपाडवा होता. रोहिणीच्या घरी गुढी उभारली. बासुंदी पुरीचे जेवण केले. दोन दिवस पुरेल इतके धान्य व कणिक वगैरे मी बरोबर नेले होते. कारण यापुढे दोन-तीन महिने घर बंद राहणार होते.

रविवारी सकाळी उठून अंथरुणातच गप्पा मारत बसलो. गप्पांच्या ओघात मी रोहिणीला म्हणाले, ''रोहिणी, यांना ७५ वर्षे पूर्ण झाली. मी पण सत्तरीला आले. आता देवाला सांगावेसे वाटते की ''तेरी दुनिया मे दिल लगता नही, वापस

बुला ले मुझको ए मालिक उठाले जा.'' या गाण्याच्या ओळी ऐकल्यावर हे म्हणाले, नुसते इतकेच नाही तर मला अनुप जलोटाच्या गाण्याप्रमाणे म्हणावेसे वाटते की ''इतना तो कर दो स्वामी, जब प्राण तन से निकले, गोविंद नाम लेकर तब प्राण तन से निकले.''

गाणे म्हणता म्हणता त्यांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. हे त्यांचे आवडते गाणे होते. आता असे वाटते की जणू नियतीच आम्हाला हे बोलायला लावत होती.

रोहिणी म्हणाली, ''आई, दादा तुम्ही तरी सकाळी सकाळी काय विषय घेऊन बसलात! आम्हाला तुम्ही दोघेही अजून खूप दिवस हवे आहात. चला, उठा. गप्पा पुरे झाल्या. आता कामाला लागू या. आज भाऊमामा, इंदूमामी येणार आहेत, हे तुझ्या लक्षात आहे ना आई.'' मी हो म्हणाले आणि चहा करायला उठले.

गाद्या वगैरे आवरून दोघेही स्वयंपाकघरात आले. रोहिणीला कवेत घेऊन मला म्हणाले, ''बघ कशी आहे माझी मुलगी. तीन भाषणे देण्यासाठी दोन वेळेचे विमान–भाडे देऊन तिला इंग्लंडला बोलावले आहे. आहे का दुसऱ्या कोणाची अशी मुलगी.'' मी म्हणाले, ''तर तर, तुमची एकट्याचीच नाही का ती? माझी कुणीच लागत नाही ना ती.'' आम्ही सगळे हसलो व परत आपापल्या कामाला लागलो.

माझा विलेपार्ल्याचा मावसभाऊ आम्हाला भेटायला व जेवायला येणार होता. गौरीसाठी (मीनाची मुलगी) साठे नावाचे एक स्थळ पाहिले होते. त्या स्थळाची मला भाऊकडे चौकशी करावयाची होती. ती मंडळी भाऊच्या ओळखीची होती. मुलाची आई माझ्या भाच्याची वर्गमैत्रीण होती व आजी भाऊबरोबर ग्राहक संघात काम करीत होती. वडील पार्ला कॉलेजमध्ये संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख असून त्यांचा नावलौकिक चांगला होता. मुलगा जपानमध्ये Merly Lynch कंपनीत कामाला होता. आई–वडिलांनी बघून शॉर्ट लिस्ट केलेल्या मुलींपैकी एक गौरी होती. दोघांची पसंती झाल्यास लगेचच लग्न करायचा त्यांचा मानस होता. त्यांनी हॉल वगैरे बुक करून ठेवला होता. आणि त्यामुळे तातडीने माहिती काढणे अगत्याचे वाटत होते. सगळी माहिती समाधानकारक मिळाली. जेवणे झाली. यांनी सगळ्यांना सुपारी दिली. साधारण बारा–साडेबारा वाजले होते. आम्ही लवकरच निघणार होतो. म्हणजे संध्याकाळच्या आधी पुण्याला पोहोचणार होतो.

हे कपडे करायला आत गेले. ड्रायव्हर बाळू सामान गाडीत ठेवायला निघणार इतक्यात हे मला हाक मारून म्हणाले, ''मला जरा अस्वस्थ वाटते आहे''. मी बाळूला थांबायला सांगून म्हणाले, ''जरा पडा तुम्ही. आपल्याला कुठे गाडी गाठायची आहे. थोड्या वेळाने निघू या''. पण कसचे काय. यांची अस्वस्थता वाढतच

गेली. ''पंखा लावा, खिडकी उघडा, माझी जीव घाबरतो आहे,'' म्हणू लागले. लगेच कल्पनाला फोन लावला. तिने मला माऊथ टू माऊथ ब्रीदिंग द्यायला सांगितले. लगेच रोहिणीने तिचे सहकारी डॉ. नाडकर्णींच्या घरी फोन लावला. त्यांच्या सौभाग्यवती डॉक्टर होत्या. त्यांनी नानावटीला पेशंट घेऊन येत असल्याचा फोन करून आमच्या घरी आल्या. पण तोवर सगळे संपले होते. मी ब्रीदिंग दिल्यावर किंचित सावरले व म्हणाले, ''जातो मी. गोविंद, श्रीराम.'' क्षणात होत्याचे नव्हते झाले. मी संवेदनाशून्य, घशातून हुंदका फुटेना की डोळ्यातून अश्रू येईनात. एक जडत्व, शून्यत्व–काय होत आहे काहीच कळेना. माझी चित्तवृत्ती थाऱ्यावर नव्हती. पण एका क्षणात मी स्वत:ला सावरले. रोहिणी एकटी होती. मला मोडून चालणार नव्हते. आल्या प्रसंगाला धीराने तोंड देणे गरजेचे होते. इतक्याच सौ. नाडकर्णी आल्या. त्यांनी मी म्हणाले, ''माझ्या मते सगळे संपले आहे. तुम्ही फक्त आम्हाला सांगायचे बाकी आहे.'' पुण्याला फोन लावला. कल्पना व विनोद ॲम्ब्युलन्स घेऊन निघाले. जोगेश्वरीच्या भावाला फोन केला. तो आल्यावर बाळूला भाऊ–वहिनींना घरी सोडून यायला सांगितले. दोघांची वये झालेली. वेळेवर घरी गेलेले बरे, असे वाटले. मुंबईतील इतर नातेवाईकांना फोन केले. वाशीचा भाऊ पण आला. आवश्यक ते सोपस्कार उरकून आम्ही पार्थिव पुण्याला नेण्याचे ठरवले. त्याच संध्याकाळी रोहिणीचे बी. ए. आर. सी. त व्याख्यान होते. त्यांनाही कळवले व आम्ही पुण्याला निघालो. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत अहमदाबादहून सुहासराव व मीना, अकोल्याहून माझा धाकटा दीर व जाऊ आले.

ते जरी वृत्तीने पुरोगामी असले तरी काही गोष्टीत रुढीप्रिय व परंपरावादी होते. या त्यांच्या मताचा आदर राखण्यासाठी त्यांचे और्ध्वदेहिक ज्ञानप्रबोधिनी पद्धतीने न करता जुन्याच पद्धतीने करणे पसंत केले. रोहिणीने अग्नी देण्याची तयारी दर्शवली, पण धाकटा दीर ''मी करतो'' म्हणाला. हा दीर त्यांच्या मुलाच्या वयाचा होता व आमच्याशी संबंध ठेवून होता. त्यांचे वर्षभराचे सर्व संस्कार केले व त्यानंतर विद्यार्थी सहाय्यक समिती व वनवासी कल्याण आश्रम या दोन ठिकाणी प्रत्येकी दहा हजार दिले व त्यांच्या स्मृतिदिनी या पैशांच्या व्याजातून गरजू व्यक्ती किंवा व्यक्तींना मदत करावी असे सांगितले.

प्राप्त परिस्थितीत मी माझ्या मनाला आवर घालून यांत्रिकपणे सर्व व्यवहार पार पाडीत असले तरी माझ्या धाकट्या नातीने मला रडायला लावले. त्या बाळ जीवाला माणसांनी भरलेल्या घरात तिचे लाड करणारे, तिला बाहेर फिरायला घेऊन जाणारे आबा दिसत नव्हते. एकसारखी प्रवेशद्वारापाशी जाऊन ''आबा, ये''

अशा हाका मारीत होती. आबांचा फोटो हातात दिल्यावर तिला वाटले, यामागे आबा असतील म्हणून फोटो उलटा करून बघितला आणि तरीही आबा दिसले नाहीत म्हणून फोटो परत देऊन टाकला. मला Home they brought the warrior dead कवितेची आठवण आली.

गौरीचे लग्न साठ्यांकडेच ठरले. या घटनेमुळे त्यांनी लग्नसमारंभ न करता फक्त साखरपुडा करून घेतला. साठे मंडळी भेटून गेली. पण पुढे अशा काही घटना घडल्या की ज्यामुळे लग्न करून घेतले असते तर बरे झाले असते असे वाटले.

गौरीचं लग्न २५ नोव्हेंबरला होणार होते. पण लग्नाच्या एक महिना अगोदर काहीही कल्पना नसताना तिच्या सासऱ्यांना हार्ट ॲटॅक आला. त्यांच्यावर नानावटीत उपचार सुरू होते. लग्नाच्या दोन दिवस अगोदर ''काहीही झाले तरी मी याच मुलीशी लग्न करेन,'' असे मुलाकडून वचन घेतले आणि लग्नाच्या आदल्याच दिवशी एकाएकी त्यांचे निधन झाले. आम्ही सगळेच दुःखात बुडून गेलो. हा आघात खरोखरीच फार भयंकर होता.

त्यांच्या चौदाव्या दिवशी प्रशांतच्या मामाने पुढाकार घेतला व अगदी पाच पंचवीस निकटवर्तीयांच्या उपस्थितीत लग्न समारंभ पार पडला. प्रशांतच्या आईच्या मनोनिग्रहाची प्रशंसा करावी तितकी कमीच होती. दोघांची वये लहान, पहिल्या वहिल्या मुलाचे लग्न अशा रीतीने पार पडावे याहून भयानक दैवदुर्विलास कोणता? त्या माऊलीने डोळ्यातून पाण्याचा थेंबही बाहेर पडू न देता सर्व कार्यक्रम पार पाडला. माझे मनोमन त्यांना शतशः प्रणाम आहेत.

या दोन प्रसंगांनी मी अंतर्बाह्य ढवळून निघाले. मानवी जीवनाच्या क्षणभंगुरतेची विदारक जाणीव मनाला अस्वस्थ करीत असतानाच सामान्य माणसेसुद्धा आपापल्या ठिकाणी किती महान असू शकतात याचाही प्रत्यय आला. आपण जातो आहोत याची जाणीव झाल्यावर क्षणाचाही विलंब न लावता एखादे पिकले फळ झाडावरून गळून पडावे तसा निरोप घेऊन परमेश्वराचे नामस्मरण करून देह त्यागणारे माझे यजमान व आपल्या जाण्याने एका निष्पाप मुलीला त्रास भोगावा लागू नये म्हणून मुलाकडून वचन घेणारे गौरीचे सासरे यांना सामान्य कसे म्हणता येईल. हे सामान्यांमधले असामान्यत्व मला जीवनात जागोजागी आढळले आहे आणि स्तिमित करत आले आहे.

या सर्व गोष्टींमुळे आपणही आता शेवटची निरवानिरव करायला हवी, याची मला प्रकर्षाने जाणीव झाली व मी हळूहळू त्या तयारीला लागले.

ooo

# माझा वानप्रस्थाश्रम

सप्टेंबर ९३ मध्ये अर्बन लँड सीलिंगमधून जमीन मुक्त झाल्यापासून आमच्या दोघांच्याही मनात शेवटच्या निरवानिरवीचे विचार सुरू झाले होते. यांच्या मनात मुक्त झालेल्या जमिनीवर रोहिणी व विभावरीने दोन सदनिका स्वखर्चाने बांधून तिथे राहावे असे होते. या जागेसाठी रोहिणीने बराच खर्च केला असल्याने तिला Consideration म्हणून काही रक्कम देण्याचाही आमचा विचार होता. आता अचानकपणे ही सर्व जबाबदारी माझ्यावर येऊन पडली होती. आमची सर्वच मिळकत स्वकष्टार्जित असून दोघांच्या नावावर होती. आम्ही दोघांनी दोघांच्या सहीने एक कागद लिहून जो कोणी मागे राहील त्याला सर्वाधिकार दिलेले होते.

हा विचार रोहिणीला सांगितल्यावर तिने या गोष्टीला तिची काही हरकत नसल्याचे सांगितले. यांचे वकील मित्र श्री. दिनकर सोहोनी व माझा करसल्लागार पुतण्या चि. माधव गणपुले यांच्या सल्ल्याने आम्ही एक आराखडा तयार केला व १० फेब्रुवारी, १९९७, या दिवशी ३९ बुधवारला कृतज्ञतापूर्वक नमस्कार करून नवीन सदनिकेत रहावयास आलो. सदनिकांचे बांधकामावर देखरेख ठेवण्याची मोठी जबाबदारी माझे जावई डॉ. विनोद केळकर यांनी स्वखुशीने पार पाडली.

हे सर्व करीत असताना माझ्या मुलींनी माझ्यावर दाखवलेला विश्वास व केलेले सहकार्य याचा वाटा फार मोलाचा ठरला. मी मागेन त्या कागदावर सर्वांनी कोणतीही कुरकूर न करता मला सह्या दिल्या. ढोबळ मानाने कोणावरही अन्याय होणार नाही अशा प्रकारे मी माझ्या स्वत:साठी काहीही ठेवून न घेता सर्व वाटप करून मोकळी झाले. मला मिळणारे निवृत्तिवेतन माझ्या उदरनिर्वाहासाठी पुरेसे होते. जसजशी महागाई वाढत गेली तसतसे निवृत्तीवेतन पण वाढत गेले. आता खऱ्या अर्थाने माझा वानप्रस्थाश्रम सुरू झाला. 'वाटणी' या शब्दाची आम्ही फार मोठी धास्ती घेतली होती. आमच्या पश्चात आमच्या मुलींमध्ये पैशांवरून वितुष्ट येऊ नये असे वाटत असल्यामुळेच आम्ही हा निर्णय घेतला होता. त्यामुळे

बहिणी बहिणींचे सौहार्द टिकून आहे. आता आम्ही कल्पनाच्या घराजवळ आलो होतो. या जागेत येऊन सुद्धा वीस वर्षे झाली. या घरातच सौ. विभावरीचा संसार खऱ्या अर्थाने सुरू झाला. चि. पूजा एम. ए. इकॉनॉमिक्स करून तिने एशियन कॉलेज ऑफ जर्नालिझम मधून पत्रकारितेचा डिप्लोमा केला व ती आता The Hindu मध्ये चीफ सब एडिटर म्हणून काम करते. भाषा विषयांमध्ये तिला विशेष रुची व गती आहे. एस. एस. सी. नंतर चांगले गुण मिळालेले असूनही तिने कला शाखेला प्रवेश घेतला होता व त्याच्या जोडीने पुणे विद्यापीठातर्फे चालवल्या जाणाऱ्या जपानी भाषेच्या सर्व परीक्षा दिल्या. वयाच्या १८ वर्षी जपान सरकारची मोंबुशो नावाची शिष्यवृत्ती मिळवून एक वर्ष जपानी संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी ती जपानला राहून आली. गौरी त्या वेळी जपानमध्ये होती. तिच्याकडे ती लहान मोठ्या सुट्ट्यांमध्ये जात असे. त्यामुळे आमच्या मनाला आपले कोणीतरी गरज पडली तर तिथे आहे, असा मोठाच आधार वाटला. या व्यतिरिक्त पूजाने स्पॅनिश भाषेवर पण बऱ्यापैकी प्रभुत्व मिळवले आहे.

विभावरीची धाकटी मुलगी एम. आय. टी. स्कूल ऑफ डिझाईनिंग मधून Communication design चा डिप्लोमा करून आता मुंबईला नोकरी करीत आहे. तिने भरतनाट्यम् आत्मसात केले असून तिचे अरंगेत्रम पण झाले आहे. तिने इंग्रजी घेऊन बहिस्थ विद्यार्थिनी म्हणून बी.ए. केले आहे.

चि. गजाननने पण नोकरी सोडून स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. त्याचा व्यवसायात चांगला जम बसल्यावर विभावरीने नोकरी सोडून स्वतःचे गणित व विज्ञान विषयाचे क्लास सुरू करण्याचे ठरविले. कारण माझे वय ऐंशीच्या पुढे गेल्यामुळे तिला मला एकटीला घरी ठेवणे प्रशस्त वाटले नाही. आता घरासाठी काढलेल्या कर्जाचे हप्ते पण संपले होते व घरालापण मनुष्य बळाची आवश्यकता भासत होती.

दोन हजार साली रोहिणीचे वैवाहिक जीवन संपुष्टात आले. व तिचा घटस्फोट झाला. कितीही विचारपूर्वक निर्णय घेतला असला तरी व्हायचा तो मनस्ताप होतोच. तिच्या ह्या भावनिक अस्थिरतेचा तिच्या संशोधनावर परिणाम होऊ नये यासाठी मी जास्तीत जास्त वेळ बंगलोरला तिच्याजवळ व्यतीत करण्याचे ठरवले. तिला मानसिक आधार देताना, तिचे महाविद्यालयीन काळापासूनचे स्नेही आणि आताचे सहकारी डॉ. निरंजन जोशी यांचे सहाय्य खूप मोलाचे ठरले. डॉ. जोशी व त्यांचे कुटुंबिय ह्यांच्याशी आमचे आजही खूप घनिष्ट व जिव्हाळ्याचे संबंध आहेत.

मी वानप्रस्थाश्रम स्वीकारला असला तरी कर्मसंन्यास घेतला नव्हता. आवश्यकता असल्यास घरात थोडीफार मदत करणे, विभावरी नोकरी करीत होती तोवर व अनुजा लहान होती तोवर तिचा अभ्यास घेणे वगैरे करीत असे. तसंच, २००० साली गौरीच्या बाळंतपणात मीनाला मदत करण्यासाठी तीन महिने जपानला पण जाऊन आले. पंच्याहत्तरावा वाढदिवस नातीने व नातजावयाने जपानमध्ये साजरा केला. जपानमध्ये एक बौद्ध मंदिर, फुजी पर्वत दर्शन व तिथला सुप्रसिद्ध चेरी ब्लॉसम पाहायला मिळाला. त्या वेळची एक सुखद आठवण म्हणजे मी त्या बाळाला झोपवतेवेळी रामरक्षा किंवा गीतेचा पंधरावा अध्याय म्हणत असे. मी परत आल्यावर नातीने आग्रह केल्यामुळे रोहिणीने व्हाईस मेलवरून या दोन्ही गोष्टी जपानला पाठवल्या व ते ऐकल्यावर त्या लहानग्याच्या चेहऱ्यावर हसू उमलले आणि हे ऐकल्यावर माझ्या डोळ्यात अश्रू तरळले. अशीच एक दुसरी सुखद आठवण म्हणजे टी. व्ही.वर सलील कुलकर्णी 'दूरदेशी बाबा गेला, आई कामावर गेली' ही कविता म्हणत होता. कविता संपता संपता पूजा उठली व गळ्यात पडून म्हणाली, ''आजी, Thanks for not having made us experience this." हे असे अनेक लहान-लहान प्रसंग ग्रीष्माने तापलेल्या पृथ्वीवर पडलेल्या पहिल्या पावसाने उसळलेल्या मृदगंधाप्रमाणे मनात दरवळत राहतात. मुलींनी माझा सहस्र चंद्रदर्शनाचा कार्यक्रम बऱ्याच मोठ्या प्रमाणावर साजरा केला. वयाच्या ऐंशीव्या वर्षापर्यंत मी माझी बँकेची कामे, सी. जी. एच. एस. मधून महिन्याची औषधे आणणे वगैरे करीत असे. मला शहात्तर सालापासून हृदयरोगाचा त्रास आहे. अगदी मोठा ॲटॅक आला नसला तरी एक benign attack आला होता व अजूनपर्यंत औषधांच्या मदतीने तो आटोक्यात आहे. सी. जी. एच. एस.ची डिस्पेन्सरी मुकुंदनगरला गेल्यापासून मी औषधे आणणे बंद केले. कारण देव दमडीचा व धूप पैशाचा असा प्रकार होता. तिथे जिने चढावे लागत, पुरेशी औषधे नसली की दोनदा जावे लागे. पंच्याऐंशी वर्षे पूर्ण होईपर्यंत रोहिणीची प्राप्तिकर विवरणाची कामे, तिच्या पैशांची देखरेख वगैरे गोष्टी सांभाळल्या व तिच्याकडे ती कुठे परदेशी जाणार नसली तर महिना दोन महिने विमानाने एकटी जात असे. गेल्या चार-पाच वर्षांपासून मात्र सर्व सोडून दिले आहे.

निवृत्तीनंतर कधी पैशांअभावी तर कधी वेळेअभावी मनात साठवून ठेवलेल्या व करावयाच्या राहून गेलेल्या कितीतरी गोष्टी करावयाला सुरुवात केली. आता पैसा किंवा वेळ दोन्हींची कमतरता नव्हती. मी एक विणकामाचे मशीन खरेदी केले. घरच्या लोकांना, बारशाला, वाढदिवसाला, स्वेटर्स विणून द्यायला सुरुवात केली. वेळ चांगला जाई व २५ ते ५० रु. खर्च करून १००-१५० ची वस्तू दिल्याचे

समाधान मिळे. कर्नाटकी काशिद्याची पुस्तके वाचून माहिती करून घेतली. मुलींना, नातींना कशिद्याच्या साड्या भरून दिल्या. क्रॉस स्टिच किंवा क्रोशाचे रुमाल केले. फॅन्सी एम्ब्रॉयडरी चा सराव करून कांथा वर्क, कश्मीर टाका वगैरेच्या पण जिला हव्या तिला साड्या भरून दिल्या. कोणाला हिंदी, संस्कृत अथवा इंग्रजी मार्गदर्शनाची गरज पडली तर तेही काम थोड्या फार प्रमाणात केले. हळूहळू संध्याकाळच्या सावल्या गडद होऊ लागल्या. माझ्या वाढत्या वयोमानाचा विचार करून विभावरीने दृष्टिपथात आलेल्या बढतीकडे पाठ फिरवून नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. आणि माझा संपूर्ण संन्यासाश्रम सुरू झाला. आता स्वतःच्या बौद्धिक व शारीरिक क्षमतांचा विचारपूर्वक वापर करून उरलेले आयुष्य इतरांना कमीत कमी त्रास देऊन कसे जगता येईल याचा विचार करते, व अक्षरशः परमेश्वराचे नामस्मरण करून त्याने दिलेले उर्वरित आयुष्य जगण्याचा प्रयत्न करते आहे.

हरिः ओम् तत्सत्.

❍❍❍

# लेखिकेच्या काही कविता

### १) रोहिणीच्या एका उत्तम यशानंतर स्फुरलेली कविता

**कन्या :** आई तुझे डोळे ओले आज कशासाठी झाले
नको सांगू शब्दावीण मला सारे समजले।
आज माझ्या परीक्षेचे कल तुझ्या हाती आले
आणि तुझ्या डोळ्यातून पूर अश्रूंचे लोटले।
पुत्रहीनतेची खंत तुझ्या जिवाला जाळिते
आणि अशी अचानक उफाळून वर येते।
नाव लावणारा पुत्र होणे नाही ग हातात
नाव काढणारी कन्या आई मी होईन निश्चित।

**आई :** नको बोलू माझे बाई नको घलू मला कोडी
माझी गुणी गुणवंती लाख मोलाची लालडी।

✻

### २) दै. सकाळमध्ये आलेल्या एका कवितेचे हे विडंबन

नको नको रे पावसा असा धिंगाणा अवेळी
आज माझ्या घरी आहे किती पार्टी संध्याकाळी।
नको नाचू तडातडा असा कौलारावरून
हिरवळीवर किती कसे घालू पांघरूण।
नको करु झोंबाझोंबी साडी कडक इस्त्रीची
तिचा होईल पाचोळा माती माझ्या रुबाबाची।

आडदांडा नको येऊ झेपावत दारातून
माझी वेलकम रांगोळी नको टाकू विस्कटून।
किती सोसले मी तुझे माझे एवढे टोक ना
माझी कामवाली बाई तिला लवकर आण ना।
तिचे घर दूरदूर आहे सखल भागात
विजबाई कडाडून करु नको ते उध्वस्त।
आण पावसा राजसा तिला नीट सांभाळून
टाकीन मी जीव माझा तुझ्यावर ओवाळून।
घाल किती ही धिंगाणा मग मुळी न बोलेन
तुझे लोभस कपडे ध्यानी मनी साठवीन ।

*

## ३) अनुभूती

अणुरेणूतुन व्यापुनि उरला
वास जगीचा जरी तव सरला।

लुकलुकणारा तारा होऊन
विशाल सुंदर नभागणातुन
कूर्मदृष्टीने पाहसी मजला
वास जगीचा जारी तव सरला।

लहर वायुची स्पर्शुनी जाते
अस्तित्वाची जाणीव देते
सुगंध स्मृतिचा हृदि दरवळला
वास जगीचा जरी तव सरला।

झुळझुळणाऱ्या जललहरीतुन
सळसळणाऱ्या पर्णराजीतुन
आश्वासक तव ध्वनी उमटला
वास जगीचा जरी तव सरला।

कर्तव्याचा पथ आचरुनी
कृतार्थ आपुले जीवन करुनी
मुक्तिपथावर अग्रेसरला
वास जगीचा जरी तप सरला।

चराचराच्या अनुभूतितून
विश्वदर्पणी अमूर्त प्रकटन
विषाद मातिचा समूळ विरला
वास जगीचा जरी तव सरला

*

## ४) पतिनिधनाच्या दुःखातून सावरताना

आमच्याजवळ काहीच नव्हते
तरी आम्ही सुखात होतो।

कडाक्याच्या थंडीत
आभाळाची पांघरून दुलई
टक्के टोणपे खात होतो
खाच खळगे चुकवीत होतो
चढत होतो पडत होतो
पुन्हा उठून उभे राहून
उजाड माळराळ तुडवीत होतो ।

कधी उमेद खचत होती
कधी मने पिचत होती
वर्षामागून वर्षे झिजत होती
एकमेकांना आधार देत
तोल आम्ही सावरत होतो।

करून हाताची उशी
शेज आमची सजवत होती

थंडगार फरशी
रणरणत्या उन्हात वणवण
आम्ही भरकटत होतो
कोसळत्या पावसात
सुसाट वादळवाऱ्यात
चिंब भिजून थिजत होतो
एक असे मांडीला
एक असे दांडीला
शालू शेले, दागदागिने
केशर काजू बदाम पिस्ते
दुरूनच नुसते पहात होतो
नाकासमोर चालत होतो
वाकडी वाट करत नव्हतो
शॉर्टकट शोधत नव्हतो
कर्मण्ये वाधिका रस्ते
मंत्र जपत चालत होतो।
विजयाची आस होती
'आगे बढो' ध्यास होता
प्रयत्नांची साथसंगत
आणि मनाचा निर्धार
हाच आमचा आधार होता।
संध्याकाळी दमून भागून
घरी परत आल्यावर
आम्ही दोघे एकाच ताटात जेवत होते।
तुम्ही म्हणाल 'Oh how romantic'
पण खर विचारल तर

घरात एकच ताट होते
म्हणून हा रोमान्स होता ।

अजनुही मी सुखातच आहे
डोंगरमाथ्यावर उभी आहे
अंगावर मायेची शाल आहे.
पण सखा नाही शेजारी
हाच एक सल आहे।

*

**भास्कराचार्यांच्या लीलावती ग्रंथातील काही श्लोकांचे स्वैर भाषांतर आणि भास्कराचार्यांची लेखिकेने संस्कृतमधे उचललेली प्रार्थना**

बाले बालकुरंगलोल नये लीलावति श्रूयताम्।
ते तात भास्कराचार्यस्य लीलावत्यां समाविष्टम्।।
हसन् क्रीडन् गणिताध्यापन कौशल्यं।।
प्राकृते अनुवादयाम्यद्याहं तर्हि देहि मे।
आशीर्वचः इति प्रार्थयति मालती।।

*

**लीलावतीमधील गणिती कोड्यांचे स्वैर भाषांतर**

**संदर्भ ग्रंथ - लीलावती पुनदर्शन, लेखक-प्रा.ना.ह.फडके**

**श्लोक क्र. १**

स्वार्धं प्रादात्प्रयागे नवलवयुगलं योऽवशेषाच्च काश्याम्।
शेषांध्रिं शुल्कहेतोः पथि दशमलवान्षट् च शेषाद् गयायाम्।।
शिष्टा निष्कत्रिषष्टिर्निजगृहमनया तीर्थपांथः प्रयातः।
तस्य द्रव्यप्रमाणं वद यदि भवता शेषजातिः श्रुताऽस्ति।।

तीर्थस्थळांच्या भेटीगाठी एक प्रवासी गेला।
बांधून घेतले द्रव्य काहिसे मार्गी खर्चायाला।।
प्रयोगक्षेत्री अर्धा त्याचा कसा रिकामा झाला।
उरलेल्यातिल द्विनवमांश काशीक्षेत्री सरला।।
शेष राहिले त्यातिल चवथा यात्रा करतो भरला।
शिल्लक बाकीमधून वेचिले सहा दशांश गयेला।।
तीन आणखी साठ घेऊनी परत गृहाप्रती आला।
सांगा तर मग किती द्रव्य तो गाठी घेऊन गेला।।

(उत्तर ५४० नाणी)

*

**श्लोक क्र. २**

लोलाक्ष्या प्रियनिर्मिता वसुलवा भूषा लालटेऽर्पिता।
यच्छिष्टास्त्रिगुणाद्रिभागकलिता न्यस्ता कुचान्तःस्रजि।।
शिष्टार्धं भुजनालयोर्मणिगणः शेषाब्धिकस्त्र्याहतः।
कांच्यात्मा मणिराशिमाशु वद मे वेण्यां हि यत्षोडश।।

प्रियतम देई काही रत्ने अपुल्या प्राणप्रियेला।
अलंकार ती मोहक घडवी भूषविण्या निज कायेला।।
बिन्दीमध्ये तिने जडविली एक अष्टमांश।
माळ रुळे कंठात त्यामध्ये उरली त्यांचा तीन सप्तमांश।।
शेष राहिली त्यातिल अर्धी दंडावरल्या वाकीत।
बाकी उरली त्याचे केले चार भाग अन् तीन जडविले कटिबंधनात।।
तरिही उरली सोळा त्यांना माळियले कचपाशात।
किति रत्ने निज देई प्रियतम सांग मला त्वरित।।

(उत्तर २५६ रत्ने)

*

**श्लोक क्र.३**

हारस्तारस्तरुण्या निधुवनकलहे मौक्तिकानां विशीर्णः।
भूमौ यातस्त्रिभागः शयनतलगतः पंचमांशोऽस्य दृष्टः।।
प्राप्तःषष्ठः सुकेश्या गणक दशमकः संगृहीतः प्रियेण।
दृष्टं षट्कं च सूत्रे कथय कतिपयैर्मौक्तिकैरेष हारः।।

पतिपत्नीतिल विलोल विभ्रम ।
चुकून तुटली मौक्तिक माला।
मणी विखुरले चोहिकडे ।।
ओच्थाज सांडला भाग तीसरा
पडे पाचवा जमिनीवरती।
भाग सहावा आणि दहावा।
गोळा केले दोघांनी।।
सहा राहिले दोऱ्यातच तर
मालेत मणी किति होते?

(उत्तर ३० मोती)

*

**श्लोक क्र. ४**

षड्भागः पाटलीषु भ्रमरनिकरतः स्वत्रिभागः कदम्बे।
पादश्चूतद्रुमे च प्रदलितकुसुमे चंपके पंचमांशः।।
प्रोत्फुल्लांभोजखंडे रविकरदलिते त्रिंशदंशोऽभिरम्ये।
तत्रैको मत्तभृंगो भ्रमति वद सखे का भवेद्भृंगसंख्या।।

सुगंध शोधित भ्रमर पातले
भ्रमरथव्यातिल भाग सहावा लाल लोघ्र वृक्षावरती।

भाग तीसरा आणिक चवथा कदंब, आम्रतरुवरती।।
भाग पाचवा मजेत शिरला प्रफुल्ल चंपक वृक्षावरती।
भाग तिसावा रविकिरणांनी मुकुलित कमलदलावरती।।
शेष एकला मत्त भृंग तो उगाच घिरट्या घालित फिरला।
तर मग सांग, सख्या थवा तो किति भ्रमरीचा आला।।

(उत्तर ६० भुंगे)

*

**श्लोक क्र. ५**

यातं हंसकुलस्य मूल दशकं मेघागमे मानसं।
प्रोड्डीय स्थलपद्मिनीवनमगादष्टांशकोंऽभस्तटात्।।
बाले बालमृणालशालिनी जले केलिक्रियालालसम्।
दृष्टं हंसयुगत्रयं च सकलां यूथस्य संख्यां वद।।

हंसभव्याचे वर्गमूळ जे,
दसपट त्याचा हंस उडाले,
मेघागम होताच मानसी।।
हंसथव्याचा भाग आठवा,
जास्वंदीच्या रमे बनी।।
कमलसरोवरि करिती क्रीडा,
तीन जोडपी हंसांची।।
सांग बालिके हंसयण्याची
संख्या किती होती?

(उत्तर १४४ हंस)

*

**श्लोक क्र. ६**

पार्थः कर्णवधाय मार्गणगणं क्रुध्दो रणे संदधे।
तस्यार्धेन निवार्य तत्छरगणं मूलैश्चतुर्भिर्हयान्।।
शल्यं षड्भिरयेषुभिस्त्रिभिरपि च्छत्रं ध्वजं कार्मुकम्।
चिच्छेदास्य शिरः शरेण कति ते यानर्जुनः संदधे ।।

क्रुद्ध जाहला पार्थ पेटला अंगार त्याचिया नयनात।
बाण भराभर सोडि कराया कर्णाचा तो निःपात।।
अर्ध्या शरसंख्येने त्याने कर्णबाण निष्प्रभ केले।
वर्गमुळाची चौपट करुनि कर्णरथाचे अश्व मारिले।।
षट् बाणांनी शल्य मारिला तीन शरांनी छत्र ध्वज चाप।
एका शराने भेदी मस्तक किति शर त्याने सोडियले?

❍❍❍



लेखिका: **श्रीमती मालती गोडबोले**

## ✻ अल्प परिचय ✻

✻ लेखिका हुजूरपागा प्रशालेतील माजी शिक्षिका आहेत.

✻ लग्नाच्या वेळी फक्त इंटर आर्ट्‌सपर्यंत शिक्षण झालेले असताना हळूहळू संधी मिळेल तसे M.A.B.Ed. पर्यंत शिक्षण पूर्ण केले.

✻ वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षी नोकरीला सुरवात केली. नोकरीच्या कालखंडात नाट्यस्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा अशा अनेक उपक्रमांमधे विद्यार्थिनींना मार्गदर्शन करून जिल्हा व राज्य पातळीवर अनेक पुरस्कार मिळवले.

✻ शिवणकाम, विणकाम, भरतकाम, पाककला अशा अनेक कलांमधे लेखिका पारंगत आहे.

✻ वयाची नव्वदी पार केल्यानंतरही आयुष्याकडे बघण्याच्या सकारात्मक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब ह्या पुस्तकात दिसते.